**Impact Factor 5.982**
**www.sjifactor.com**

**p-ISSN 2454-7409**
**e-ISSN 2582-5305**

डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र व
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद
यांचा संयुक्त उपक्रम

वर्ष दहावे अंक पहिला जानेवारी २०२५
**Vol. 10 Issue 1**
**Jan. 2025**
**Regular Issue**

# मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका





# MPSP

www.indiramahavidyalaya.com

**Peer Reviewed Annual National Indexed Research Journal in Marathi**
**Published as per UGC (India) Guidelines**

मराठी भाषा,साहित्य, संस्कृती व अस्मिता जोपासणारे मराठी विषयाचे प्राध्यापक,
संशोधक आणि अभ्यासक यांच्या संशोधनकार्याला चालना देणारे वार्षिक

Online & Print
**Published By**
**DBMRC**
**INDIRA MAHAVIDYALAYA**
KALAMB, DIST. YAVATMAL, MAHARASHTRA 445 401 (India)

Impact Factor 5.982 p-ISSN 2454-7409 e-ISSN 2582-5305

डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र आणि
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद यांचा संयुक्त उपक्रम

# मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका

# (MPSP)

Peer Reviewed Annual National Research Journal as per UGC Guidelines
VOL 10 ISSUE 1 January 2025
वर्ष दहावे, अंक पहिला, जानेवारी २०२५

**मुख्य संपादक**
डॉ. पवन मांडवकर
संस्थापक अध्यक्ष, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र
अध्यक्ष, सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद तसेच प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब
**Chief Editor**
**Dr. Pavan Mandavkar**
Chairman, DBM Research Centre
President, Sant Gadge Baba Amravati Vidyapeeth Marathi Pradhyapak Parishad, Amravati
Address: Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra, India 445 401
E Mail: marathipradhyapak@gmail.com Mobile No: +91-9422867658

**सहसंपादक व प्रकाशक**
प्रा.डॉ.सौ. वीरा मांडवकर
संचालक, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१
**Associate Editor & Publisher**
**Dr. Mrs. Veera Mandavkar**
Director, DBM Research Centre
Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra, India 445 401
E Mail: veeramandavkar18@gmail.com Mobile No: +91-9403014885

## संपादक मंडळ Editorial Board

प्रा. नीलकंठ नरुले, प्रा. सरोज लखदिवे, डॉ. कैलाश नेमाडे, डॉ. दशरथ चव्हाण, डॉ. वेद पतकी
**1. Prof. N.V. Narule,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: narulenilkantha3@gmail.com Mobile No.: +91-9923909296
**2. Prof. S.Y. Lakhadive,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: saroj20lakhadive@gmail.com Mobile No.: +91-9420199479
**4. Dr. K.R. Nemade,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: krnemade@gmail.com Mobile No.: +91-7020242364
5. **Dr. D.M. Chavhan,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: dmchavhan1985@gmail.com Mobile No.: +91-9637360295
6. **Dr. V.R. Patki,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: vedpatki@gmail.com Mobile No.: +91-9960153188

## Invited Editors

**1. Vikram Raje,** 4, Alderman Willey Close, Wokingham – RG41 2AQ, Berkshire, UK
**2. Vishal Dahalkar,** 20747, N Margaret Ave, Prairie View, IL 60069 USA
**3. Dr. Anita Gupte Patil,** Auckland, New Zealand
**4. Ranjit Raje,** 201/83 Whiteman Street, Southbank, Melbourne, VIC-3006, Australia

## Advisory Board

1. **Mrs. Sonali Dahalkar**, 20747, N Margaret Ave, Prairie View, IL 60069 USA
2. **Dr. J. Prabhash**, Former Pro-VC, Uni. of Kerala, Thiruvananthpuram, Director General of State institute of parliamentary affairs, Visiting fellow of diff. Uni. Australia, USA
3. **Dr. Ramesh Mangal**, Ex. Principal, MKHS Guj. College & Director SVCC, Indore, M.P.
4. **Dr. Anil Gajbhiye**, Ex. Principal, Govt. college Sardarpur, Dist. Dhar, M.P.
5. **Dr. Prakash Somalkar**, Ex. Principal, Gurukul Arts, Commerce & Science College, Nanda Ta. Korpana, Dist. Chandrapur
6. **Dr. P.W. Kale**, Ex. Dean, Faculty of Commerce, S.G.B. Amravati University, Amravati
7. **Dr. Leela More**, Ex-Professor, Government College, Indore, M.P.
8. **Dr. Sindhu Mandavkar**, Ex-Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra
9. **Dr. Upinder Dhar,** Vice Chancellor, Shri Vaishnav Vidyapeeth Vishwavidylaya, Indore, MP
10. **Dr. Karunesh Saxena,** Vice Chancellor, Sangam University, Bhilwara, Rajasthan
11. **Dr. Rajesh Vyas,** Principal, Christian Eminent College, Indore, M.P.
12. **Dr. Atul Patel,** Dean, Smt. Chandaben M. Patel Institute of Computer Applications, Charotar University of Science and Technology, Changa, Gujarat.



**मुद्रक :** सेवा प्रकाशन, विजय कॉलनी, रुक्मिणी नगर, अमरावती ४४४६०६

**मुखपृष्ठ व संगणक :** डॉ. पवन मांडवकर



Communication

Dr. Bhau Mandavkar Research Centre
Indira Mahavidyalaya, kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra 445 401
E mail: marathipradhyapak@gmail.com
Alternate mail id: researchjournalofindia@gmail.com
Telephone: +91-7201-226147, 226129 Mobile No.: +91-9422867658, +91-9403014885
**Website:** www.indiramahavidyalaya.com



**Online Access Free / Subscription for hard copy for a year including special issues Rs. 700/-**
by crossed Cheque or by DD or by RTGS/IMPS A/c in favour of **Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre,** A/c No. 60175373000, Bank Of Maharashtra, Branch - Azad Maidan Road, Yavatmal, IFSC - MAHB0000047, MICR - 445014001



(सूचना : या नियतकालिकात प्रकाशित झालेल्या लेखांचे किंवा शोधनिबंधांचे अधिकार त्या त्या लेखकांकडे असले तरी इतरत्र प्रकाशनार्थ संपादक मंडळाची परवानगी घेणे गरजेचे आहे. संदर्भ वापरताना या नियतकालिकाचा उल्लेख करणे आवश्यक आहे. मात्र या लेखांमधून अथवा शोधनिबंधांतून प्रकाशित मतांशी संपादक मंडळ, सल्लागार मंडळ किंवा प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. मूळ संदर्भ तपासून घेण्याची विनंती वाचकांना करण्यात येत आहे. मुद्रणदोषासह कोणत्याही चुकांबद्दल दिलगिरी व्यक्त केली जाईल; मात्र कायदेशीर बाबी कळंब येथील न्यायालयांतर्गतच सोडविता येतील.)

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १ | नव्वदनंतरच्या लेखनातील सर्जनशीलता | डॉ. विजय जाधव | ५–७ |
| २ | लोककलेचा उपासक : पोतराज | प्रा. डॉ. जवाहर लक्ष्मण मोरे | ८–१३ |
| ३ | तिच्या सेल्फीत तो दिसत नाही : वेदनांचा हुंकार | डॉ. अर्चना काटकर | १४–१७ |
| ४ | मराठी भाषा अपभ्रंश ते अभिजात | प्रा. शिवदास गोविंदराव मुंडे | १८–२३ |
| ५ | 'रुद्रवीणा' कवितासंग्रहातील राष्ट्रभक्तीपर कविता | डॉ. दुष्यंत शिंदे | २४–२८ |
| ६ | **शेतकऱ्यांच्या विपन्नावस्थेवर महात्मा फुले यांनी सुचविलेले उपाय** | **डॉ. पवन मांडवकर** | २९–३३ |
| ७ | जीवनानुभव प्रकट करणाऱ्या कथा : ओंजळीतील फुले | प्रा. सुखदेव विष्णू कोल्हे | ३४–३६ |
| ८ | क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे सामाजिक व शैक्षणिक कार्य | प्रा. डॉ. प्रमोद दामोदर देवके | ३७–४० |
| ९ | अहिराणी बोलीतील म्हणींची भाषिक वैशिष्ट्ये | जयदिप ओंकार कदम[१]<br>डॉ. प्रतिभा सुरेश जाधव[२] | ४१–४८ |
| १० | **साठोत्तरी मराठी कादंबरीतील श्रीकृष्णाचे सांस्कृतिक मूल्यांचे प्रतिबिंब – संक्षिप्त अध्ययन** | **कु. कीर्ती व्ही. कोशटवार[१],<br>डॉ. पवन मांडवकर[२]** | ४९–५४ |
| ११ | राजकारणातल्या वृत्ती-प्रवृत्तींचा वेध घेणारी 'आमदार सौभाग्यवती' | अंगद श्रीपती भुरे | ५५–५८ |
| १२ | मराठी भाषा आणि प्रसार माध्यमे सहसंबंध | प्रा. डॉ. संतोष विष्णू चतुर | ५९–६५ |
| १३ | **डॉ. योगेंद्र मेश्राम यांच्या कथांचा विषय** | **प्रा. विलास मेश्राम[१]<br>डॉ. राजेन्द्र वाटाणे[२]** | ६६–६८ |
| १४ | मावची आदिवासींच्या लोककथा : स्वरूपमीमांसा | प्रा.डॉ. माहेश्वरी वी. गावित | ६९–७६ |
| १५ | वर्तमानाचा अचूक वेध घेणारा काव्यसंग्रह "वर्तमान तुडवताना" | प्रा. डॉ. पी. आर. जाधव | ७७–८० |
| १६ | उत्तम बंडू तुपे यांच्या कथेतील समाजवास्तव: एक दृष्टिक्षेप | प्रा.डॉ. अन्नपूर्णा अ. चौधरी | ८१–८३ |
| १७ | दलित आत्मकथनांची वाटचाल | प्रा. डॉ. अतुल नारायण चौरे | ८४–९० |
| १८ | राष्ट्रसंतांची ग्रामोद्धारक दृष्टी | प्रा. डॉ. करुणा व. डहाके | ९१–९६ |
| १९ | साहित्य व चित्रपट भाषा : एक अभ्यास | प्रा. डॉ. विठ्ठल पं. लंगोटे | ९७–१०० |
| २० | **आदिवासी कोलाम जमातीच्या संस्कृतीचे दर्शन घडविणारे भाऊ मांडवकर** | **दिपाली विजय ठावरी[१]<br>डॉ. मृदुला निळकंठ रायपूरे[२]** | १०१–१०४ |
| २१ | **भटक्या विमुक्त समाजाची कला** | **प्रा. डॉ. विजयकुमार खंदारे** | १०५–१०७ |
| २२ | उच्च शिक्षणातील समस्या | प्रा. डॉ. उज्ज्वला भोर | १०८–११२ |
| २३ | कवी नारायण मुरलीधर गुप्ते यांच्या कवितेचे स्वरूप | प्रा. डॉ. लालबा चां. दुमटकर | ११३–११५ |
| २४ | अण्णा भाऊ साठे यांच्या 'लोकमंत्र्यांचा दौरा' या वगनाट्याचे स्वरूप व समकालीन प्रस्तुतता | डॉ. कैलास सोनू महाले | ११६–११९ |
| २५ | **सिमोन द बोव्हुआर : जीवन आणि लेखन** | **प्रा. डॉ. नंदकुमार ग. भाकरे** | १२०–१२३ |
| २६ | **तुकडोजी महाराजांचे शिक्षणविषयक विचार** | **प्रा. डॉ. सी. डी. पाखरे** | १२४–१२७ |
| २७ | लेखकाच्या अभ्यासगुणाची सिद्धता | प्रा. डॉ. मार्तंड कुलकर्णी | १२८–१३१ |
| २८ | लोकरंगभूमीवरील रामायण-महाभारताचा प्रभाव | **प्रा.डॉ.सौ. वीरा पवन मांडवकर** | १३२–१३६ |

# संपादकीय

'मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिके'चा हा दहाव्या वर्षीचा पहिला अंक. शोधनिबंध लेखकांनी शोधनिबंध लेखनाच्या आंतरराष्ट्रीय पद्धती पाळून त्याचा मूल्यात्मक व वाङ्मयीन दर्जा सांभाळावा, ही आमची अपेक्षा असते. त्यात गोषवारा अथवा सारांश, बीजशब्द, प्रस्तावना, निष्कर्ष किंवा समारोप, संदर्भ यांचा समावेश अनिवार्यपणे करावा. शुद्धलेखनाच्या चुका नसाव्यात. शोधनिबंध पूर्णतः तपासूनच पाठवावा, असे आवाहन आम्ही नेहमची करतो. जर्नल हे गूगल, एसएसआरएन, रिसर्च गेट यांच्याशी लिंक केले असल्याने आपल्या निबंधाचे शीर्षक, लेखकाचे नाव व गोषवारा युनिकोड फॉन्टमध्ये मराठीत व त्याखाली इंग्रजीत अनुवाद टाईम्स न्यू रोमन मध्ये पाठविल्यास त्याचा आपल्याला फार मोठा फायदा होतो.

या अंकासाठी संशोधकांनी विविध विषयांवरील उत्तमोत्तम शोधनिबंध प्रकाशनार्थ पाठविले व पीअर रिव्ह्यू समितीकडून झालेल्या छाननीतून दुरुस्त्या सुचवून प्रकाशनयोग्य अशा निबंधांना स्वीकारल्यानंतर हा अंक तयार झाला आहे. आंतरराष्ट्रीय नियमावलीनुसार शोधनिबंध प्रकाशित करण्यासंदर्भात सर्व संशोधक, अभ्यासक लेखकांना आम्ही सतत आवाहन करतो आणि त्याला शोधनिबंधलेखकांकडून योग्य प्रतिसाद मिळतो. यूजीसीचा नियतकालिकांसदर्भात जी नियमावली आहे, तिचे तंतोतंत पालन 'मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका' करते. हे नियतकालिक संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेच्या मार्गदर्शनात प्रकाशित होते. पी—आयएसएसएन व इ—आयएसएसएन प्राप्त या नियतकालिकाचा इम्पॅक्ट फॅक्टरही पाचच्या वर आहे.

हे जर्नल इंदिरा महाविद्यालयाच्या www.indiramahavidyalaya.com या वेबसाईटवर Research Journal या हेडमध्ये ठेवले जाते. Peer Reviewed जर्नल असल्याने यातील शोधनिबंध विविध प्राधिकरणांवरील निवडीसाठी ग्राह्य धरले जातात. तसेच एपीआयसाठी Peer Reviewed जर्नलमधील शोधनिबंधांचे गुण ग्राह्य धरता येतात.

आपल्या सर्वांच्या सहकार्याने अधिकाधिक दर्जेदार शोधनिबंध ऑनलाईन व ऑफलाईन प्रकाशित करण्याची संधी 'मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिके'ला मिळत राहील, हीच अपेक्षा!

— डॉ. पवन मांडवकर
व संपादक मंडळ

# नव्वदनंतरच्या लेखनातील सर्जनशीलता

**डॉ. विजय जाधव**

राजस्थान महाविद्यालय, वाशीम

मो.: ९८८१५२७६६०

मानवी जीवनाशी संबंधित अनेकानेक महत्त्वाचे पैलू आहेत, तद्वतच अनेकानेक महत्त्वपूर्ण विषयसुद्धा आहेत. सामाजिक, कौटुंबिक, आर्थिक, आरोग्य, क्रीडा, प्रेम, लैंगिक, राष्ट्रीय, राजकीय, ऐतिहासिक, नैसर्गिक, प्रदूषण, वैश्विक, पर्यावरण, खगोलीय... असे न संपणारे सारे विषय. आणि अशा साऱ्या विषयांतून साहित्याला अलिप्त ठेवता येत नाही. या विषयांकडे साहित्याला गंभीरपणे बघावेच लागते. कारण मानवी जीवन हे या विषयांच्या कक्षेबाहेर जाऊ शकत नाही. मानवी जीवनात सकस, प्रेरक आणि वास्तववादी साहित्याचे मूल्य हे शब्दांतीत आहे हे निर्विवाद. म्हणूनच मानवाने श्रेष्ठ, सर्जनशील साहित्याला आपल्या जीवनप्रवासात श्रेष्ठत्वाचे अमिट स्थान दिलेले आहे.

कलेसाठी कला म्हणून लिहिणे वेगळे आणि वास्तवाचा पक्का हात धरून क्रांतिदर्शी लेखन करणे वेगळे. वंचित समूहांचे जीवन उन्नत व्हावे यासाठी अत्यंत तळमळीतून लेखन करताना ज्यांची प्रतिभा फुलारुन येते असाही संवेदनशील आणि अस्वस्थ मनाच्या साहित्यिकांचा आपल्या जबाबदारीचे डोळस भान असलेला एक वर्ग आहे. साहित्यिक हा कलाऽ कला म्हणत नुसत्या कलेसाठी समर्पित झालेला नसावा. त्याला स्वभान आणि सामाजिक मूल्यांचेही पुरेसे भान असणे आवश्यक आहे. त्याचे सामाजिक बांधिलकीशी अतूट नाते असण्याची गरज आहे. गंभीर, दाहक प्रश्नांच्या आक्रमणकाळात तो अस्वस्थ व्हायला हवा. विषमतेच्या विरोधात तो मानवतेच्या रक्षणार्थ निडरपणे झुंजायला ताठपणे उभा राहायला हवा. नैसर्गिक आणि मानवी मूल्ये त्याने जपायला हवीत.

शूद्र, अतिशुद्रांची अधोगती ही विषम व्यवस्थेने केली. त्यांना शिक्षणाची दारे उघडण्यास मज्जाव केलेला होता हेसुद्धा प्रमुख कारणांपैकी एक आहे. खरे म्हणजे ब्रिटिशकाळातच प्रस्थापित व्यवस्थेला हादरे बसायला लागले, तरीही भारतीय व्यवस्थेत पूर्णतः हस्तक्षेप करायला ब्रिटिशसत्ता अनुकूल नव्हती. देशात खरी परिवर्तनप्रक्रिया सुरू झाली ती स्वातंत्र्यानंतर, पण तिलाही मर्यादा होत्या. ब्रिटिशांनंतर निर्माण झालेला स्वतंत्र भारत हा नवनिर्मित संविधानाच्या कक्षेत आला. संविधानाद्वारे हजारो वर्षे व्यवस्थेने नाकारलेल्यांना त्यांचे मूलभूत अधिकार देण्यात आले, ज्यांना आपल्या पूर्वायुष्यात मुक्तपणे बोलताच आलेले नव्हते, माणूस असूनही माणसासारखे जगताच आलेले नव्हते, ज्यांनी शिक्षण घेणे हा अतिशय गंभीर गुन्हा मानला जात होता... अशा उपेक्षित, हक्कवंचितांना संविधानाने माणूस म्हणून जगण्याचे, बोलण्याचे, शिक्षणाचे, वाचण्या- लिहिण्याचे आणि इतरही हक्क देऊन क्रांतीवाटा बंधमुक्त केल्या. त्याचा परिणाम असा झाला की हळूहळू का असेना, शिक्षणप्रवाहात वंचित समूह यायला लागले. ते बोलायला लागले. त्यांच्याशी प्रथमतःच अस्मिता संवाद करायला लागली. पूर्वकाळी लेखन करणे ही एक प्रस्थापितांचीच मक्तेदारी होती, तिला खिंडार पडले आणि वंचित समूहातील होरपळत आलेल्या लोकांमधून काही लोक लिहायला लागले. त्या सुमारास अशांचे साहित्य प्रस्थापित प्रकाशक छापायला पुढे येत नव्हते. त्यांच्या साहित्याला साहित्य म्हणायला तयार नव्हते. समीक्षक तिरस्कृतपणे बघत होते, तरीही ही माणसे व्यवस्थापुरस्कृत कटकारस्थानांचा बाऊ न करता लिहीत राहिली. पुढे काही प्रकाशक अनुकूल व्हायला

लागले आणि वंचितांच्या साहित्याने आपला प्रभाव निर्माण केला. प्रारंभीच्या काळात हे साहित्य सर्जनशील लेखनशैलीपासून दूर होते, पण अनुभव सर्जनशीलतेशी नाते सांगणारे होते. ते दाहक वास्तवातून आलेले होते. तत्पूर्वी साहित्यात असे घडलेले नव्हते. याच साहित्याने मराठी साहित्य अधिक समृद्ध केले, पण हे एवढे होण्यासाठी येथील वंचितांच्या हजारो पिढ्या काळाआड गेल्या.

जे मूकबधिर ते देहबोलीचा व्यक्त होण्यासाठी वापर करतात. शिकलेले असतील तर कागदावर लिहून आपल्या भावना व आपले म्हणणे मांडतात. शिक्षित लोक बोलतात, पण त्यातील सर्वांनाच दर्जायुक्त लिहिता येते असे नाही. लेखन करणे हा कलेचा प्रकार असे मानण्यात येते. कलेसाठी कला अशा मताचा समर्थन करणारा मोठा वर्ग अजूनही कालबाह्य झालेला नाही. खरेच लेखन ही कलाच आहे का असा प्रश्न उपस्थित झाला पाहिजे. ही कला असेल तर अवगत कशी करायची? ती सर्वच शिक्षितांना वा अक्षरओळख असणाऱ्यांना का अवगत होत नाही? आपल्याकडे संवेदनशीलता नसेल, ठाम भूमिका नसेल, सामाजिकतेचे पुरेसे भान नसेल, सकस आणि दर्जेदार साहित्यवाचनाचा अभाव असेल तर? मग याच्याशी संबंधित साहित्यिक वर्ग हा कलेसाठी स्वतः कला बनूनच आपले आयुष्य व्यतीत करणार हे उघडच आहे. आपल्या साहित्याचा विशेष दबदबा निर्माण होण्यासाठी साहित्यिकाला खूप कष्ट करावे लागतात. म्हणजे, भाषेला सामर्थ्यवान बनवावे लागते, अनुभवांकडे बघण्याची त्याला विशेष दृष्टी कमवावी लागते, भरपूर वाचन, चिंतन- मनन करावे लागते, त्याच्या अंतर्मनातून आणि त्याच्या रंध्रारंध्रातून साहित्य पाझरावे लागते. नुसती संवेदनशीलता असून वा लिहिता येते म्हणून भागत नाही. साहित्य ही मानवोभ्युदयासाठी निर्माण झालेली ऊर्जा आहे. ही एक कठोर साधना आहे. मनुष्याला उच्च आणि यथार्थ भूमिका देण्यात साहित्याचा मोठा वाटा आहे. कठीण प्रसंगी साहित्य माणसाला केवळ धैर्यच नव्हे,  योग्य अशी दिशा देण्याचेही महत्त्वपूर्ण काम करते. सर्जनशील लेखनशैलीतील सशक्त साहित्य हे माणसाच्या अंतर्मनात आपले स्थान निर्माण करते. आपले शरीर सुदृढ होण्यासाठी शास्त्रशुद्ध व्यायामाची गरज असते, तद्वतच मन सुसंस्कारित होण्यासाठी कसदार आणि मानवीय दृष्टिकोनातून निर्माण झालेल्या साहित्याची गरज असते. साहित्य हे माणसाला तणावमुक्त होण्यासही मोलाची मदत करते, याचे गांभीर्य असले पाहिजे.

लेखक व कवींकडे नुसते सशक्त अनुभव असूनच चालत नाही तर अतिशय परिणामकारक यथार्थ लेखन करण्यासाठी त्यांच्याकडे समर्थ शाब्दिक संपदा असावी लागते. त्यांचा विविध स्वरूपाच्या वाचनाचा आवाका भक्कम असावा लागतो. त्यांच्याकडे तर्कदृष्टी आणि ऐतिहासिक वाचनाबरोबरच वर्तमानाचे अचूक, तर्कशुद्ध ज्ञान असावे लागते. शब्द आणि भाषेतील बारकावे त्यांना कळणे गरजेचे असते. समाजजीवनाबरोबरच त्यांचा भाषिक कौशल्य आणि व्याकरणाचाही सखोल, व्यापक अभ्यास असला पाहिजे. लेखनासाठी त्यांना महत्त्वपूर्ण, गंभीर, विचारप्रवृत्त आणि अस्वस्थ करणारे ठळक मुद्दे शोधता आले पाहिजे. हजारो शब्द लिहून जे साध्य होत नाही ते त्याला कमीत कमी शब्दांतून प्रभावीपणे मांडता आले पाहिजे.

नेहमी नेहमी कानांवर न पडणारे कठीण आणि सहजपणे अर्थबोध न होणारे, म्हणजे दुर्बोध शब्द अनेक नामांकित साहित्यिकांच्या साहित्यकृतींमधून डोकावताना दिसतात. शिवाय, अलंकारांचा अतिरेकी वापर, पांडित्य प्रदर्शित करण्यासाठी मांडलेली शब्दांची आरास आणि अवास्तव, निरर्थक आशय-विषय अशाही निरुपयोगी गोष्टी मुबलक प्रमाणात आढळून येतात. समाजजीवनातील गंभीर आणि अस्वस्थ करणारे प्रश्न ज्यांच्या लेखनाचे विषयच होत नाहीत अशा साहित्यिकांची संख्या मोठी आहे. सोबतच, असे साहित्यिक अगदी सहजपणे उच्चार करता येणार नाही अशीच आखीव-रेखीव मांडणी करण्यात तरबेज

असतात. नको त्या व्यक्तिरेखांच्या माथी ग्रांथिक भाषेतले अकारण संवाद लादणे, त्याच भाषेतून कृत्रिम निवेदन_ या अशा गोष्टी साहित्यव्यवहारात निरसता आणि कृत्रिमता निर्माण करतात. त्या वाचकमनाला स्पर्शत नाहीत वा योग्य तो परिणाम साधत नाहीत. तरीही तकलादूपणात बरेच लेखणीवीर अडकून पडतात. लेखन करणे म्हणजे पांडित्य मिरवणे नव्हे, पण ही जाण फारच थोड्यांना असते. सर्वसामान्यांच्या दैनंदिन व्यवहारात वापरले जाणारे शब्दही योग्यप्रकारे वापरले गेले तर ते अधिक परिणामकारक होऊ शकतात.

विविध प्रकारचे लेखन करणाऱ्यांची संख्या कालपर्यंत तर होतीच, पण आता त्यात कमालीची वृद्धी होताना दिसत आहे. प्रतिवर्षी हजारोंच्या संख्येत पुस्तके प्रकाशित होतात, पण विषयांचे गांभीर्य असलेली सर्जनशील शैलीतील क्वचितच पुस्तके नजरेपुढे येतात.

मनुष्यजीवन हे दु:खव्याप्त आहे. या जीवनात नाना प्रकारचे प्रश्नांमागून प्रश्न शिरकाव करतात. प्रचंड स्वरुपाची आव्हाने येतात आणि ती मनुष्याला हतबल, हतोत्साहित करण्याचे बलशाली प्रयत्न करतात. मनुष्याला वेळोवेळी नाना संघर्षांना सामोरे जावे लागते. पुष्कळदा कमालीची घुसमट होते. दुरावे हे अमानुष बनून भयंकर आक्रमणे करतात. बहुतेक वेळा मनुष्याला एकाकी पडावे लागते. अशा सर्वच कठीण प्रसंगी मानवी मूल्यांना समर्पित असलेले साहित्य हे खऱ्याखुऱ्या मित्रत्वाची भूमिका पार पाडू शकते.

सर्जनशील लेखनशैली ही अनुकरणातून प्राप्त होत नाही. ती साहित्यिकांना प्रगल्भ जाणिवेतून, प्रचंड वाचनातून, लेखनसातत्यातून, तर्कशुद्ध विचारांतून, कठोर साधनेतून आणि विशेष गांभीर्यातून प्राप्त होऊ शकते. साहित्यिकाने आपले शब्दसामर्थ्य वाढवले पाहिजे, अनुभवक्षेत्र विस्तारित कसे होईल याकडे लक्ष दिले पाहिजे, सर्जनशीलता त्याच्या लेखणीचे बलस्थान बनले पाहिजे आणि सर्जनशील लेखनशैली अवगत करण्याकडे त्याने विशेष लक्ष पुरविले पाहिजे. असे झाले तर त्याच्या साहित्याचा वाचकमनावर खोलवर परिणाम होईल आणि साहित्याकडून दर्दी वाचकाला हेच अपेक्षित आहे.

❖❖❖

# लोककलेचा उपासक : पोतराज

**प्रा. डॉ. जवाहर लक्ष्मण मोरे**
संतोष भीमराव पाटील महाविद्‌यालय, मंद्रूप
मो.नं. ९४२१०२४९७९

## प्रस्तावना

महाराष्ट्राला समृद्ध अशा लोककला प्रकाराची प्रदीर्घ परंपरा आहे. या लोककला जिवंत ठेवण्याचे व्रत हाती घेतलेले असंख्य लोककलाकार आहेत. परंतु बदलत्या काळानुसार याचे प्रमाणही कमी होत चालले आहे हे नाकारता येणार नाही. म्हणून प्रस्तुत लेखात लोककलेचा उपासक पोतराज याच्या परंपरा व स्वरुपाविषयी माहिती दिली जाणार आहे. लोककलेचे उपासक म्हणून पोतराज, डहाक, मसणजोगी, बहुरुपी व पांगूळ यांचा समावेश होतो.खरं पाहिलं तर लोककला हा सांस्कृतिक ठेवा आहे. अध्यात्मिक, सामाजिक, धार्मिक व व्यावसायिक व्यवहाराच्या दृष्टीने मानवी भावना आणि परस्परांशी संबंध जोडलेला आहे. त्यामुळे पुढे या लोककलांना भावना, श्रध्दा, देव, धर्म यांचे अधिष्ठान प्राप्त झाले. यातूनच लोककलेचा अधिक विकास होत गेला असेही म्हणता येईल. एवढेच नव्हे तर लोककला हा लोकसाहित्याचा अनमोल ठेवा आहे. याची प्रचिती आली. म्हणूनच पोतराज या लोककला उपासकाची परंपरा व स्वरुप जाणून घेणे मला उचित वाटले.

## पोतराज : परंपरा व स्वरूप

महाराष्ट्र राज्यांतील प्रत्येक गावामध्ये मरिआई या देवीचे मंदिर असतेच. ते मंदिर गावामध्ये असले तरी पूर्वी या मरिआई देवीचे मंदिर गावाच्या सीमेवर असायचे. गावावर येणारे संकट किंवा साथीचे रोग यांना दूर करण्याचे किंवा गावात शिरू न देण्याचे काम ही देवी करत असते. पोतराज हा मरिआईचा भक्त असतो. गावाच्या रक्षणासाठी किंवा सुरक्षेसाठी हा भक्त मुक्ती मागत असतो. कंबरेला आभरान बांधलेले असते. त्यावर मोठमोठी घुंगरं बांधलेली असतात. पुरूष असूनही स्त्रियांसारखे केस वाढवलेले असतात. कपाळावर मळवट भरलेला असतो, तोंडाला शेंदूर लावलेला असतो. पायातही चाळासारखे घुंगरू बांधलेले असतात. हातात हलगी, खांद्यावर कोरडा आणि भिक्षेसाठी झोळी अडकवलेली असते.[१] अशी माहिती डॉ. महादेव देशमुख यांच्या ग्रंथात आढळते. हलगीच्या आणि घुंगरांच्या आवाजाने गावात पोतराज आल्याचे कळते. एकूणच पोतराजाची वेशभूषा ही भयाण आणि उग्र असते. तरीपण तो दारात आल्यावर देवीच प्रत्यक्ष आल्यासारखे घरातील प्रत्येक महिलेस वाटत असते. देवीचा महिमा तो गाण्यातून सांगत असतो. तेव्हा ऐकणाऱ्या महिला व लहान मुले आनंदी होतात. त्यानंतर महिला आपापल्या घरातून सुपातून धान्य किंवा पीठ आणतात आणि पोतराजाच्या इ गोळीत टाकतात. यावेळेस पोतराज प्रत्येकास कपाळी अंगारा लावून आशीर्वाद देत असतो. म्हणून आजही कमी अधिक प्रमाणात या पोतराजाचा कलात्मक आविष्कार टिकून आहे.

पोतराज हा शब्द द्रविड भाषेतील पोतुराजु या शब्दाचा मराठी अपभ्रंश आहे. पोतु म्हणजे रेडा किंवा बकरा. ग्रामदेवतेच्या यात्रेवेळी पशुबळी देण्याची प्रथा असते. त्यामुळे बळीक्रिया पार पाडणारा उपासक म्हणजे 'पोतराज' असे नामाभिधान झाले असावे, असा उल्लेख रा. चिं. ढेरे यांच्या ग्रंथात

आढळतो.[२] मरिआई आणि लक्ष्मीआई या देवीचे भक्त म्हणून पोतराज उपासना करत असतात. या देवी गावावर येणाऱ्या संकटाचे निराकरण करत असतात. त्याचबरोबर प्लेग, नारू, पटकी, देवी यासारख्या साथीच्या रोगाचा प्रसार थांबवण्यासाठी किंवा रोगमुक्त गाव करण्यासाठी मरिआई देवीचा गाडा पोतराज व त्याची बायको गावात नेत असतात. त्या गाड्यात मरिआईची मूर्ती किंवा मुखवटा ठेवलेला असतो. भक्तगण त्याचेच दर्शन घेत असतात.

पोतराजाचा दुसरा भाग म्हणजे पोतराज होण्यासाठी दीक्षाविधी केला जातो. आषाढ महिन्यातील मंगळवार किंवा शुक्रवार या दिवशी हा विधी पार पडतात. महार, होलार किंवा मातंग या जातीतील मुलाला परंपरेने पोतराज बनवले जाते. पुढे मुलाला पोतराजाची दीक्षा दिली जाते. या दीक्षाविधीला बढण असे म्हणतात.[३] मग हा पोतराज मरिआईला प्रसन्न करून घेण्यासाठी मोठमोठ्या आवाजात मरीआईला हाका मारतो. केस मोकळे सोडून सोबत असलेल्या आसूडाने अंगावर फटके मारतो. बेभान होऊन नाचत असतो. अशावेळी गावातील लहान मुले, महिला जमा होतात. तरीही आई प्रसन्न होत नाही म्हटल्यावर हा पोतराज देवीशी संवाद साधतो. दार उघड बये दार उघड म्हणून विनवण्या करतो. दंडाच्या स्नायूत दाभण खुपसून घेतो, मनगट दाताने फोडण्याचा प्रयत्न करतो. शेवटी मरिआई प्रसन्न होते, मग पोतराज मरीआईला गावाची पिडा दूर कर, गावाचं भलं करण्याचं साकडं घालतो. मरिआईकडून होकार मिळाल्यानंतर गोळा झालेल्या आया-बाया पूजा करतात, मरिआईची ओटी भरतात, सुपात आणलेले धान्य पोतराजाच्या झोळीत टाकतात. ही मरिआई कडक दैवत असल्याने तिला कडकलक्ष्मी असेही म्हणतात म्हणून कडकलक्ष्मी हे नाव पोतराजालाही वापरले जाते. आईला प्रसन्न करून घेणे, मरिआईवर समस्यांचा भार टाकणे, समस्या सोडवून घेणे, पोतराज आणि गावकऱ्यांनी समाधानी होणे यासाठीच पोतराजांकडून हा विधी पार पाडला जातो. आषाढ महिन्यात प्रत्येक गावात हा पोतराज दारोदारी फिरत असतो. गावातील लोक आईवा फेरा आलाआहे, अशी समजूत करतात आणि पोतराजाच्या बाजूला जमा होतात पोतराज, त्याची बायको, मूल किवा साथीदार मिळून आली भूमिका सादर करत असतात. त्यामागे त्यांची निष्ठाही महत्त्वाची असते. ज्या ज्या गावात मरिआई आणि लक्ष्मी आईच्या यात्रा भरतात, त्या प्रत्येक यात्रेत पोतराजाच्या पुढाकाराने देवीची उपासना पार पाडली जाते. त्यावेळी पोतराजाच्या अंगातही येत असते. त्यावेळी त्याचे रौद्ररूप भयावह असते. पोतराजाचे हलगीवर नाचणे, गोल गिरकी घेणे, अंगावर आसूड मारून घेणे, दाताने लिंबू फोडणे, डोळे वटारून, फिरवून नाचणे असे प्रकार पोतराज हा करत असतो. अशातच काही बायका पोतराजाला नवसही बोलतात. हा पोतराज फक्त यात्रेतच किंवा आषाढ महिन्यातच दिसतो असे नाही. तर दर मंगळवार आणि शुक्रवार या दिवशीही दारोदारी जाऊन गाणी गाऊन भिक्षा मागत असतो. असा हा पोतराज पोटाची खळगी भरण्यासाठी बाकीचे दिवस तो इतर मजुरीची कामे करत असतो. आजही पोतराजाची अशीच परिस्थिती प्रामुख्याने दिसून येते. ज्याप्रमाणे प्रत्येक गावामध्ये ग्रामदैवताचे मोठे मंदिर असते. त्याप्रमाणे मरीआईचे प्रत्येक गावात मंदिर असते. पण ते फार मोठे नसते. त्याच मरीआईचा पोतराज हा उपासक असतो. पोतराज हा त्याच गावातील असतो. त्याला पोतराज, मरीआईवाला, कडकलक्ष्मी असेही म्हणतात. स्वतःला क्लेश करून देवीला प्रसन्न करून घेणे हे पोतराजाचे काम असते. आषाढ महिन्यात या पोतराजाला अधिक महत्त्व असते. कारण याच महिन्यात मरीआई आणि लक्ष्मीदेवीच्या यात्रा असतात. पोतराजाने विधी केल्याशिवाय यात्रा पूर्ण होऊ शकत नाही. आषाढ महिन्यात मंगळवार किंवा शुक्रवारी मरीआईची जत्रा केली जाते. आषाढ महिन्यातील यात्रा आणि प्रत्येक महिन्यातील मंगळवार व शुक्रवार यादिवशी पोतराज हा गाणी म्हणत भिक्षा मागत

असतो. मरीआई आणि लक्ष्मीदेवीची गाणी पोतराज हा हातातल्या हालगीच्या ठेक्यावर आणि पायातल्या घुंगराच्या तालावर सादर करीत असतो. यात्रेच्या निमित्ताने इतर गावचे पोतराजही सामील होत असतात, पण इतरवेळी मात्र पोतराज हा एकटाच असतो. मगळवार किवा शुक्रवार तसेच ज्यादिवशी गावाचा आठवडा बाजार असेल तेव्हा पोतराज झोळी घेऊन बाजारातही भिक्षा मागत असतो. गाण्याचे स्वरूप है सर्वसामान्याला समजेल अशा स्वरूपाचे असते. गाण्यात मरीआई, लक्ष्मीदेवी, आषाढ महिना. सामाजिक, कुटुंब, नातीगोती या विषयाचा समावेश होतो. 'आषाढ महिन्यात हलगी कुणाची वाजतीया, पोतराज गाणं हे गातोया' हे गाणं आषाढ महिन्यात प्रत्येक पोतराजाच्या मुखात असते. घरात सुख समृध्दी नांदावी, गावात रोगराई येऊ नये, भूत पिशाच्च, करणी, भानामती यापासून घरातील सर्वांचं संरक्षण व्हावं यासाठी संपूर्ण गाव मरीआईला साकडं घालत असतो. लिंबू, नारळ, नैवेद्य, कोंबडा किवा बोकड कापणे इ. द्वारे नवसपूर्ती करून घेतली जाते. या पोतराजाच्या अंगात देवीही संचारत असते. मग या देवीला पशूबळी दिल्याशिवाय देवी शांत होत नाही, असा लोकमानस आहे. पण मरीआई ही उग्रदेवता असल्याने या देवीला सर्वजण घाबरत असतात. प्रत्येक गावात असलेले पोतराज हे शक्यतो देवीला विधीपूर्वक वाहिलेले असतात. काही घरांमध्ये वंशपरंपरेने पोतराज देवीला वाहण्याची प्रथा आहे, याची अनेक कारणे असतात.

लोककलाकार म्हणून पोतराज या उपासकाचा विचार केला तर त्याचे असणारे गाण्याचे सादरीकरण आणि कथागीत, मरीआई आणि लक्ष्मीआई यांच्या सामर्थ्याचे वर्णन करणारी तो गाणी म्हणत असतो. बळवंत कांबळे यांच्या एका ग्रंथात पोतराजाचे एक गीत आढळते ते असे

आली आली मरीबया |
हिचा कळंना अनुभव |
भल्याभल्यांचा घेती जीव |
आली आली मरीबया |
का सुटलासा वारा |
दुनिया कापती चरचरा |[४]

अशाप्रकारची गीते गाऊन पोतराज उपासना करीत असतात. त्याचबरोबर एखादया घरासमोर भिक्षा मागण्यासाठी गेले असता त्या घरातील पोक्त स्त्री त्या पोतराजाला मायलेकीचं गाणं म्हणण्याचा आग्रह धरते. तेव्हा तो पोतराजही लगेच तयार होतो आणि तो मुलगी नांदायला जातानाच्या प्रसंगाचे गाणे म्हणतो ते खालीलप्रमाणे -

नांदाया जाती लेक बाप म्हणतो जा गं बाई,
आईची वेडी माया, जशी हंबरते गाई कारभारी चला की जाऊ या,
लाडक्या लेकीला नांदाया धाडू या । (ऐकीव)

पोतराज हे गाणं सादर करताना, इतके अप्रतिमपणे सादर करतो की, मुलगी खरोखरच नांदायला निघाली आहे. असा प्रसंग डोळयासमोर उभा राहतो. एवढेच नव्हे तर गाणं ऐकणाऱ्या प्रत्येक स्त्रिच्या डोळ्यात पाणी येते. आपल्याच मुलीचा प्रसंग गाण्यातून व्यक्त होत आहे, असे त्या स्त्रियांना वाटते. या गाण्यातून आईचे रडणे म्हणजे गायीने हंबरणे असते आणि बापाने सर्वांसमोर रडून चालत नाही म्हणून तो मुलीस जा गं बाई असा निरोप देत असतो, असे असले तरी बाप एकटाच घरात जाऊन रडत असतो, अशा आशयाचे कौटुंबिक गाणे पोतराज म्हणत असतो, असा हा पोतराज अशिक्षित असतो. असे असले तरी समाजात चाललेल्या बदलाचे भान त्याला असते. मग ते कौटुंबिक कलह, बिघडलेली तरुण पिढी,

निसर्गाचा प्रकोप असो किंवा शेतकऱ्याचे हाल असो हे घटनाप्रसंग त्याला डोळ्यासमोर दिसत असतात. तेव्हा अशा आशयाचे गाणेही प्रसंगानुरुप म्हणतो. काहीवेळा लोकांच्या मागणीस्तवही म्हणत असतो.

असं नव्हतं पहिलं
मग हे आताच का घडतंया
पावसाळ्यात कडाक्याचं ऊन पडतंया
पावसाळ्यात कडाक्याचं ऊन पडतंया ।। धृ।।
अहो बदलला जमाना
वळखंना पोरं का पोरी
टि. व्ही. बघून नाचू लागली
ती तरणी म्हातारी
अहो न्हाय राहिली माया
बिघडली सारी
अन् मायबापाची करत्यात
आश्रमात तयारी
अहो बदलू नका नीती
जरा मार्ग वळून पाहू या
पावसाळ्यात कडाक्याचं ऊन पडतंया ।। १।।
पावसानं मारली दडी
झाली सारी बघा हैराण
या पाण्याविना पिकं सारी
चालली करपून
काय गुन्हा केला
सांगा गाय-गुरानं
थोडा थोडा पाऊस पडतोय
त्यांच्या आशीवादानं
हुंड्यापायी लगीन पोरीचं मोडतंया
कानावर मोबाईल एकटंच हासतंया
पावसाळ्यात कडाक्याचं ऊन पडतंया ।। २।।
लक्ष्मण पोतराज सांगतोय
गेली साधी कौलारु घरं
प्रत्येकाची राहणी माडी उंच बंगल्यावर
अहो बंधूंनो उघड्या डोळ्यानं
बघून घ्यावा सारा प्रकार
मनगटात जीव न्हाय तर
होंडा चालवत्याती बारकी पोरं
अहो कुठं गेली बैलं

नातू गाडी ही मागतूया
पावसाळ्यात कडाक्याचं ऊन पडतंया
पावसाळ्यात कडाक्याचं ऊन पडतंया ।। ३ ।। (संकलित)

प्रसंगानुरुप पोतराजाने गायलेली गाणी लोकांचे मनोरंजन तर करतातच; त्याचबरोबर प्रबोधनाचे डोळ्यात अंजन घालण्याचे कामही करतात. भिक्षा मागत मागत सकाळच्या वेळेत पोतराज गाणी म्हणत असतो. सोबत हलगीच्या आणि पायातील कड्याचा आवाज करीत असतो, त्यामधून लयबध्द साधलेली असते.

भिक्षा मागून झाल्यावर किंवा इतर दिवशी तो दुसरीकडे कामाला जात असतो. आपले कुटुंब तो सांभाळत असतो, देवदेवतांची पूजा अर्चा करून, त्याचे उपासक म्हणून आजही गावोगावी पोतराज आढळतात. विशेषतः मागास समाजात असे पोतराज आढळतात. सध्याच्या पोतराजाच्या पिढीला मात्र हलगी वाजवता येत नाही, गाणीही म्हणता येत नाहीत. फक्त एखाद्या मरीआईच्या देवकार्यात तेवढा अशा पोतराजास मान असतो. इतर वेळी नसतो. पोतराजाची परंपराही हळूहळू कमी होत आहे. कारण पुर्वीसारख्या रोगराई वर, रोगाच्या साथीवर नियंत्रण आले आहे. परंतु बीड, परभणी, नांदेड, औरंगाबाद यासारख्या जिल्हयात अजूनही पोतराजाची परंपरा असल्याचे बळवंत कांबळे आपल्या ग्रंथात सांगतात. काही पोतराज हे भिक्षा मागताना व गाणे म्हणतानाही साध्या वेशात वावरताना दिसतात. पारंपरिक वेशभूषेतील आभरान ते घालताना दिसत नाहीत. असा बदल पोतराज या उपासकात झालेला दिसून येतो. वाङ्.मयीनदृष्ट्या पोतराजाच्या गाण्याचा विचार केला तर ओवीगीत, धुपात्री वहया आणि कथागीते या तीन भागात गाण्याचे वर्गीकरण केल्याचे दिसते. यातूनच केलेला पारंपरिक कलात्मक आविष्कार हा तितकाच रूद्र, मनोरंजन करणारा असतो.

## समारोप

मानवजीवन जगण्याचा आधार शोधत असताना विविध जाती धर्मातल्या लोकदैवतांना, त्यांच्या रूढी, परंपराना जवळ करत असताना दिसतो. समाधान, श्रद्धा व कमी अधिक प्रमाणात अंधश्रद्धा म्हणून मानवी जीवन दैवतांच्या जत्रा, यात्रा, नवस, सायास, उपासना, विधी यांना प्राधान्य देतो आणि आपले जीवन सुखकर करण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसते. यातूनच लोकदैवतांकडे श्रद्धेने पाहण्याची वृत्ती माणसांमध्ये वाढल्याची दिसते. प्रयोगरूप लोककलेमध्ये माझ्या मते अंधश्रद्धेपेक्षा श्रद्धा व भावनेलाच जास्त महत्त्व दिले जाते. त्यामुळे एकविसाव्या शतकातही ही परंपरा सुरू असल्याचे दिसते. त्याचबरोबर जत्रा किंवा धार्मिक कार्यक्रमामध्ये भक्त किंवा लोक निष्ठेने आणि सर्व जाती धर्मातील लोक सामील होताना दिसतात. प्रयोगरूप लोककलाकार हे निष्ठेने आपापल्या दैवताची सेवा करताना दिसतात. या निष्ठेमागे लोकांचे मनोरंजन व प्रबोधन, स्वतःचा व कुटुंबाचा उदरनिर्वाह ही कारणे असल्याची दिसतात. प्रयोगरूप लोककलाप्रकाराच्या अभिव्यक्तीतून वेगवेगळ्या आविष्काराचे स्वरूप लक्षात येते. त्यांच्या परंपरेचे मूळ शोधण्यास मदत होते. आविष्कारशैलीची व वाङ्मयीन वैशिष्ट्ये यांचा अभ्यास करता येतो. सामाजिक परिस्थिती, सांस्कृतिक परंपरा व भौगोलिक स्थिती, धार्मिकता याचे आकलन होते. लोककलेच्या माध्यमातून आख्यान, कथा, गीते यांची मानवी जीवनात यशस्वितेची भर घालतात, असे म्हणता येते. आधुनिकीकरणामुळे या कला लोप पावत चाललेल्या आहेत. तर परंपरा बदलत आहेत. काळानुसार बदल केलेल्या परंपरांची भरच पडत आहे असे सकृतदर्शनी दिसून येते.

## निष्कर्ष

१. प्रयोगरूप लोककला या प्राचीन काळापासून आजपर्यंत चालत आल्या आहेत. धार्मिक विधी म्हणून या लोककलांकडे पाहिले जाते.

२. अतिशय भक्तीभावाने या प्रयोगरूप लोककला जोपासल्या जातात. या प्रायोगिक लोककलांना आज व्यवसायिक रूप प्राप्त झाले आहे.

३. प्रयोगरूप लोककलामधून तत्कालीन संस्कृतीचे दर्शन घडते. संस्कृतीचे जतन व संवर्धन या कलामधून केले जाते.

४. प्रयोगरुप लोककलांना, विधिनाट्याला धार्मिक महत्त्व आले आहे. लोककला सादर करणारे कलावंत विशेषतः बहुजन समाजातील आढळतात.

५. आधुनिकतेमुळे लोककलेच्या सादरीकरणात काळानुसार बदल होत आला आहे. प्रयोगरुप लोककला सादर करणारे कलाकार पिढीजात परंपरा जपताना दिसतात.

६. लोककलेतून दिसणारी लोकसंस्कृती मानवी जीवन जगण्यास बळ देते. लोककलेमुळे रुढी, परंपरा यांचे जतन होते.

७. लोककलेमुळे श्रध्दा, निष्ठा, भावना या गोष्टी वाढीस लागतात. धार्मिकतेमुळे मानवी जीवनात अंधश्रध्दा डोकावताना दिसते.

८. जत्रा, यात्रा व धार्मिक कार्यात सर्व लोक मनोभावे सामील झालेले दिसतात. काही विधिनाट्यात पूर्वजांना पूजण्याची परंपरा आजही कायम दिसते.

९. कुलाचार व घराण्याचे परंपरेनुसार देवकार्य असल्याने ही विधिनाट्ये परंपरेने आजही सादर होताना दिसतात. लोककलेच्या माध्यमातून ग्रामदैवत, लोकदैवत, कुलदैवत यांच्या आख्यान व कथागीताची स्फूर्तीदायी माहिती मिळते.

१०. लोककलेमुळे दैवताचे मूळ शोधण्यास मदत होते. लोककलेच्या सादरीकरणातून सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक, भौगोलिक परिस्थितीचे आकलन होते.

११. लोककलेतून त्या त्या प्रादेशिक भागातील परंपरा लक्षात येते. लोककलाकार उदरनिर्वाहासाठी सादरीकरण करताना दिसतात.

१२. प्रयोगरुप लोककलाकारांमध्ये लोकसमूहाची भावना निर्माण झाल्याची दिसते. प्रयोगरुप लोककलेच्या माध्यमातून परंपरेत काळानुसार बदल झालेला आहे.

१३. एकविसाव्या शतकातही लोककला बदलत्या स्वरूपात आजही आहे.

१४. अलिकडील तंत्रज्ञानातही ती स्वरूप बदलून आपले अस्तित्व टिकून आहेत.

१५. काळ बदलला तरीही त्यामध्येही ही लोककला आपले मूळ रूप बदलताना दिसत नाही.

## संदर्भ

१. महादेव देशमुख :- प्रयोगरूप लोककलाप्रकार परंपरा आणि स्वरूप, लक्ष्मी बूक पब्लिकेशन सोलापूर, प्रथमावृत्ती २०१३, पृ.५०.

२. रा.चि.ढेरे :- लोकसंस्कृतीचे उपासक, पद्मगंधा प्रकाशन पुणे, तृतीयावृत्ती २००७, पृ.६६.

३. शरद व्यवहारे :- लोकसंस्कृतीचा अंत: प्रवाह, प्रतिभा प्रकाशान पुणे, प्रथमावृत्ती १९९९, पृ.३०.

४. बळवंत कांबळे :- देवदासी, पोतराज, वाघ्या-मुरळी, रूप-स्वरूप, विकृती, पद्मगंधा प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती २००८, पृ.९२.

❖❖❖

# तिच्या सेल्फीत तो दिसत नाही : वेदनांचा हुंकार

**डॉ. अर्चना काटकर**
मराठी विभागप्रमुख
कला महाविद्यालय बिडकीन
ता. पैठण, जि. छ. संभाजीनगर
मो.न. ९४२३७१६९१८

**सारांश** :

'तिच्या सेल्फीत तो दिसत नाही' या संतोष देशमुख यांच्या काव्यसंग्रहामध्ये स्त्रियांच्या दुःखाचा आणि तिच्या भावनिक आंदोलनाचा वेध घेऊन स्त्रियांचा कौटुंबिक, मानसिक व सामाजिक अंगाने वेद घेऊन त्याला काव्याच्या द्वारे शब्दबद्ध केलेले आहे. संतोष देशमुख यांच्या काव्यसंग्रहाचे शीर्षक हे समकालीन, नवतरुणांच्या भाषेतील वाटत असले तरी कविता वाचल्यानंतर मला याचे विशेष जाणवले ते म्हणजे स्त्रियांच्या संघर्षमय जीवनात ज्या पुरुषासाठी ती जगते, आपले सर्वस्व अर्पण करते. त्या व्यक्तीचे तिच्या मनपटलावर कुठेही प्रतिबिंब दिसत नाही. म्हणजेच तिच्या सेल्फीत तो दिसत नाही. त्यावर मी या लेखाच्या माध्यमातून चिंतन करण्याचा प्रयत्न केला आहे. स्त्रियांचा संवेदनशीलतेने विचार आलेला आहे. हे या कवितेतून विशेष जाणवते. स्त्रियांच्या दुःखाला एका पुरुषांने संवेदनशीलरित्या शब्दबद्ध केले आहे. म्हणूनच हा काव्यसंग्रह मला या ठिकाणी अधिक महत्वपूर्ण वाटतो.

**बीजशब्द** :
सेल्फी, तृष्णा, इभ्रत, बेफाम, मोहल्ला, रॉयल्टी, प्रगल्भ, आत्मनिर्भर, वेदना, कलेवर, द्विध्रुव, भावनाशून्य, खाई, बिनबोभाट, सावज, कानशिळ

**प्रास्ताविक** :

'तिच्या सेल्फीत तो दिसत नाही' हा डॉ. संतोष देशमुख यांचा काव्यसंग्रह दुसरे मुक्त सृजन साहित्य संमेलन महाबळेश्वर येथे प्रकाशित झाला. काव्यसंग्रहाचे नाव ऐकल्यावर साहजिकच एखाद्या नवतरुण मुलीच्या उथळ अशा जाणिवा यात असतील असे वाटले; परंतु हा कवितासंग्रह हातात पडल्यानंतर वाचला यामध्ये समाजातील एकूण सर्व स्तरातील स्त्रियांच्या दुःखाची, भावनांची, जाणीवेची व नेणीवेचा हुंकार या कवितेतून आलेला आहे. स्त्रीला समाजात पिढयानपिढ्या द्विध्रुवात्मक वागणूक दिली गेली. एक तर तिला दागिन्यांनी मढवून देवघरात देवी म्हणून पुजणे किंवा पायातली वाहन समजून सतत लाथडणे असेच जीवन तिच्या वाट्याला पुरुषसत्ताक व्यवस्थेत आलेले असल्याने तिची सतत घुसमट होत आलेली आहे.

डॉ. संतोष देशमुख यांनी ग्रामीण कादंबरीतील स्त्री प्रतिमांचा सखोल अभ्यास केलेला असल्याने कवीला या कवितासंग्रहामध्ये स्त्रीच्या वाट्याला आलेले दुःख, तिची अगदीकता, प्रेमात सर्वस्व लूटून दुःखात डूबणारी स्त्री, तसेच या सर्वांबरोबर त्यातून स्वतःला सावरणारी स्त्री ही येथे प्रभावीपणे कवीने चित्रीत केलेली आहे. या काव्यसंग्रहातील कविता वाचल्यानंतर एका पुरुषांनी इतक्या भावतरल

संवेदनाशील कविता लिहिल्या असतील का? असा प्रश्न पडतो पण कवीने सामूहिक नेणीवेच्या पातळीवर जाऊन स्त्रीच्या संवेदना कवितेच्या माध्यमातून व्यक्त केलेल्या आहे असेच दिसून येते.

**उद्दिष्टे :**

१) 'तिच्या सेल्फीत तो दिसत नाही' या काव्यसंग्रहातून व्यक्त होणाऱ्या भावना जाणून घेणे.

२) 'तिच्या सेल्फीत तो दिसत नाही' यातील कवितांच्या वैशिष्ट्यांचा शोध घेणे.

**विषय विवेचन** :

कवीने या ठिकाणी अनेक स्तरातील स्त्रियांच्या अनेक भूमिकातील दुःखाला, वेदनेला वाट मोकळी करून दिलेली आहे. या काव्यसंग्रहातील कवितांचा बहुतांशी विषय हा स्त्रीच असून काही ठिकाणी सामाजिक वातावरण आलेले आहे. काव्यसंग्रहातील पहिलीच कविता' मी कुठे काय म्हणते...' यामध्ये कवीने नववधूच्या विवाह प्रसंगातून तिच्या आयुष्यभरातील जीवनाचा आलेखच उभा केलेला आहे.

" बाहुल्यांवर पुष्पहाराचं
ओझं झालेले बाहू
यंत्राप्रमाणे उचलले जातात
आयुष्यभराचा फास लावून घेण्यासाठी "

या पहिल्या चार ओळीतूनच एकूणच स्त्रीच्या विवाहनंतरच्या आयुष्याचा आलेख डोळ्यासमोर उभा राहतो. शेवटच्या कडव्यात ती म्हणते,

"असंख्य वेदनांचे पूर
अंगावर घेऊन डबडबलेल्या डोळ्यांनी
संयमाचा हात अगदी गच्च धरलेला...
आणि अधराला कळू ही न देता
ती पुटपुटते अगदी शांत...
मी कुठे काय म्हणते!"

नववधूच्या पुढील आयुष्याचं चिंतन करून कवी स्त्रीच्या वास्तवाला भिडलेला आहे; असे या ठिकाणी जाणवते. सगळे काही सहन करून ती तिच्या भावनांना वाट मोकळी करून न देता म्हणते; 'मी कुठे काय म्हणते!' पुरुषापेक्षा स्त्री ही आपल्या संसारात कायम स्वतःला झोकून देते; पण नेहमी असे दिसते की कुटुंब कितीही सधन, उच्चभ्रू असले तरी स्त्रीला एका चौकटीतच बंदिस्त केले जाते. तिला तिच्या भावनांना, तिच्या विचारांना, व तिच्या हक्काला कुठेही जागा नसते. या कडव्यातून ते प्रतित होते.

" तरी राखीले भाळी तुला मी,
जरी तू सौभाग्य पायी तुडवत गेला...
शोधिते निवारा आता माझ्यात
जरी तू इमले चढवीत गेला ! "

या ओळीतून स्त्री ही आत्मनिर्भर होण्याच्या दृष्टीने स्वतःचा शोध घेताना दिसते. ती हेही म्हणते "माझं दुःख मी वाटणार नाही दारोदारी साखरपणासारखं" तिला आपल्या दुःखातून सहानुभूती मिळवायची नाही किंवा त्याचा बाजारही मांडायचा नाही कारण बाजारातील वस्तू ही स्पर्श करून, नाकाला लावून

पाहिली जगते;  म्हणून स्त्री आणि तिच्या भावना या वस्तू नसून एक संवेदनशील माणूस आहे हेच कवीला सांगायचे आहे असे जाणवते. कवितेतून अपेक्षा, आशावादही आपल्या जोडीदाराकडून स्त्रीने व्यक्त केलेला आहे ती प्रश्न विचारते आणि अपेक्षित उत्तरही येथेच मांडते.

"एक दिवस त्याला मी विचारले कुठवर देशील मला साथ,
तो शांतपणे म्हणाला,
अगं मी आहे म्हणून तर तुला किंमत आहे
तू आहे म्हणून मलाही ओळख आहे.
आपण दोघेही एकत्रच राहू,
अगदी या विश्व दुःखाच्या अंतापर्यंत..."

शेवटपर्यंत जोडीदाराची साथ लाभावी ही वाजवी अपेक्षा ती करते जी रास्त आहे आणि तिला येणाऱ्या अनुभवातून तिला खात्रीही वाटते की,

"वाटतं
तो माणूस
नाहीच आनंदी राहू देणार
आयुष्यभर...
जेव्हा जेव्हा परमानंदाच्या
उंच शिखरावर
आपल्याच धुंदीत विहार करत असते.
तो येतो कोणत्याही रूपात
माझ्या आनंदाचा कडेलोट करतो..."

येथे स्त्रीच्या वाट्याला येणारे वेगवेगळ्या भूमिकेत येणारे पुरुष जसे वडील, भाऊ, प्रियकर, पती सहकारी, मुलगा व  नातू अशा अनेक रूपातील पुरुषांकडून तिला येत जाणारे अनुभव शब्दबद्ध केलेले आहे.

"तुझ्या ईच्छे खातर
मांडलेला डाव
जिंकता जिंकता
मी हरून जाते ठरल्याप्रमाणे..."

स्त्री ही दुसऱ्याच्या आनंदासाठी त्याच्या सुखासाठी कायमच तिच्या भावनांना, विचारांना तिलांजली देऊन हार पत्करतांना दिसते. ती म्हणते,

"मी मात्र जगणं विसरून गेले, त्याचं जगणं सुंदर करण्यासाठी...
मी वेडी निपचित पडलेल्या कलेवराकडे मायची आस धरून बसलेली..."

कवीने येथे भावना शून्य झालेल्या मृतदेहावर ती अपेक्षा ठेवून जगते याचे भान तिला आहे हे ही मांडले आहे. ती या कवितेतून एक कल्पक असलेल्या स्त्रीचे जीवन; आपल्या मुलांना वाढवताना येणारा अनुभव चिमणी पक्षी हे प्रतीक वापरून शब्दबद्ध केला आहे.

"तिची मात्र घुसमट होते
इवली इवली पिल्ले वाढवताना!
कारण आता खोप्यावर  असते प्रत्येकाचीच नजर,
खोप्याकडे येणारा प्रत्येक चिमणा पारखला जातो सूक्ष्म दुर्बिणीतून"

या कवितेतून एकल स्त्रीच्या भावनांना चित्रित करतांना डोळ्यापुढे प्रसंग उभा केलेला आहे. पुढेही चिमणी ची अपेक्षा व्यक्त करते.

"ती आता उगबगली आहे
शोधते आहे चिमणा
चोचीतल्या चाऱ्यासाठी नव्हे तर,
चोचीतल्या गोष्टी सांगण्यासाठी!"

आजची स्त्री ही एकविसाव्या शतकातील सक्षम, आर्थिक दृष्ट्या आत्मनिर्भर असल्याने तिचा स्वतःकडे व समाजाकडे बघण्याचा दृष्टिकोन हा दृढ झालेला आहे. तिला वैचारिक प्रगल्भता आल्याने ती आपल्या दुःखाला कुरवाळत न बसता स्वतःचा मार्ग चोखळतांना दिसते. तरीही भावनिक आधारासाठी तिला एका जोडीदाराची नक्कीच गरज असते. हे मानसशास्त्र ही या ठिकाणी कवीने टिपलेले आहे.

कवीला अपेक्षित असलेली सेल्फी म्हणजेच स्त्रीचे मनपटल आहे कारण या कवितासंग्रहाचे नाव आहे. "तिच्या सेल्फी तो दिसत नाही" प्रत्येकाला आपले स्व-प्रतिबिंब पाहण्यास आवडते तसेच स्त्री ही आपले प्रतिबिंब जेव्हा बघण्यास जाते तेव्हा तिला आलेल्या अनुभवावरून तिचा एक चेहरा जो अनेक धारदार कंगोरे घेऊन साकारतो आणि आपल्या मनपटलावर जेव्हा ती स्वतःला पाहते तेव्हा एकटीच असते. तिला आपल्याबरोबर कोणाला ठेवावसं वाटत नाही हेच या कवितासंग्रहातून प्रकर्षाने प्रतित होते. कवितांच्या शीर्षकातून कवितेच्या आशयाची कल्पना येते."मी कुठे काय म्हणते..., माझं दुःख, वेदना, तो माणूस, जुनी वाट, तुझ्या शिवाय, ती, सावज, बाई शोधते फुटका मणी, तिच्या सेल्फी तो दिसत नाही. या शीर्षकातच कवितेचे यश आहे असे दिसते.

कवितांचे लेखन करताना यामध्ये वापरलेले शब्द हे ताकदीचे आहेत असे जाणवते. जसे की शून्य सावल्या, कुस्करून, मुळासकट, बिनबोभाट, सावज, कानशिळावर, खुंट्याला, विषारी नभात, श्वापत, पिंड तृष्णा, इभ्रत असे शब्द त्याचबरोबर इंग्रजी शब्दही आले आहे सेल्फी, रॉयल्टी,कॅ नव्हास, डिक्शनरी व उर्दू शब्दही काही ठिकाणी आलेले आहेत बेफाम, खाई, मोहल्ला अशा शब्दांचा वापर केला आहे. काव्यसंग्रहाच्या मुखपृष्ठावर एक तरुणी जी स्वतःचे प्रतिबिंब आपल्या मोबाईल मध्ये बघते. परंतु तिला कोणीतरी हातात पकडलेले आहे व सगळीकडे अंधार आहे, एका कोपऱ्यात उंच टेकडीवर एक सावली दिसते. कदाचित ही सावली चिंतन करणारी स्त्री असावी. तर दुसऱ्या कोपऱ्यात पांढरा रंग आहे जो शांततेचं, तहाचं प्रतीक आहे. जे की स्त्री कायम करत आलेली आहे. काव्यसंग्रहाचे शीर्षक हे पिवळ्या रंगात येते जे आनंदाचे,उषःकालाच प्रतीक आहे सकारात्मकता या ठिकाणी जाणवते.

कवितासंग्रहाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे कवीने कवितांचा शेवट हा अनेकवेळा वाक्य, शब्द, ओळ अपूर्ण ठेवून वाचकास विचार प्रवृत्त करण्यास जागा सोडलेली आहे. तर काही ठिकाणी स्त्रीने आपले मत स्पष्टपणे उद्घृत केलेले दिसते. जे उद्गारचिन्हाने स्पष्ट होते. अनेक रूपातील स्त्रियांच्या अंतरंगातील दाह येथे कवीने सकसरीत्या अगदी ताकदीने मांडलेला आहे. एका पुरुषाने स्त्रीच्या भावनांना संवेदनशील मांडणे म्हणजे एका पुरुषांमध्ये असलेली संवेदनशील मनाची साक्ष या ठिकाणी पटते. कवीच्या निरीक्षण शक्तीला ही या ठिकाणी दाद द्यावीशी वाटते. दुसऱ्यांच्या भावना समजून घेऊन त्यामांडल्या आहेत. या काव्यसंग्रहात पहिलेपणाच्या खुणा अधिक जाणवत नाही. कवीने पुरुषांच्या भावनाही याच पद्धतीने काव्यबद्ध करून त्या व्यक्त कराव्या अशी आशा व्यक्त करते.

❖❖❖

# मराठी भाषा अपभ्रंश ते अभिजात

**प्रा. शिवदास गोविंदराव मुंडे**
श्री. बालाजी विद्यापीठ, पुणे - 411033
मो. 9689047738

भाषा ही मानवाला मिळालेली नैसर्गिक देणगी आहे. भाषेच्या माध्यमातून मानव आपल्या भावना आपले विचार व्यक्त करत असतो. तसे पाहिले तर आज जगामध्ये अनेक भाषा बोलल्या जातात.वेगवेगळ्या प्रदेशानुसार त्यामध्ये विविधता आढळते.त्यातील मराठी ही महाराष्ट्र व गोवा राज्याची राजभाषा आहे तर जागतिक स्तरावर १५ व्या क्रमांकावर बोलली जाणारी भाषा आहे. मराठी भाषेचा इतिहास खूपच प्राचीन आणि समृद्ध आहे. मराठी भाषा ही इंडो-युरोपियन भाषा कुटुंबातील एक महत्त्वाची भाषा आहे. मराठी भाषेचा विकास संस्कृत, प्राकृत, आणि अपभ्रंश भाषांमधून झाला आहे. तिचा स्वतंत्र अस्तित्वाचा इतिहास सुमारे १५०० ते २००० हजार वर्षे जुना आहे. मराठी भाषेच्या विकासासाठी ऐतिहासिक कालखंडांचा आढावा घेणे संयुक्त ठरते.

**1. प्राकृत आणि अपभ्रंश युग**

इ.स. पूर्व ३ ऱ्या शतकामध्ये, महाराष्ट्र प्रदेशात प्राकृत आणि पाली या भाषांचा प्रभाव होता. प्राचीन भारतीय साहित्य आणि शिलालेखांमध्ये प्राकृत भाषेचा उपयोग आढळतो.
प्राकृत भाषेपासून विविध अपभ्रंश भाषांचा विकास झाला, ज्यामधून मराठीसह इतर आधुनिक भारतीय भाषांची निर्मिती झाली.

महाराष्ट्री प्राकृत ही महाराष्ट्रातील सर्वात प्रचलित भाषा होती. कालांतराने, महाराष्ट्री प्राकृतचा अपभ्रंश होऊन मराठी भाषा विकसित झाली असे वेगवेगळ्या मराठी भाषेतील संशोधनावरून स्पष्ट होते.

**2. मराठी भाषेतील शिलालेख**

मराठी भाषेतील प्राचीनतम लिखित पुरावे साधारणत: १०व्या शतकातील आहेत.
अक्षीचा शिलालेख मराठीतील आद्य शिलालेख असून त्यावर शके ९३४ म्हणजेच इ. स. १०१२ असा स्पष्ट उल्लेख आहे. शिलाहारवंशीय राजा पहिला केसीदेवराय याचा प्रधान भइर्जू सेणुई याच्या काळात म्हणजे शिलाहार काळात कोरलेला हा शिलालेख असून त्याने देवीच्या बोडणासाठी नऊ कुवली धान्य दिल्याचा यात उल्लेख आहे.

भिल्लाम पाचवा या राष्ट्रकूट राजाच्या काळातील (११व्या शतक) शिलालेखांमध्ये मराठी शब्दांचा वापर आढळतो.

**3. यादवकालीन मराठी साहित्याचा आरंभ**

इ.स. ११व्या ते १३व्या शतकात देवगिरीच्या यादव राजवटीच्या काळात मराठी भाषेला राजाश्रय मिळाला. या काळात मराठीचे साहित्यिक विकासाला सुरुवात झाली.

मराठीतील आद्यकवी मुकुंदराज यांचा विवेकसिंधु हा ग्रंथ मराठी भाषेतील तत्त्वज्ञानाचा आद्य ग्रंथ म्हणून ओळखला जातो. त्यांनी अद्वैत वेदांत तत्त्वज्ञानाचे साध्या आणि ओघवत्या भाषेत विवेचन केले आहे. विवेकसिंधूमध्ये आत्मज्ञान, मोक्ष, आणि तत्त्वज्ञानाचे गूढ विषय समजावून दिले आहेत. या ग्रंथात त्यांनी आत्मतत्त्व, मोक्षप्राप्ती, आणि संसारविमुक्ती यासारख्या विषयांचा सखोल उहापोह केला

आहे. संत ज्ञानेश्वरांनी "भावार्थ दीपिका" किंवा "ज्ञानेश्वरी" या ग्रंथाद्वारे मराठी साहित्यिक परंपरेला चालना दिली.

संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, आणि इतर संत कवींनी मराठीत विविध भक्तीगीतांची (अभंगांची) निर्मिती केली, ज्यामुळे मराठीचे धार्मिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक मूल्य प्रस्थापित झाले.

**4. मराठी भाषेचा शिवकालीन विकास**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात मराठीला राजभाषेचा दर्जा मिळाला.
राजकारण, प्रशासन, न्याय, आणि शैक्षणिक क्षेत्रात मराठीचा वापर झाला. शिवाजी महाराजांनी सुराज्य स्थापनेच्या उद्देशाने विविध सरकारी आदेश मराठीतून दिले.
या काळात मराठी भाषेत अनेक लष्करी, प्रशासकीय, आणि सांस्कृतिक शब्दांची भर पडली.

**5. पेशवा काळातील मराठी**

पेशव्यांच्या काळात मराठी भाषेला आणखी स्थिरता आणि शासकीय महत्त्व मिळाले.
मराठी भाषेच्या गद्य लेखनाचा आणि दस्तऐवजीकरणाचा विकास झाला. न्यायालयीन आणि प्रशासकीय बाबतीत मराठी भाषा अधिक वापरली जाऊ लागली.
या काळात तमाशा आलू साहित्याचा प्रकार रूढ झाला तसेच अनेक पोवाडे, लावणी, बखरी, आणि नोंदी मराठीत रचण्यात आल्या.

**6. ब्रिटिश काळातील मराठीचा विकास**

ब्रिटिशांच्या काळात मराठी शिक्षणाला महत्त्व दिले गेले. मराठी माध्यमातून शाळा आणि शिक्षण संस्थांची स्थापना झाली.

मराठी भाषेत छापखाने सुरू झाले, ज्यामुळे वृत्तपत्रे, मासिके आणि पुस्तके उपलब्ध झाली.
या काळात अनेक मराठी साहित्यिक आणि विचारवंत उदयास आले. गोपाळ गणेश आगरकर, लोकहितवादी, ज्योतिबा फुले, बालशास्त्री जांभेकर, इत्यादी विचारवंतांनी मराठी भाषेतील लेखनाला नवीन विचारप्रवाह दिला.

**7. स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी**

भारत स्वतंत्र झाल्यानंतर मराठीला महाराष्ट्र राज्याची अधिकृत भाषा म्हणून मान्यता मिळाली.
शैक्षणिक, साहित्यिक, आणि सांस्कृतिक स्तरावर मराठीचा अधिक वापर होऊ लागला.
आचार्य अत्रे, व. पु. काळे, पु. ल. देशपांडे, आणि बाबासाहेब पुर्हित यांसारख्या लेखकांनी मराठी साहित्याला एक नवीन दिशा दिली.

**8. आधुनिक मराठी भाषा**

आज मराठी भाषेत विविध प्रकारचे साहित्य निर्माण होते. वर्तमानपत्रे, मासिके, शैक्षणिक ग्रंथ, चित्रपट, नाटकं, आणि विविध माध्यमांमधून मराठी भाषेचा वापर होतो.

इंटरनेट आणि डिजिटल माध्यमांमुळे मराठी भाषा जागतिक स्तरावर पोहोचली आहे.

मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आज अनेक संस्थात्मक आणि सामाजिक स्तरावर प्रयत्न सुरू आहेत.

मराठी भाषा ही एक समृद्ध, प्राचीन, आणि वैविध्यपूर्ण भाषा आहे. तिचा इतिहास संस्कृत, प्राकृत आणि अपभ्रंश युगांमधून विकसित झाला आहे, आणि अनेक संत, साहित्यिक, आणि राजे-रजवाड्यांनी

तिचे संवर्धन केले आहे. मराठी भाषेचा हा प्रवास महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, धार्मिक, आणि सामाजिक जीवनात महत्वाची भूमिका बजावतो.

भाषा ही संवादाचे महत्त्वाचे माध्यम आहे. मात्र मातृभाषा ही नैसर्गिकरीत्या आपण शिकत असतो आत्मसात करत असतो त्याचा अभिमान असणं यात काही वावगं नाही. संत ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेच्या मोठेपणाबद्दल काढलेले गौरव उद्‌गार

“माझा मराठी चा बोल कौतुके।परि अमृताते हि पैजा जिंके।ऐसी अक्षरे रसिके।मेळवीन।।१४।।

- **ज्ञानेश्वरी अध्याय सहावा.**

तसेच मराठी भाषेविषयी प्रेम आपुलकी आणि अभिमान बाळगणारी कविवर्य सुरेश भट यांची कविता

लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्या एक तो मराठी ।
धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी
एवढ्या जगात माय मानतो मराठी ॥

**- कविवर्य सुरेश भट**

भारतीय राज्यघटनेत "अभिजात भाषे"संदर्भातील थेट तरतूद कोणत्याही विशिष्ट कलमांतर्गत समाविष्ट केलेली नाही. तथापि, भाषांच्या संवर्धनासाठी आणि प्रोत्साहनासाठी काही महत्त्वाच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. अभिजात भाषांबाबतची परिभाषा आणि मान्यता प्रक्रिया केंद्र सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाने ठरवलेली आहे, परंतु राज्यघटनेत ती विशेषतः नमूद केलेली नाही.

**राज्यघटनेतील भाषांसंदर्भातील तरतुदी:**

भारतीय राज्यघटनेत भाषांसाठी काही महत्त्वपूर्ण कलमे आहेत, ज्यांचा संबंध अप्रत्यक्षरीत्या अभिजात भाषांच्या संरक्षण आणि संवर्धनाशी जोडला जाऊ शकतो:

**1. कलम 29(1) - सांस्कृतिक आणि भाषिक अधिकार:** या कलमानुसार, कोणत्याही नागरिकांना त्यांच्या विशिष्ट भाषा, लिपी किंवा संस्कृतीचे संरक्षण आणि संवर्धन करण्याचा अधिकार आहे. हा अधिकार भाषिक गटांना त्यांची भाषा आणि संस्कृती जपण्यासाठी प्रोत्साहन देतो.

**2. कलम 343 ते 351 - अधिकृत भाषा आणि भाषांचे संवर्धन:** या कलमांमध्ये हिंदी भाषेला अधिकृत भाषा म्हणून मान्यता देण्यात आली आहे, तसेच इतर भाषांसाठीदेखील संवर्धनाचे प्रावधान करण्यात आले आहे. कलम 351 हे हिंदी भाषेच्या संवर्धनासाठी आहे, परंतु यामध्ये भारतातील इतर भाषांचा विकास करणे आणि त्यांचे संवर्धन करण्याचे निर्देशदेखील दिले आहेत.

**3. आठवी अनुसूची:** भारतीय राज्यघटनेच्या आठव्या अनुसूचीमध्ये भारतातील 22 अधिकृत भाषांची नोंद आहे. या भाषांच्या संवर्धनासाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकार विविध योजना आणि कार्यक्रम राबवू शकतात. अभिजात भाषांचा दर्जा मिळालेल्या भाषा आठव्या अनुसूचीत समाविष्ट असलेल्या भाषांमध्ये आल्या आहेत.

**अभिजात भाषा मान्यतेची प्रक्रिया:**

अभिजात भाषेची मान्यता केंद्र सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाने दिलेल्या निकषांनुसार, एका समितीच्या शिफारशीवर आधारित भाषा अभिजात ठरवली जाते. राज्यघटनेत यासंदर्भात थेट तरतूद नसली तरी केंद्र सरकारच्या निर्णयानुसार संबंधित भाषेला विशेष सन्मान आणि लाभ मिळतात.

भारतात, भाषेला अभिजात दर्जा (Classical Language) मिळण्यासाठी काही विशिष्ट निकष असतात, जे भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाने निश्चित केले आहेत. या निकषांनुसार भाषेला अभिजात दर्जा मिळण्यासाठी खालील अटी पूर्ण कराव्या लागतात:

**1. प्राचीनता:** भाषेचा ऐतिहासिक कालावधी 1500 ते 2000 वर्षांपूर्वीचा असावा. ती भाषा खूप जुनी असावी आणि तिचा वापर खूप काळापासून केला जात असावा.

**2. संपन्न साहित्यिक परंपरा:** त्या भाषेचे संपन्न आणि मौलिक साहित्य असावे, ज्याची मौलिकता आणि सांस्कृतिक योगदान उच्च दर्जाचे मानले जाते.

**3. स्वायत्त परंपरा:** त्या भाषेची स्वतःची परंपरा असावी. तिच्या साहित्य, भाषाशास्त्र आणि संस्कृतीवर इतर कोणत्याही भाषेचा प्रभाव नाही.

**4. आधुनिक भाषेपासून वेगळेपणा:** त्या भाषेचा आधुनिक रूपांशी थेट संबंध नसावा. म्हणजेच, अभिजात भाषेचे आजचे रूप किंवा वापर प्राचीन भाषेशी थेट जोडलेले नसावे.

या निकषांच्या आधारावर, भारतात आतापर्यंत 11 भाषांना अभिजात भाषेचा दर्जा केंद्र शासनाच्या सांस्कृतिक मंत्रालयाकडून बहाल करण्यात आला आहे.

**मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्यासाठी प्रशासकीय स्तरावरील प्रयत्न :**

- मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासंदर्भात (महाराष्ट्र ) राज्य शासनाने 10 जानेवारी 2012 रोजी प्रा. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली मराठी भाषा तज्ज्ञ संशोधकांची समिती स्थापन केली होती.
- 2024 ला पुन्हा केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याकरिता सेवानिवृत्त अधिकारी ज्ञानेश्वर मुळे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली व अखेर ऑक्टोबर 2024 रोजी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला.
- ऑक्टोबर 2024 पर्यंत भारतातील पुढील 11 भाषांना अभिजात भाषांचा (Classical Languages) दर्जा प्राप्त झालेला आहे.

1) तमिळ (2004)
2) संस्कृत (2005)
3) कन्नड (2008)
4) तेलगू (2008)
5) मल्याळम (2013)
6) ओडिया (2014)

- **2024 :**

7) मराठी
8) पाली
9) बंगाली
10) आसामी
11) प्राकृत

भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यानंतर केंद्र सरकारकडून काही विशिष्ट लाभ आणि सवलती दिल्या जातात, ज्यामुळे त्या भाषेचा प्रचार, प्रसार, अभ्यास आणि संशोधन होण्यास प्रोत्साहन मिळते. अभिजात दर्जा प्राप्त झालेल्या भाषांसाठी केंद्र सरकारकडून दिले जाणारे प्रमुख लाभ हे पुढीलप्रमाणे आहेत:

**1. अभ्यासक्रम आणि संशोधनासाठी अनुदान:** अभिजात भाषांचा अभ्यास, संशोधन, आणि त्या भाषांवरील प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकारकडून विशेष अनुदान दिले जाते.

**2. विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठांमध्ये अभ्यास केंद्रे:** संबंधित भाषेच्या अभ्यासासाठी देशातील 460 केंद्रीय विद्यापीठांमध्ये स्वतंत्र अभ्यास केंद्रे किंवा पीठे स्थापन केली जातात.

**3. विद्वानांना सन्मान आणि अनुदान:** त्या भाषेच्या विद्वानांना विशेष अनुदान दिले जाते, तसेच संशोधन करण्यासाठी वेगवेगळ्या शिष्यवृत्त्या (fellowships) दिल्या जातात.

**4. आंतरराष्ट्रीय स्तरावर भाषेचा प्रचार:** अभिजात भाषा म्हणून मान्यता मिळाल्यानंतर त्या भाषेचा आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रचार करण्यासाठी विविध कार्यक्रम आखले जातात.

**5. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये भाषेचा समावेश:** संबंधित भाषेचा शाळा आणि महाविद्यालयांमध्ये शिक्षणक्रमाचा भाग म्हणून समावेश केला जातो, ज्यामुळे त्या भाषेचा अभ्यास अधिक विद्यार्थ्यांना करता येतो.

**6. नवीन संशोधन केंद्रांची स्थापना:** या भाषेच्या अभ्यास आणि संशोधनासाठी नवीन संशोधन केंद्रांची स्थापना केली जाते, ज्यामुळे त्या भाषेचे संरक्षण आणि संवर्धन केले जाते.

## निष्कर्ष (सारांश)

मराठी भाषेचा प्रवास अपभ्रंश ते अभिजात हा समृद्ध व ऐतिहासिक आहे. यामध्ये भाषा, समाज आणि संस्कृती यांच्या एकत्रित प्रभावाचा मोठा वाटा आहे.

**१. अपभ्रंश कालखंड:**

मूळ: मराठी भाषेची मुळे प्राकृत व संस्कृत भाषांमध्ये आहेत. प्राचीन प्राकृत भाषेपासून "महाराष्ट्री प्राकृत" विकसित झाले, जे पुढे मराठीच्या प्रारंभिक स्वरूपाला जन्म देते.

भाषेत स्थानिक बोलींचा प्रभाव.

साधे, सरळ शब्दरचना आणि व्याकरण.

धार्मिक आणि दैनंदिन व्यवहारासाठी वापर.

**२. मध्ययुगीन कालखंड (अभिजाततेकडे वाटचाल):**

**संत कवींचा प्रभाव:** ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम यांसारख्या संतांनी मराठी भाषेला धार्मिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक स्तरावर उंचावले.

ज्ञानेश्वरी ही पहिली मोठी रचना मराठीतून झाली (१३व्या शतक).

संत साहित्यातून लोकभाषेला प्रतिष्ठा मिळाली.

**भाषेचे व्यापकत्व**: मराठी बोलींचे स्वरूप व्यापक झाले, आणि ती लेखनाच्या माध्यमातून एकसंध बनली.

**३. मराठा साम्राज्याचा प्रभाव (अभिजाततेचा पाया):**

**प्रशासनिक भाषा:** शिवाजी महाराजांनी मराठीला राजकीय आणि प्रशासनिक स्तरावर वापरण्यास प्रोत्साहन दिले.

राजव्यवहार कोश आणि पत्रलेखन हे याचे उत्तम उदाहरण.

**वैचारिक अभिजातता:** भाषा केवळ बोलण्यापुरती मर्यादित न राहता ती साहित्यात, इतिहासात, आणि ज्ञानाच्या क्षेत्रात वापरण्यात आली.

**४. आधुनिक मराठीचा अभिजात कालखंड:**

१८व्या-१९व्या शतकात आधुनिक साहित्य प्रकार (कविता, कादंबऱ्या, नाटके) विकसित झाले.

बालगंगाधर टिळक, विष्णुशास्त्री चिपळूणकर, आणि लोकहितवादी यांसारख्या विचारवंतांनी मराठीचा पाया भक्कम केला.

**शास्त्रीयता:** भाषेची व्याकरणात्मक आणि सैद्धांतिक मांडणी अधिक परिष्कृत झाली.

**स्वतंत्र ओळख:** मराठीने प्रादेशिक आणि राष्ट्रीय पातळीवर आपले महत्त्व सिद्ध केले.

**५. अभिजात मान्यता पर्यंत (सध्याचा काळ):**

**साहित्यिक संपन्नता**: विविध साहित्यकृतींनी मराठीला जागतिक स्तरावर मान्यता मिळवून दिली.

मराठी भाषेने अपभ्रंशातून अभिजाततेकडे यशस्वी प्रवास केला आहे. संत साहित्य, मराठा साम्राज्याचा प्रभाव, आणि आधुनिक साहित्याचा विकास यामुळे मराठीचा अभिजात भाषा पर्यंत चा प्रवास सुलभ झाला. आता मराठी भाषा केवळ दैनंदिन व्यवहाराची भाषा नसून एक समृद्ध सांस्कृतिक वारसा असेलेली अभिजात भाषा आहे.

## संदर्भ सूची :

**1. मराठी भाषेचा इतिहास**

**लेखक:** संजय सोनवणी, **प्रकाशन वर्ष:** 2012, **प्रकाशन संस्था**: डायमंड पब्लिकेशन्स, पुणे

**2. मराठी भाषेचा अभ्यास**

**लेखक:** गो. म. कुलकर्णी, **प्रकाशन वर्ष:** 1995, **प्रकाशन संस्था:** मौज प्रकाशन गृह, मुंबई

**3. भारतीय अभिजात भाषा: दर्जा आणि विकास**

**लेखक:** न. रा. फाटक, **प्रकाशन वर्ष:** 2010, **प्रकाशन संस्था:** ग्रंथाली प्रकाशन, ठाणे

**शोधप्रबंध आणि संशोधन निबंध**

**1. "मराठी भाषेचा विकास: ऐतिहासिक आणि सामाजिक दृष्टिकोन"**

**संशोधक:** डॉ. अर्चना पाटील, **प्रकाशन वर्ष:** 2017, **प्रकाशन संस्था:** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**2. "भारतीय भाषांमध्ये अभिजात भाषेचा दर्जा: मराठीचा विचार"**

**संशोधक:** डॉ. मिलिंद देशमुख, **प्रकाशन वर्ष:** 2015, **प्रकाशन संस्था:** मुंबई विद्यापीठ

**शासकीय अहवाल आणि धोरणे**

**2. मराठी भाषा संवर्धन आणि विकास समितीचा अहवाल**

**प्रकाशन वर्ष:** 2016, **प्रकाशन संस्था**: महाराष्ट्र शासन

**संकेतस्थळे आणि ऑनलाइन संदर्भ**

**1. मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन**

**संकेतस्थळ:** https://marathibhasha.maharashtra.gov.in

**प्रकाशन वर्ष:** नियमित अद्ययावत

❖❖❖

# 'रुद्रवीणा' कवितासंग्रहातील राष्ट्रभक्तीपर कविता

**डॉ. दुष्यंत शिंदे**
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभागप्रमुख,
आझाद महाविद्यालय, औसा,
ता. औसा, जि. लातूर

आधुनिक मराठी काव्यातील अत्यंत महत्त्वाचे नाव म्हणून वा. रा. कांत यांचा उल्लेख आदराने करावा लागतो. जाज्वल्य राष्ट्रभक्ती, उच्चकोटीचे समाज भान पुरविणारे कवी म्हणूनही त्यांची ओळख आहे. प्रस्तुत रुद्रवीणा हा कवितासंग्रह त्यापैकीच एक होय. स्वातंत्र्याच्या आगे मागे तत्कालीन समाज जीवनात देशभक्ती सर्वदूर पसरली होती. स्वातंत्र्य मिळविण्याच्या दृष्टीने समाजमन अधिक जागृत होण्याच्या उद्देशाने साहित्यिक आपली लेखणी झिजवत होते वा. रा. कांतही त्यापैकीच एक होत. समाजकारण, राजकारण, अर्थकारण, सांस्कृतिक जीवन अशा विविध पैलूंनी नटलेले काव्य त्यांनी लिहिले हा त्यांच्या लेखनाचा आणखी एक विशेष होय. मराठी भाषा, मराठी माणूस आणि मराठी संस्कृतीच्या स्वातंत्र्य आणि सन्मानाचा विचार प्रस्तुत कविता व्यक्त करते. तत्कालीन इंग्रजी राजवट तसेच हैद्राबाद संस्थानातील निजामाची जुलमी राजवट याचा अनुभव त्यांना होता. परिणामी स्वातंत्र्याचा विचार व्यक्त करताना त्यांची कविता आग्रही भूमिका मांडते. प्रस्तुत लेखात 'रुद्रवीणा' या काव्य संग्रहातून चित्रित देशभक्तीचा थोडक्यात विचार करू.

**उद्देश -**

1. वा. रा. कांत काळ आणि कर्तुत्वाचा शोध घेणे.
2. समकालीन समाजजीवनातील राष्ट्रभक्तीचे स्वरूप समजून घेणे.
3. समकालीन भाषिक विषेशांचा अभ्यास करणे.

### 1) वारा कांत : काव्य लेखणामागील भूमिका -

वा. रा. कांत मराठवाड्याचे. 6 ऑक्टोबर 1913 रोजी नांदेड येथे त्यांचा जन्म झाला. नांदेडसारख्या प्रसिध्दी पासून दूर असलेल्या तत्कालीन गावात राहून कांत यांनी आपले वेगळेपण सिद्ध केले हे विशेष आहे. प्रतिभा शक्तीचे धनी असलेल्या कांत यांनी 1925 पासून काव्यलेखनास सुरुवात केली. 'बाई कलिके' या नावाने सन 1928 साली पहिली कविता 'मंदारमाला' नावाने प्रसिद्ध केली. पहाटतारा, दोनुली, रुद्रवीणा यासह त्यांचे अनेक कविता संग्रह प्रकाशित आहेत. 1928 पासून वा. रा. कांत यांनी 'विहंगमाला' या नियतकालिकाचे संपादन सुरू केले.

1930 ते 1990 या एकूण सहा दशकात वा. रा. कांत यांचा काव्यलेखन प्रवास विविध वळणांनी पुढे गेला आहे.

"आज स्वातंत्र्याच्या सुवर्णजयंती वर्षात आपण नांदत आहोत. बरोबर पन्नास वर्षांपूर्वी 9 ऑगस्ट 1947 रोजी काय कविवर्य वा. रा. कांत यांचा 'रुद्रवीणा' हा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला होता. स्वतंत्रपणे

प्रकाशित झालेला कांतांचा हा पहिलाच कवितासंग्रह. हा कवितासंग्रह प्रकाशित झाला आणि कांतांची वाहवा होऊ लागली. श्री. प्रभाकर पाध्ये यांच्यासारख्या चिकित्सक समीक्षकाची त्याला प्रस्तावना लाभल्यामुळे साहित्य क्षेत्रातील प्रतिष्ठित व बुजुर्ग मंडळींचे लक्ष वेधले गेले. 1932 ते 1946 या स्वातंत्र्यपूर्व 14 वर्षांच्या काळातील एकंदर 78 कविता 'रुद्रवीणा'त समाविष्ट केल्या आहेत."[1] वरील मत विचारात घेता प्रस्तुत रुद्रवीणा काव्यसंग्रहाचे नेमके स्वरूप लक्षात येते. स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील एकूण 14 वर्षाचा काळ या संग्रहात आहे. हा काळ स्वातंत्र्य प्राप्तीसाठी जन आंदोलनाचा अत्यंत महत्त्वाचा आणि तितकाच भारावलेला काळ आहे. वा. रा. कांत यांनी अत्यंत संवेदनशीलपणे हा काळ आपल्या काव्यातून चित्रित केला, हे सहज लक्षात येते.

## 2) जाज्वल्य राष्ट्रभक्तीची अनुभूती देणारी कविता -

वा. रा. कांत यांची कविता जाज्वल्य राष्ट्रभक्ती प्रसृत करते. स्वातंत्र्यपूर्व काळात मराठी माणूस आणि मराठी भाषेच्या अनुषंगाने अभिमान जागृत करणारी कविता त्यांनी प्रस्तुत काव्यसंग्रहात लिहिली. परिणामी निस्तेज मनाला ऊर्जा मिळवून देण्याचे सामर्थ्य प्रस्तुत कवितेत आहे. तत्कालीन परिस्थिती भयावह होती. इंग्रजांचा अत्याचार वाढलेला होता. दुसऱ्या महायुद्धाची दाहकता प्रत्येकालाच सहन करावी लागत होती. अशा वातावरणात मनात क्रांतीची मशाल पेटविण्याच्या दृष्टीने प्रस्तुत कवितेचे योगदान अनन्यसाधारण आहे. प्रस्तुत कविता संग्रहातील 'गाशील का हे गाण?' या कवितेमधून देश भक्तीची जाज्वल्य भावना ते व्यक्त करतात.

"देशास्तव वनवासी झाले
न्यायास्तव फासावर चढले
आराधकांच्या अभिलाषांचे घुमते येथे तुफाण
सखे, तू गाशील का हे गाण?

आशेने जे गेले श्रमुनी
त्यांच्यातल्या त्या बुबुळातूनि
तेज घेऊनी येयी कल्पना तेजाळीत असमान
सखे, तू गाशील का हे गाण?

सणसण सुटती गोळ्या पवनी
निरापराध ये रक्त उसळूनी
अरुण तयाचा गगनी धावे निर्माया दिनमान
सखे, तू गाशील का हे गाण?"[2]

इंग्रजांचा अन्याय एकाबाजूला तर मराठवाड्यात निजामाचा जुलूम व अत्याचार वाढलेला हा काळ होता. या काळाच्या पार्श्वभूमीतील वा. रा. कांत यांचा कवितेतील वरील आशय विचार करण्यास भाग पाडणारा आहे.

"खरं तर 1932 नंतरचा काळ हा गांधीजींच्या अहिंसा युगाचा व कायदेभंगाचा. याच काळात कांतांनी दोन-दोन पारतंत्र अनुभवले. इंग्रजांनी तर भारतभर आपली सत्तांध दमन चालवलेच होते. पण

कांत ज्या मराठवाड्याच्या भूमीत वाढले तेथेही निजामी राजवटीचा जुलूम व अत्याचार शिगेला पोहोचला होता. मराठवाड्यातील तत्कालीन परिस्थितीतूनच कांतांची क्रांतीपूजन करणारी कविता निर्माण झाली. निजामी राजवटीच्या जुलमी सत्तेखाली मराठी भाषा, मराठी संस्कृती व मराठी माणूस यांची मुस्कटदाबी होत होती."[3]

वरील मत समकालीन स्थितीचे बोलके चित्र कथन करणारे आहे. हाती शस्त्र नसलेल्या सर्व सामान्य जनतेवर निजाम आणि इंग्रज बेछूट गोळीबार करत असे. जालीयानवाला बाग हत्याकांड त्यापैकीच एक होते. अशावेळी देश भक्तीची जाज्वल्य भावना असेल तरच देशाला स्वातंत्र्य मिळवून देणे शक्य झाले असते हे सूचित करताना मागील देश भक्तांच्या कार्याचे स्मरण करण्याचे आवाहनही कवी इथे करताना दिसतो. महात्मा गांधी यांनी दांडी यात्रा काढून सर्व सामान्य जनतेस स्वातंत्र्यासाठी प्रेरित केले. मराठी माणूस आणि मराठी भाषेचा सन्मान वाढविण्याच्या दृष्टीने त्यांची कविता आग्रही असल्याचे वरील विवेचनावरून सहज लक्षात येते.

प्रस्तुत कवितासंग्रहातील 'मूर्तीभंजक' या कवितेतून व्यक्त झालेली भावना लक्षात घेता देशभक्तीबद्दल वा. रा. कांत यांची भूमिका अधिक सुस्पष्ट होते. राष्ट्रीय भावना व्यक्त करताना मानवतेचे विस्मरण होऊ नये याचीही काळजी घ्यायला हवी असे मत कवी इथे करताना दिसतो त्याचा विचार पुढीलप्रमाणे करता येईल.

"मानवास तोडनिया,
रक्त -  मास- चिखल करून
बसविल्या धर्ममूर्ती त्या खुनी मातीच्या
चपल - भाव - पिठावरि;
रडवूनिया दुबळ्यांना
अश्रूतून निर्मिलिन नीतिदेवी पंकजा;
अण्णाविन तडफडले
पथि सडसडुनी मेले
घालुनी माळा त्यांच्या, थिजलेल्या बुबळांच्या
नाचतात मंदिरात कोटि कोटि देवमूर्ती!
पूजा यांचीच करा बळी देऊन आम्हाला
लावा माथ्यास  टीळा आमुच्याच रक्ताचा हे घडे"[4]

दीनदुबळ्या निष्पाप लोकांना पायदळी तुडविण्यात काहीच हशील नसल्याचे मत कवी व्यक्त करतो. वा. रा. कांत यांच्या लेखनातून व्यक्त होणाऱ्या राष्ट्रभक्तीतून माणुसकीचा गहिवर दिसून येतो. आमच्याच रक्ताचा टिळा आमच्या माथ्याला लावला जातोय अशी भावना कवी इथे व्यक्त करताना दिसतो.

## 3) **समारोप** -

कविता आणि प्रतिमा याबाबतीत अनेक अभ्यासकांनी आपली मते मांडली आहेत. सुधीर रसाळ यांच्या 'कविता आणि प्रतिमा' या संशोधन ग्रंथातून आलेला विचार या दृष्टीने समजून घेणे गरजेचे आहे. "आपल्या अबोध मनात आपण अतृप्त इच्छा दाबत, दडपत असतो. त्या स्वप्नाद्वारे आपली काल्पनिक तृप्ती घडवत असतात. काव्यातही असेच घडते. स्वप्नात जशा सर्वसामान्य इच्छांची तृप्ती घडते, तशीच

काव्यातून सर्वसामान्य इच्छांची तृप्ती घडत नाही. काव्य हे उच्च, उदात्त इच्छांची निर्मिती आहे. ते वैयक्तिक नव्हे तर वांशिक, सर्वसामान्य इच्छातून निर्माण होते. म्हणूनच काव्याला एक स्थल कालातीत वैश्विक व वस्तुनिष्ठ रूप प्राप्त झालेले असते."[5] कवितेसाठी आवश्यक कल्पना शक्तीचा विचार सुधीर रसाळ यांनी केल्याचे दिसून येते. कवितेला वैश्विक रूप प्राप्त करून देण्याचे सामर्थ्य कवीच्या कल्पना शक्ती आणि प्रतिभा समाथ्यर्थात असल्याचे रसाळ यांनी स्पष्ट केले आहे.

वरील मत विचारात घेऊन वा. रा. कांत यांच्या काव्यलेखन आणि त्यातून अभिव्यक्त विषयाचा विचार केल्यास त्यांची कविता वैश्विक पातळीवर सहज पोचते. रुद्रवीणा या कविता संग्रहातील राष्ट्रभक्तीपर कविता याची साक्ष पुरवितात. पुढीलप्रमाणे काही निष्कर्ष नोंदवता येतील.

1. वा. रा. कांत यांची कविता स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील सर्वांगीण जीवनाचे चित्रण करते.
2. प्रस्तुत रुद्रवीणा या कविता संग्रहातील कवितेतून व्यक्त राष्ट्रभक्तीपर कविता वाचकांच्या मनात देशभक्तीची जाज्वल्य भावना उद्दिपित करते.
3. कोणतेही साहित्य त्या त्या काळाचे अपत्य असते. परिणामी वा. रा. कांत यांच्या कवितेतून याचा परिचय येतो.
4. मराठी भाषा आणि मराठी माणूस यांच्या सर्वांगीण आत्म सन्मानाचा विचार प्रस्तुत कवितेतून व्यक्त होतो हे इथे लक्षात घेतले पाहिजे.
5. वा. रा. कांत यांच्या राष्ट्रभक्ती पर कवितेतून केवळ देशभक्ती व्यक्त न होता माणुसकीचा विचारही प्रामुख्याने चित्रित होतो, हे ही विशेषत्वाने विचार घ्यायला हवे.
6. समाज आणि साहित्य तसेच साहित्यिक आणि समाज यांचा अत्यंत जवळचा संबंध असतो हे कोणत्याही सर्जनशील लेखनाच्या बाबतीत सांगता येणारे महत्त्वाचे सूत्र आहे. वा. रा. कांत यांच्या लेखनातून हे सहज प्रत्ययास येते.

सामज आणि देश घडविण्याच्या काळातील वा. रा. कांत यांची ही कविता अनेक अर्थाने महत्त्वाची आहे. समाज आणि साहित्य यातील अनन्य साधारण संबंध प्रस्तुत कवितेतून लक्षात येते. ज्या काळात आणि समाजात साहित्यिक वाढला त्याचे काही एक संस्कार त्याच्यावर होतात. मराठी भाषेच्या सन्मानाच्या दृष्टीने त्यांचे लेखन आजही प्रेरणादायी आहे. हैद्राबाद येथे वास्तव्य असतानाही त्यांनी मराठी बाबत प्रेम व्यक्त केले आहे हे विशेष आहे. त्यांचा काळ हैद्राबाद निजामाच्या काळातील असल्यामुळे निजाम आणि इंग्रज यांच्या अन्यायी अत्याचारी वृत्तीचा अनुभव त्यांना आहे म्हणून त्यांची कविता देशभक्तीचा विचार व्यक्त करते. स्वातंत्र्य प्राप्ती शिवाय मराठी माणूस आणि मराठी भाषा असा दुहेरी विकास होणे शक्य नाही याची जाणीव त्यांच्या कवितेतून सहज पणे लक्षात येते.

वा. रा. कांत यांनी रुद्रवीणा या कविता संग्रहाच्या निमित्ताने समकालीन समाजाच्या समता, स्वातंत्र्य आणि अभिमानाचा विचार अतिशय आदराने व्यक्त केला आहे, हे नाकारता येत नाही. साहित्याने समाजाला दिशा द्यावी या मतानुसार वा. रा. कांत यांच्या प्रस्तुत रुद्रवीणा या कविता संग्रहाचा विचार केल्यास त्यांची कविता समकालीन तसेच सर्वकालीन मराठी वाचकांस प्रेरणा देते हे इथे लक्षात घ्यायला हवे. मराठी भाषा, मराठी माणूस आणि मराठी संस्कृतीच्या सन्मानाचा विचार मांडला आहे.

आधुनिक मराठी कवितेतील अतिशय महत्त्वाचे कवी म्हणून वा. रा. कांत यांचा उल्लेख अतिशय आदराने करावा लागतो, हे ही इथे विशेषत्वाने लक्षात घेतले पाहिजे. स्वातंत्र्यपूर्व तसेच स्वातंत्र्योत्तर कालखंडात जोडणारी कविता म्हणूनही त्यांचा कवितेकडे पाहता येईल. थोडक्यात वा. रा. कांत यांची कविता सर्वार्थाने वाचनीय, चिंतनीय आहे यात दुमत नाही. याला 'रुद्रवीणा' कविता संग्रहातील कविताही अपवाद नाही.

## संदर्भ सूची -


1. रुद्रवीणा - वा. रा. कांत - प्रकाशक के. एस. अतकरे पब्लिकेशन्स - कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद - द्‌वितीय आवृत्ती जून 1997 - पृ. 9.
2. तत्रैव - पृ. 39 - 40.
3. तत्रैव पृ. 10.
4. तत्रैव - पृ. 28.
5. कविता आणि प्रतिमा - सुधीर रसाळ - श्री. पु. भागवत मौज प्रकाशन - पहिली आवृत्ती जून 1982 - पृ. 75.


❖❖❖

# शेतकऱ्यांच्या विपन्नावस्थेवर महात्मा फुले यांनी सुचविलेले उपाय

## (Solutions on Poverty of Farmers suggested by Mahatma Phule)

डॉ. पवन मांडवकर
प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१
E mail: pavanmandavkar@hotmail.com भ्रमणध्वनी ९४२२८६७६५८

## गोषवारा

शेतकरी—कामकरी यांची चळवळ उभारणारे पहिले पुढारी म्हणून महात्मा ज्योतिबा फुले ओळखले जातात. 'शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे', हे त्यांच्या 'तृतीयरत्न' या नाटकातून त्यांनी पटवून दिले. अज्ञान, अंधश्रद्धा, खुळचट रूढी—परंपरा या कल्पना मानवाला दास्यशृंखलांमध्ये बद्ध करून टाकणाऱ्या आहेत. त्यावरचा उपाय म्हणजे शिक्षण आणि तेच समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम ठरू शकते, असे त्यांचे मत होते. महात्मा फुले यांना न्या. रानडे यांचे 'शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारत आहे' हे मत मुळीच रुचले नाही आणि ते मत त्यांनी 'इशारा' या पुस्तिकेत खोडून काढले. शेतकऱ्यांच्या विपन्नावस्थेच्या त्यांनी मांडलेल्या कारणांमध्ये शेतकऱ्यांना हेतूपूर्वक विद्येपासून दूर ठेवले गेले, धर्माच्या नावाखाली लुबाडले जाते, शेतीच्या वाटणीमुळे दर पीढीत पडत जाणारे शेतीचे तुकडे, जंगलखात्याचा जाचक कारभार, शेतसारा, लोकल फंड, जकात इ. कर ही काही कारणे होती. शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी काही उपाय त्यांनी सुचविले होते. त्यात शेतकऱ्याच्या घरी जन्मलेली व्यक्तीच कुणबी वगैरेंसाठी शिक्षक असायला हवी, शेतकऱ्याला नवे तंत्रज्ञान शिकवावे, गाय, बैल मारून खाण्यास कायद्याने बंदी करावी, तलाववजा बंधारे बांधून पाण्याची सोय करावी, इमारत लाकडांशिवाय इतर लाकडे तोडायची परवानगी असावी या उपायांचा समावेश होता.

## Abstract

Mahatma Jyotiba Phule is known as the first leader of the farmers-workers movement. 'Education is the third eye of a man', he proved in his play 'Tritiyaratna'. Ignorance, superstitions, rigid customs and traditions are the ideas that bind human beings in chains of slavery. He believed that the solution is education and it can be an effective means of social change. Ranade's view that the condition of the farmers was improving was not liked by Jyotiba at all and he refuted that view in the book 'Ishara'. Reasons for the poverty of farmers include deliberate exclusion of the farmers from education, being robbed in the name of religion, inheritance of pieces of land due to division of land, oppressive administration of forest department, Shetsara, local fund, zakat etc. taxes were some of the reasons. He suggested some measures for the upliftment of farmers. It included the measures that only a person born in the home of a farmer should be a teacher for Kunbi, farmers should be taught new technology, slaughtering of cows and bulls should be banned by law, small dams should be built and water should be provided, trees other than building timber should be allowed to be cut.

## बीजशब्द

महात्मा ज्योतिबा फुले, शेतकरी, तृतीयरत्न, शेतकऱ्याचा असूड, शिक्षण, उच्चवर्णीय, शूद्र, कुणबी

## प्रास्ताविक

जोतीराव गोविंदराव फुले अर्थात महात्मा ज्योतिबा फुले यांना भारतातील परंपरागत समाज संस्थांच्या विरुद्ध बंड करणारे पहिले बंडखोर म्हणून ओळखले जाते. भारतीय स्त्री शिक्षणाचे जनक तसेच स्त्री स्वातंत्र्याचे आणि हक्कांचे उद्‌गाते म्हणूनही ते ओळखले जातात. शेतकरी–कामकरी यांची चळवळ उभारणारे पहिले पुढारी म्हणूनही ते ख्यातीप्राप्त ठरले आहेत. समाज सुधारणा, सर्वांना शिक्षणाचा मूलभूत हक्क यांविषयी ते आग्रही होते.

महात्मा फुले यांनी त्यांच्या 'तृतीयरत्न' या नाटकातून 'शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे', हे पटवून दिले होते. शिक्षणानेच मनुष्य विवेकशील व संवेदनशील बनतो. समाजसुधारणेचा परीघ व्यापक होण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही, याची त्यांना जाणीव होती.

## विषय विवेचन

संपूर्ण समाजव्यवस्थेचा कणा असलेला शेतकरी हा अज्ञान व अंधश्रद्धांच्या भाराने वाकला आहे, त्याच्यातील अज्ञानाची पुटे जितक्या लवकर दूर होतील, तितकी समाजसुधारणेस गती प्राप्त होईल. त्यासाठी शिक्षण हाच एकमेव पर्याय आहे, असे महात्मा ज्योतिबा फुले यांचे स्पष्ट मत होते. शेतकऱ्यांच्या अवनतीचे चित्र त्यांनी अतिशय समर्पक शब्दात त्यांनी 'शेतकऱ्याचा असूड' मध्ये रेखाटले आहे. त्यात सूत्ररूपाने ते लिहितात –

'विद्येविना मती गेली
मतीविना नीती गेली
नीतिविना गती गेली
गतीविना वित्त गेले
वित्ताविना शूद्र खचले
इतके अनर्थ एका अविद्येने केले'[१]

('शेतकऱ्याचा असूड', पृ. २६३)

अज्ञान, अंधश्रद्धा, खुळचट रूढी–परंपरा, पुनर्जन्म, स्वर्ग–नरक, कर्मकांड, पूर्वसंचित या सर्व कल्पना मानवाला दास्यशृंखलांमध्ये बद्ध करून टाकणाऱ्या आहेत. भोळ्या–भाबड्या लोकांच्या मनावर या कल्पनांनी गारूड केले होते. त्यांची विचारशक्ती मरून गेली होती. त्यांच्यातील नवनिर्माण शक्तीचा ऱ्हास झाला होता, त्या सर्वांवर एकच पर्याय होता तो म्हणजे शिक्षणाचा! म्हणूनच महात्मा फुल्यांनी सर्व जातीधर्मातील मुला–मुलींसाठी सक्तीच्या व सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाची निकड बोलून दाखविली व त्यासाठी कृतीयुक्त आचरणही केले. सामान्य शेतकऱ्यांना दास्यशृंखलातून मोकळे करण्यासाठी त्यांनी शर्थीचे प्रयत्न केले. शिक्षणामुळेच समाजातील दरी कमी होण्यास मदत होईल यावंर त्यांचा विश्वास होता. शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे व शेतकरी वर्गासह समाजातील सर्व घटकांची दुरावस्था शिक्षणामुळेच दूर होऊ शकते, हे ते जाणून होते.

शेतकऱ्यांची पिछेहाट, अवनती ही अज्ञानामुळेच झाली आहे. जोपर्यंत शेतकरी बौद्धिकदृष्ट्या संपन्न होत नाही तोवर परावलंबित्व लाचारी, अगतिकता, असहायता त्याची पाठ सोडणार नाही. पडलेल्या प्रश्नांना निर्भीडपणे, सडेतोड उत्तर देण्याची ताकद शिक्षणातच असते. त्यामुळेच त्यांनी सार्वत्रिक व सक्तीच्या शिक्षणाचा आग्रह धरला होता. त्यातच त्यांना समाजाच्या सर्वांगीण प्रगतीचा मार्ग गवसला.

भारतातील कृषीप्रधान अर्थव्यवस्थेमुळे बहुसंख्य समाज हा शेतीवर आपली गुजराण करतो. शेतीमधील काबाडकष्टाची कामे करूनही पदरी काहीच पडत नाही, ही शेतकऱ्यांची वास्तविक परिस्थिती होती. 'शेतकऱ्याचा असूड'मध्ये फुल्यांनी शेतकऱ्याच्या हलाखीची अनेक कारणे सांगितली आहेत. शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांना लुबाडणाऱ्या, ऐषोरामात राहणाऱ्या, भाकडकथा सांगून फसविणाऱ्या उच्चवर्णियांना या आसूडाचा प्रसाद मिळाला पाहिजे, अन्यायाविरुद्ध पेटून उठण्याची ताकद त्यांच्यात आली पाहिजे अशा जागृती करण्याच्या प्रयत्नातून या ग्रंथाची निर्मिती झाली आहे.

फुले स्वत: शेतकरी कुटुंबातील असल्यामुळे त्यांना शेतकऱ्यांच्या प्रश्नांची चांगली जाण होती. शेतकऱ्यांचे अनेक मार्गांनी होणारे शोषण त्यांना दिसत होते. त्यांनी शेतकऱ्यांच्या समस्यांचा गांभीर्याने विचार केला. त्यामागील कारणांचा शोध घेतला व त्यावरील उपाययोजनाही सांगितल्या. १० डिसेंबर १८८२ रोजी महात्मा फुले यांचे मुंबईमधील भायखेडा येथे 'शेतकऱ्याची स्थिती' या विषयावर भाषण झाले. त्यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांची चित्तवेधक मांडणी केली व प्रश्नांच्या निराकरणासाठी उपायही सुचविले.

१८८५ च्या मे महिन्यात न्या. रानडे यांनी पुण्याच्या वक्तृत्व सभेत 'शेतकीची स्थिती' या विषयावर व्याख्यान दिले. त्या व्याख्यानात ''तीस वर्षांपेक्षा हल्ली शेतकीची स्थिती चांगली आहे. शेतकऱ्यांचे धान्य बाजारात सुलभरीतीने जाते व दुसऱ्या अनेक सुधारणा झाल्या आहेत. दहा वर्षांमागे दुष्काळ पडला तेव्हा स्थिती खालावली तरीपण आजची स्थिती तीस वर्षामागल्या स्थितीपेक्षा चांगली ठरते.''[२] असे उद्‌गार काढले. याच व्याख्यानात त्यांनी जमीनदारांची त्यांच्या कार्यावरून तरफदारी केली होती. जोतीराव फुल्यांना न्या. रानडे यांचे हे प्रतिपादन मुळीच रुचले नाही. त्यांचे मत त्यांनी 'इशारा' या पुस्तिकेत खोडून काढले. 'रानड्यांचे मत पूर्णत: चुकीचे व फसवे आहे, हे त्यांनी साधार पटवून दिले. उन्हातान्हात, उपाशीपोटी बायकामुलांसह राबणाऱ्या शेतकऱ्यांचे दु:ख बंगल्यात, ऐषोआरामात राहणाऱ्यांना काय माहीत?' असा रोखठोक सवाल फुल्यांनी केला. शेतकऱ्यांना फसवून, त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेत त्यांची संपत्ती गडप करणाऱ्यांना श्रमाचे मोल कसे कळणार! यासाठी शेतकऱ्यांनी जागरूक झाले पाहिजे, असे त्यांना वाटत असे. शिक्षणाशिवाय हे परिवर्तन अशक्य आहे, याची त्यांना जाणीव होती. म्हणूनच त्यांनी शिक्षणावर सर्वाधिक भर दिला.

'शेतकऱ्याचा असूड' हा महात्मा फुले यांचा प्रसिद्ध ग्रंथ होय. तत्कालीन समाजातील जातिभेद अनिष्ट प्रथा, तसेच समाजातील उच्चवर्णीयांची मक्तेदारी याविरुद्धची प्रतिक्रिया महात्मा फुले यांच्या साहित्यातून उमटलेली होती. त्याकाळच्या समाजाला प्रबोधनाची व सामाजिक परिवर्तनाची वाट दाखविण्यासाठी त्यांनी लिहिलेले ग्रंथ हे मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरले. समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीमध्ये महात्मा फुले यांनी मोलाचे योगदान दिलेले आहे. त्यांचे कार्य समाजाला प्रेरणादायी आहे.

महात्मा ज्योतिबा फुले यांनी १८८३ च्या आरंभालाच 'शेतकऱ्याचा असूड' हा ग्रंथ लिहिण्यास प्रारंभ केला. पण त्या दरम्यान अनेक ठिकाणी भटकंती करावी लागल्यामुळे ग्रंथ सिद्ध व्हायला विलंब झाला. मात्र, जोतीरावांनी दोन हस्तलिखिते तयार करून महाराज्यपालांना एक प्रत तर सयाजीराव महाराज यांना दुसरी प्रत भेट दिली. यामध्ये त्यांनी शेतकऱ्याच्या दुरावस्थेला त्याचे अज्ञान, गुलामगिरी, परावलंबित्व व अगतिकता, धार्मिक रूढी–परंपरा, आर्थिक शोषण कारणीभूत असल्याचे म्हटले आहे. भटशाहीचा अमानवी व्यवहार हेच शूद्रांच्या दु:खाचे मूळ कारण असल्याचे ते पोटतिडकीने सांगत असत. धर्म व धार्मिक चालीरीती, चातुर्वर्ण्य व्यवस्था, कर्मकांड, भटब्राह्मणांचा कपटी कावा यातच बहुजन समाज पिचून जात होता. त्याला जाग यावी म्हणून या ग्रंथातून म. फुले यांनी उपदेश केला आहे.

शेतकरी हा एकीकडे धर्माच्या नावाखाली लुटला जात होता तर दुसरीकडे सत्ताधारी त्याचे शोषण करत होते. ''इथल्या परिस्थितीचे तुटपुंजे ज्ञान असलेले ब्राह्मणधार्जिणे व ऐषोरामी वृत्तीचे गोरे साहेब लाचखाऊपणा, लब्धप्रतिष्ठित उच्चवर्णीय अधिकारी, ब्राह्मण कामगारांच्या ओंजळीने पाणी पिणारे देखमुख–पाटील यांच्यासारखे वतनदार, द्रव्यलोभी सावकार आणि धर्मकृत्यांचा बाजार मांडणारे पुराणिक–पुरोहित या सर्वांचीच शेतकऱ्यांच्या शोषणात भागीदारी होती''[३] यावरच जोतीरावांनी आसूड उगारला होता. शेतकऱ्यांच्या शोचनीय, दयनीय, परिस्थितीचे मूळ त्यांच्या अज्ञानात आहे. हे त्यांनी निरनिराळ्या लेखनातून आवर्जून सांगितले.

'शेतकऱ्याचा असूड' या ग्रंथाच्या लेखनामागील भूमिका विशद करताना त्यांनी म्हटले होते, ''शूद्र शेतकरी हा हल्ली इतक्या दीनवाण्या स्थितीत येऊन पोहचण्याची धर्म व राज्यासंबंधी अनेक कारणे आहेत. त्यापैकी थोडक्या बहुतांचे विवेचन करण्याच्या हेतूने हा ग्रंथ रचिला आहे. शूद्र शेतकरी बनावट व जुलमी धर्माचे योगाने, एकंदर सर्व सरकारी खात्यांनी ब्राह्मण वर्गाचे प्राबल्य असल्याने भटभिक्षुकांकडून व सरकारी युरोपिअन

कामगार ऐषोरामी असल्याचे योगाने ब्राह्मण कामगारांकडून नाडले जातात. यांच्यापासून त्यात या ग्रंथावलोकनाचे योगाने आपला बचाव करता यावा असा हेतू आहे.''[४] पारंपरिक, गतार्थ, रूढी–परंपरांपासून शेतकऱ्यांनी स्वत:ला दूर करून सजग होण्याची निकड फुल्यांनी व्यक्त केली. शेतकऱ्यांनी स्वत:च्या मुलांना शिकवावे, त्यांना आधुनिक ज्ञान–विज्ञानाची ओळख पटल्यास ते नवीन तंत्राचा वापर करून शेती सुधारण्याचा प्रयत्न करतील, अशी त्यांना खात्री होती. सरकारनी शेतीविषयक ज्ञान शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्यावे, नोकरीमधील जागा लोकसंख्येच्या प्रमाणात द्याव्यात, शेतकऱ्यांच्या व एकूणच सर्व जातीधर्मांच्या मुला–मुलींसाठी सक्तीचे मोफत प्राथमिक शिक्षण द्यावे, अशा अनेक सूचना म. फुल्यांनी या ग्रंथातून केल्या आहेत.

शेतकऱ्यांच्या जगण्याशी ते साक्षात संबंधित असल्यामुळे त्यांचे जीवनमान, राहणीमान, खानपान, कुटुंबाची स्थिती याविषयीची तपशीलवार माहिती यात दिलेली आहे. त्यावरून शेतकऱ्याच्या वास्तव जीवनाची कल्पना येऊ शकते. प्रत्यक्ष निरीक्षणातून हा तपशीतल नोंदविलेला असल्यामुळे तो वास्तव व यथायोग्य असा उतरला आहे. नापिकी, दुष्काळ, दैन्य, दारिद्र्य यामुळे शेतकरी कर्जबाजारी झाला. शेतीवर संपूर्ण कुटुंबाचे भरणपोषण करणे त्याला अशक्य झाले. त्यामुळे जोडधंदा करण्याची त्याला गरज भासली. त्यातूनच लाकूडतोड, दुभती जनावरे पाळणे, डिंक गोळा करणे, रानमेवा विकून उदरनिर्वाह करण्याकडे त्याचा कल वाढला. त्याच्या या अगतिक, शोचनीय परिस्थितीत दिवसागणिक वाढच होत गेली.

शेतकऱ्याच्या विपन्नावस्थेत भर टाकण्यासाठीच शेतसारा, लोकल फंड या जीवघेण्या समस्या उभ्या राहिल्या. रात्रंदिवस कष्ट उपसूनही पोटभर अन्न मिळण्याची ददात असते, त्यात बळजबरीने केलेली करवसुली त्यांच्या जगण्यात नवीन आपत्ती निर्माण करीत असते. दिवसरात्र कुटुंबातील बायकामुलांसोबत राबराब राबूनही दरमाणशी दरमहा तीन रुपयेही पडत नाहीत आणि साधारण युरोपिअन व नेटिव्ह सरकारी कामगारास दरमहा पंधरा रुपये किरकोळ खर्चास व दारुपाण्यासही पुरत नाहीत, हा विरोधाभास फुल्यांना जाणवला होता. यासंदर्भात त्यांनी 'शेतकऱ्याचा असूड' या ग्रंथात अत्यंत सत्यदर्शक अर्थपूर्ण विधान केलेले आहे. ''जगातील एकंदर सर्व देशांचे इतिहास एकमेकांशी ताडून पाहता, हिंदुस्थानातील अज्ञानी व देवभोळ्या शूद्र शेतकऱ्यांची स्थिती मात्र इतर देशांतील शेतकऱ्यांपेक्षा निकृष्ट अवस्थेत पात्र होऊन केवळ पशूपलीकडचे मजलशीस जाऊन पोहचली असे दिसून येईल.''[५] असे असतांनाही शेतकऱ्यांबद्दल जाणीवपूर्वक गैरसमज निर्माण करून त्यांचा उपहास करण्याची प्रवृत्ती समाजात वाढीस लागली आहे. त्याविषयी सुद्धा खरपुस समाचार फुल्यांनी घेतला आहे. शेतीचा कुठलाही अनुभव नसताना त्यांची निंदानालस्ती करणे गैर आहे, असे रोखठोक प्रतिपादन त्यांनी केले आहे.

शेतकऱ्यांच्या विपन्नावस्थेच्या कारणांची मुद्देसूद मांडणी फुल्यांनी केली आहे. त्यातील काही मुद्दे असे –

१. शेतकऱ्यांना हेतूपूर्वक विद्येपासून दूर ठेवले गेले.
२. धर्माच्या नावाखाली जन्मापासून मरणोत्तर लुबाडणारा भिक्षुक वर्ग
३. शासनातील शेतकरी विरोधी कामगार, युरोपीय अधिकारी व सावका
४. शेतीच्या वाटणीमुळे दर पीढीत पडत जाणारे शेतीचे तुकडे
५. जंगलखात्याचा जाचक कारभार
६. परदेशगमनास बंदी
७. शेतसारा, लोकल फंड, जकात इ. करांचे लादलेले ओझे
८. परकीय मालाच्या आयातीमुळे व स्वस्त विक्रीमुळे बंद पडत चाललेले देशी उद्योगधंदे
९. सुदृढ बैलांचे कमी कमी होत गेलेले बेणे
१०. परदेशाच्या कर्जाच्या व्याजाचे आणि इथल्या अधिकारी वर्गाच्या भारी पगाराचे ओझे

इ. अनेक कारणांमुळे भारतीय शेतकरी देशोधडीला लागला आहे. त्याची उन्नती साधावयाची असेल तर खालील उपाययोजना करण्याची गरज त्यांनी बोलून दाखवली होती.

१. ब्राह्मण शिक्षक नकोत. शेतकऱ्याच्या घरी जन्मलेली व्यक्तीच कुणबी वगैरेंसाठी शिक्षक असायला हवी.

२. सहाव्या इयत्तेपर्यंतचे शिक्षण झालेली व शेतकाम जाणणारी व्यक्तीच पाटील करावी.
३. शेतकऱ्याला नवे तंत्रज्ञान शिकवावे.
४. गाय, बैल मारून खाण्यास कायद्याने बंदी करावी.
५. तलाववजा बंधारे बांधून पाण्याची सोय करावी.
६. इमारत लाकडांशिवाय इतर लाकडे तोडायची परवानगी असावी.
७. उत्तम पीक उत्पादनाच्या स्पर्धा घेऊन बक्षिसे देण्यात यावी.
८. शेती सुधारणेसाठी शेतकऱ्यांच्या विद्वान मुलांना परदेशी पाठवून शेतीचा नवा अभ्यास करवून घ्यावा.

## समारोप

'जोतीराव फुले यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन लोकांनी त्याना मुंबईतील सभेत १८८८ मध्ये 'महात्मा' ही उपाधी दिली. त्यामुळे जोतीराव फुले हे 'महात्मा फुले' या नावाने ओळखले जाऊ लागले.'[६]

महात्मा फुले यांनी सुचविलेले हे उपाय पुस्तकी ज्ञानातून नव्हे तर अनुभवातून आलेले आहेत. जमिनीवर पाय ठेवून केलेल्या जीवनाच्या प्रत्यक्ष अवलोकनातून त्यांचे हे विचार साकारले आहेत. त्यांच्याजवळ स्वतंत्र विचार करण्याची, स्वतंत्र अन्वयार्थ लावण्याची कुवत असल्यामुळे नवे कोरे निष्कर्ष त्यांना काढता आले आहेत. त्यामुळेच त्यांच्या लेखनातून सतत एक जिवंत व दाहक अनुभव शब्दबद्ध होताना दिसतो.

स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण भागात शिक्षणाचा मोठा प्रसार झालेला आहे. 'विद्याहीनत्व' या कारणसूत्राचे काही प्रमाणात निराकरण झाले आहे. तंत्रज्ञानाची जोड मिळून हरित व श्वेत क्रांतीही होऊन गेली आहे. शासकीय पातळीवरून शेतकऱ्यास पदव्या दिल्या जात आहेत. मदत केली जात आहे. परदेशातून जनावरांच्या व पिकांच्या उत्तम पैदाशींसाठी चांगली बेणी आणली जात आहेत. शेतीशास्त्राचे उच्च शिक्षण शेतकरी पुत्रांना मिळत आहे. किंबहुना, त्यांना नवे ज्ञान गोळा करण्यासाठी त्यांचे परदेश दौरेही आखले जात आहेत. जोतीरावांनी सुचविलेले बरेच उपाय आज प्रत्यक्षात आणले गेले आहेत. तरीपण देशातील ७० टक्के शेतीवर जगणाऱ्यांची स्थिती सुधारली आहे किंवा त्यांनी त्यांच्या घरी लक्ष्मीला नांदायला आणली आहे, असे चित्र दिसत नाही. एकूणच कालमानाने शेती आणि शेतकरी यांच्यासाठी विशेष प्रयत्न केल्याशिवाय त्यांची प्रगती अजूनही साधता येणार नाही, हे नक्की. शेतकऱ्यांच्या विपन्नावस्थेवर महात्मा फुले यांनी सुचविलेले उपाय आजही अत्यंत महत्त्वपूर्ण समजले जातात.

## संदर्भ

१. फुले जोतीराव गोविंदराव, शेतकऱ्याचा असूड, उपोद्घात, (म.फुले समग्र वाङ्.मय), संपा. धनंजय कीर, स. गं. मालशे, प्रका. म. रा. साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, सुधारित सहावी आवृत्ती, नोव्हे. २००६, पृ. २६३
२. फाटक न. र., न्या. महादेव गोविंद रानडे यांचे चरित्र, १९२४, पृ. ३७३—३७४.
३. सरदार गं. बा., म. फुले व्यक्तित्व आणि विचार, पृ. ८७
४. म. फुले समग्र वाङ्.मय, पृ. १८९
५. उनि. पृ. २६४
६. https://mr.wikipedia.org/wiki/ महात्मा फुले

❖❖❖

# जीवनानुभव प्रकट करणाऱ्या कथा : ओंजळीतील फुले

**प्रा. सुखदेव विष्णू कोल्हे**
दादा पाटील महाविद्यालय, कर्जत
जि. अहिल्यानगर ४१४४०२
ईमेल:- sukhadevkolhe@gmail.com मोबा. ८६०५२९८५२९

'ओंजळीतील फुले' हा प्रकाश खंडागळे यांचा प्रकाशित झालेला पहिला वहिला कथासंग्रह आहे. यापूर्वी आत्मगंधाच्या पाऊलखुणा (कवितासंग्रह), सत्कार (लघु कादंबरी), सफर लायबेरिया (प्रवासवर्णनपर लेखन), एक होती आशा (आठवणीवजा चरित्रकथन) ही पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. याशिवाय 'आरोग्याचा महामेरू डॉ. रजनीकांत आरोळे' हे चरित्रवजा पुस्तकाच्या लेखनाचे काम सध्या सुरू आहे. श्री. प्रकाश खंडागळे यांनी संघर्षपूर्ण परिस्थितीमध्ये 'सेवाभाव' हे व्रत स्वीकारून आरोग्य क्षेत्रात कर्मचारी म्हणून नोकरी केल्यानंतर त्यांनी पत्रकारिता केली आहे व अजूनही करत आहेत. त्यामुळे स्फूट स्वरूपाचे लेखन त्यांच्याकडून वर्तमानपत्रांमध्ये लिहिले जात आहे. पत्रकाराचा पिंड असल्याने लेखनामध्ये चौकसपणा आणि शिस्त जाणवते. त्यांच्या लेखनामध्ये कालबाह्य संदर्भ वापरलेले नाहीत. त्यांचे लेखन वाचताना या घटना वास्तवाशी इतक्या मिळत्याजुळत्या आहेत की, पुस्तकातील घटना प्रत्यक्षातील घटनेसारख्या भासतात.

या कथासंग्रहातील लेखन कथात्म परंपरेशी निगडित असले तरी यातील काही लेखनाचा संबंध ललितपर लेखनाशी येत असल्याचे जाणवते. श्री प्रकाश खंडागळे हे वाचनातून लेखनाकडे वळालेले लेखक आहेत. मनात चोहोबाजूंनी उठलेले काहूर शब्दांच्या माध्यमातून त्यांनी विविध लेखन प्रकारांद्वारे व्यक्त केले. परमेश्वराने दिलेले आयुष्य म्हणजे ओंजळ आणि त्याच्यात आलेले अनुभव व प्रसंग कथा स्वरुपात प्रगट झाल्या ती फुले, म्हणूनच 'ऑजळीतली फुले' असा हा आविष्कार आहे. या कथासंग्रहातील माय, रेशीमगाठ, सॉरी बाळा, दिल्लीचा ठक, पतंग, स्नेहांकुर, माणुसकी, समेट, मफलर, स्पर्श, ओळख, भेट, दोन कैदी, मुक्ता उडाली आकाशी आदि कथा मराठीतील श्रेष्ठ कथांच्या पंगतीला बसण्याची क्षमता प्रकट करतात. या वीस कथा विशेषतः ग्रामीण भागातील आठवणी सांगणाऱ्या आहेत. सामान्य जीवनातील न संपणारे दुःख या कथेत दिसते. कुटुंब, संघर्ष, आरोग्य, व्यक्तिचित्रे आदि माणसांच्या जगण्यातील बहुविध स्तर या कथांमध्ये जाणवतात. ग्रामजीवनातील आठवणी सांगणाऱ्या या कुटुंब, संघर्ष, आरोग्यविषयक, व्यक्तिचित्रणात्मक अशा या कथा आहेत. साचेबंद चौकटीत या कथा लिहिलेल्या नाहीत तर या कथा मुक्त प्रकारातील आहेत.

व्यवसाय व घर सांभाळून मोठ्या हिमतीने कुटुंब सांभाळणारी नायिका पतंगाप्रमाणे आयुष्यभर स्वकष्टावर जगते असून आयुष्य हे परमेश्वराने दिलेली देणगी आहे असे मानून या विशाल मायभूमीवर आकाशात विहार करणाऱ्या पतंगासमान उपभोग घेत आयुष्य जगत असल्याची निर्मळ भावना 'पतंग' कथेतील नायिकेद्वारे व्यक्त होते. तिघी बहिणी आप्पाला होत्या. या मुलींनाच आप्पांनी मुलांसारखे मानले व वागवले. म्हणूनच कथेतील नायिकेला आप्पा म्हणतात, "तुच माझ्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करणार आहेस" (पृष्ठ ९). रक्ताचे नाते नसले तरीही हॉस्पिटलमधील बेड शेजारच्या पेशंटच्या नातेवाईकांनी अरविंदच्या पत्नीकरिता रक्ताची गरज भागवली होती. सख्ख्या भावाप्रमाणे त्या इसमाने मदत केल्याबद्दल

बहिणीच्या नात्याने 'करदोडा' देऊन अरविंदच्या पत्नीने भाऊबीज साजरी केली. करदोडा म्हणजे बहिण भावाच्या प्रेमाचे प्रतीक असल्याची भावना 'रेशीमगाठ' कथेमध्ये प्रत्ययास येते. कुटुंबातील सदस्य असल्याप्रमाणे कामवाली साखरबाई घरातील सदस्य असल्यासारखी मालकिणीच्या सुशांत बाळाची आजारीपणात मनोमन काळजी घेत असल्याचे 'स्नेहांकुर' कथेत जाणवते

व्यसनी नवऱ्याला सांभाळणारी 'माणुसकी' कथेतील नायिका धुणी-भांडी करून संसार चालवते. "उद्या या गरिबाच्या घरी शिरखुर्मा खायला, श्रीमंताच्या घरी तर सर्वच जातात" (पृष्ठ १७) असे रमजान ईदचे आमंत्रण मोठ्या मनाने देणारी संघर्ष नायिका या कथेत भेटते. टीबीग्रस्त मुक्ताला नवऱ्याने सोडले असतानाही आपल्या स्वकर्तृत्वाने गावाच्या विकासासाठी झटून काम करू लागते. 'आरोग्याबाबत जे ज्ञान मिळाले ते पणतीप्रमाणे एकमेकांना देऊन गावाचा विकास केला'(पृष्ठ २०) असे छातीठोकपणे सांगणारी व पंतप्रधान राजीव गांधींसोबत गावाच्या विकासाबाबत चर्चा करणारी मुक्ता ही नायिका 'मुक्ता मिळाली आकाशी' कथेत भेटते. मुंबईहून पंचमीच्या यात्रेसाठी गावी आलेला रामू भाचा श्री ला यात्रा दर्शन घडवतो. यात्रेच्या ठिकाणी फुग्याच्या टाकीच्या स्फोटातून पळापळी होऊन भाचा हरवतो, कर्तव्यदक्ष पोलिसांच्या मदतीने नंतर भाचा भेटल्याची भावना 'समेट' कथेत येते

'माँ तुझे सलाम' कथेतील जवान वाघा बॉर्डरवरून ड्युटी करून गावी परतताना प्रवासात रामभाऊ बरोबर हितगुज करतो आणि देश सेवेला सर्वस्व अर्पण करणारे आमचे कुटुंब व गाव असल्याचे निधड्या छातीने व अभिमानाने त्यांना सांगतो. फुफुसाचा क्षय असलेल्या मास्तरांच्या अंतिम प्रवासातही 'मफलर' सोबतीण होती. मृत्युनंतर मफलर माझ्या डोक्याला गुंडाला असे मास्तर मुलीला सांगतात. त्यापद्धतीने मुलीने जड अंत:करणाने आण्णांची आवडती मफलर त्यांच्या डोक्याला गुंडाळली. हातापायाचे स्पर्शज्ञान कमी झाल्याने तेथील संवेदना मेंदूपर्यंत पोहोचत नसल्याने कापलेले, भाजलेले, टोचलेले कुष्ठरोग्यांना समजत नाही. अशा विकृतीवर मसाज थेरपी देऊन रुग्णांची विकृती पासून सुटका करण्यासाठी फिजीओथेरपीचे ट्रेनिंग घेणारा मारुती 'स्पर्श' कथेत दिसतो. "स्पर्शातून जाणीव निर्माण होते, जाणीवेतून आशा निर्माण होते. अशी आशा कुष्ठरोग्याबद्दलची निर्माण झाली तर समाजातून कुष्ठरोग निर्मूलन होण्यास मोठी मदतच होईल, यात शंकाच नाही! मात्र मारुती विसरले नव्हते कुष्ठरोग्याचा तो झालेला एक प्रेमळ आशावादी स्पर्श!" (पृष्ठ ३१). साध्या ओळखीवर रिक्षाकरिता आवडीचा नंबर एक पैसा खर्च न करता पंढरीनाथ यांनी मिळवून दिला होता म्हणून पंढरीनाथच्या कर्जाला उतराई होण्यासाठी रऊफ भाई दुष्काळात पंढरीनाथ यांना टँकरने मनसोक्त पाणीपुरवठा करताना 'ओळख' कथेत दिसतो

जात्यावर दळताना म्हटलेल्या ओव्या, पाणी तापवण्यासाठी वापरले जाणारे घंगाळ, गोधडी आदि गावगाड्यांचे संदर्भ 'माय' कथेत मास्तर व माय यांच्या माध्यमातून मिळतात. "माय दळताना सुंदर आवाजात गाणे गायची! स्वरबद्ध केलेली तिचीच रचना असायची. त्यात सर्वच नाते संबंधातून मायेचा झरा झिरपत असायचा" (पृष्ठ ३५). 'आणि मुन्ना शाळेत जाऊ लागला' कथेतील अपंग मूकबधिर मुन्ना या मुलाला कुटुंबवत्सल नेमीचंद प्रेमाने सांभाळतो आणि मुन्नाच्या भविष्यासाठी त्याला मोठ्या प्रयत्नाने मूकबधिर अपंग शाळेत भरती करतो. 'सॉरी बाळा' या कथेत खूप मेहनतीने प्राथमिक शिक्षिकेची नोकरी लागलेल्या सुमनचे मामाचा मुलगा किरण याच्यासोबत लग्न होते. बिनपगारी रजा होऊ नये म्हणून सातव्या महिन्यातही बाळंतपणाची रजा न घेता सेवाभाव वृत्तीने काम करणारी सुमन एके दिवशी पाणी साठलेल्या आणि चिखलातून स्कूटर चालवताना तोल जाऊन खड्ड्यात पडल्याने गर्भाशयाच्या पिशवीचे नुकसान पोहोचते. पहिल्या बाळाची स्वप्ने पाहणारी सुमन 'बाळा..सॉरी' असे अश्रूंना मोकळी वाट करताना दिसते. 'भेट' कथेत जामखेडच्या पंचमी यात्रेला गंगाराम हा पुतण्या बाबू याला घेऊन जातो. नागेश्वराची पालखी, नर्तकींचे डाव दाखवतो. मात्र त्याला याच यात्रेत मित्र सोपान भेटतो आणि मित्राच्या आग्रहाखातर

दोघे मिळून देशी दारूच्या गुत्त्यात रममान होऊन नशेत डुबतात. दुसरीकडे कासावीस झालेल्या बाबुला शेवटी पोलीस स्टेशनमध्ये आसरा घेणे भाग पडते. नशेपायी झालेल्या ताटातुटीची खंत गंगाराम व्यक्त करताना बाबुला कवटाळून म्हणतो 'अरं लेकरा मी चुकलो रं, रातचीला मी लय ढोसली, त्या सोपानच्या नादानं अन तुला विसरलोच बघ' (पृष्ठ ४७). अशी कबुलीही देतो

मायकल व जुलीचे ओळखीतून प्रेमात रूपांतर होते व दिवस जातात म्हणून मायकल जुलीचे अ‍ॅबोर्शन करण्याचे ठरवतो. अ‍ॅबोर्शनसाठी नागपाडा नेबसूड रात्री गेस्ट हाऊसमध्ये नायकाचे चोरलेल्या पैशाची कबुली देतो. अ‍ॅबोर्शनसाठी चोरलेले पैसेच मायकल लग्नाच्या खर्चासाठी वापरत असल्याची व एक चोरी त्याच्या कामाला आणणारी आणि त्याचे आयुष्य बदलून टाकणारी घटना 'दोन कैदी' या कथेमध्ये येते. 'दिल्लीचा ठक' कथेत दिल्ली ते मुंबई रेल्वे प्रवासाची कहाणी येते. गावाकडील आहे असे सांगणारा युवक नायकाला दिल्लीतून रेल्वेचे तिकीट काढून देतो म्हणून फसवतो व ही फसवेगिरी नायकाला रेल्वे प्रवासादरम्यान अनेकांकडून झाल्याची कहाणी या कथेत येते. 'अगा जे कल्पिले नाही' या कथेत मुंबईतील पुस्तकाच्या दुकानात नायकाची बॅग चोरीला जाते आणि त्याच बॅगमधील डॉ. आरोळे यांचा पासपोर्टही चोरीला जातो. डॉ. आरोळे यांची परदेशातील मिटिंग चुकू नये म्हणून कथेचा नायक महतप्रयासाने तो पासपोर्ट आठ दिवसात मिळवून देतात व डॉ. आरोळे यांची परदेशातील मीटिंग विनासायस पार पडण्याची वाट मोकळी होते. 'प्रवासातील आफ्रिकन' कथेत गुढकथेचा अनुभव येतो. रात्रीचा प्रवास करताना नायकाला घाटामध्ये एक आफ्रिकन निर्जन रस्त्याला भेटतो व पैशाची मागणी करतो नंतर पैसे मिळत नसल्याचे पाहून अंधारात गुडूपही होतो. 'झक मारली अन मुंबई पाहिली' कथेत दामू कामधंद्यापायी मुंबईला यशवंताकडे जाण्याचे ठरवून उस्मान भाईच्या जीपमधून जातो. मुंबईत गवंड्याच्या हाताखाली गगनचुंबी इमारतीवर काम करतो. लोकल रेल्वे प्रवास करताना चर्चगेट वरून येणाऱ्या लोकलमध्ये बॉम्ब फुटतो आणि रक्ताने माखलेला लोकल डबा पाहून दामूच्या काळजाचे ठोके वाढतात. “आपली गावाकडची भाकरी चांगली, एक वेळ नाही मिळाली तरी चालेल, पण असं मरण नगं रे बाबा! गावाकडं काहीतरी करू, पण नको ही मुंबई” (पृष्ठ ८०). असे यशवंताला सांगून दामू गावाकडे परततो.

अलंकारिकता त्यांच्या लेखनामध्ये फारशी येत नाही. याउलट व्यवहारी भाषेचे अनेक संदर्भ कथेमध्ये आलेले दिसतात. आशय व अभिव्यक्तीदृष्ट्या या कथा वेगळ्या असून लेखकाची गंभीर जीवनदृष्टी व संपन्न जीवनानुभव प्रकट करणाऱ्या या कथा आहेत. विविधांगी वैशिष्ट्यपूर्णतेमुळे हा कथासंग्रह मराठी कथावाङ्मयात निश्चितच मोलाची भर घालेल. समाजात जगताना होणारे आनंद आणि त्रास त्यांच्या संपूर्ण व्यामिश्रतेसकट या कथा वाचकापुढे मांडतात. प्रथम पुरुषी व तृतीय पुरुषी निवेदन पद्धतीचा वापर या कथांद्वारे आलेला दिसतो. प्रकाश खंडागळे यांच्या बहुविध कथेच्या समाप्तीमध्ये अथवा कथेच्या शेवटच्या ओळीमध्ये त्यांच्या कथेचे शीर्षक डोकावलेले दिसते. एव्हाना ते कथेच्या शीर्षकाचे शेवटचे अक्षर बनलेले आहे. विजय तेंडुलकर एका ठिकाणी लिहितात, ‘शब्द देता येतात. लिहिण्याची हौसही देता येईल. शैली तर दिली-घेतली जातच असते. परंतु जगण्याचा आशय देता येत नाही. उसण्या आशयावर कोणाचे लेखन जीव धरू शकत नाही. हा आशय ज्याचा त्याने कमवावा लागतो, तो मिळविण्याची ईर्षा मुळातच असावी लागते’ विजय तेंडुलकरच्या या मांडणीला अनुसरूनच प्रकाश खंडागळे यांचे या पुस्तकातील लेखन स्वतःचे, स्वकमाईचे आहे. त्यांच्या लेखनातून त्यांचे व्यक्तिमत्व अधिकाधिक उलगडत गेल्याचे दिसते.

(सदर शोधनिबंधासाठी ‘ओंजळीतील फुले’ (कथासंग्रह), समीक्षा पब्लिकेशन, पंढरपूर, फेब्रुवारी २०२३ ही आवृत्ती आधाराला घेतलेली आहे. कंसात दिलेले पृष्ठक्रमांक याच आवृत्तीतील आहेत.)

❖❖❖

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे सामाजिक व शैक्षणिक कार्य

**प्रा. डॉ. प्रमोद दामोदर देवके**
सहयोगी प्राध्यापक
यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय,
मंगरुळपीर जि. वाशिम
pramoddevke66@ gmail com.मो नंबर 9604674723

## गोषवारा :-

सावित्रीबाईच्या जीवनकार्याचा विचार करता त्यांचे व्यक्तीमत्व् क्रातीकारक होते. ज्याकाळात शिक्षणाचा जास्त प्रसार झालेला नव्हता, त्या काळात स्वत: शिक्षण घेऊन सामाजिक कार्य करण्यासाठी त्या घराबाहेर पडल्या. संस्काराचा वाटा फार मोठा आहे. माणसाबरोबर माणुसकीने, अपुलकीने वागण्याचे, गोरगरीबांना मदत करण्यांचे सर्व संस्कार त्यांच्यात होते. सावित्रीबाईंनी महिलांना साक्षर करण्यासाठी विद्यानगरी निर्माण करुन शिक्षणाचा पाया रचला. या संधीचे सोने करण्यासाठी महिलांनी शिक्षणाचे इमले उभारुन शैक्षणिक, सामाजिक व राजकारणातही स्त्री ही पुरुषाबरोबर आहे, हे दाखवून दिले. सावित्रीबाई फुले यांच्या प्रेरणेने मुलींना व महिलांना आजही सन्मान मिळत आहे. म्हणुनच त्या थोर क्रांती देवतेचे जीवन आजच्या स्त्रियांनी अभ्यासले पाहिजे.

**बीजशब्द :-** अस्पृश्यता , अंधश्रध्दा, जातिभेद, शिक्षण, शुद्र.

## प्रस्तावना :-

समाजाच्या जडणघडणीमध्ये सावित्रीबाईचे सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील योगदान मोलाचे आहे. स्त्री-पुरुष समानतेचे दर्शन सवित्रीबाईंनी आपल्या विचारातून घडविले. भारतातील स्त्री चळवळीच्या पहिल्या महिला कार्यकर्त्या व अस्पृश्यता निवारणातील एक धडाडीच्या महिला म्हणजे सावित्रीबाई होत. त्यांचे सामाजिक कार्य सर्वव्यापी होते. स्त्रिया, शुद्र, शेतकरी, कामगार या सर्व शोषित वर्गासाठी त्यांनी कार्य केले. शिक्षणाचा अभाव, जातीभेद, अंधश्रध्दा, स्त्री दास्य् या सर्वच आघाडयावर त्यांनी लढा दिला. आधुनिक भारताच्या जडणघडणीत मोलाची भूमिका बजावतांना सावित्रीबाईंनी एक आदर्श शिक्षिका , उत्तम प्रशासक लेखिका, कवियत्री इत्यादी रुपात समाजप्रबोधनाचे काम शेवटच्या श्वासापर्यंत केले.

## उद्देश :-

१) सवित्रीबाई फुले यांचे जीवन व कार्य अभ्यासणे
२) सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील सावित्रीबाई फुलेंच्या योगदानाचा अभ्यास करणे.
३) समाजसुधारक सावित्रीबाई यांच्या स्त्रीवादी विचारांचा आढावा घेणे.

## विषय विवेचन :-

भारतीय समाजाच्या जडणघडणीमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील योगदान महत्वपुर्ण आहे. हे त्यांच्या आयुष्यभर समाजाच्या उत्थानासाठी केलेल्या कार्यातून व कष्टातून दिसून येते. सावित्रीबाईंनी स्त्री शुद्रांना ज्ञानाची महती पटवून देण्याचे काम आयुष्यभर केले. शिकण्यासाठी जागे व्हा हेच आवाहन त्यांनी सतत केले. विद्या हे धन आहे रे, श्रेष्ठ साऱ्या धनाहूनी हे त्यांनी पुन्हा पुन्हा सांगितले.

### १) स्त्री शिक्षणाला महत्व् :-

ज्या काळात स्त्रियांना कोणतेच शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. कोणत्याच ग्रंथाचे पठण करता येत नव्हते. चुल आणि मुल हेच स्त्रियांचे कार्यक्षेत्र होते. स्त्रियांचे अस्तित्व् चार भिंतीच्या आत बंदिस्त् होते. अशा काळात मुली, महिला , स्पृश्य, अस्पृश्य् सर्वांसाठी शैक्षणिक कार्य विनामुल्य् करणाऱ्या पहिल्या अध्यापिका सावित्रीबाई फुले होत. ज्यांनी स्त्रियांबद्दलची चुल आणि मूल ही भावना मोडीत काढून स्त्रि शिक्षणाचा पाया रोवला. मानवी जीवनात शिक्षण अतिशय महत्वाचे आहे. कारण शिक्षणामुळे अज्ञानाचा नाश होतो, अज्ञान हे माणसाला गुलाम बनविते. गुलामीतून मुक्त व्हायचे असेल तर सर्वांनी शिक्षणाचे महत्व् जाणले पाहिजे, असे त्या म्हणत्.

### २) केशवपन पध्दतीवर हल्ला :-

केशवपन हया वाईट रुढी विरुध्द सावित्रीबाईनी आवाज उठविला. केशचपनामुळे स्त्रिया विद्रूप दिसतात म्हणून ही प्रथा थांबविण्यासाठी सावित्रीबाईने जीवनाचे रान केले. केस हा स्त्रियांचा अनमोल दागिना आहे. तो हिरावून घेता कामा नये. म्हणून या संदर्भात २३ मार्च १८९० च्या सभेत केशवपन करु नये असा महत्वाचा ठराव पास केला. पेशव्याच्या काळापासून अस्तित्वात असलेल्या या अमानविय प्रथेला लगाम घालण्याचे धाडस सावित्रीबाईनी केले.

### ३) शैक्षणिक कार्य :-

शिक्षणासंबंधी विचार मांडतांना सावित्रीबाई फुले म्हणतात , मानसातील माणूसपण जागे करुन सुसंवाद वाढविण्यासाठी आणि माणसामाणसातील अंतर कमी करण्यासाठी शिक्षण खूप महत्वाचे आहे. या देशातील स्त्री , दलित , बहुजनांच्या मुला-मुलींना शिक्षणाची संधी देऊन हजारो वर्षापासून धर्माच्या नावाखाली दबलेला आवाज बुलंद करुन गुलामगिरीला झुगारुन देण्यांचे सामर्थ्य त्यांनी शिक्षणातून मुला-मुलीमध्ये निर्माण केले. सावित्रीबाईनी लोकांचा विरोध पत्करुन शाळेत जाऊन ज्ञानदानाचे पवित्र कार्य केले. लोक त्यांचा रस्ता अडवत , शेण, दगड फेकून मारत , पण सावित्रीबाई डगमगल्या नाहीत. रस्ता अडविणाऱ्यांचा मुकाबला आत्म् विश्वासाने करत. शालेय विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे यासाठी त्यांनी स्वत:च्या घरी विनामुल्य वसतीगृह चालविले. मुलींनी रोज शाळेत यावे म्हणून सावित्रीबाई स्वत: त्यांच्या घरी जाऊन पालकांना भेटत, समजावुन सांगत. त्यांच्या शाळेत विद्यार्जन व चारित्र्य् निर्माण करणे यावर जास्त् भर होता.

## ४) अस्पृश्यता निवारण :-

आपण सारी एकाच निर्मिकाची लेकरे आहोत मग आपसात भेदाभेद का करायचा ? असा सावित्रीबाईचा सनातनी लोकांना सडेतोड सवाल होता. विषमता ही फार मोठया प्रमाणात वाढली होती. जातीजातीत प्रचंड भेदभाव निर्माण झाला होता. अस्पृश्य् माणसांना पिण्यासाठी सुध्दा पाणी मिळत नव्हते. अस्पृश्य् लोकांची ही दयनीय अवस्था बघून सावित्रीबाईनी आपल्या पाण्याचा हौद अस्पृश्यांना खुला करण्यासाठी जोतीबांना सांगीतले आणि अठरापगड जातीच्या लोकांना पाणी भरण्यासाठी हौद खूला केला. अशा प्रकारे अस्पृश्यता निवारणाचे कार्य त्यांनी केले.

## ५) सामाजिक कार्य : -

ज्योतीरावांनी सत्य् शोधक समाजाची स्थापना केली होती. परंतु त्यांच्या निधनानंतर सावित्रीबाईनी या सत्यशोधक समाजाचे 'समता आंदोलन'पुढे चालु ठेवले. तसेच पारंपारिक विवाह नव्या पध्द्तीने लावले. पुरोहितास नाकारले, हुंडा घेण्यांची पध्दती नाकारली, कमी खर्चात लग्न् लावून दिले. अनेक सामाजिक कार्यात भाग घेणे. पुढाकार घेणे हे त्यांचे घ्येय होते. दृष्काळ आणि प्लेग मध्ये सुध्दा त्यांनी जीवाची पर्वा न करता कार्य केले.

## ६) प्लेग निर्मूलन कार्य :-

सावित्रीबाईंनी प्लेगच्या साथीच्या वेळी केलेले सामाजिक कार्य अभूतपूर्व व अपार धैर्याचे कार्य होय. सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन प्लेग निर्मूलनाचे कार्यास हातभार लावला, शर्थीचे प्रयत्न् केले. प्लेगच्या रोग्यांची सुश्रुषा करण्यासाठी त्यांनी डॉक्टर् यशवंतरावांना नगरहून बोलावून घेतले. यशंवतरावांनी हडपसर येथे ससाणे यांच्या माळरानावर जनसुश्रुषेसाठी दवाखाना सुरु केला. प्लेगग्रस्त मुलास दवाखान्यात नेत असतांना त्यांना प्लेगची लागण झाली त्यातच त्यांचे निधन झाले.

## ७) विधवा पुनर्विवाहाचा प्रयत्न् :-

बालविवाहाच्या प्रथेमुळे स्त्रिया तरुण वयातच विधवा होत. विवाह काय हे कळण्या आधीच त्यांचा संसार संपून त्यांना अपमानीत दिवाभीतासारखे जीवन जगावे लागे. त्यामुळे सावित्रीबाई व ज्योतीबा यांनी विधवांच्या विवाहासाठी खुप प्रयत्न् केले.

## ८) बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना :-

सावित्रीबाई व ज्योतीबा फुले यांनी बालहत्या प्रतिबंधक गृह काढले. येथे येऊन बाळंतपण करुन जा असे आवाहन प्रसिध्द् केले. कारण त्या काळात बालविवाह, बाल-जरठ विवाह हया प्रथा होत्या . त्यामुळे स्त्रिया विधवा होत. समाजातील पुरुष त्यांना फसवत व दिवसगेल्यावर निघुन जात. अशा वेळी स्त्रीयांनाच दोषी समजले जाई. अशा स्त्रियांना आत्महत्या शिवाय पर्याय राहत नसे. अशा स्त्रियांना वाचविण्यासाठी जोतीबा व सावित्रीबाईनी उघडपणे बालहत्या प्रतिंबंधक गृह काढले.

## ९) विद्येचे महत्व् :-

स्त्री शिक्षणास व एकूण शुद्र् व अतीशुद्र यांच्या शिक्षणास म. फुल्यांनी जे महत्व दिले त्या पाठीमागे एक मोठे तत्व् होते. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे एक अत्यंत प्रभावी असे साधन आहे. असे सांगणारा भारतातील हा पहिला दृष्टा शिक्षण तज्ञ होय. म्हणूनच यांनी आपल्या पत्नी सावित्रीबाई यांच्या सहकार्याने केवळ शाळा सुरु केल्या असे नाही तर अभ्यास क्रमही तयार केला व विद्येचे महत्व लोकांना पटवून दिले.

## निष्कर्ष् :-

१) सावित्रीबाई फुले हया स्त्री मुक्तीच्या आद्य प्रणेत्या होत्या.

२) सावित्रीबाईच्या शैक्षणिक योगदानामुळे स्त्रियांत मोठया प्रमाणात शिक्षणविषयक जागृती झाली.

३) सावित्रीबाई फुले यांनी अनाथांना व वसतीगृहातील मुलांना बळ दिले.

४) बालविवाह,पुनर्विवाह, केशवपनाच्या प्रथेविरुध्द् आवाज उठविल्यामुळे स्त्रिजीवनाला संजीवनी मिळाली.

५) रुढी, परंपरा, अंधश्रध्दा या सर्वावर मात करीत प्रचंड अन्याय, अत्याचार सहन करुन सामाजिक व शैक्षणिक कार्य मोठया प्रमाणात केले.

## संदर्भ ग्रंथ सूची :-

१) झोडगे फुलवंता - साध्वी सावित्रीबाई फुले,चिनार पब्लीशर्स,पुणे, प्रथमावृत्ती, २००६

२) कीर धनंजय - महात्मा जोतिराव फुले, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई१९९८

३) माळी मा.गो.- क्रांतिज्योती सावित्रीबाई ज्योतिराव फुले, फुले प्रकाशन, गारगोटी

४) पवार ना.ग. - सावित्रीबाई फुले चरित्र , मातृभुमी प्रकाशन, पुणे

५) पवार ना.ग. - सावित्रीबाई फुले अष्टपैलु व्यक्तीमत्व् पद्मगंधा प्रकाशन पुणे-२००४

❖❖❖

# अहिराणी बोलीतील म्हणींची भाषिक वैशिष्ट्ये

**संशोधक विद्यार्थी**
**जयदिप ओंकार कदम**
मराठी संशोधन केंद्र
के.टी.एच.एम. महाविद्यालय, नाशिक

**मार्गदर्शक**
**डॉ. प्रतिभा सुरेश जाधव**
मराठी विभाग प्रमुख
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
लासलगाव, ता. निफाड, जि. नाशिक

## १. प्रस्तावना :-

संस्कृत भाषेतील ‘भण’ धातूपासून अपभ्रंश होऊन बनलेला शब्द ‘म्हण’ याचा अर्थ जे म्हटलेले आहे किंवा जे लोकांच्या वारंवार म्हणण्यात येते ते असा आहे. म्हणीलाच ‘लोकोक्ती’ म्हटले जाते. म्हणीतून भाषेचे अंतरंग व्यक्त केले जाते. काव्य किंवा लेखन करताना विशिष्ट नियम, अटी पाळून करावे लागते. त्यामुळे त्यात सहजता येत नसल्याने तडजोड करत भावभावना मांडणे क्रमप्राप्त ठरते. त्यातुलनेत म्हणीची भाषा लौकिक व व्यावहारिक स्वरूपाची असल्याने नैसर्गिक, मूळ आणि तिच्या अस्सल स्वरूपात दिसते. त्या-त्या काळातील बोलीचे प्रतिबिंब म्हणीतून पडत असल्याने भाषेचे अंतरंग म्हणीतून कळते जे कुठल्याही लिखित वाड्.मयातून कळू शकत नाही. भाषेचे अस्सल रूप, तिचा चेहरा मोहरा कसा आहे हे जाणून घ्यावयाचे असेल तर भाषेतील म्हणीच अभ्यासाव्या लागतात. म्हणी या संपूर्ण समाजाची निर्मिती असल्याने लोकसमूहाकडून तिचा स्वीकार होतो . प्रदेशाच्या एका टोकाला एखादी म्हण बोलली गेली तर दुसऱ्या टोकाला जाईपर्यंतच्या वाटचालीत समुदायाच्या स्थानिक प्रतिमा, प्रतीके, शब्दांचे उच्चारण यात बदल होत जाऊन मूळ स्वरूपात परिवर्तन होत जाते. काही वेळा हे परिवर्तन इतक्या मोठ्या प्रमाणावर होते की दोन्ही म्हणी भिन्न वाटतात. त्यामुळे त्यातून व्यक्त होत जाणाऱ्या भावना, त्यांचे अर्थही बदलताना दिसतात.

म्हणी या अल्पाक्षरी, आटोपशीर असून एक प्रकारची लय, नाद, गेयता त्यात असते. म्हणीची प्रकृती गद्याची असली तरी साधले जाणारे यमक तिला पद्याकडे झुकण्यास सहाय्य करतात. कमी शब्दात अपेक्षित परिणाम साधून मोठे तत्त्वज्ञान सांगण्याचे सामर्थ्य म्हणीतच असते. एखादे सुभाषित त्यातील आशयामुळे, सहजसोप्या रचनेमुळे जनसामान्यांत वारंवार वापरले जाऊ लागले तर ते म्हणीचे रूप धारण करते. पिढ्यानपिढ्यांचा इतिहास, अभ्यास व निरीक्षण दडलेले असल्याने म्हणीतील आशयाला आव्हान दिले जाऊ शकत नाही. समाजाच्या अनुभवाची शिदोरी म्हणीद्वारे आपल्या हातात दिली जाते.

खानदेशातील अहिराणी भाषक समाज प्रमाण शिक्षण घेतलेला नव्हता. त्यामुळे त्यांनी रामायण, महाभारत, पोथी-पुराण किंवा धार्मिक ग्रंथ वाचलेले नव्हते. ग्रामीण भागात श्रावण मासात पोथी वाचणारा व्यक्ती त्यातील ओव्यांची फोड करून सांगताना त्यातील आशय सर्वांना समजावा यासाठी कथांमध्ये गुंफून, दृष्टांत दाखले देत सांगत असे. ह्या धर्मसंस्कारांदरम्यान बोलता बोलता आपला मुद्दा सामान्यांपर्यंत पोहोचावा, त्यांच्या मनावर ठसावा म्हणून कमी शब्दात आशय व्यक्त होण्यासाठी म्हणींचा वापर होत असे. या पद्धतीने म्हणी रुजल्या असाव्यात आणि काळाच्या प्रवाहात या म्हणींमध्ये बदल होत गेले असावेत. त्यानंतर पिढ्यानपिढ्या हे मौखिक लोकसाहित्य परंपरेने चालू राहून अहिराणी म्हणी समाजमनात रुजत गेल्या असाव्यात. खानदेशातच बोलल्या जाणाऱ्या या बोलीतील खजिन्यावर अद्याप प्रमाण मराठीची नजर गेली नसल्याने या शब्दसंपत्तीचा समावेश मराठीत झालेला नाही. नव्याने येत असलेल्या संकल्पना एकतर शब्दबंबाळ स्वरूपात व्यक्त होत असतात किंवा त्यासाठी परभाषेतील शब्दांचा आधार घ्यावा लागतो. त्यापेक्षा अहिराणीतील म्हणींचा सहजउपयोग सुरू झाल्यास मराठी भाषा वैभवशाली व श्रीमंत होईल.

## २. म्हणीतील आशयघनता :-

समाजातील रूढी-परंपरा, चालीरीती, माणसाचे आपसातील संबंध, लोकसंस्कृतीचे आकलन होण्यासाठी त्या-त्या प्रदेशातील बोलीभाषा, लकबी यांचा अभ्यास करणे गरजेचे ठरते. अहिराणी म्हणी लोकपरंपरेने समाजात पिढी दरपिढी चालत आल्या असल्या तरी निरनिराळ्या जाती, निरनिराळे व्यवसाय करणारे लोक, वेगवेगळे वयोगट, स्त्री-पुरुष यांचे स्वभाव, गुणदोष, वृत्ती-प्रवृत्ती याचे मार्मिक दर्शन त्यातून घडते. लोकांना विचार करण्यास भाग पाडायचे असेल, काही सत्य त्यांच्यासमोर मांडायचे असेल, विशिष्ट आशय व्यक्त करायचा असेल तर या आशयघन म्हणींचा उपयोग केला जातो. रूढी-परंपरा, वृत्ती-प्रवृत्ती, नीतीमूल्यांचा अविष्कार या म्हणीतून होतो.

१. आजला नांदे, नातू भीक मांगे
२. आसनं ते दिवाळी, नही ते शिमगा
३. कर्मात पडनं खोड, हासीसनी करवा गोड
४. गावमा बढाई, घरमा लढाई
५. तूपसांड्या असवा पण पाणीसांड्या नसवा
६. पदर शिदोरी ते व्हस जेजुरी
७. पै पै जोडू, येळवर मोडू
८. माय मरो पण आशा ना मरो
९. याळ गया तो काळ गया, घडी गयी ते पिढी गयी
१०. लोकनं पाहवा आणि आपलं इसरवा
११. आगबिगर कढ नही, मयाबिगर रड नही
१२. आजनी वू, सकाळनी सासू
१३. खडकू खडकू जोडवा, योगे योगे मोडवा
१४. अग्नीवाचून सोनानी परीक्षा व्हत नही
१५. मुंगीनं मढं, मुंगीलेच उचलणं पडस

## ३. म्हणीतील टोमणा :-

अहिराणीभाषक ग्रामीण भागातील व्यक्तींची बोलण्यातून कान उघडणी करायची असेल, त्यांना विचार करण्यास भाग पाडायचे असेल तर म्हणींतून टोमणा मारून हे साध्य केले जाते. ग्रामीण लोकसंस्कृतीतील अलुतेदार-बलुतेदार प्रथा कृषीसंस्कृतीचे आणि गावगाड्याचे वैशिष्ट्य असल्याने म्हणीतून प्रकट होणाऱ्या निरनिराळ्या व्यवसायात गुंतलेल्या जाती-जमाती, त्यांची जीवनराहणी, त्यांचे गुणदोष, स्वभावविशेष, वृत्ती-प्रवृत्ती, आचारविचार यांचे मार्मिक दर्शन या सूचक म्हणीतून घडते. या टोमणादर्शक म्हणीतून व्यक्त होणाऱ्या आशयातून समोरच्या व्यक्तीने उचित बोध घ्यावा आणि आपल्या वागणुकीत सुधार करून घ्यावा अशी अपेक्षा असते.

१. आईवर ना बाईवर, जायी पडनी फुईवर
२. आपला माल नि आपलाच हाल
३. एक चिंधीले चार चार गाठा, मना बापना दरारा मोठा
४. गाडं घोडं लोकनं, भूषण मना बापनं
५. तुले ना माले, घाल कुत्राले
६. नही नही म्हणस, गबागब हाणस
७. फुकट खाय, त्याले सस्तं महाग काय

८. येडानं मत आणि घुबडना चाळा
९. हातमा मुंदी सोनानी, घरात बोंब दाणानी
१०. अंगात नही करणी, माले म्हणा तरणी
११. आपलं ना देऊ, लोकनं खाऊ
१२. अंगात ताव, खावाना लाव
१३. आपलं ते मापनं, लोकनं ते पायली
१४. गावनी जत्रा नि कारभारी सतरा
१५. रूप बावळानी, नजर कावळानी

### ४. म्हणीतील ठसकेबाजपणा व रांगडेपणा :-

पूर्वीच्या काळी गावे स्वयंपूर्ण असत. गावाच्या गरजा गावातच भागवल्या जात असत. आलुतेदार-बलुतेदार यांच्याकडून कामे करून घेऊन मोबदल्यात धान्य- वस्तू देऊन त्यांचीही गरज भागवली जात असे. या व्यक्तींमध्ये प्रेमाचे संबंध असतील तर तेथे व्यवहाराला जागा नसे. परंतु व्यवहारातील यश-अपयश, व्यक्तींचा स्वभाव यामुळे व्यवहार चांगला होईलच याची निश्चिती नसे. त्यातूनच एकमेकाला टोचणे, हिणवणे, कुणाची समजूत काढावी, कुणाला धडा शिकवावा अशा भावना निर्माण होऊन ठसकेबाजपणा वा रांगडेपणा दर्शविणाऱ्या म्हणी रुजल्या असाव्यात. अहिराणी भाषेतील रोखठोकपणा, रांगडेपणा या विविध म्हणींमधून प्रत्ययाला येतो.

१. आसू ना पासू, मरी गयी सासू
२. गधडाना पाठमांगे नि कुत्राना तोंडपुढे जाऊ नही
३. गरीबनी बायको, सर्वा गावनी भवजायी
४. डोकाले खवडा, गुलालनी हौस
५. बाहेर तलाठी, घरात भिलाटी
६. हातात नही कवडी, वनी बजार भवडी
७. हालू ना चालू, बडा वाटा झेलू
८. कळे ना वळे, गधडं वाळे
९. नंगानी झोपडी किल्लावर
१०. माले पहा नि मग्गम राहा
११. घरमा उंदिर फारकत मांगतस
१२. दिधं घिदं गोड, नही तर त्यानं सपरं मोड
१३. सांगेल कामना, दियेल भाकरना
१४. उच्चा खाये आंबा, निच्चा मारे बोंबा
१५. खोंडयाना भंडारा, सारा गावले दांडोरा

### ५. म्हणीतील ग्राम्यता :-

ग्रामीण लोकांची भाषा शहरी अथवा शिकलेल्या लोकांच्या भाषेपेक्षा वेगळी असते. त्यांच्या शिष्ट-अशिष्ट, श्लील-अश्लील, बऱ्या-वाईट समजाच्या कल्पना एवढ्या टोकदार नसतात. त्यांची भाषा सहजसोपी, अघळपघळ आणि समोरच्याच्या काळजाला भिडणारी असते. निसर्गाच्या सानिध्यात त्यांचे वास्तव्यअसल्यामुळे निसर्गातील जीव, प्राणीमात्रा, वस्तू यांचा त्यांच्या नित्य बोलण्यात संदर्भ असतो. बोलणे सहज आणि प्रवाही असल्याने स्वभावातील ग्राम्यता तोंडी येणाऱ्या म्हणींमध्ये सुद्धा डोकावते.

१. आबल्यानी म्हैस, काबल्याले ऊठबैस

२. ढेकूनना खून नि फाशीना हुकूम
३. दुखस कुठे, शेकस कुठे
४. नवसनी गाय, धायी धायी धुवाले जाय
५. माले नही आबरू, मी कसाले घाबरू
६. म्हैसनं रांधे आणि हेलानं खादं
७. आपुन शेण खावानं आणि दुसराना तोंडना वास घेवाणं
८. खंडीभर सासवा, कितलं कुथवा
९. इलायती कोंबडा, दोन्ही अंगे चोंबडा
१०. चार आणानी पेवानी, बारा आणानी दखाडानी
११. म्हणा बाई बोला, बेलदारना हेला
१२. माय येहेरमा पडी मरनी, ते पोर निदान ढुकी तरी पाही
१३. आब्रुनं मरी जाय, बिनआब्रुनं चरी खाय
१४. उंबरवर डोळा नि बोरवर चित
१५. गाव भ्यास पाटीलले, पाटील भ्यास बायकोले

## ६. म्हणीतील लोकप्रवृत्ती :-

मुल लहान असताना त्याच्या माता-पित्यांकडून, कुटुंबाकडून त्याच्यावर होणाऱ्या संस्कारांमधून कालांतराने त्याचा विशिष्ट असा स्वभाव घडून तीच त्याची प्रवृत्ती बनून जाते. समाजातील अशा वेगवेगळ्या वृत्ती-प्रवृत्तींच्या व्यक्तींचे स्वभाव जुळत नाहीत. कुणी दयाळू, कुणी मायाळू, कुणी निष्ठुर, कुणी कठोर, कोणी श्रद्धाळू, कुणी विश्वासू, कुणी संशयी, कुणी तिरकस बोलणारा, कुणी धीर-गंभीर तर कुणी उतावळा दिसून येतो. अशा व्यक्तींच्या बोलण्यावरून त्यांच्या शैलीवरून त्यांच्या स्वभावाची पारख करता येते. स्त्री-पुरुष, वेगवेगळ्या वयोगटाच्या, वेगवेगळ्या जाती-धर्माच्या , वेगवेगळा व्यवसाय-धंदा करणाऱ्या, वेगवेगळ्या आर्थिक आणि सामाजिक गटातील लोकांची शैलीसुद्धा वेगवेगळी असल्याचे दिसून येते. म्हणींच्या निर्मितीमागे किंवा त्यांच्या बदलत जाण्यामागे या विविध व्यक्तीविशेषांच्या प्रवृत्तीचाही मोठा वाटा असतो. या लोकप्रवृत्तीनुसार म्हणींचा केला जाणारा वापर आपल्याला अभ्यासता येतो.

१. उधारीना बजारले, पिसोडी कसाले
२. कामनं ना काजनं, मुसळ घी धावणं
३. खैसले नही बायको, चुडेलले नही नवरा
४. ज्यानी बेटी, त्यानी मान हेटी
५. धनी तवर दुन्या, नही ते चारी गल्ल्या सुन्या
६. रीसनी माय, भीक मांगी खाय
७. हातले माटी ना पायले माटी, चंप घीऽसनी मोजाले बठी
८. काशी गये ते कोणीऽभी सांगस, मांजर मारी ते कोण सांगस ?
९. गळात माळा नि पोटात काळा
१०. जिना गळात गाठलं, तिले बसाले पाटलं
११. चालता घोडाले दान, नांदती आंडेरले मान
१२. जव जव मिळे, तव तव बावचळे
१३. बावळी मुद्रा, देवळी निद्रा
१४. काही लोकंसले घेवानी याद राहास, पण देवानी याद राहात नही
१५. हालकी वडांग पाही, कोणीऽभी पाय देस

## ७. म्हणीतील ताल व लयपूर्ण भाषा :-

अहिराणी बोलीभाषेमध्ये एक मधुर ताल व लय आहे. बोलताना ओघवत्या पद्धतीने विषय मांडण्याची अहिराणी भाषकाची शैली असते. त्यामुळे विशिष्ट आशय किंवा गोष्ट समोरच्या व्यक्तीच्या मनावर बिंबवली जावी व ती त्याच्या मनात रुजावी या पद्धतीने प्रचलित असलेल्या म्हणीसुद्धा ताल आणि लयबद्ध भाषाशैलीत असल्याचे आपल्याला दिसते.

१. आन मिळस पण मान मिळत नही
२. कावं बाई पळस, घर भाकर जळस
३. कोदडं करवा, पोतडं भरवा
४. तन खाई धनले, मन खाई तनले
५. याळ गया तो काळ गया, घडी गयी ते पिढी गयी
६. लोकनं दियेल पुरत नही, घरनं करेल सरत नहीं
७. श्रीमंतना घर जावा पाव्हाले, गरीबना घर जावा खावाले
८. हाऊ मना सगा, तो मना सगा, गाडं सोडाले नही जागा
९. करणं येस, त्याले रडणं येस
१०. डोळात नही आसू नि मरी गयी सासूदिसाले कळकट, बुद्धीले बळकट
११. बहू जू त्याले खाज नही, बहू कर्ज त्याले लाज नही
१२. मूळबिगर माहेर जाऊ नही, निवतनाबिगर जेवाले जाऊ नही
१३. काय हासस माले, त्याच दिवस तुले
१४. पोरनी जात आणि बैलनी जात, कुठे जायी त्याना नेम नही
१५. कडकनं काम पुरत नही, थंडानं काम सरत नही

## ८. म्हणीतील कथाबंध :-

पूर्वी शिक्षणाचा प्रसार झाला नव्हता त्यावेळी समाजात असणाऱ्या स्त्री-पुरुषांनी, वडीलधाऱ्यांनी, लहान मुलांनी कसे वागावे याची कल्पना यावी यासाठी वेगवेगळ्या कथांचा उपयोग केला जाई. या कथांमधून त्यांच्यापुढे जीवनाचे आदर्श ठेवले जात. पौराणिक, ऐतिहासिक स्वरूपाच्या या कथा कुणीतरी कुणाकडून ऐकलेल्या असत असेल किंवा मौखिक परंपरेने त्या पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या असत. प्रसंगी आवश्यकतेनुसार त्यात बदल केले जात किंवा प्रसंगानुरूप त्या कमी-जास्त करून, प्राप्त परिस्थितीतील संदर्भ टाकून प्रादेशिक वैशिष्ट्यांसह समोरच्याला बोधप्रद होतील या पद्धतीने सांगितल्या जात. या कथांमधून काही म्हणी उगम पावतात तर म्हणीतून बहुरंगी कथा लोकांमध्ये प्रचलित होतात.

१. झोजानी वडांग कयी, भुर्रकन उडी गयी
२. तोंडपुरतं हाजी हाजी, पाठमांगे दगलबाजी
३. दुबळाना घर दुबळं गये, ह्याव फोडी मरी गये
४. मोठा घरना पोकळ वासा, एक मासा नि हंडाभर रसा
५. राग मारा त्यानं वाघ मारा
६. वना ऊरवर ते घेवा खुरवर
७. आई-बाप शेतस् तोवर माहेर, नही तर बस बाहेर
८. सासू गयी गावले, काय खाऊ जीवले ?
९. हातभर काकडी, नऊ हात बी
१०. जीव जाव, पण जिलेबी खाव

११. घर ना दार, चावडी बिऱ्हाड
१२. बारा कोसवर नणंद वसे, तिना वासे दूध नासे
१३. अर्धी घागर, डबडब करस
१४. शहाणाले एक बात, मूर्खले सारी रात
१५. या हाते करवा, त्या हाते भरवा

**९. म्हणीतील नाद, नेटकेपणा :-**

अहिराणी म्हणी साध्या, सोप्या, नीटनेटक्या असतात. त्यात जिव्हाळा असतो, रूक्षपणाचा लवलेश नसतो. सामान्यांच्या तोंडी प्रचलन होत गेल्याने एक मधुर नाद, लय या म्हणींमध्ये असते. दैनंदिन वापरातील सोपे, धावते शब्द या म्हणींमध्ये असल्यामुळे त्या छोट्या,आटोपशीर असतात. नर्म विनोदाच्या शैलीत समोरच्याला उलगडेल असा अर्थ त्यात सामावलेला असतो.

१. आमनी मोरी नि आमलेच आंग धुवानी चोरी
२. कुणबी मरत नही, काम सरत नही
३. चिडी साचा करे, हाड्या बलका भरे
४. जो धायी, तो खायी
५. झळके त्याले वळखे
६. नणीनना घर पाहुणं जाऊ नही, सासूना संगे बजार जाऊ नही
७. भूक लागी ते कोयडं काय, झोप लागी ते दयडं काय
८. लागी उठ नि ढोमणं फुटं
९. वनी लहर, कया कहर
१०. धाक ना धनी, माले कोण म्हणी ?
११. मेथीनी भाजी, देव राजी
१२. जिवडा तव हावडा
१३. आज माले, सकाळ तुले
१४. चावळी चावळी, दिन गया मावळी
१५. बाहेर वाघोबा अन् घरात राघोबा

**१०. म्हणीतील प्रतिमांचा आणि प्रतिकांचा वापर :-**

अहिराणी म्हणींचा लोकसंस्कृतीत वापर करताना त्यातील आशय जनसामान्यांच्या लक्षात यावा म्हणे परिणामकारक व्हाव्यात यासाठी या म्हणींमध्ये नित्य वापरातील किंवा निसर्गात असलेल्या प्रतीक, प्रतिमांचा वापर केलेला आढळून येतो. या म्हणी विस्तृत अशा अहिराणी भाषक प्रदेशात वापरताना या टोकापासून त्या टोकापर्यंत त्यांचे प्रचलन सुरू असताना त्यात विशिष्ट शब्दांचे किंवा काही प्रसंगी अर्थाचेही बदल होत गेल्याचे दिसून येते. सामान्यांच्या वापरात या म्हणी असल्यामुळे निसर्गातील प्रतिमा, प्रतीकांचा वापर या म्हणींचे अर्थ मनावर ठसण्यासाठी उपयोगी ठरतात.

१. आवसबाई इकडे, पुनवबाई तिकडे
२. खावाले फुटाणा, टांगाले आठाना
३. गहू हरबरा एक व्हती, वटाणा गरबडी जाती
४. गाजरभर इकडे, मुळाभर तिकडे
५. घोडा इकी, डांगरं खाणं
६. दुख हेलाले, डाव पखालले

७. माडी चेटी गयी, गोधडीनी काय चिंता
८. वादीकरता म्हैस मारी
९. आयड्याऽमा सयडया मारा
१०. बैल मोटा वाहे, घोडा घास खाये
११. कोयाळनं पिल्लू नि हाड्याले जंजाळ
१२. गळात गाठलं, बसाले पाटलं
१३. डोळाऽभी फोडू नही अन् काडीऽभी मोडू नही
१४. पोळीनं पुरण फुटावाचून राहात नही
१५. कोल्हानी शिकारले जावा, पण वाघनं हत्यार संगे ठेववा

## ११. म्हणीतील प्रवाहीपणा :-

अहिराणी बोलीतील म्हणीतून समाज जीवनाचे दर्शन घडून येताना म्हणीत असलेल्या अर्थाचा प्रवाहीपणा समजून घेणे आवश्यक ठरते. जनसामान्यांकडून या म्हणींचा वापर होत असल्यामुळे त्यांच्या सोप्या, नित्य वापरातील शब्दांमुळे या म्हणी सुटसुटीत व प्रवाही बनत गेल्याचे अनुभवावयास मिळते. समाज जीवन बदलत असले तरी त्याची मुळे मानवाच्या आदिमतेत रुजली असल्याने या म्हणी समजून घेण्यासाठी ग्रामजीवन, ग्रामसंस्कृती, जातीव्यवस्था, गावगाड्याची प्रथा, जीवनवैशिष्ट्ये, पारंपरिक संकेत समजून घेणे आवश्यक ठरते. समाजात वावरल्याशिवाय माणसांकडे डोळसपणे पाहून त्यांना अनुभवल्याशिवाय म्हणींचा अर्थ समजून येत नाही. या म्हणी अनुभवणे सोपे नसले तरी मानवी स्वभाव, वृत्ती-प्रवृत्ती, स्त्री-पुरुषांच्या अंतरंगात डोकावून पाहताना जीवनाचा विशाल पट उलगडताना अनुभवास येतो.

१. गाडीले पेंढी जड व्हत नही
२. घासभर खाणं, कोसभर जाणं
३. देश तसा वेष आणि उलटं लुगडं नेस
४. त्यानं गाय मारी, तू वासरू मारस का?
५. बापना जीववर खादा घाटा, नवराना जीववर नितात फिटा
६. लागा डोळा, उठा पोळा
७. आईशिवाय माहेर नही आणि सासूशिवाय सासर नही
८. आपला माल आणि आपलाच हाल
९. खावाना दात न्यारा आणि दखाडाना दात न्यारा
१०. ज्यानं जळस, त्यालेच कळस
११. आंग दुखस तव काम करवा आणि पोट दुखस तव खावा

## १२. निष्कर्ष :-

१. अहिराणी म्हणींमधून खानदेशातील लोकांचे विचार परिणामकारकपणे व्यक्त होत आहेत.
२. खानदेशातील अहिराणीभाषक समाजाच्या आचारविचारात अहिराणी म्हणींच्या प्रभावामुळे बदल घडून येत आहेत.
३. खानदेशातील कृषक समाजव्यवस्था आणि ग्रामसंस्कृती अहिराणी म्हणींमुळे अन्य भाषिकांसमोर परिणामकारकपणे अविष्कृत होत आहे.
४. लोकसाहित्यातील मौखिक परंपरेने जपलेले हे विचारधन जनमानसावर प्रभावीपणे अंकुश ठेवत आहे.
५. खानदेशातील म्हणींच्या या मौल्यवान लेण्याने अहिराणी बोलीला वैभव प्राप्त करून दिले आहे.

## १३. सारांश :-

कमी शब्दात आशय आणि मोठे तत्त्वज्ञान सांगण्याचे सामर्थ्य म्हणीतच असते. सुभाषितात ही कुवत असली तरी ते ग्रंथ-पुस्तकांपुरते अथवा पंडितापुरते मर्यादित राहते. जनसामान्यांच्या ओठावर लिलया रुळत नसल्यामुळे त्याचे प्रचलन मर्यादित राहते. एखादे सुभाषित त्यातील आशयामुळे, सहजसोप्या रचनेमुळे जनसामान्यांत वारंवार वापरले जाऊ लागले तर ते म्हणीचे रूप धारण करते. कित्येक पिढ्यांनी पाहिले, अनुभवले ते सारे म्हणीतून व्यक्त होत गेल्याने म्हणीला इतिहासाची मोठी परंपरा लाभलेली असते. पिढ्यानपिढ्यांचा इतिहास, अनुभव, अभ्यास व निरीक्षण त्यात दडलेले असल्याने म्हणीतील आशयाला आव्हान दिले जाऊ शकत नाही. म्हणीद्वारे लोकसंस्कृतीतील अनुभवाची शिदोरीच येणाऱ्या पिढ्यांसाठी आपल्या हातात दिली गेली आहे.

## १४. संदर्भ ग्रंथसूची :-


१) पाटील कृष्णा,'अहिराणी लोकसाहित्य दर्शन खंड २', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथम आवृत्ती : ऑक्टोबर १९९०

२) डॉ. सूर्यवंशी रमेश, ‘खानदेशातील कृषकजीवन सचित्र कोश’, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

३) डॉ. सूर्यवंशी रमेश, ‘खानदेशातील म्हणी (वर्गीकरणात्मक)’, अभ्यासिका प्रकाशन, कन्नड, जि. औरंगाबाद, प्रथम आवृत्ती : जुन २०१०.

४) डॉ. सूर्यवंशी रमेश, ‘अहिराणी म्हणी- वाक्प्रचार’, अक्षय प्रकाशन,पुणे,प्रथम आवृत्ती : ऑक्टोबर १९९७.

५) डॉ. सूर्यवंशी रमेश, ‘अहिराणी शब्दकोश’, अभ्यासिका प्रकाशन, कन्नड, जि. औरंगाबाद, व्दितीय आवृत्ती : जानेवारी २०१३.

६) डॉ. मांडे प्रभाकर, ' मौखिक वाङ्.मयाची परंपरा ', गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती : मार्च २०१०

७) डॉ. सूर्यवंशी रमेश, 'अहिराणी : भाषावैज्ञानिक अभ्यास', अभ्यासिका प्रकाशन, कन्नड, जि. औरंगाबाद.

८) डॉ. सूर्यवंशी रमेश, ‘अहिराणी बोली सुलभ व्याकरण’, अभ्यासिका प्रकाशन, कन्नड, जि. औरंगाबाद, प्रथम आवृत्ती : फेब्रुवारी २०१६.

९) डॉ. चौधरी सुधाकर, ‘समाज भाषाविज्ञान: बोलीचा अभ्यास (अहिराणी बोली)’, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे, प्रथम आवृत्ती : ऑक्टोबर २०१४

१०) डॉ. सूर्यवंशी रमेश, ‘लोकसाहित्य आणि अभ्यास विषय (खानदेशी)’, अभ्यासिका प्रकाशन कन्नड, जि. औरंगाबाद, प्रथम आवृत्ती : जुन-२०१०

११) डॉ. गुंजाळ बाळासाहेब, 'अहिराणी म्हणी : अनुभवाच्या खाणी', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपुर, जि. अहमदनगर

१२) डॉ. गुंजाळ बाळासाहेब, 'अहिराणी शब्दकोश’, वैशाली प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती जानेवारी-२०२४

१३) पाटील अभिमन्यु, गांधलीकर, ‘अहिराणी वाग्वैभव (अहिराणी म्हणी, वाक्प्रचार, आन्हे व लोककथा)’, कस्तुरी प्रकाशन, अमळनेर, प्रथम आवृत्ती : जुन-२००९

१४) डॉ. वाघ विठ्ठल, 'व-हाडी म्हणींतील वाङ्.मयीन सौंदर्य’,अक्षरभारती अकादमी, पुणे, प्रथम आवृत्ती : २००७

१५) डॉ. वाघ विठ्ठल, ' पारंपरिक व-हाडी म्हणी’, अक्षरभारती अकादमी, पुणे, प्रथम आवृत्ती : २००७


❖❖❖

# साठोत्तरी मराठी कादंबरीतील श्रीकृष्णाचे सांस्कृतिक मूल्यांचे प्रतिबिंब – संक्षिप्त अध्ययन

संशोधक छात्र – कु. कीर्ती व्ही. कोशटवार, मार्गदर्शक – डॉ. पवन मांडवकर
मराठी विभाग, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ – ४४५४०१ महाराष्ट्र
**E-mail:** kirtimukkawar13@gmail.com भ्रमणध्वनी– ७०८३०४४००१

## गोषवारा

या संशोधन कार्याचे मुख्य उद्दिष्ट साठोत्तरी मराठी कादंब–यांमधून श्रीकृष्णाच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणे आहे. श्रीकृष्णाचे जीवन, त्याचे गीतेतील तत्त्वज्ञान आणि त्याच्या चरित्रातील विविध रूपे यांचा आधुनिक संदर्भात पुनर्व्याख्यान केला आहे. साठोत्तर कादंब–यांमध्ये श्रीकृष्णाची भूमिका केवळ धार्मिक नाही, तर तात्त्विक, मानसिक आणि सामाजिक संदर्भातही अत्यंत महत्त्वाची आहे. या कार्यात श्रीकृष्णाच्या कर्मयोग, भक्तियोग आणि ज्ञानयोग यांचे विश्लेषण केले आहे, जे आजच्या काळातही प्रासंगिक ठरते. श्रीकृष्णाच्या चरित्रातील मूल्ये आणि तत्त्वज्ञान विविध कादंब–यांमध्ये कालसापेक्षतेने प्रस्तुत केली गेली आहेत. यामध्ये त्याच्या जीवनातील गीतेचे तत्त्वज्ञान, त्याच्या संघर्षांची आणि त्याचा समाजावर होणारा प्रभाव यांचा सखोल विचार करण्यात आलेला आहे. या संशोधनाने श्रीकृष्णाच्या विचारांना आधुनिक काळातही ताजेतवाने ठेवले आहे आणि त्याच्या मूल्यांचा कालजयी प्रभाव सिद्ध केला आहे. या कार्यातून एक महत्त्वपूर्ण निष्कर्ष काढला गेला आहे की श्रीकृष्णाचे जीवन, त्याचे तत्त्वज्ञान आणि त्याचा समग्र दृष्टिकोन आजच्या समाजासाठी देखील प्रेरणादायक आणि उपयुक्त आहे.

## Abstract

The main objective of this research work is to study the personality and philosophy of Lord Krishna through the lens of post-1960 Marathi novels. The life of Lord Krishna, his philosophy in the Bhagavad Gita, and the various forms of his character have been reinterpreted in the modern context. In post-1960 Marathi novels, the role of Krishna is not only religious but also holds significant philosophical, mental, and social relevance. This work analyses Krishna’s teachings of Karma Yoga, Bhakti Yoga, and Jnana Yoga, which remain relevant in today’s times. The values and philosophy found in Krishna's character have been presented in a contemporary context in various novels. The research delves into his philosophical teachings from the Bhagavad Gita, the sweetness of his struggles, and his influence on society. This study has revitalized Krishna's thoughts in the modern era and demonstrated the timeless impact of his values. A crucial conclusion drawn from this work is that Krishna's life, philosophy, and holistic perspective remain inspirational and relevant for today’s society.

**बीजशब्द** – श्रीकृष्ण, साठोत्तरी मराठी कादंबरी, तत्त्वज्ञान, कालजयी प्रभाव

## १. प्रस्तावना

साठोत्तरी मराठी कादंबरी हा मराठी साहित्याच्या विकासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. या काळातील कादंबऱ्यांनी केवळ साहित्यिक सौंदर्याचा विचार न करता समाजातील वास्तव प्रश्न, व्यक्तीचे आंतरिक संघष, आणि बदलत्या जीवनमूल्यांचे प्रतिबिंब दाखवण्याचा प्रयत्न केला. या काळातील साहित्याने मानवी जीवनातील गहन समस्या, सांस्कृतिक ताणतणाव, आणि बदलत्या मूल्यव्यवस्थेवर सखोल चिंतन केले.

साठोत्तर मराठी कादंबऱ्यांमध्ये श्रीकृष्ण हे एक प्रभावी सांस्कृतिक प्रतीक म्हणून वारंवार दिसते. श्रीकृष्ण हे केवळ धार्मिक देवता नसून भारतीय समाजमनासाठी तत्त्वज्ञान, नीतिमूल्ये आणि जीवनदृष्टी यांचे प्रतीक आहेत.

त्यांचे महाभारतातील बहुआयामी व्यक्तिमत्त्व, राजनीतीतले कौशल्य आणि मानवतावादी दृष्टिकोन यांचे प्रतिबिंब साठोत्तरी कादंबऱ्यांमधून दिसते. या संशोधनात साठोत्तरी मराठी कादंबऱ्यांमधील श्रीकृष्णाच्या सांस्कृतिक मूल्यांचे विश्लेषण केले आहे. कादंबऱ्यांमधील प्रतीके, रूपके आणि तत्त्वज्ञान यांच्या आधारे श्रीकृष्णाच्या भूमिकेचे कालसापेक्ष आणि कालजयी स्वरूप उलगडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

## २. विषय विवेचन

साठोत्तरी मराठी कादंबरीतील श्रीकृष्णाचे सांस्कृतिक मूल्यांचे प्रतिबिंब यावर आधारित हा संशोधन लेख आहे. या कादंबऱ्यांमध्ये श्रीकृष्णाची भूमिका केवळ धार्मिक प्रतीक म्हणून न मांडता, त्याच्या जीवनातील तत्त्वज्ञान, राजनीती आणि सांस्कृतिक मूल्यांचे पुनर्विचार केला जातो. श्रीकृष्णाचे महाभारतातील बहुआयामी व्यक्तिमत्त्व, नीतिमूल्य आणि सामाजिक आदर्श आधुनिक संदर्भात कादंबरीतून व्यक्त होतात. या संशोधनाचा उद्देश श्रीकृष्णाच्या विचारांचा कालसापेक्ष विश्लेषण करणे, तसेच त्याच्या मूल्यांचा मानवी जीवनावर होणारा प्रभाव समजून घेणे आहे. यामध्ये कादंबऱ्यांमधील त्याच्या प्रतीकांचा आणि रूपकांचा गहन अभ्यास केला आहे.

## २.१ साठोत्तरी मराठी कादंबरीचा सामाजिक व साहित्यिक संदर्भ

साठोत्तर मराठी कादंबरी हा स्वातंत्र्योत्तर काळातील एक महत्त्वपूर्ण साहित्यिक प्रवाह आहे, ज्याने सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय बदलांना प्रतिबिंबित करण्याचे कार्य केले. या काळातील साहित्यिक प्रवृत्तींमध्ये मुख्यत: सामाजिक वास्तववाद, मनोविश्लेषण आणि प्रायोगिक दृष्टिकोन यांचा समावेश होता. यामध्ये समाजातील असंतुलन, शोषण आणि व्यक्तिमत्त्वांच्या आंतरिक संघर्षांना प्राथमिकता देण्यात आली. साठोत्तरी कादंबऱ्या केवळ काल्पनिक कथानकावर आधारित न राहता, त्या काळातील संघर्ष, विषमता आणि अन्याय यांचे वास्तववादी चित्रण करतात.

या कालखंडात मराठी समाजात मोठे सामाजिक आणि सांस्कृतिक बदल घडत होते. औद्योगिकीकरण, शहरीकरण, आणि प्रगतीच्या मार्गावर समाजाने पाऊल ठेवले होते. त्यामुळे पारंपरिक मूल्यांच्या विरोधात नवीन विचारधारा आणि सांस्कृतिक बदल घडले. याचे स्पष्ट प्रतिबिंब साठोत्तरी कादंबऱ्यांमध्ये दिसून येते. कादंबरीकारांनी सामाजिक विषमता, स्त्रीवाद, आणि धर्म यावर विचार मांडले. तेच प्रमुख साहित्यिक व राजकीय बदलांचे प्रतिबिंब होते. या कादंबऱ्यांमध्ये श्रीकृष्णासारख्या सांस्कृतिक प्रतीकांचा वापर करून जीवनाच्या मूल्यांचे पुनर्विचार केला गेला. त्यामुळे कादंबऱ्यांमध्ये केवळ ऐतिहासिक आणि धार्मिक संदर्भांचा उपयोग न करता, त्या काळाच्या सामाजिक बदलांवर सखोल विश्लेषण केले गेले.

## २.२ श्रीकृष्ण – सांस्कृतिक आणि अध्यात्मिक प्रतिमान

श्रीकृष्ण हे भारतीय समाजाच्या सांस्कृतिक आणि अध्यात्मिक परंपरेचे एक महत्त्वाचे प्रतीक आहेत. त्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व आणि विविध भूमिका भारतीय समाजाच्या विविध स्तरांवर आणि संप्रेषणात महत्त्वपूर्ण स्थान घेतात. श्रीकृष्णाचे पात्र केवळ धार्मिक देवता किंवा दैवी व्यक्तिमत्त्व न राहता, ते मानवता, नीतिमूल्य आणि जीवनाचा गहन विचारसरणी दर्शवणारे तत्त्वज्ञान आहे. त्यांचे जीवन आणि कृती हे मानवतेच्या आदर्शाची आणि मूल्यांची प्रतिमा असल्यामुळे त्यांचा प्रभाव समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि अध्यात्मिक स्तरावर नेहमीच अनुभवला जातो.

महाभारतातील प्रमुख पात्रांपैकी श्रीकृष्णाची भूमिका अत्यंत बहुआयामी आहे. ते एक धार्मिक, राजकीय आणि दैवी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. महाभारतात, श्रीकृष्णाचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व विविध भूमिका निभावते – साधक, राजा, युद्धनायक आणि गुरू या सर्वांमध्ये त्यांचे अद्वितीय स्थान आहे. श्रीकृष्णाचा राजकीय दृ ष्टिकोन, बुद्धी आणि नेतृत्व कौशल्ये यांचे निरूपण महाभारतातून स्पष्ट होते. त्यांनी युद्धाच्या क्षणातही शांतता आणि मार्गदर्शनाचा संदेश दिला, ज्यामुळे ते केवळ धार्मिक, ऐतिहासिक किंवा राजकीय व्यक्तिमत्त्व न राहता, मानवतेचे दैवी प्रतीक बनले.

महाभारतातील त्यांचे गीता उपदेश हे जीवनातील नीतिमूल्ये, कर्तव्य आणि आत्मज्ञानाचे सखोल तत्वज्ञान आहे. ते युद्धातील नैतिक निर्णय, कर्तव्य आणि आत्मविश्वासाच्या बाबतीत मार्गदर्शक भूमिका बजावतात. या गीतेतून त्यांनी मनुष्याचे आध्यात्मिक आणि मानसिक सशक्तीकरण केले. त्यांच्या उपदेशातून कर्मयोग, भक्तियोग, ज्ञानयोग आणि भजनाचे तत्त्वज्ञान समजते, जे मनुष्याच्या आध्यात्मिक वाढीसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरते.

श्रीकृष्णाचा प्रभाव भारतीय समाजमनावर खूप खोलवर रुजला आहे. त्यांचे व्यक्तिरेखन केवळ धार्मिक किंवा आध्यात्मिक प्रतीक म्हणूनच नाही तर ते जीवनातील संघर्ष, कर्तव्य आणि नैतिक मूल्ये दर्शवणारे प्रतीक बनले आहेत. भारतीय समाजातील विविध स्तरांवर त्यांच्या भूमिकेचे आणि विचारसरणीचे प्रभाव खूप महत्त्वाचे आहे. त्यांची कथा आणि व्यक्तिरेखन ही केवळ धार्मिक शास्त्रापुरती मर्यादित नाही, तर ती समाजातील विविध स्तरांवर संवाद साधण्याचे आणि बदल घडवण्याचे साधन बनली आहे.

श्रीकृष्णाच्या व्यक्तिमत्त्वात असणारे तत्त्वज्ञान आणि नीतिमूल्ये त्या काळाच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय वातावरणावर आधारित आहेत. त्यांचे शिक्षण, त्यांचे कर्तव्य, त्यांच्या नेतृत्व आणि समाजाच्या वयोगटांच्या विविध स्तरांवर संवाद साधण्याची क्षमता यामुळे ते केवळ धार्मिक किंवा नैतिक शिक्षक म्हणूनच नाही तर समाजाचे एक संजीवक आणि मार्गदर्शकही ठरले आहेत.

मराठी कादंबऱ्यांमध्ये श्रीकृष्णाच्या प्रतिमेचा वारंवार वापर केला गेला आहे. या कादंबऱ्यांमध्ये त्यांचा व्यक्तिमत्त्व आणि तत्त्वज्ञान विविध दृष्टिकोनातून मांडला गेला आहे. कादंबऱ्यांमध्ये कर्तव्य, नैतिकता आणि धार्मिक विश्वास यांचा संघटन आणि संघर्षात त्यांचा प्रभाव स्पष्टपणे दिसतो. कादंबऱ्यांमधून समाजातील विविध स्तरांवर होणारे बदल आणि समस्या तसेच मानवी जीवनातील संघर्ष यांचे दर्शन घडते. श्रीकृष्णाच्या कथा, प्रतिमा आणि विचार आधुनिक काळात नव्या दृष्टिकोनातून मांडले जातात, ज्यामुळे त्यांचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आणि टिकून राहतो. श्रीकृष्णाचे अध्यात्मिक आणि सांस्कृतिक स्वरूप हे त्यांचे जीवन आणि कृती यांमधून स्पष्ट होते. त्यांची कथा केवळ धार्मिक ऐतिहासिक संदर्भात मर्यादित न राहता, मानवतावादी तत्त्वज्ञान आणि सामाजिक बांधिलकी यांच्यातही समृद्ध आहे. त्यांच्या उपदेशांमधून सामाजिक सलोखा, न्याय आणि दयाळूपणाची मूल्ये स्पष्टपणे दिसून येतात. त्यांचे जीवन कर्मयोग, भक्तियोग, ज्ञानयोग आणि संजीवनी प्रेरणेचे सुंदर मिश्रण आहे, जे प्रत्येक व्यक्तीला आध्यात्मिक आणि मानसिक सशक्तीकरणाचा मार्ग दाखवते.

श्रीकृष्णाची भूमिका आणि त्यांचे विचार हे भारतीय समाजाच्या विविध स्तरांवर खोल रुजलेले आहेत. त्यांच्या तत्त्वज्ञानात कर्म, भक्ति आणि ज्ञान यांचा सुंदर मिलाफ आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळे समाजातील परंपरा आणि नैतिक मूल्ये पुन्हा स्थापित होण्यास मदत झाली आहे. त्यांनी समाजाच्या विविध स्तरांवर आदर्श आणि प्रेरणा म्हणून काम केले आहे.

श्रीकृष्णाची सांस्कृतिक आणि अध्यात्मिक प्रतिमा केवळ धार्मिक शास्त्रपुरती मर्यादित नाही, तर त्यांचा प्रभाव समाजाच्या विविध स्तरांवर आजही अनुभवला जातो. त्यांच्या तत्त्वज्ञानाने आणि नीतिमूल्यांनी साठोत्तर मराठी कादंबऱ्यांमध्ये समाजातील तणाव, संघर्ष, आणि बदल यांचे प्रभावी स्वरूप मांडले गेले आहे. श्रीकृष्णाच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाने आणि तत्त्वज्ञानाने साठोत्तरी मराठी कादंबरीला अधिक समृद्ध आणि तात्त्विक बनवले आहे. त्यांच्या उपदेशांमधून माणूस आणि समाज यांच्यातील नातेसंबंधांचे गहन आणि भावनिक स्वरूप समजून घेता येते.

## २.३ मराठी कादंबरीतील श्रीकृष्णाची प्रतीके आणि रूपके

श्रीकृष्णाची कथासंस्था भारतीय साहित्य आणि संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे. त्यांची विविध व्यक्तिमत्त्वे आणि त्यांचा तत्त्वज्ञान समजून घेतल्यावर, ते केवळ धार्मिक प्रतीक म्हणूनच नव्हे, तर समाजातील आदर्श, जीवनदृष्टी आणि नैतिक मूल्यांचे प्रतीक देखील आहेत. मराठी कादंबऱ्यांमध्ये श्रीकृष्णाच्या कथा आणि त्याची विविध प्रतीके विशिष्ट सांस्कृतिक आणि सामाजिक संदर्भातून प्रकट होतात. कादंबऱ्यांमध्ये श्रीकृष्णाची उपस्थिती एक रूपक म्हणून वापरली जाते, ज्याद्वारे मानवी जीवनातील दुविधा, संघर्ष आणि त्यावर कसे मात करावी हे दर्शवले जाते.

साठोत्तरी मराठी कादंबरीत श्रीकृष्णाची प्रतीके आणि कथा आधुनिक संदर्भात विविध प्रकारे मांडली जातात. या कादंबऱ्यांमध्ये श्रीकृष्णाच्या जीवनातील महत्त्वपूर्ण घटनांचा सखोल अभ्यास तात्त्विक आणि मानसिक दृ

ष्टिकोनातून केला आहे. चिंतामणराव वैद्य यांच्या "श्रीकृष्ण चरित्र" या कादंबरीत श्रीकृष्णाच्या जीवनातील विविध पर्वांची उत्कृष्ट मांडणी केली आहे. वैद्य यांनी गीतेचे तत्त्वज्ञान, श्रीकृष्णाच्या अद्वितीय गुण आणि त्याचे कार्यक्षेत्र यांची सुसंगतता दर्शविली आहे. यामध्ये बालपर्व, मथुरापर्व, द्वारकापर्व, राजसूर्यपर्व, भगवद्गीतापर्व आणि युद्धपर्व अशा सर्व प्रमुख पर्वांचा समावेश आहे. यामध्ये गीतेचा विशेष महत्त्व आहे, कारण त्यात श्रीकृष्णाचे तत्त्वज्ञान संपूर्ण जगाला मार्गदर्शन करीत आहे. येथे श्रीकृष्णाचे तत्त्वज्ञान आणि त्याचे मार्गदर्शन कादंबरीत एक प्रकारे रूपक म्हणून वापरण्यात आले आहे. कादंबरीतील नायकाचा आंतरिक संघर्ष, त्याचे कर्तव्य आणि त्याचे जीवनदर्शन श्रीकृष्णाच्या गीतेतील तत्वज्ञानावर आधारित आहे.

आजच्या सामाजिक आणि राजकीय स्थितीच्या संदर्भात श्रीकृष्णाची कथा एक आदर्श म्हणून पुन्हा समोर येते. श्रीकृष्णाच्या भूमिका आणि त्याचे मार्गदर्शन म्हणजे केवळ धार्मिक कर्तव्यांचा पाठपुरावा नाही, तर हे जीवनाच्या विविध आव्हानांशी सामना करण्याचे, धैर्य ठेवण्याचे आणि आपल्या कर्तव्यातील नैतिकतेचे पालन करण्याचे एक उदाहरण आहे.

डॉ. शं.शि. परचुरे यांची कादंबरी "महामानव योगेश्वर" श्रीकृष्णाच्या जीवनावर आधारित एक गहन आणि प्रेरणादायक चरित्र आहे. या कादंबरीत श्रीकृष्णाच्या आध्यात्मिक, तत्त्वज्ञानात्मक आणि नेतृत्वाच्या गुणांचा विशद आणि सखोल अभ्यास करण्यात आलेला आहे. या कादंबरीत श्रीकृष्णाच्या व्यक्तिमत्त्वाचा आदर्श दाखवला आहे. परचुरे यांच्या लेखनात श्रीकृष्णाच्या गीतेतील तत्त्वज्ञान, त्याची कार्यप्रणाली आणि त्याच्या जीवनातील असामान्य घटनांवर सखोल विचार केला गेला आहे. कादंबरीतील श्रीकृष्ण एक अत्यंत नीतिवान आणि दूरदर्शी व्यक्तिमत्त्व म्हणून प्रस्तुत केले जातात. त्याच्या या महत्त्वपूर्ण गुणांमुळे तो समाजाचा आदर्श आणि मार्गदर्शक बनतो. या कादंबरीत श्रीकृष्णाचे कर्मयोग, भक्ति आणि ज्ञानयोग यांवर विशेष प्रकाश टाकला आहे. गीतेतील त्याचे संवाद, अर्जुनाला दिलेले उपदेश आणि त्याच्या युद्धाच्या रणभूमीतील कार्यप्रणाली या सर्वांचा समावेश आहे. यामुळे वाचकांना श्रीकृष्णाच्या जीवनातील गूढता आणि त्याचे विशिष्ट स्थान अधिक स्पष्टपणे समजते.

श्रीकृष्णाचे भक्तियोग आणि ज्ञानयोग हे तत्त्वज्ञान कादंबरीकारांच्या लेखनात मानवी जीवनाच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी समाविष्ट केले जाते. श्रीकृष्णाच्या भक्तियोग आणि कर्मयोग या तत्त्वज्ञानांचा संदर्भ कादंबऱ्यांमधून आधुनिक काळातील अराजकता, मानसिकतेतील संकल्पनांची खोली आणि सामाजिक बदलांमध्ये सुसंवाद साधण्यासाठी वापरला जातो. कादंबरीतून श्रीकृष्णाच्या शिक्षांचा संदर्भ द्यायचा असतो, जेणेकरून त्याद्वारे जीवनातील वेगवेगळ्या समस्या सोडवता येतात. यामुळे श्रीकृष्णाचे तत्त्वज्ञान केवळ आदर्श रूपात नाही, तर ते एक प्रत्यक्ष मार्गदर्शन बनते.

श्रीकृष्णाच्या कथा आणि त्यांच्या प्रतीकांचे रूपक मराठी कादंबरीमध्ये एक महत्त्वपूर्ण स्थान ठेवतात. ते एकतर्फी किंवा केवळ धार्मिक प्रतीक म्हणून न राहता, जीवनाच्या विविध दृष्टीकोनातून अनुभवले जातात. कादंबऱ्यांमध्ये श्रीकृष्णाच्या रूपकांचा उपयोग कर्तव्य, नैतिकता, आध्यात्मिक मार्गदर्शन आणि समाजातील मूल्ये पुन्हा शोधण्यासाठी करण्यात आलेला आहे. यामुळे कादंबरीचे कथा आणि त्यांचा संदेश कालसापेक्ष राहतो.

## २.४ श्रीकृष्णाच्या मूल्यांचा मानवी जीवनावर प्रभाव

श्रीकृष्ण हे भारतीय समाजाच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जीवनाचे एक अत्यंत प्रभावी प्रतीक आहेत. त्यांचे जीवन, तत्त्वज्ञान आणि कर्म यांचे आदर्श प्रत्येक मनुष्याच्या जीवनात एक नवीन दिशा देतात. श्रीकृष्णाच्या मूल्यांचा मानवी जीवनावर प्रभाव केवळ धार्मिक क्षेत्रातच नाही, तर समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात विविध प्रकारे दिसून येतो. धर्म, राजनीती, तत्त्वज्ञान आणि नीतिमूल्ये या सर्व क्षेत्रांत श्रीकृष्णाच्या विचारांचा सकारात्मक प्रभाव पडला आहे. मराठी कादंबरीत त्यांच्या मूल्यांचा प्रतिबिंब विविध रूपांत व्यक्त झाला आहे.

श्रीकृष्णाचे जीवन आणि त्यांचे तत्त्वज्ञान या तीन मुख्य क्षेत्रांमध्ये आपली छाप सोडतात. गीतेमधून ते धर्म, राजनीती, आणि तत्त्वज्ञान यांचे समग्र विवेचन करतात. श्रीकृष्णाने कर्तव्य, धर्म आणि नैतिकतेचा महत्त्व सांगितला आहे. त्यांच्या या शिकवणीचा प्रभाव आजच्या समाजावरही जाणवतो. धर्माच्या बाबतीत श्रीकृष्ण मनुष्याला त्याच्या कर्तव्यात निष्ठा ठेवण्याचा संदेश देतात. त्यांचा "कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन" हा उपदेश जीवनातील प्रत्येक कार्यामध्ये नि:स्वार्थपणे कार्य करण्याची शिकवण देतो.

तत्त्वज्ञानाच्या बाबतीत श्रीकृष्णाला विश्वातील संपूर्ण ज्ञान प्राप्त आहे आणि ते दुसऱ्यांना त्याच ज्ञानाचा प्रसार करत आहेत. ज्ञानयोग आणि भक्तियोग या दोन प्रमुख तत्त्वज्ञानांची मांडणी करीत त्यांनी आध्यात्मिक क्षेत्रातील विचार बदलले आहेत. हे तत्त्वज्ञान कादंबरीत विविध पात्रांच्या जीवनावर प्रभाव टाकते, ज्यामुळे ते अंतर्मुख होतात आणि आध्यात्मिक दृष्टिकोनातून आपले जीवन मार्गदर्शित करतात. श्रीकृष्णाच्या नीतिमूल्यांचा प्रभाव मराठी कादंबऱ्यांमध्ये स्पष्टपणे दिसून येतो. त्यांच्या जीवनातील तत्त्वज्ञानाच्या माध्यमातून नायकाला त्याच्या जीवनातील आदर्शांचा शोध मिळतो. कादंबऱ्यांमधील पात्रे श्रीकृष्णाच्या शिकवणीप्रमाणे आपल्या कर्मामध्ये सत्य आणि न्यायाचे पालन करतात.

श्रीकृष्णाच्या जीवनदृष्टीने नीतिमूल्ये आणि त्यावर आधारित आदर्श बनवले जातात. त्यांच्या शिकवणीतून कर्माची पवित्रता, नि:स्वार्थ सेवा, आणि निष्कलंक प्रेम यांचे महत्त्व अधोरेखित केले जाते. कादंबऱ्यांमधून असे दर्शवले जाते की, प्रत्येक नायक श्रीकृष्णाच्या तत्त्वज्ञानाचा अनुसरण करत, आपला आत्मविश्वास आणि जीवनदृष्टी सुधारतो. कादंबरीतील नायक समाजातील अपार विषमतांशी, संघर्षाशी आणि अस्तित्वाशी लढताना श्रीकृष्णाच्या नीतिमूल्यांचा उपयोग करत एक नवा आदर्श निर्माण करतो.

श्रीकृष्णाचे जीवन, तत्त्वज्ञान आणि मूल्ये आजच्या समाजावर महत्त्वपूर्ण प्रभाव टाकतात. धर्म, राजनीती, तत्त्वज्ञान आणि नीतिमूल्ये या सर्व क्षेत्रांत त्यांचे योगदान आपल्या जीवनदृष्टीत महत्त्वपूर्ण ठरते. मराठी कादंबऱ्यांमध्ये त्याचे प्रतिबिंब स्पष्टपणे दिसून येते. कादंबरीकार त्यांच्या लेखनात श्रीकृष्णाच्या तत्त्वज्ञानाचा वापर करून पात्रांच्या जीवनातील संघर्ष, आदर्श, आणि बदल दाखवतात. त्याच्या शिकवणीचा वापर केल्यामुळे जीवनातील जटिल प्रश्नांची सोडवणूक सोपी होऊ शकते, आणि मानवी जीवनाला एक गहन आणि शाश्वत अर्थ प्राप्त होतो.

## २.५ श्रीकृष्ण — कालबाह्य की कालजयी?

श्रीकृष्ण हे भारतीय सांस्कृतिक, धार्मिक आणि तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातील एक अतुलनीय व्यक्तिमत्त्व आहेत, ज्यांचे जीवन आणि तत्त्वज्ञान केवळ त्यांच्या काळातच प्रभावी नव्हते, तर ते आजही मानवता, तत्त्वज्ञान आणि जीवनाच्या सर्व अंगांवर प्रभाव टाकत आहेत. आधुनिक काळात श्रीकृष्णाच्या विचारांची सुसंगती आणि त्यांचा कालजयीपणा समजून घेणं अत्यंत महत्त्वाचं ठरतं.

श्रीकृष्णाचे तत्त्वज्ञान आजच्या सामाजिक, राजकीय आणि मानसिकतेशी अगदी सुसंगत आहे. त्याच्या गीतेतील प्रमुख तत्त्वज्ञान — कर्मयोग, भक्तियोग आणि ज्ञानयोग, आजच्या ताणतणावाच्या काळात देखील अत्यंत उपयुक्त आणि महत्त्वाचे ठरते. विशेषत: कर्मयोग हे तत्त्वज्ञान, जे प्रत्येक व्यक्तीला त्याच्या कर्तव्याचं पालन करण्याचं, धर्माचे पालन करत स्वार्थाची जोपासना न करता कर्म करण्याचं आवाहन करतं, हे विचार आजच्या व्यक्तिमत्त्व विकास आणि सामाजिक जबाबदारीच्या संदर्भात अत्यंत प्रासंगिक ठरतात. श्रीकृष्णाच्या या विचारांची सुसंगती आणि त्याचा कालजयी प्रभाव आजही वाचकांना आणि समाजाला मार्गदर्शन देत आहे. त्यामुळे श्रीकृष्णाचे तत्त्वज्ञान सर्व काळात लागू होणारे असून, ते आजच्या व्यक्तीच्या जीवनातील ताण—तणावांचा सामना करत, नवा दृ ष्टिकोन आणि सकारात्मक विचार देण्यासाठी प्रोत्साहन देते. आजचे समाज, ज्या ठिकाणी विविधतेला सामोरे जात आहे, त्याला श्रीकृष्णाच्या भिन्न रूपांची आवश्यकता आहे. त्याचे व्यक्तिमत्त्व केवळ एक शौर्याचा किंवा युद्धाची कथा नसून त्यात मानवतेचा, तत्त्वज्ञानाचा आणि तात्त्विक मार्गदर्शनाचा देखील समावेश आहे. गीतेमध्ये त्याने जीवनातील विविध प्रश्नांची सोडवणूक केवळ ध्यान, योग, आणि साधना यांच्या माध्यमातून केली आहे, जी आजच्या काळात जागतिक स्तरावर स्वीकारली जात आहे.

साठोत्तर मराठी कादंबरीतील श्रीकृष्णाच्या रूपांचा कालसापेक्षता आणि कालजयीपणा अत्यंत महत्त्वाचा आहे. साठोत्तर काळात, विशेषत: २०व्या शतकाच्या उत्तरार्धात, साहित्यिक जगतात अनेक सामाजिक आणि सांस्कृ तिक बदल होत होते. याच कालखंडात श्रीकृष्णाच्या व्यक्तिमत्त्वाचा वेगळ्या दृष्टिकोनातून अभ्यास केला गेला. कादंब—या आणि साहित्यिक कार्यांमध्ये श्रीकृष्णाचे रूपके केवळ धार्मिक न राहता सामाजिक, तात्त्विक आणि मानसिक आयामांनाही समाविष्ट करतात. मराठी कादंब—यांमध्ये श्रीकृष्णाच्या तत्त्वज्ञानाचे पुनर्व्याख्यान काळानुसार केले जाते. साठोत्तर कादंब—यांमध्ये, श्रीकृष्णाच्या रूपकाचा आधुनिक संदर्भात वापर करत, त्याच्या जीवनातील

सामर्थ्य, कार्य आणि ध्येय निश्चित करण्याचा दृष्टीकोन प्रस्तुत केला जातो. हे फक्त ऐतिहासिक संदर्भ नसून, समकालीन जीवनासाठी एक महत्त्वपूर्ण संदेश आहे. कादंब–यात श्रीकृष्णाच्या कथेतील आदर्श, त्याच्या तत्त्वज्ञानाचे कालसापेक्ष मोल आणि त्याच्या कार्याची प्रेरणा वाचकाला आजही ताजीतवानी ठरवते. श्रीकृष्णाच्या जीवनातील तत्त्वज्ञान आणि कर्मयोग आजही एका मानसिकतेच्या दृष्टीकोनातून उपयुक्त ठरते. कादंब–यांमध्ये त्याच्या आदर्शांची मांडणी करण्याचा पद्धत, ते त्याच्या वक्तृत्वावर आधारित संवादांतून व्यक्त होणारे तत्त्वज्ञान आणि त्याच्या जीवनातील विविध घटना आणि त्याचे सुसंगत कारणज्ञान आधुनिक मनुष्याला कसे समजते हे दर्शविते.

एकंदरीत, श्रीकृष्णाच्या तत्त्वज्ञानातील कालजयीपणा त्याच्या चिरस्थायी प्रभावावर आधारित आहे. त्याच्या गीतेतील संदेश, जीवनशैली आणि तत्त्वज्ञान हे कालबाह्य न मानता प्रत्येक काळात उपयुक्त ठरतात. याच कारणामुळे, साठोत्तर कादंब–यांमध्ये श्रीकृष्णाची प्रकट होणारी छायाही कालजयी ठरते.

## ३. निष्कर्ष

श्रीकृष्णाचे जीवन आणि तत्त्वज्ञान हे केवळ ऐतिहासिक आणि धार्मिक संदर्भातच महत्त्वाचे नाहीत, तर आधुनिक काळातील समाज, तत्त्वज्ञान आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी देखील अत्यंत उपयुक्त ठरतात. साठोत्तर मराठी कादंब–यांमध्ये श्रीकृष्णाच्या व्यक्तिमत्त्वाचे विश्लेषण आणि त्याच्या तत्त्वज्ञानाची आधुनिक संदर्भात पुनर्परिभाषा करण्यात आलेली आहे. कादंब–या लेखकांनी श्रीकृष्णाच्या जीवनातील विचारांचे कालसापेक्ष महत्त्व स्पष्टपणे मांडले आहे, ज्यामुळे त्याचे तत्त्वज्ञान आजच्या ताण–तणावाच्या जीवनाशी सुसंगत ठरते. श्रीकृष्णाचा कर्मयोग, भक्ति आणि ज्ञानयोग हे त्रिसुत्री सिद्धांत आजही वाचकांसाठी मार्गदर्शक आहेत. श्रीकृष्णाच्या व्यक्तिमत्त्वात त्याच्या आध्यात्मिक आणि भौतिक आयुष्याचे सामर्थ्य स्पष्टपणे दिसते, ज्यामुळे त्याचे जीवन प्रत्येक काळासाठी प्रेरणादायक ठरते. त्याच्या गीतेतील तत्त्वज्ञान जीवनाच्या विविध अडचणींना समजून आणि योग्य निर्णय घेऊन कशा प्रकारे सुटकेचा मार्ग शोधावा हे दर्शविते. साठोत्तर कादंब–यांमध्ये, श्रीकृष्णाच्या रूपकांचा वापर केवळ धार्मिक संदर्भात न करता, त्याच्या तत्त्वज्ञानाच्या कालजयी महत्त्वावर आधारित झाला आहे. यामुळे श्रीकृष्णाचे विचार प्रत्येक काळात वाचकांना प्रासंगिक आणि प्रेरणादायक ठरतात, जे त्याच्या कालजयी प्रभावाचे प्रतीक आहे.

## आभार प्रदर्शन

या संशोधनासाठी आवश्यक सुविधा आणि मार्गदर्शन प्रदान केल्याबद्दल प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब यांचे मन:पूर्वक आभार मानते. त्यांनी संशोधन कार्यासाठी दिलेले प्रोत्साहन, सहकार्य, आणि वेळोवेळी केलेले मार्गदर्शन यामुळे माझ्या संशोधन प्रक्रियेला योग्य दिशा मिळाली.

## संदर्भग्रंथ व साहित्य

१. जनार्दन ओक, कृष्णमाता देवकी, मनोरमा प्रकाशन, १९६८
२. मंगला कुळकर्णी, आधुनिक मराठी साहित्यातील श्रीकृष्णदर्शन, गोदावरी प्रकाशन, २०१७
३. श.शि. परचुरे, महामानव योगेश्वर, परचुरे प्रकाशन, २०१८
४. सुमती क्षेत्रमाडे, योगेश्वर श्रीकृष्ण, रिया पब्लिकेशन्स, २०१६
५. चिंतामणराव वैद्य, श्रीकृष्ण चरित्र, वरद प्रकाशन, १९९८

❖❖❖

# राजकारणातल्या वृत्ती-प्रवृत्तींचा वेध घेणारी 'आमदार सौभाग्यवती'

**अंगद श्रीपती भुरे**
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग
दयानंद कला महाविद्यालय, लातूर

महाराष्ट्र ही संतांची भूमी म्हणून ओळखली जाते. त्याप्रमाणेच मराठवाडा ही मराठी साहित्य व संस्कृतीची जननी म्हणून ओळखली जाते. मराठवाड्याला सामाजिक आणि आर्थिक मागासलेपणाची व दारिद्र्याची पार्श्वभूमी असली तरी, साहित्याच्या दृष्टीने आणि सांस्कृतिक दृष्टीनेही सुसंपन्न व श्रीमंत प्रदेश लाभला होता. महानुभाव साहित्य, संत साहित्यातून मराठवाड्यातील साहित्यप्रकाश सर्वत्र प्रकाशमान झालेला दिसून येतो.

आधुनिक काळातही मराठी साहित्य क्षेत्रात मराठवाड्यातील थोर मराठी साहित्यिकांनी आपला बहुमोल व भारदस्त ठसा उमटविलेला आहे. सामाजिक, राजकीय, धार्मिक, ग्रामीण, दलित अशा विविध बाजूंचा विचार मराठवाड्यातील साहित्यिकांच्या साहित्यातून वास्तवपणे चित्रित झालेला आहे. ज्यामध्ये वा.ल. कुलकर्णी, ना.गो. नांदापूरकर, नरहर कुरुंदकर, यु.म. पठाण, भगवंतराव देशमुख, प्रभाकर मांडे, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले' ना.धो. महानोर, स.रा. गाडगीळ असे विविध समीक्षक, थोर विचारवंत, लेखक, लोकसाहित्यिक, तज्ञ व मराठीचे गाढे अभ्यासक असलेले दिसून येतात. त्यातीलच एक महत्त्वपूर्ण नाव म्हणजे रा. रं. बोराडे होय.

मराठवाड्यातील लातूर जिल्ह्यातील व तालुक्यातील काटगावी जन्मलेले रावसाहेब रंगराव बोराडे हे मराठी भाषेतील प्रसिद्ध व श्रेष्ठ कथाकार, कादंबरीकार म्हणून ओळखले जातात. साधी, सोपी आणि वाचकांच्या हृदयाचा ठाव घेणारी शैली हे बोराडे यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य समजले जाते. यांच्या साहित्यातून पुरुषांबरोबरच महिलांची व्यक्तिचित्रनेही अत्यंत समर्थपणे आली आहेत. त्यांच्या साहित्य निर्मितीमध्ये कादंबरी, कथा, नाटके, बालसाहित्य व समीक्षात्मक साहित्याचा अधिकचा वाटा आहे.

रा. रं. बोराडे यांच्या साहित्यकृतीत 'आमदार सौभाग्यवती', 'आयुष्याच्या सायंकाळी', 'इथं होतं एक गाव', 'कथा एका तंटामुक्त गावाची', 'चारापाणी', 'तिळा तिळा डिकी उघड', 'नामदार श्रीमती', 'पाचोळा', 'रहाटपाळणा', 'राजसा', 'रिक्त अतिरिक्त', 'वळणाचं पाणी', 'सावट', 'हरीनी' या कादंबऱ्या आहेत तर कथासंग्रहात 'पेरणी', 'कणसं आणि कडबा', 'मळणी', 'राखण', 'वाळवण', 'ताळमेळ', 'गोंधळ', 'माळरान', 'बोळवण', 'वरात', 'खोळंबा', 'फजितगाडा', 'बुरुज', 'नातीगोती', 'हेलकावे' यांचा समावेश होतो. तर नाटकांमध्ये 'रिंगण', 'विहीर', 'बंधमुक्ता', 'बिनपाण्याचा गाव', 'भोहरा', 'पिकलेलं पान', 'पाणी! पाणी! पाणी!', 'पाच ग्रामीण नाटिका', 'चोरीचा मामला', 'चहाट', 'कशात काय अन फाटक्यात पाय', 'आम्ही लेकी कष्टकऱ्यांच्या' यांचा समावेश होतो. एकूणच रा. रं. बोराडे यांच्या साहित्यातून भेटणाऱ्या व्यक्ती ह्या विविध वृत्ती प्रवृत्तीचे वास्तव दर्शन घडविणाऱ्या व्यक्ती रूपात दिसतात.

राजकारण म्हटलं की पक्ष, निवडणुका, मोर्चे, सभा, भाषणे, भेटीगाठी या येतातच. परंतु लोकशाहीच्या नावाने राजकारणातले खेळले जाणारे विविध खेळ व राजकीय उलाढाली करण्यासाठी करावे लागणारे वेगवेगळे प्रयत्न यातून राजकारणातल्या व्यक्तीच्या वृत्ती-प्रवर्तिंचा वेध घेणे कठीण असते. रा.

रं. बोराडे यांनी त्यांच्या 'आमदार सौभाग्यवती' या कादंबरीतून राजकारण, राजकारणातले डावपेच व राजकारणातल्या व्यक्तींच्या वृत्ती-प्रवर्तिंचा वेध वास्तवपणे घेतलेला दिसून येतो. या कादंबरीचे नंतर रा.र बोराडे यांनी याच नावाने नाट्यरूपांतर केले. या कादंबरीतून व नाटकातून बोराडे यांनी स्त्री-पुरुषांतील सत्ता संघर्षाचे थरारक वास्तव चित्रण केले आहे.

'आमदार सौभाग्यवती' ही कादंबरी राजकारणातल्या वेगवेगळ्या वृत्ती-प्रवृत्तीचा वेध घेते. आमदारकीचे पद, मंत्री पद मिळवण्यासाठी करावे लागणारे राजकारण व राजकारणातल्या पद प्राप्ती पूर्वीची व पद प्राप्तीनंतरची मानवी वृत्ती-प्रवृत्ती कशी असते याचे वास्तव चित्रण या कादंबरीतून चित्रित झाले आहे. आमदारकीचे तिकीट मिळवणारे चिमणराव जाधव उर्फ अण्णासाहेब व त्यांची पत्नी सुमित्राबाई यांच्या भोवती फिरणारी व्यक्तिचित्रणे आणि त्यांच्या बदलत गेलेल्या राजकारणातल्या वृत्ती-प्रवृत्तीचा वेध साधेपणातून सहजपणे रा. रं. बोराडे यांनी घेतलेला आहे. आपल्या नवऱ्याला अण्णासाहेबांना मागच्या प्रमाणेच आमदारकीचे तिकीट मिळावे म्हणून सुमित्रा स्वतःला देवघरात कोंडून घेते. तिकीट मिळेल की नाही याची ती चिंता करते. मुख्यमंत्री साहेबांनी आपल्या साहेबांच्या विरोधात दिल्लीला फार मोठी आघाडी उघडली आहे. अण्णासाहेबांना निवडणुकीचे तिकीट मिळू नये म्हणून उघड उघड कोशिश केलेली आहे. हे ऐकून सुमित्रा चिंता करते. राजकारणातले साहेबांचे पद टिकून राहावे, आपली मुले सुखी राहावीत असा विचार करणारी सुमित्रा ही नेहमी आपल्या पतीसोबत असते. वयात आलेल्या मुलीची दिपालीची तिला काळजी असते. मुलीने बाहेर जाणे, उशिरा घरी येणे हे सुमित्राला पसंत पडत नाही. म्हणून ती दीपावर रागावते, तेव्हा दीपाला एका नोकरादेखत रागावल्याने आईचा राग येतो. रागाने ती म्हणते, "मग काय पसंत आहे तुला? राजकारणातल्या नावाखाली इथं या ठिकाणी एकमेकांचे गळे कापले जातात, हे तुला पसंत आहे? जनहिताच्या नावाखाली जनतेची लुबाडणूक कशी करायची, याचे प्लॅन इथं आखले जातात हे तुला पसंत आहे?" यातून अण्णासाहेबांच्या वृती- प्रवृत्तीची ओळख होते.

चिमणराव हे नेहमी राजकारणात रममान असल्याने संसाराकडे त्यांचे लक्ष राहत नाही. त्यामुळे मुलगा दीपक हा ही चिमणरावांवर रागावून राहतो. आपले नेतृत्व धोक्यात येऊ नये म्हणून, दीपकला फॅक्टरीत गुंतवले आहे. हे दीपक आईला सांगतो. सुमित्राच्या अडाणीपणाचे दिपकला हसू येते. 'राजकारणातलं तुझं ज्ञान झिरो आहे', म्हणून दीपक राजकारणाविषयी म्हणतो की, "आज आज राजकारण इतकं विचित्र झालंय, की आकाशात भराऱ्या मारणारा राजकारणी कधी मातीवर येऊन पडेल आणि मातीवरचा चालणारा राजकारणी कधी आकाशात झेप घेईल, हे सांगणं फार अवघड झालंय". आपल्या वडिलाला म्हणूनच तो म्हणतो की, दिल्लीचे वारकरी आपल्या राज्यातले आमजनतेचे उद्योगमंत्री, आमचे जन्मदाते.

साखर कारखान्याचे चेअरमन, चिमणरावांचे विश्वासू सहकारी म्हणजे ऐपतराव. अण्णासाहेबांना तिकीट न मिळाल्याचे दुःख व्यक्त करतात. तर दीपकला त्याचा आनंद होतो. पूर्व स्वप्नांना आठवण करून सुमित्रा अण्णासाहेबांच्या मंत्रिपदामुळे आपण सुखी आहोत. आता मंत्रिपद नाही मिळाले तरी काय होणार? दोन्ही मुलांच्या वेगवेगळ्या तऱ्हा त्याच काय? असे विविध प्रश्न सुमित्राला भेडसावतात. अण्णासाहेबांना विधानसभेच्या निवडणुकीचे तिकीट न मिळाल्याने ते सुमित्रा व आपल्या मुलामुलीवर राग व्यक्त करतात. आपल्या मुलीने मित्राच्या मुलासोबत लग्न करावं या विचाराचा विरोध दीपा कडून होतो. राजकारणात आपल्याला प्रवेश दिला नाही म्हणून दीपक नेहमी अण्णासाहेबांना तूच्छतेने पाहतो. अशा या सर्व कारणांमुळे सुमित्राच्या मनाची अवस्था विचलित होते.

अण्णासाहेबांना निवडणुकीचे तिकीट मिळालं नव्हतं याची चर्चा सर्वत्र पसरली. त्यामुळे त्यांना भेटणाऱ्या गटातील, विविध विरोधी पक्षातील लोकांच्या वृत्ती-प्रवृत्ती, विचारातून वेगवेगळ्या स्वरूपात

दिसून येतात. मतदार संघाच्या तिकिटाबाबत निवड समितीने अंतिम निर्णय घेतलेला होता. या निर्णयानंतर त्यांच्या मतदारसंघाचं विधानसभेच्या निवडणुकीचं तिकीट त्यांच्या मुलाला किंवा त्यांच्या पत्नीला दिलं जाणार होतं. या दोघांपैकी कुणाला तिकीट द्यायचं, याचा निर्णय चिमणरावांनी घ्यायचा होता. वेळ अल्प होता त्यामुळे तिकीट कोणाला द्यावं याचा विचार चिमणरावांना पडतो. पत्नी अशिक्षित आहे, मुलगा बरोबर जबाबदार आहे, निर्णयातून पत्नीला तिकीट द्यायचे अण्णासाहेब ठरवतात. परंतु सुमित्राला तिकीट घेऊ नये असं वाटतं. दीपकला राजकारणात सीट का देत नसल्यामुळे तो अण्णासाहेबापासून तुटल्यावानी झालाय? म्हणून त्याला तिकीट न देता मला तिकीट दिलं, तर तो माझ्यापास्नंबी तुटलं' अशी भीती सुमित्राला वाटते.

दीपा ही सुद्धा राजकारणाला कंटाळलेली असते. आपले मत सांगताना ती म्हणते की, 'विधानसभेच्या निवडणुकीसाठी तुम्ही ममीचंही नाव प्रपोज करू नका आणि भय्याचंही नाव प्रपोज करू नका, अशानं आपल्या घरातलं राजकारण तरी संपेल.' अण्णासाहेब मात्र दीपाला अनुभवातले उत्तर देतात, 'राजकारण हे मद्यासारखं असतं, दीपा एकदा ते माणसाच्या रक्तात भिनलं, की अखेरपर्यंत उतरत नाही. माझं खोटं वाटत असेल, तर तू आमदार निवासाकडं एक चक्कर टाक. राजकारणाबाहेर फेकली गेलेली कितीतरी माणसं हिरवळीच्या आशेनं रात्र दिवस तिथे नाल पडलेल्या घोड्याप्रमाणे भटकत असतात. ऐपतरावांच्या सल्ल्यानुसार अण्णासाहेब सुमित्राला आमदारकीचे तिकीट देण्याचा निर्णय घेतात. आपल्याला तिकीट मिळालं नाही म्हणून दीपक विरोधी पक्षात जाण्याचा निर्णय घेतो. एकीकडे पती व दुसरीकडे मुलगा व आमदारकीचे तिकीट या परिस्थितीत सुमित्राची द्विधा अवस्था होते.

निवडणुकीच्या प्रचाराला वेग येतो. सुमित्रा प्रचार करते. प्रचारादरम्यान बाई आता दाबून, घोळून, ठासून होऊ द्या. असे चावट वाक्य ऐकून सुमित्राला प्रचार सभेत भाषण करणे नकोशे वाटते. राजकारणातल्या लोकांच्या विचारांची, प्रचारांची ओळख सुमित्राला होते. राजकारणातल्या खेळींचा बदला घेण्याचा, पदावरून काढून टाकण्याचा विचार, स्वार्थी वृत्ती, मी पणा अशा विविध प्रसंगांची जाणीव राजकारणात सुमित्राला होते. राजकारणात सुमित्रा स्वतः निर्णय घेऊ लागते, त्यामुळे चिमणरावांना मंत्रिपदाची काळजी वाटते. सुमित्राने आमदारकीचा राजीनामा द्यावा व पद आपल्याला प्राप्त व्हावे, या स्वार्थी वतीने चिमणरावांनी सुमित्राला आमदारकीचे तिकीट दिले होते. निवडणुकीचा निकाल जाहीर होतो सुमित्रा तिचे नजीकचे प्रतिस्पर्धी श्री माधवराव ठिपसे यांच्यापेक्षा बावन्नहजार पाचशे सदतीस मते अधिक घेऊन निवडून येते. विजयाचा उत्साह साजरा होतो. सुमित्राच्या जयजयकारानं सारं आकाश दणाणून जातं. परंतु चिमणरावाचं महत्त्व मात्र कमी होतं. सुमित्रा आता आमदार झाली होती. अनेक सभांमध्ये फिरणे, नेत्यांच्या बैठकी घेणे, दौऱ्यावर दौरे करणे सुरू होते. त्यामुळे सुमित्राचे स्वतःच्या घराकडे दुर्लक्ष होते. चिमणरावांनी चिंता आमदारकी पदासाठी वाढत जाते, ते बेचैन होतात.

आपल्या भावना समजून घेण्यासाठी चिमणराव सुमित्राला आमदारकीचा राजीनामा देण्यास सांगतात. तेव्हा सुमित्रा आपल्या पतीसाठी काय केले हे सांगते. ती म्हणते की, तुम्हाला भावना आहेत आणि मला भावना नाहीत का? तुम्हाला आमदारकीचं तिकीट मिळावं म्हणून कुलदैवतेला प्रत्येक वेळी नवस केला. आणि आता थोडं मला मिळालं तर तुम्ही ते लाथडून द्यायला सांगताय. सुमित्रा आता अण्णासाहेबांचा विरोध करू लागली. तिने राजीनामा देण्यासाठी नकार दिला. त्यामुळे राजकारणातल्या खेळींचा अवलंब चिमणराव करतात. सुमित्राचे मतदार संघात सतत दौरे असल्याने सुमित्राचे व दलपत्रावांचे अनैतिक संबंध सुरू झाल्याची कुजबूज सुरू होते. अनेक प्रश्नांना सामोरे जाऊन सुमित्रा आपले राजकीय काम करत राहते. सुमित्राच्या व दलपत्रावांच्या संबंधाच्या चर्चा सर्वत्र सुरू होतात. याचे चिमणरावांना काहीच वाटत नाही. दीपक अण्णासाहेबांना सांगतो की, 'ममीच्या मतदार संघातले लोक ममीला 'ऊर्जा'

म्हणतात. दलपत्रावांचा आणि तिचा दौरा सुरू झाला की, ऊर्जा मंत्राचा दौरा सुरू झाला दौरा सुरू झाला काय, म्हणतात. दलपतराव तिच्या मतदारसंघाचं शंभर टक्के विद्यतीकरण करणार, म्हणून फिदीफिदी हसतात काय, यापेक्षा लाजिरवाणे प्रसंग घडण्याचे ऐकण्यात येते.' सुमित्रा व चिमणरावांच्यामध्ये आमदारकीच्या राजकारणावरून वाद-विवाद निर्माण होतात. सुमित्रणे चिमणरावांना राजीनामा देण्यास नकार दिल्याने चिमणराव आपल्याच पत्नीविरोधात राजकीय कट रचून सुमित्राला आमदारकीचा राजीनामा देण्यास भाग पाडतात. राजकारणासाठी पती-पत्नीच नातं ते विसरून जातात. सुमित्राने राजीनामा द्यावा म्हणून चिमणराव ऐपतरावांना म्हणतात की, ऐपतराव उद्यापासून तुम्ही एक करायचं तालुक्यातल्या सगळ्या कार्यकर्त्यांना सुमित्राच्या विरुद्ध चेतवायचं. तिला तालुक्यात हिंडण-फिरणं अवघड करायचं. अनायासे दुष्काळ आपल्या साथीला आलाय. याचा फायदा घ्यायचा. तिच्या मतदारांना तिच्या विरुद्ध भडकवायचं, सरकारी अधिकारी देखील तिला कसलंही सहकार्य करणार नाहीत, ती राजीनामा देईपर्यंत वातावरण असं तापत ठेवायचं, तिला राजीनामा द्यायला भाग पाडायचं. चिमणरावांच्या सांगण्यामुळे सुमित्राला सरकारी मदत टाळली जाते. एकमेव सुमित्राचा पीए. बाबुराव सोडला तर बाकी सर्वजण सुमित्राच्या कार्यात अडथळे आणण्याचे कार्य चिमणरावांच्या सांगण्यावरून करतात. विविध मोर्चे निघतात. चिमणरावांचा कट यशस्वी होतो. 'राजकारणात माणसाला जवळ ठेवून संपविण्यापेक्षा दूर ठेवून संपविणे फार सोयीचं असतं. संपविणं म्हणजे कोणत्याही अर्थानं संपविणं... जवळच्या माणसाच्या संपविण्याला आपण कारणीभूत नसलो, तरी कारणीभूत ठरतो. पण दुरच्या माणसाच्या संपविण्याला आपण कारणीभूत असलो, तरी कारणीभूत ठरतोच असं नाही.'असे राजकीय खेळ राजकारणात आजही दिसून येतात.

सारांश : आमदार सौभाग्यवती या कादंबरीतून मानवाच्या वृत्ती-प्रवृत्तीचे वास्तव चित्रण केले आहे. राजकारण, राजकारणातले मी पणा,स्वार्थ यातून रचले जाणारे राजकीय कट कसे असतात आणि त्यातून कौटुंबिक, धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय अशा सर्व क्षेत्रात मानवी विचार मूल्ये व नात्यांना कसे तडे जातात याचे वास्तव चित्रण रा.रं. बोराडे यांनी केले आहे. राजकारणातल्या वाटा-पळवाटा याचे वास्तव चित्र बोराडे यांनी केले आहे. आपले पद कायम ठेवण्यासाठी राजकारणाची खेळी मानवी वर्तनात कशी बदल करते, जवळचे, दूरचे नाते कसे बदलतात, स्त्रियाला दिले गेलेले दुय्यम स्थान, स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन, आपला स्वार्थ साधण्यासाठी स्त्रीला समोर करून केले जाणारे राजकीय खेळ, आजही स्थानिक स्तरापासून ते केंद्रस्तरापर्यंत राजकारणाच्या  नावाखाली मानवी वृत्ती प्रवृत्तीतून सुरू असल्याचे दिसून येतात.

## संदर्भ ग्रंथ :

(१) रा.रं. बोराडे - आमदार सौभाग्यवती, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

(२) प्रा. त्र्यंबक महाजन - राजकीय नाटक आणि आमदार सौभाग्यवती, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

(३) रा.रं. बोराडे - विकिपीडिया.

❖❖❖

# मराठी भाषा आणि प्रसार माध्यमे सहसंबंध

**प्रा. डॉ. संतोष विष्णू चतुर**
मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा

## सारांश

भाषा ही मानवी जीवनाचे अविभाज्य अंग आहे. आजच्या प्रगत मानवाच्या जीवनाकडे पाहता भाषाहीन समाजाची कल्पनाही करता येत नाही. मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात भाषा अपरिहार्य आहे. मनुष्य आपले विचार, भावना आणि अनुभव भाषेमुळे व्यक्त करतो. बोली तसेच प्रमाण भाषेतून अनुभव व ज्ञान यांचे आदान-प्रदान पुढील पिढीत होते. ज्ञानाच्या कक्षा वाढवण्यासाठी आधीच्या लोकांना आलेला अनुभव पुढील पिढीत संक्रमित करण्यासाठी भाषेचा वापर होतो. ज्ञान, कला, साहित्य भाषेच्या माध्यमातून पुढील पिढीत हस्तांतरित करण्याकरिता आधुनिक युगात प्रसार माध्यमे महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे. अनेक प्रसार माध्यमे भाषेच्या माध्यमातून ज्ञानाची, माहितीची, अनुभवाची रुजवन लोकांमध्ये करताना दिसतात.

**बीजशब्द -** बोलीभाषा, प्रमाणभाषा, आकाशवाणी, दूरदर्शन, मोबाईल, वृत्तपत्र, फेसबुक, संगणक

## प्रस्तावना

महाराष्ट्रात व त्यांच्या सीमावर्ती भूभागात फार प्राचीन काळापासून लोकांमध्ये मराठी बोलीचा वापर होत आहे, असे दाखले मिळाले आहेत. ह्या विविध भागात फिरस्ती करणारे संत महात्मे, साहित्यिक, विचारवंत, कलावंत हे सर्व बोली बोलणाऱ्या लोकांमध्ये मिसळत असल्याने त्यांच्या व्यवहारात, साहित्यात, संवादात, कलेत ह्या विविध भागातील बोलींचे शब्द येत गेले. त्यामुळे अनेक भागातील मराठी बोलींचे प्रतिबिंब या जुन्या जाणत्या लोकांच्या काव्य लेखनात व गद्य लेखनातून उमटलेले दिसते. प्रारंभी ह्या बोली, बोलणाऱ्या त्या त्या लोकसमुदायांच्या नावांनी ओळखल्या जात असल्याचे दिसते. उदाहरणार्थ अहिरांची अहिराणी बोली. पुढे या बोलींची व्यापकता वाढून त्या गावाच्या, शहराच्या किंवा प्रदेशाच्या नावांनी परिचित झाल्या. जसे कोल्हापुरी, नागपुरी, वऱ्हाडी, खानदेशी, मालवणी इत्यादी. ह्या बोलीतूनच लोकसाहित्य निर्माण झाले आहे. बोलींच्या सर्वसमावेशक वापरामुळे प्राचीन संत साहित्यात किंवा लोकसाहित्यात महाराष्ट्रातील ठीकठिकाणच्या विविध बोलींचे शब्द संपन्नतेने विखुरलेले आहेत. यामुळेच प्रत्येक बोलीच्या चाहत्याला आपल्या बोलीची रुपावली या साहित्यातून दिसून येते. त्याला जुन्या साहित्याचा विशेष अभिमान वाटतो. शाहिरी वाङ्मयालाही जनसामान्यांचा मराठी बोलींचा रांगडा पोत लाभला आहे.

प्रसार माध्यमे हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. जनमताच्या निर्मितीसाठी व अभिव्यक्तीसाठी हे अतिशय प्रभावी माध्यम आहे. एकाच वेळी अनेकांशी संज्ञापन किंवा संभाषण साधने हे प्रसार माध्यमामुळे शक्य होते. समाजातील सर्व स्तरातील लोकापर्यंत भाषेच्या माध्यमातून विचारांचे आदान प्रदान करून जगातील ज्ञानाची कवाडे प्रसार माध्यमांमुळे खुली झाली आहेत. जनसामान्यांच्या अभिव्यक्तीसाठी व मनोरंजनासाठी हे प्रभावी ठरले. मराठीच्या बोली आणि प्रमाणभाषेचा वापर प्रसार माध्यमातून केला जातो. मराठी भाषा व प्रसार माध्यम सहसंबंध यांचे अवलोकन करणे हाच मुख्य उद्देश प्रस्तुत शोधनिबंधाचा आहे.

## प्रमाणभाषा व बोलीभाषा

महाराष्ट्रात मराठीच्या अनेक बोली आहेत. या सर्व बोलीभाषेला एकच प्रमाणभाषा आहे. सर्वप्रथम प्रमाणभाषेचा व बोलीभाषा यांचा अर्थ समजून घेणे गरजेचे ठरते.

प्रमाणभाषा म्हणजे, "ऐतिहासिक परंपरा आणि रुढी यांना अनुसरून सामान्यतः कोणत्याही प्रदेशातील वा राज्यातील मुख्य नगरातील सुशिक्षितांच्या बोलण्याला प्रमाणभाषा असा शब्द योजीला जातो."[१]

बोलीभाषा म्हणजे, "बोलण्यामध्ये जास्तीत जास्त साम्य आढळणाऱ्या व्यक्तींचा एखादा गट विशिष्ट नामाभिधानाने ओळखता येण्याएवढा जाणवू लागल्यास त्या गटाच्या स्वाभाविक बोलण्याच्या गोळा बेरजेस बोली अशी संज्ञा लावता येईल."[२] बोली आणि प्रमाणभाष दोन्ही भाषिक संज्ञापनासाठी महत्त्वपूर्ण आहेत. दैनंदिन जीवनामध्ये बोलीचाच अधिक वापर होताना दिसतो. बोलीचे स्वरूपही व्यापक आहे.

डॉ. कालेलकर बोलीचे स्वरूप सांगताना म्हणतात, "बोली हे दैनंदिन व्यवहाराचे स्वाभाविक साधन आहे. परिस्थितीला अनुरूप अशा भाषिक सामग्रीचा ती उपयोग करते. मुखरंपरेने आल्यामुळे तिच्या अंगी एक प्रकारचा जिवंतपणा असतो. ती साधी पण परिणामकारक असते. आपले रूप प्रतिष्ठेच्या आरशात पाहून इतरांना ते आकर्षक वाटेल असे करण्याचा प्रयत्न करायला तिला वेळ नसतो. तिची स्वाभाविकता हेच तिचे वैशिष्ट्य. काहींना ते मोहक वाटेल, काहींना ते ओंगळ वाटेल हा ज्याचा त्याचा मनोवृत्तीचा आणि संस्काराचा प्रश्न आहे."[३] मराठीच्या बोली आणि प्रमाणभाषेचा वापर ज्ञान, विचार, मनोरंजन इत्यादीसाठी प्रसार माध्यमे करतात.

## मराठी भाषा आणि प्रसार माध्यमे

आधुनिक काळात प्रसारमाध्यमे शिक्षण देणाऱ्या संस्था ठरल्या. या प्रसारमाध्यमांना सामान्य लोकांच्या जीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. याविषयी विश्राम ढोले म्हणतात, "आपल्या दैनंदिन जगण्यामध्ये प्रसार माध्यमांचे स्थान अटळ, महत्त्वाचे आणि व्यापक होत चालले आहे. केवळ आपल्याच नव्हे तर कमी अधिक प्रमाणात आपल्यासारख्या लाखो लोकांच्या जगण्यातही प्रसारमाध्यमांना महत्त्वपूर्ण स्थान आहे. मात्र या सर्वांमध्ये भाषा हा घटक समान आहे. प्रसार माध्यमे हाताळण्यासाठी भाषेवर प्रभुत्व असावे लागते."[४] यावरून प्रसार माध्यमांची लौकिकता लक्षात येते. प्रसार माध्यमांचे प्रामुख्याने खालील प्रकारात वर्गीकरण करता येते.

**१) वर्तमानपत्र**

वर्तमानपत्र एक प्रभावी प्रसार माध्यम आहे. वर्तमानपत्र हे अनेक भाषेत छापले जाते. रोजच्या बातम्या, गावोगावची माहिती, कार्यक्रम, जाहिराती, शिक्षण, कृषी, विज्ञान, तंत्रज्ञान, कला, वाणिज्य, अंतराळ, साहित्य, गोष्टी, विविध उपक्रम, स्वास्थ इत्यादी अनेक विषयांची चर्चा वर्तमानपत्रातून केली जाते. समाजहिताच्या बाबी, अहवाल, नोटीस, कविता, सूचना, वेळापत्रक, विविध संस्थांची माहिती, विद्यापीठ कॉलेजची माहिती एकंदरीत बऱ्याच काही बाबींचा ऊहापोह वर्तमानपत्र करते. प्रत्येक राज्यात तेथील राज्यभाषेप्रमाणे वर्तमानपत्रात त्या भाषेचा वापर होतो. जेणेकरून तेथील जनता जास्तीत जास्त वर्तमानपत्र वाचू शकेल. महाराष्ट्राचा विचार केला तर महाराष्ट्रात मराठी भाषिक लोक असल्याने वृत्तपत्रेही मराठी भाषेत तसेच काही इंग्रजी व हिंदी भाषेत छापली जातात. कारण महाराष्ट्रात इतर राज्यांचे अनेक लोक राहतात. दर्पण, मुकनायक, सकाळ, लोकमत, महाराष्ट्र टाइम्स, टाइम्स ऑफ

इंडिया, एम्प्लॉयमेंट न्यूज, पुढारी, केसरी, लोकसत्ता, सामना, नवाकाळ, आपला महाराष्ट्र, गावकरी, लोकसूत्र तसेच इतर राज्यांमध्येही अनेक वर्तमानपत्र त्या त्या प्रादेशिक भाषेत छापले जातात. वर्तमानपत्रामुळे व्यक्तीच्या ज्ञानाची पातळी रुंदावते. विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी वर्तमानपत्र आधारभूत घटक बनते.

वर्तमानपत्र हे बहुउपयोगी माध्यम आहे. शिक्षित वर्गासाठी या माध्यमाचा अधिक उपयोग होतो. वर्तमानपत्रातील विविध सदरांमधून वैविध्यपूर्ण माहिती प्रसिद्ध होत असते. अग्रलेख, स्फोट किंवा स्तंभलेख, वृत्तकथा, सदरलेखन यातून अभ्यासपूर्ण लेखन केले जाते. वाचकापर्यंत बातम्या पोहोचण्याचे काम वर्तमानपत्र करते. जगात, देशात, राज्यात, प्रांतात, परिसरात काय चालू आहे याची इत्यंभूत माहिती वर्तमानपत्रामुळे घरात बसून मिळते. जाहिरात, वस्तूंची माहिती, शिक्षण, व्यवसाय, राजकारण, समाजकारण, धर्म, मनोरंजन या सगळ्याच क्षेत्रांसाठी वर्तमानपत्रांचा जास्त वापर होतो. वर्तमानपत्रात जी बातमी प्रसिद्ध करावयाची असते तिची भाषा अधिक साधी व सोपी असणे गरजेचे असते. वर्तमानपत्राचा वाचक हा वेगवेगळ्या वयोगटातील, सामाजिक, आर्थिक, स्तरातील असतो. म्हणून वर्तमानपत्रीय लेखनात नेमकेपणा, अचूकपणा असावा. वस्तुनिष्ठ दृष्टिकोन, वास्तववादी भूमिका, घटितांचे विश्लेषण व वैचारिक प्रतिपादन याचे विवेचन वर्तमानपत्र लेखनात आढळून येते. वर्तमानपत्राच्या भाषेत प्रत्येक शब्दाला महत्त्व आहे. एखादा चुकीचा शब्द सुद्धा हानिकारक ठरू शकतो. भाषेच्या माध्यमातूनच वर्तमानपत्रे विचारांची, भावनांची, माहितीची देवाण-घेवाण करतात.

**२) आकाशवाणी**

आकाशवाणीच्या पूर्व इतिहासाबद्दल समीरण वाळवेकर म्हणतात की, “भारतात नभोवाणीला मोठा इतिहास आहे. १९२७ मध्येच भारतात खाजगी व्यावसायिक रेडिओ कंपनी सुरू झाली. २३ जुलै १९२७ रोजी त्यावेळच्या बॉम्बेमध्ये इंडियन कास्टिंग कंपनीने आपली व्यावसायिक नभोवाणी सेवा सुरू केली.”[१] यावरून असे लक्षात येते की, वृत्तपत्र निघाल्यानंतर अनेक वर्षानंतर ही पहिली नभोवाणी सेवा सुरु झाली. जेथे कोणतीच सुविधा पोहचली नव्हती अशा ठिकाणी आकाशवाणीने लोकांचे मनोरंजन व प्रबोधन केले.

आकाशवाणीवरून विविध प्रदेशातील, विविध भाषांमधून कार्यक्रमाचे प्रसारण केले जाते. स्वास्थ, शिक्षण, आजार, समाजातील बदलती परिस्थिती, विविध जाहिराती इत्यादीच नव्हे तर अनेक विषयांची माहिती विविध भाषा माध्यमांच्या मदतीने जनसामान्यापर्यंत पोहोचवली जाते. आकाशवाणीवरील माहितीमुळे जनसामान्यांच्या ज्ञानात वाढ होत असते. तसेच त्यांचे मनोरंजन करण्याचे काम देखील आकाशवाणी करते. विविध चित्रपटातील गाणी, नाटक, हवामहल, संतांची महफिल, छायागीत, आज के फंकार इत्यादी अनेक कार्यक्रमांमुळे भारतातील फक्त शहरच नव्हे तर देशाच्या कानाकोपऱ्यातील खेडेगावापर्यंत तसेच आदिवासी पाड्यावर आजही आकाशवाणीचा वापर होताना दिसते. राज्याप्रमाणे त्या त्या प्रादेशिक भाषेचे कार्यक्रम आकाशवाणीवरून प्रसारित होतात. ह्यासर्व कार्यक्रमाकरिता वेगवेगळ्या भाषांचा वापर केला जातो.

रंजनातून लोकशिक्षण हा आकाशवाणीचा मुख्य उद्देश असला तरी अध्ययावत माहितीचा प्रसार करण्यात हे माध्यम आघाडीवर आहे. राष्ट्राच्या निर्मितीला आणि समाजाच्या विकासाला हातभार लावण्याचे काम आकाशवाणीने केले आहे. आकाशवाणीच्या कार्यक्रमांमध्ये विविधता असून श्रोत्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व शैक्षणिक स्तराचे भान जपले गेले आहे. आकाशवाणीवरील शब्द हा अत्यंत प्रभावी असावा लागतो. साधी, सोपी, सुटसुटीत भाषा, छोटी वाक्ये, श्रवण सुलभता व नादमयता, बोली भाषेचा अवलंब हे सर्व घटक आकाशवाणीचा आत्मा आहे. आकाशवाणीवरील शब्द एकदाच ऐकू

शकतो त्यामुळे कार्यक्रमाचा परिणाम साधायचा असेल तर श्रोत्यांचे लक्ष पहिल्यापासून वेधून घेता आले पाहिजे. सर्वसामान्य माणसाला समजेल, रुचेल, पचेल अशा प्रवाही भाषेचे आयोजन आकाशवाणीसाठी महत्त्वपूर्ण ठरते. आकाशवाणी हे माध्यम केवळ श्राव्य माध्यम असल्यामुळे काही गोष्टी लक्षात ठेवाव्या लागतात जसे नादमय व श्रवण सुलभ भाषेचे आयोजन, आवाजातील फरक जाणवेल असे संवाद लेखन व पात्र निर्मिती, आकर्षित करणारा प्रारंभ, आवश्यक असेल तेथे पार्श्वभूमी म्हणून ध्वनी संकेताचा वापर करणे गरजेचे पडते.

**३) दूरदर्शन**

दूरदर्शन हे भारताचे एक टी.व्ही. चॅनल आहे. दूरदर्शन मनोरंजनपर कार्यक्रम प्रसारित करते. दूरदर्शन भारताचे प्रथम टी.व्ही. चॅनल आहे. दूरदर्शन हे प्रसार भारती या भारत सरकारच्या संस्थेद्वारे चालवले जाते. भारत सरकारने १५ सप्टेंबर १९५९ दिल्ली येथे दूरदर्शनची सुरुवात केली. पूर्वीच्या काळी फक्त दूरदर्शनचे कार्यक्रम बघता येत होते. परंतु आज जनसामान्यांना वेगवेगळ्या प्रादेशिक भाषेतील चॅनल्स उपलब्ध झाले आहे. जसे झी मराठी, झी सिनेमा, एबीपी माझा, बरेचसे न्यूज चैनल मराठी, ओडिसा, पंजाबी, बंगाली इत्यादी भाषेमध्ये आज उपलब्ध आहेत. सोनी, कलर मराठी, हिस्ट्री, ट्रॅव्हल इत्यादी प्रादेशिक भाषेतील चॅनेलही सुरू झालेले आहेत. यासर्व दूरदर्शन चॅनलच्या माध्यमातून भाषेचा वापरा करून विविध माहिती लोकांना आज उपलब्ध होत आहे. यामध्ये भाषेचा सर्वात महत्त्वाचा भाग आहे.

दूरदर्शनचे जाळे संपूर्ण देशात पसरले आहे. जनसामान्यांच्या जीवनावर फार मोठा प्रभाव आणि परिणाम पाडण्याचे काम दूरदर्शनने अल्पावधीतच केले आहे. ज्ञान प्रसाराचे महत्त्वाचे कार्य दूरदर्शन ने पार पाडले आहे. दूरदर्शनमुळे आज जग जवळ आलेले पाहायला मिळते. घरात बसून जगातल्या कानाकोपऱ्यातील घटनांची माहिती दूरदर्शनद्वारे कळत आहे. दूरदर्शनच्या चांगल्या बाजू विषयी जयदेव डोळे म्हणतात, "टी.व्ही.च्या चांगल्या बाजू आहेत. वाईट बाजू त्यापुढे अगदी फिक्या पडतात. २४ तास चालणाऱ्या विश्लेषणांचा अखंड खजिना प्रेक्षकांच्या हाती पडतो. टी.व्ही. बघणारा माणूस माहितीकार असतो. अनेक बाजू कळू लागल्यामुळे तो इतरांच्या पुढे असतो. आपले सत्ताधारी कसे आहेत, कोण निवडून द्यावेत इत्यादी गोष्टी त्याला कळतात. कला, संगीत, क्रीडा, निसर्ग आदींचा आनंद त्याला मनसोक्त लुटता येतो. बाजारातील घडामोडी त्याला सहज समजतात. व्यायाम, आरोग्य, अध्यात्म, पाकक्रिया, सरकारी योजना, शैक्षणिक अभ्यासक्रम यात अप्रत्यक्ष सहभाग घेऊन यासर्वांचा त्याला आपल्या जीवनात उपयोग करून घेता येतो."[६] हळूहळू या तंत्रज्ञानाने प्रगती केल्यामुळे टी.व्ही.वरील चॅनल संख्या वाढत गेली. त्यामुळे त्यावर लागलेले कार्यक्रमही वाढले. शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक या स्वरूपाचे कार्यक्रम लोकमान्य कार्यक्रम झाले. धार्मिक प्रवचने, बातम्या यासारख्या कार्यक्रमांची रेलचेल वाढू लागली.

दूरदर्शनवरील निवेदक बोलतो व प्रेक्षक ऐकतो. ही दृकश्राव्य प्रक्रिया लक्षात घेता निवेदकाच्या तोंडची भाषा साधी व समजायला सोपी हवी. छोटे व सुटसुटीत वाक्ये व योग्य वापर, आवश्यक तपशील टाळणे, आकडेवारी आणि कालदर्शक तपशील योग्य पद्धतीने सांगणे, नकारात्मक रचना टाळणे, दृश्यांना पूरक अशी भाषा वापरणे, शब्दांची पुनरावृत्ती टाळणे, कोणत्याही कार्यक्रमाला चालना गती देणारी शब्दयोजना असावी लागते. निवेदनातून दीर्घकाळ वाटेल अशा प्रकारची सुसंगत भाषा असावी लागते.

**४) संगणक व इंटरनेट**

आज संगणकामुळे जी सुविधा उपलब्ध झाली आहे, ती खरोखरच वाखाण्याजोगी आहे. संगणकासाठी वापरले जाणारे इंटरनेट हे देखील प्रसार माध्यमांना पूरक आहे. इंटरनेटच्या मदतीने आपण

एका सेकंदात जगभरात कोठेही क्षणात ई-मेल पाठवू शकतो. आपल्या विचारांचे आदानप्रदान विविध भाषेच्या माध्यमातून करणे शक्य होते. संगणकावरही वेगवेगळ्या भाषेचा वापर करून आपण साहित्याचे जतन करू शकतो किंवा ई-मेलच्या माध्यमातून आपले मनोगत इतर ठिकाणी पाठवू शकतो.

**५) फेसबुक**

फेसबुक हे देखील आजच्या २१ व्या शतकात अत्यंत महत्त्वाचे प्रसार माध्यम ठरले आहे. फेसबुकच्या माध्यमातून व्यक्ती कुणालाही कोणताही संदेश पाठवू शकतो तसेच आपल्या व्यवसाय देखील फेसबुकमुळे वाढविता येतो. फेसबुकवर फेसबुक पेज तयार करता येते. या सर्वांसाठी भाषा हे प्रभावी माध्यम आहे. फेसबुकवर आपण आपल्या क्षेत्रातील किंवा आज उपलब्ध असलेल्या कोणत्याही क्षेत्रातील कोणत्याही देशातील व्यक्तीशी मैत्री करू शकतो. विचारांचे आदानप्रदान भाषेच्या माध्यमातून करू शकतो.

**६) मोबाईल फोन**

मोबाईल फोन हे एक प्रसार माध्यम आहे. आज मोबाईलचा उपयोग फक्त संदेश देणे इतकाच सीमित राहिलेला नाही. २१ व्या शतकात ज्ञान व तंत्रज्ञानाची प्रचंड प्रमाणात प्रगती झाली. जग म्हणजे एक गाव झालेले आहे. जगातील कोणतीही माहिती एका क्लिकवर क्षणात जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात असलेल्या व्यक्तीला मिळू शकते. मोबाईलला इंटरनेट जोडलेले असल्यामुळे विविध भाषेच्या माध्यमातून आज मोबाईलद्वारे एका क्षणात कुठेही राहणाऱ्या व्यक्तीशी आपण भाषेच्या माध्यमातून संवाद साधू शकतो. आपल्या विचारांची देवाण-घेवाण करू शकतो. मोबाईलवरसुद्धा हाताने लिहिता येते तसेच बोलूनही आपोआप टाईप होते. असे अनेक ॲप आपल्याला दिसतात. ब्लॉग, क्लासरूम, गुगल ट्रान्सलेट, गुगल ॲप, व्हॉट्सॲप, बिजनेस, टेलिग्राम, मेसेज या माध्यमातून भाषेचा वापर करून आपल्या भावना मनोगत इतरांशी आपण शेअर करू शकतो.

**७) व्हॉट्सॲप**

मोबाईलवर सहज उपलब्ध असलेली व्हॉट्सॲपची सुविधा देखील समाजातील व्यक्ती मोठ्या प्रमाणात वापरताना दिसतात. त्याद्वारे लेखी संदेश, ध्वनी संदेश, चित्र संदेश, कोणतीही कागदपत्रे क्षणार्धात दुसऱ्या व्यक्तीला पाठविता येतात. व्हॉट्सॲपमधून उपयुक्त संदेश, माहिती मग ती शैक्षणिक, कृषी विषयक, करियर विषयक, प्रवेश परीक्षा इत्यादी संबंधित कोणतीही माहिती मिळते. ही माहिती प्रादेशिक भाषेनुसार पाठविता येते किंवा संदेश देणारा व ज्याला संदेश मिळतो त्या व्यक्तीला समजेल त्या भाषेत देता येते.

**८) संदर्भग्रंथ व ई-स्रोत संदर्भ**

संदर्भग्रंथ सूचनांच्या स्त्रोतासाठी उपयोगात आणला जातो. विविध विषयांसाठी संदर्भ घेणे आवश्यक असते. विविध विषयांची, विविध भाषेमधील संदर्भ पुस्तके उपलब्ध आहेत. संदर्भात शब्दकोश, विश्वकोश, जर्नल, ई बुक्स, अहवाल, इंटरनेटवरील सामग्री, संदर्भ सीरिज व व्हिडिओ इत्यादींचा समावेश असतो. प्रत्येक राज्यातील लोकांना हे सर्व संदर्भ उपलब्ध असतात इतकेच नव्हे तर इनसायक्लोपीडिया हे सुद्धा उपलब्ध आहे. कोणतीही संकल्पना शोधण्यासाठी संदर्भ उपयोगी पडतात.

## मराठी भाषा व प्रसार माध्यमे सहसंबंध

प्रसार माध्यमे भाषेच्या सहाय्याने वाचकांशी, जनसामान्यांशी संवाद साधत असतात. भाषा हे संवादाचे साधन आहे तसेच विचार करणे, संवेदना किंवा जाणीव होणे, प्रतिसाद देणे या सर्वांचे साधन

म्हणूनही भाषा फार उपयोगाची आहे. शिकलेल्या गोष्टी स्थिर होण्यासाठी लिहिणे, बोलणे आवश्यक असते, व्यक्तिमत्व विकासासाठी बोलणे, लिहिणे याबरोबरच लक्षपूर्वक ऐकणे हे सर्व गरजेचे असते. हे फक्त भाषेच्या ज्ञानामुळे साध्य होते.

प्रसारमाध्यमे माहितीचा प्रसार करत असतात. अनेक नवे शब्द आणि संज्ञा तयार करून त्या रूढ करण्यात प्रसार माध्यमांचा मोठा वाटा आहे. नभोवाणी किंवा आकाशवाणी दूरचित्रवाणी या माध्यमातून बोली व प्रमाणभाषेचा प्रसार झपाट्याने होतो. परंतु प्रसारमाध्यमांनी शुद्ध व प्रमाणभाषा वापरावी असा संकेत आहे. प्रसार माध्यमावरील भाषेचा विचार करताना माध्यमांवरील अभिव्यक्तीचा विचार होतो. शुद्ध-अशुद्ध, प्रमाण-बोली, ग्रामीण-नागरी, लोकभाषा-जनभाषा यांच्या सर्व सीमारेषा धुसर झालेल्या दिसतात. वृत्ती-प्रवृत्ती, भाव, स्वभाव, वय, लिंग, प्रदेश, परिस्थिती, जनसमुदाय आदीनुसार भाषेचा पोत आणि पदर, अभिव्यक्ती अनुभवायला मिळते. भाषेला वेगवेगळे आयाम आहेत.

अनेक भाषिक आविष्कार मराठी भाषेत होतील याची शक्यता नाकारता येत नाही. सोशल मीडियाने प्रत्येकाला आवाज तर दिलाय पण भाषा घडविण्यात-बिघडविण्यातही त्यांचा वाटा आहेच. आधुनिकीकरण व नागरिकीकरणामुळे आपला समाज बहुभाषिक पर्यावरणातला समाज बनत चालला आहे. याचे प्रतिबिंबही प्रसार माध्यमावरील विविध भाषेत दिसून येत आहे. या माध्यमांमुळे वेगवेगळ्या भाषा व बोली एकमेकींच्या जवळ येण्यातून भाषेला नवरूप प्राप्त होत आहे. यामधूनही भाषिक सौंदर्य वाढण्यास मदत होईलच.

प्रसार माध्यमावरची भाषा प्रचारकी स्वरूपाची आहे. तिच्यात कृत्रिमता, वृक्षपणा, नाटकेपणा, दिखाऊगिरी अधिक जाणवते कारण इथे सारेच आभासी आहे. या भाषेला सेन्सॉर नसल्यामुळे समाज विघातकी मनोवृत्तीचा विक्षिप्तपणा वाढलेला दिसतो. मूल्य विवेक हरवलेली, विकारी स्वरूपाची, एकात्मतेला भंग करणारी मानसिकता दिसून येते. चंगळवादी, बाजारकेंद्री, वृत्तीतून अधिक अंशतेने कॉपी-पेस्ट भाषा बनत जाते. तत्वताच ती संक्षिप्त आहे. तिचा संकोच होतोय. अक्षरलिपी, चिन्हांची जागा आता चित्रचिन्ह (इमेज), विशिष्ट खुणांनी घेतली. माध्यमांवर लेखन वाढले, पण दर्जा आणि शिस्तीचे काय. या भाषेत विनोद आहेत, वैचारिक वाद-प्रतिवाद आहेत.

प्रसार माध्यमावर एका नव्या भाषेने जन्म घेतलेला आहे. ती म्हणजे ट्रोलिंगची भाषा या भाषेत केवळ कॉपी-पेष्टचा उद्योग चालतो. अश्यावेळेस नव सूचनाची शक्यता मरून जाते. आपल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली वापरण्यात येणारी भाषा दुसऱ्याला त्रासदायक होणार नाही इतपत आपली भाषा नक्कीच प्रतिष्ठित असायला हवी. आपल्या हातात आलेल्या प्रसार माध्यमांवर वापरली जाणारी भाषा सर्वांनी जबाबदारीने वापरल्यास समाजाचे स्वास्थ बिघडणार नाही आणि विवेकशील समाज निर्मिती होईल. समृद्ध विचार, सकारात्मक चिंतन, विधायक चर्चा ही मराठी भाषेला, भाषिक अभिव्यक्तीला समृद्ध करण्यासाठी आवश्यक आहे. आकाशवाणी, दूरदर्शन, वृत्तपत्रे, इंटरनेट ही आधुनिक प्रसार माध्यमे आहेत. या प्रत्येक प्रसार माध्यमांचे स्वरूप वेगळे आहे. प्रत्येक माध्यमाची स्वतःची गरज व वेगळेपण म्हणून भाषेच्या आविष्कारातही बदल केले गेले. आकाशवाणीवरून निवेदनाची, दूरदर्शनवरील बातमीदारांची आणि वृत्तपत्रातील वार्तांकनाची स्वतःची शैली तयार झाली. बाजार, लोककला, बैठक, चर्चा इत्यादी पारंपरिक प्रसार माध्यमे आहेत. त्यात बोली भाषेचा अधिक वापर होतो. त्यात शुद्ध-अशुद्धतेचा फारसा विचार केला जात नाही. याशिवाय व्यक्ती-व्यक्ती मधील अंतर्गत संवादासाठी टेलीफोन, मोबाईल फोन इत्यादींचा वापर केला जातो. मोबाईलला विकत घेताना आपण केवळ मोबाईलच नाही तर मोबाईलचे शब्दही विकत घेत असतो. एस. एम. एस., मेसेज, डिलीट, कॉन्टॅक्ट, इमेज, मेनू, मेल बॉक्स, सेंट, ई-रिचार्ज, साऊंड, क्लिप, सेव्ह इत्यादी सारखे हजारो शब्द आपण नव्या अर्थाने स्वीकारतो. आज जरी प्रत्येक व्यक्ती मायबोलीतून

शिक्षण घेत असला तरी आज जागतिक भाषा इंग्रजी आहे आणि म्हणून प्रत्येकाला ते शिकावी लागते. इंटरनेटवर अधिकतर इंग्रजी भाषेचा प्रभाव दिसून येतो व ती वापरण्यात सोयीची ठरते.

## निष्कर्ष

माहितीचा मुक्त प्रवाह समाजात पसरण्यासाठी प्रसार माध्यमांची गरज असते. वृत्तपत्रातील अग्रलेख, विविध सदरे, पुरवण्या हे वर्तमानपत्राचे भाग आहेत. लोकशाही सुदृढ होण्यासाठी वर्तमानपत्राचा फार मोठा हातभार आहे. आकाशवाणी हे माध्यम श्राव्य असल्यामुळे त्यावरून माहिती, कार्यक्रम प्रेक्षक श्रवण करीत असतो. शब्दांच्या माध्यमातून आकाशवाणी प्रेक्षकांशी संवाद साधून योग्य ती माहिती पुरविते. दूरदर्शन हे दृक व श्राव्य माध्यम असल्यामुळे हे माध्यम वर्तमानपत्र व आकाशवाणी यांच्या मर्यादा ओलांडून जनतेला प्रत्यक्ष काय घडते हे दाखवते. प्रसार माध्यमे समाज घडविण्याचे कार्य करीत असतात.

प्रसार माध्यमांचा प्रचंड मोठा वर्ग लक्षात घेता असे म्हणता येईल की, आजची तरुण पिढीही दूरचित्रवाणी, मोबाईल, इंटरनेटवर विविध प्रसार माध्यमांवर पोहचली आहे. संस्कार घडवण्यासाठी यासर्व प्रसार माध्यमांची जबाबदारी खूप मोठी आहे. पूर्वीच्या काळी एकत्रित कुटुंब पद्धतीत मुलांवर घरातील जेष्ठ मंडळी संस्कार करीत असत पण आज विभक्त कुटुंब पद्धतीमध्ये काही अंशी घराघरांमध्ये दूरचित्रवाणी सोबत मोबाईलचा वापर प्रचंड प्रमाणात वाढलेला दिसून येतो. आजचा पालक, तरुण पिढी तसेच लहान मुले देखील अधिक प्रमाणात मोबाईलचा वापर करतात. तो त्यांना घातक ठरत आहे. हे कुठेतरी थांबले पाहिजे. पालकांचा दृष्टिकोन बदलला पाहिजे. आकाशवाणी, दूरदर्शन, इंटरनेट यांचा वापराबरोबरच चित्रपट, नाटक, फेसबुक, व्हाट्सअप, इंष्टाग्राम इत्यादी सारखी माध्यमे आपल्या रोजच्या जीवनाशी संबंध प्रस्थापित करत आहेत. आपल्या विचार आणि कृतीला ती जोडली जातात. ही सारी प्रसार माध्यमे भाषेच्या जोरावर उभी आहेत. विविध भाषा हीच या प्रसार माध्यमांचे बलस्थान आहे. आज प्रसार माध्यमांमध्ये जास्तीत जास्त मराठी, हिंदी, इंग्रजी तसेच इतर भाषांचाही प्रदेशानुसार वापर होताना दिसतो. प्रत्येक देशाची प्रगती तेथील मनुष्यबळावर अवलंबून असते. त्यामुळे आज प्रसार माध्यमांचा वाढलेला वापर लक्षात घेतला तर आजच्या पिढीला प्रभावीपणे घडविण्यासाठी व प्रसार माध्यमावरील सर्व प्रकारची माहिती ही भाषिक दृष्टीने शुद्ध तसेच नैतिकतेला धरून असावी तरच युवा पिढी हे सक्षम घडेल व देशाचा विकास होईल.

## संदर्भ

१) डॉ. स. गं. मालशे, डॉ. द. दि. पुंडे, डॉ. अंजली सोमन, 'भाषाविज्ञान परिचय', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, तृतियावृत्ती १८ जून २००९, पृ. ८९.
२) तत्रैव. पृ. ८७.
३) ना. गो. कालेलकर, 'भाषा इतिहास आणि भूगोल', प्रथम आवृत्ती १९६४, पृ. ९१.
४) विश्राम ढोले, 'प्रसार माध्यमे आणि प्रयोग कला', लोकवाड.मय गृह, पृ.२.
५) समीरण वाळवेकर, 'आजच्या ठळक बातम्या', राजहंस प्रकाशन, पृ. १८.
६) जयदेव डोळे, 'समाचार', लोकवांड.मय गृह प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती २०११, पृ. २५.

❖❖❖

# डॉ. योगेंद्र मेश्राम यांच्या कथांचा विषय

संशोधक
प्रा. विलास मेश्राम
डॉ. एल.डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स, पवनी, जि. भंडारा.
मोबाईल नं. ९६३७३१३८१२ ई.मेलः– vilasmeshram501@gamil.com
मार्गदर्शक
डॉ. राजेन्द्र वाटाणे
तायवाडे महाविद्यालय, महादुला, कोराडी.

## प्रस्तावनाः–

साठोत्तरी कालखंडाने मराठी साहित्यात मोलाची भर घातली आहे. याच कालखंडात विविध वाङ्‌मय प्रवाह निर्माण झालेत. त्यात दलित साहित्याचा उगम याच कालखंडात झाला. दलित साहित्यामध्ये कथा हा वाङ्‌मय प्रकार अधिक समृध्द झालेला दिसून येतो. कारण दलित कथेने आपले निराळेपण सिध्द केले. मराठी दलित कथेचा प्रवाह तिच्या वळणा वळणामुळे पाहण्याजोगा, महत्वाचा झाला आहे. दलित कथा ही आत्मभान, आत्मशोध घेणारी आहे. स्वाभीमान बाळगा असे आत्मभान देणारी तर आपण माणसे आहोत. चांगल्या माणसासारखे वागा हा आत्मशोध घेणा–या कथा आहेत. दलित कथा ही या व्यवस्थेला प्रश्न विचारणारी होती. त्यातूनच दलित कथाकारांचे एक प्रगल्भ परंपरा निर्माण झाली. त्यात योगेन्द्र मेश्राम यांच्या कथेने मोलाची भर घातली आहे. त्यांच्या कथा सामाजिक जाणीवेतून निर्माण झाल्या असून त्यातही त्यांनी ग्रामीण आणि वैदर्भिय जनजिवनातील समाज वास्तव त्यांच्या कथेतून प्रकर्षाने पुढे आलेले दिसते.

## विषय विवेचनः–

१९७१–७२ नंतर लेखन करणाऱ्या दलित लेखकातील ठळक नाव म्हणजे डॉ. योगेद्र मेश्राम होय. त्याच्या कथासंग्रहातून सभोवतीच्या माणसांच्या व्यथा–वेदना ताकदीनिशी मुखर झालेल्या आहेत. दलित, उपेक्षित, शोषित माणसांचे हेलावून टाकणारे दुःख आणि प्रतिकूल परिस्थतीवर मात करीत त्यांची जगण्यासाठी चाललेली धडपड हा योगेंद्र मेश्रामांच्या लेखनांचा गाभा आहे. योगेंद्र मेश्राम हे नवीन दलित कथा कारांच्या पिढीतील एक निष्ठावान आणि ताकदीचे कथाकार आहेत. त्यांनी आंबेडकरी प्रेरणेच्या कथा लिहिल्या. त्यांच्या कथामधून दलिताच्या दुःखाचे, वेदनेचे, चित्रण येते. त्यांचे कथाविश्व त्यांच्याच जीवनानुभूतीतून अवतरलेले आहे. त्यांच्या कथेला वास्तवाचे अधिष्ठान आहे. ते स्वतः आपल्या कथेविषयी म्हणतात, माझी कथा माझ्या दलित जीवनाची कथा आहे. ती अगदी या जीवनाचीच एक लंबी कहाणी झाली आहे किंवा त्या कहाणीत तुकडया तुकडयानेच आपलेच जीवन अंतर्भुत आहे. मेश्रामांच्या कथेत नव्या जाणिवेमुळे भोवलातच्या घटना, प्रसंगाबद्‌दल त्यांचा मनात निर्माण होणाऱ्या प्रतिकिया ते आपल्या कथेतून प्रकट करताना दिसतात.

गावगाडयात व झोपडपट्‌टीत जीवन कंठत असताना दलित उपेक्षितांना सोसावा लागणारा छळ, पारंपारिक विचारांना व खोटया समजुतींनी उपेक्षित जातीचे चालविलेले शोषण, त्यांची गतानुगतिकता, त्यातून वाट्याला येणारे अज्ञान, दारिद्रय, उच्चवर्णियांनी त्यावर लादलेली अमानुष गुलामगिरी या साऱ्यांचे प्रतिबिंब मेश्रामांच्या कथेत दिसून येते. त्यांनी आपल्या कथातून माणसांची विविध रूपे रेखाटून शोषणावर प्रहार केलेले आहेत. दलितांच्या समकालीन सामाजीक जीवनाचा वेध घेणाऱ्या कथा त्यांनी लिहिल्या. त्यांनी पुर्वीच्या कथेप्रमाणे, पूर्वीच्या काळातील ग्रामीण जीवनातील अन्यायचा केवळ चित्रण केलेले नाहीत तर ती आजच्या प्रश्नांना सामोरे जात आहे. दलितांच्या जीवनात नव्याने निर्माण झालेले प्रश्न, शिक्षण घेऊन शहरी बनलेला दलित वर्ग, तळमळीचे अथवा ढोंगी नेतृत्व या संबधीचे अनुभव त्याचें कथा विषय बनतात. त्यांच्या कथेतील सदर्भ व्यापक असतात. मानवी जीवनाच्या विशाल

पटावर ते कोरलेले असतात. त्यामध्ये भीषण नाटय प्रसंग, भयप्रद, विलक्षण वातावरण असते. मन कासावीस करणारी वर्णने असतात. कथानकात अनुभंवांची जी मांडणी येते ती अधिक तीव्र स्वरुपात येते.

योगेंद्र मेश्रामांच्या कथेमध्ये दलित—शोषित—उपेक्षित अशा सर्वच पददलितांचे चित्रण आढळते. त्यातही ग्रामीण दलितांपेक्षा नागरी दलितांकडे त्यांचा कल अधिक दिसून येतो. त्यात सुशिक्षित दलितांवर त्यांचे लक्ष अधिक केंद्रीत झालेले दिसते. त्यांच्या कथेत येणारा परिसर मुख्यतः 'नागरी' आहे. डॉ. आंबेडकराच्या शिकवणीने प्रेरित झालेला ग्रामीण व नागरी दलित समाज विषम समाज रचनेतील अन्याय—जूलूम—पिळवणूक इत्यादींची नवीन जाणिव होऊन अधिक दुःखी व कष्टी झालेला आहे. ग्रामीण आणि नागरी या दोन्ही जीवनातील दुःखे कथांच्या माध्यमातून मांडण्याच्या प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या 'जगण्याचा प्रश्न' हया कथासंग्राहातून आणि हाहाःकार मधील चकवा व जीवदान या कथांतून देशाच्या ग्रामीण भागात चिरंतन असलेली जातीयवादी संरजामशाही, अमरपट्टा होऊन जन्मलेली शोषित—दलितांची दु;खी जग, शहरीकरणाची आणि उच्चभ्रुंची संभ्रमीत प्रस्थापना आणि उद्ध्वस्त वाताहतीकडे अनिवार्यपणे घेतले जाणारे सामाजिक वास्तव हा या कथेचा रूप परिसर प्रत्येक कथेतून उत्तरोत्तर विलक्षण निरूत्तर होत जाणारे दु;खीतांच्या जगण्याचे प्रश्न झिरपत जाते. त्यांनी हे जीवनवास्तव अतिशय जीवाच्या आकांताने माडले आहे.

योगेंद्र मेश्रांमाच्या कथेतील पात्रे ही नव्या जाणिवांनी व उच्च शिक्षणाने प्रक्षुब्ध झालेले व विद्रोही आहे. 'सावधान' मधला साधू हा खेडयातील स्त्री पुरूषांना अंगारे धुपारे देतो. परंतू एके दिवसी तो आपल्या साधुत्वाचा वेष टाकून सन्मानाने जीवन जगण्याची इच्छा व्यक्त करतो. 'हाडाचा लेखक' मधला नायक इथल्या सामाजिक परिस्थितीने क्रृध्द बनतो आणि दलितांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न करतो.

- दलित कुटूंबातील शिक्षित आणि अशिक्षित यातील संघर्ष, शिक्षित प्रौढ दलित तरूणांची मनोव्यथा, शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात दलित शिक्षकांच्या वाटयाला आलेले अपमान, उपेक्षा हे सरे अनुभव योगेंद्र मेश्रामांच्या कथेचे विषय आहेत. संयतपणे जीवन संघर्षाची विचारक चित्रे रेखाटणारे मेश्राम नव्या दलित लेखकातील महत्वाचे नाव आहे. त्यांनी ग्रामीण आणि नागरी जीवनातील उपेक्षितांच्या, अस्पृश्यांच्या व आदिवासींच्या जीवन वास्तवला स्पर्श करून दलित कथेची व्याप्ती वाढविली. त्यांची कथा उपेक्षित व अस्पृश्यांच्या वेदना कथन करीत असतानांच ती परिवर्तनासी नाते सांगणारी आहेत. म्हणूनच आर्थिक आणि सामाजिक समतेसाठी ते कथेतून आवज उठविण्याचा प्रयत्न करतात. संघर्ष व विद्रोह केल्याशिवाय दलितांना प्रतिष्ठा व न्याय मिळू शकणार नाही.

दलितावरील अन्याय, जुलूम, दलित स्त्रीवरील निर्घुण बलात्कार, हिंदू समाजावस्थेचे केलेली कोंडी, त्यातून बाहेर पडू पाहणारी मन, शहरी जीवनातील अस्पृश्यतेचं छुपे आवरण, बेकारी, भूक, ग्रामीण गुंडगीरी आणि अत्याचार हे मेश्रांमाच्या कथेचे विषय आहेत. मेश्राम व्यक्तींच्या माणसिक आंदोलनाच्या शोध घेतात आणि विश्वाच्या बाहय स्वरूपाचेही चित्रण करतात. योगेंद्र मेश्रामांच्या कथेत भूक, स्त्रीची परवसता हे विषय येतात. परंतू एक विशेष म्हणजे पुरूषांनीही स्वतः विकण्याची पाळी यावी असा उद्भूत आणि आश्चर्यजनक वाटणारा प्रश्न त्यांच्या 'अनावर' व 'भूक' या सारख्या कथेत दिसून येतो. दलित कथेमध्ये हा विषय कदाचित त्यांनी मांडला असावा. ही आजच्या समाजातील वास्तवता आहे.

'अनावर' या कथेत हबीबभायची दुसरी बायको मोठी देखणी होती. ती बाई मानाने वयाने पुष्कळच धाकटी ऐन जवान होती. ''मदात मावत नव्हती ............... त्याला चाहू लागली .................... कुटं जाऊ? अरे कुटं जाऊ दादा, त्या कामानं तं माहा सत्यानाश झाला ............... मी बी नालायक. पन तिच्यामुळं. तिनं मले पिसं केलं व्हतं. पुरा नास केला. मी गा गांडू —नामरद झालो दादा. माजवांल लिंगच पिरडून कहाडलं. बेकार करून टाकलं. सडांसला असतांनी थेंब थेंब गळतांनी बगतो. धार धरते. रोज रोज तेच पाहून जीव कावतो. तडफडत राहयतो ................ राती साळूचा इचार आला का ................ कसं सांगू?'' 'भूक' या कथेत पुन्नावर मोठचं 'आरिस्ट' येऊन बसंल. बायको पुन्हा गरोदर होती. ''हाय हाय .......... आणि करता करताच मेलेलाच गर्भ बाहेर पडला ................. आनं मग तिला बाळंतदोस झाला. बारं भरलं डोस्कच फिरलं, येडी पिसी करू लागली ...... ....... सामसूम रात होऊ दिली. सांदी शिळी त्याला ठाऊक होत्याच मग तो वाडयाच्या मागच्या भागानं अंदर

शिरला एकदम अंदरच्या 'इस्टोरात' तांदुळ धान्याचा उंच थप्पीवर एक चुंगडी आढली घसरली —धपकन.......... धस्स्स .................. आनं एकाएकी बलब लागला. ........... 'तुला धान्य' —तांदूळ न्यायचेत ना? मग इकडे येकसा ये पुन्हा'—आणि ती आतल्या बिछान्याकडे झाली ................. खाली पडलेल्या पायापासच्या चुंगडीकडे त्यानं पाहिलं आणि .............. भुक पेटली होती.

विद्रोह हा तर त्यांच्या कथेचा विषय आहे. ''दलित, दलित आदिवासी, दलित—बहुजन जीवनावर त्यांनी बहुविध कथा लिहिल्या आहेत. जीवनवास्तवाची जळवळ घेऊन दु:ख व कारुण्य यांनी व्यापलेले उत्कट भावबंध उकलणाऱ्या 'सावधान' 'पत्राचे कारण', 'तो कधी हसला नाही', 'भूक', 'रक्ताळलेली लक्तरे' इत्यादि लक्षवेधक कथा. या कथांचे मोठेपण हे त्यातल्या गर्भित जीवनवादितेत आणि मानवद्रोही चाकोरी विरुध्द बंड पुकारणाऱ्या विद्रोही भूमिकेत आहेत. अन्य दलित कथाकाराप्रमाणे योगेंद्र मेश्राम यांनी देव, दैव, अंधश्रंध्दा, शोषण यातील फोलपणा उघडकीस आणलेला आहे. ते खऱ्या अर्थाने समाजवास्तवाचे चित्रण करतात. या सोबतच आदिवासीचे शोषण हा सुध्दा त्यांच्या कथांचा विषय आहे. मेश्रामांचे कथाविषय, कथाबीजे निराळेपण व्यक्त करणारी आहेत. हे त्यांच्या कथेचे सामर्थ्य आहे. योगेंद्र मेश्राम यांनी आपल्या कथातून केवळ दलितांचे दु:खच दाखविले नाही तर ती सुध्दा दलित माणसं ही माणसंच आहेत हा विचार त्यांनी आपल्या कथातून प्रखरपणे मांडला आहे.

प्रचलित समाजव्यवस्थेतील शोषणावर प्रहार करतांना योंगेंद्र मेश्रामांच्या कथेतील पात्रे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार बोलतात. दलितांच्या शोषणाचे मूळ येथिल आर्थिक व जातीसंस्थेत आहेत. याची ओळख येथील शोषित माणसाला झाली आहे. डॉ.आबेडकरांच्या कार्यामुळे येथील दलित माणसात परिवर्तन होण्याची प्रकिया घडू लागली आहे. याचे चित्र मेश्रामांच्या कथेत दिसते. एवढेच नव्हे तर यांची पात्रे अन्यायविरुध्द आवाज उठवितात. विद्रोह करतात. योग्रेंद्र मेश्राम यांच्या कथेचा मुख्य विषय माणूस हा असून त्याच्या मुक्तीसाठी धडपडणे हा त्यांच्या कथेचा स्वभावधर्म आहे. आंबेडकरी प्रेरणेतून ती साकारली असल्याने सर्व स्तरातील प्रश्नाला ती हात घालते व मानवमुक्तीचे गीत गाते.

समारोप:— योगेंद्र मेश्राम यांच्या कथांचा विचार करताना असे दिसून येते की, त्यांच्या बहूतेक कथा सामाजिक चळवळी प्रेरित झालेल्या आहेत. योगेंद्र मेश्राम यांनी नाळ समाजाशी आंबेडकरी विचारांशी जुळलेली आहे. मेश्राम यांची कथा व्यक्ती मनाची भावना पकडून अवतीभवतीच्या वास्तवाचे डोळसभान ठेवून प्रकट होते. त्यांच्या कथेचा नायक निमूटपणे अन्याय सहन करीत नाहीत. तो अन्यायविरूध्द संघर्ष करतो. 'समता' निर्माण करणारी समाजव्यवस्था घडवू पाहतो आहे. त्याकरीता तो संघर्षासाठी उभा ठाकतो. त्यांची कथा लक्षवेधी आहे. त्यांच्या कथेत सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय जीवनाचा विविध पैलूचें दर्शन घडत असतांना मानवतावादी मूल्यांची जोपासना होतांना दिसते.

योगेंद्र मेश्राम यांची कथा मनोरंजन करण्यासाठी मुळीच नाही. त्यांच्या कथा वाचून वाचक अस्वस्थ होतो, ही कथा आपल्याच माणसांची आहे. माणसांच्या दु:खाची, लढयाची, समाज परिवर्तनाची भावना असलेली अस्सल कथा आहे. तिच्यात नाटकीपणा नाही, कुत्रीमता नाही. मेश्राम यांच्या कथांच्या माध्यमातून समाजाकडे आणि एकूणच संस्कृतीच्या विविध अंगाकडे डोळस दृष्टीने पाहण्याचा संदेश आपल्या कथांमधून ते वाचकांना देतात.

## संदर्भ:—

१) योगेन्द्र मेश्राम —स्मृती विषेशांक— लोकानुकम्पा —२०१८
२) योगेन्द्र मेश्राम—रक्ताळलेली लक्तरे—विजय प्रकाशन, नागपूर.
३) योगेन्द्र मेश्राम—आंक्रितांचे थरार—संदेश प्रकाशन, नागपूर.
४) योगेंन्द्र मेश्राम—जगण्याचा प्रश्न— विजय प्रकाशन, नागपूर.

❖❖❖

# मावची आदिवासींच्या लोककथा : स्वरूपमीमांसा

**प्रा.डॉ. माहेश्वरी वीरसिंग गावित**
पेमराज सारडा महाविद्यालय, अहिल्यानगर.
लोकसाहित्य व आदिवासी साहित्याच्या अभ्यासक, समीक्षक.
भ्रमणध्वनी - ९८२२४१४२०२ ई-मेल : maheshwarigavit23@gmail.com

## सारांश :-

आदिवासी जमाती या मानवाच्या प्राथमिक अवस्थेतील टोळ्यांचे अवशेषरूप आहे, असे आदिवासींची निसर्गाश्रयी मनोभूमिका व वर्तन यांच्या निरीक्षणातून मानता येते. हे मान्य केले तर आदिवासींच्या लोककथांचे महत्त्व केवळ जमातीपुरते मर्यादित राहत नाही, तर अखिल मानवजातीच्या हजारो वर्षांच्या सांस्कृतिक विकासातील मूळ अवस्थेशी त्याचा संबंध लावता येतो. या अनुबंधाचा विचार अतिशय गांभीर्याने केला पाहिजे.

लोककथा या सामूहिक मनाचा आविष्कार असतो. समग्र लोकसंस्कृती लोककथांमधून अवतरते. लोककथांचे पर्याय सर्वदूर आढळतात. भौगोलिकदृष्ट्या दूरवर असणाऱ्या प्रदेशातील कथांतही साम्य आढळल्याने वेगवेगळ्या प्रदेशांत प्रचलित असणाऱ्या सारख्या कथांचा एकत्रित अभ्यास करून, त्यांच्यात प्रतीत होणारा कथेचा समान गाभा, कथासूत्र तपासले जाऊ शकते. लोककथांच्या तुलनात्मक अभ्यासाला या कथाविशेषांचा विशेष उपयोग होऊ शकतो.

मावची आदिवासी जमातीत लोककथांचे दालन हे अतिशय समृध्द आहे. मावची बोलीतून या कथांची अभिव्यक्ती होताना दिसते. मावची आदिवासींच्या लोककथांचा अभ्यास अधिक तपशीलाने केल्यावर त्यांचे जे विशेष लक्षात येतात, त्यामुळे त्याच्या विश्वात्मकतेची अधिकाधिक लक्षणे स्पष्ट होऊ लागतात आणि त्यांचे जागतिक लोककथांशी दिसून येणारे नाते अधिक दृढ होताना दिसते.

## Abstract:

Tribal communities are often regarded as remnants of humanity's earliest societal formations, a perspective supported by observing their nature-centric worldview and behaviours. Accepting this view elevates the significance of tribal folklore beyond its immediate cultural confines, establishing its relevance as a connection to the foundational stages of cultural evolution that humanity has undergone over thousands of years. This perspective deserves profound and earnest contemplation.

Folklore embodies the collective consciousness of a community. It is through folktales that the essence of an entire folk culture is articulated. These narratives are universally present, and striking parallels can be found even among tales from geographically distant regions. A comparative analysis of such similar narratives allows us to uncover their shared essence and thematic frameworks. This comparative study, therefore, becomes a valuable tool in understanding the commonality and diversity within global folktales traditions.

The Mavchi tribal community possesses a remarkably rich repository of folktale, which is predominantly expressed through their dialect. A meticulous study of these narratives reveals distinct characteristics, which further illuminate their universality. These unique traits underscore their connection to the global corpus of folktale, forging a deeper and more robust relationship with the universal tradition of storytelling.

## प्रस्तावना :-

लोकसाहित्याची व्याप्ती फार मोठी आहे. लोकवाङ्मय हा लोकसाहित्याचा एक उपविभाग आणि तो शाब्दिक म्हणजे शब्दांशी निगडित आहे. परंपरेने चालत आलेल्या मौखिक आविष्कारांचा म्हणजेच लोककथा, लोकगीते, लोककथागीते, म्हणी, कोडी, उखाणे यांचा त्यात समावेश होतो. या लोकवाङ्मय विभागातील लोककथा हा प्रकार जास्तीत जास्त आकर्षक व अभ्यसनीय ठरला आहे. लोकसाहित्याच्या क्षेत्रात निर्माण झालेल्या सर्वाधिक अभ्यास संप्रदायांची उभारणी लोककथांच्याच अभ्यासातून निर्माण झालेली आहे. ही बाब विशेष लक्षणीय आहे. लोककथेच्या या लोकप्रियतेच्या मुळाशी अर्थातच माणसाची कथाप्रियता आहे. कथा ऐकणे आणि सांगणे हे जणू मानवाचे दोन जन्मजात स्थायीभावच आहेत. कथा सांगण्याची प्रेरणा व कथा ऐकण्याची गरज या दोन्हींमुळे कथा ही मनुष्याच्या सांस्कृतिक इतिहासात प्राचीन काळापासून ते आजपर्यंत माणसाचा नैसर्गिक मित्र, सोबती बनली आहे.

भारत देश हा फार प्राचीन काळापासून अत्यंत कथाप्रिय देश म्हणून प्रसिद्ध आहे आणि त्यामुळे भारतात लोककथांची परंपरा अत्यंत प्राचीन असल्याचे आढळते. माणसाच्या कथाप्रिय स्वभावामुळे कथाकथन करणारे कथाकथकही समाजात लोकप्रिय ठरलेले दिसतात. जगातील जवळजवळ प्रत्येक जातीजमातींत कथाकथनाची कला जोपासलेली दिसून येते. एखाद्या गावी कोणी पाहुणा आला तर गावातील लोकांनी एकत्र जमून त्याच्या गोष्टी ऐकण्याची प्रथा रूढ होती. परंपरेने चालत आलेल्या या कथा थंडीच्या दिवसात शेकोटीभोवती बसून अजूनही सांगितल्या जातात व ऐकल्या जातात.

धुळे, नंदुरबार जिल्ह्यात मावची आदिवासी जमातीचे वास्तव्य आहे. मावची जमातीत मौखिक लोकवाङ्मयाची परंपरा अतिशय समृद्ध अशी आहे. कथात्मक साहित्य विपुल प्रमाणात आढळते. मावची समाज हा आदिम काळापासून जंगलाच्या कुशीत राहात असल्यामुळे त्यांची संस्कृती ही आदिम आहे. निसर्गाला देव मानण्याची त्यांची कल्पना, त्यांच्या देवविषयक व्याप्तीचे दर्शन घडविते. वीज, पाणी, रस्ते आदी भौतिक सुविधा आजही त्यांच्यापर्यंत पोहोचलेल्या नाहीत. याद्दष्टीने ते अप्रगत म्हणता येतील, पण सांस्कृतिकदृष्ट्या मात्र ते अत्यंत प्रगत आहेत. आपला पेहराव, बोली, विविध विधी पार पाडण्याच्या परंपरा, सणोत्सव, निसर्गाशी जवळीक, नृत्य, गीते, नाट्य यांसह प्राणीप्रेम, अल्पसंतुष्टता, स्वतंत्र जमातपंचायत, सहकार्याची भावना, माणुसकी, स्त्रीपुरुष समानता, चराचराकडे समानतेने पाहण्याची दृष्टी, निसर्गाला देव मानण्याची त्यांची कल्पना ही वैशिष्ट्ये आजही या समाजजीवनात ओतप्रोत भरलेली दिसतात.

## विषय विवेचन :-

मावची आदिवासी लोककथांचे संकलन करण्याचा प्रयत्न फारसा झालेला दिसत नाही. मावची बोलीतून या कथांची अभिव्यक्ती होताना दिसते. मावची जमातीत लोककथांचे दालन हे अतिशय समृद्ध आहे. मावची लोककथांचे वर्गीकरण अद्भुतकथा, दैवतकथा, प्राणीकथा, हास्यकथा, मालाकथा, वास्तवकथा, संकीर्ण या प्रकारांमध्ये करता येते.

## दैवतकथा (Myth) :-

दैवतकथा या मानव समाजाच्या आद्यतम कथा आहेत. विश्वातील चमत्कारांनी आदिम मानवाचे मन भयचकित झाले असेल. प्राचीन काळी या चमत्कृतींची संगती कथारूपाने लावण्याचा माणसाने प्रयत्न केला. या कथा म्हणजेच दैवतकथा होत. या विश्वाचे चक्र सुरळीतपणे चालू ठेवणाऱ्या विविध शक्तींना

माणसाने कालांतराने देवतांची रूपे कल्पिली आणि या विविध देवतांबद्दलही कथा निर्माण होऊ लागल्या. दैवतकथेभोवती धार्मिकतेचे व पावित्र्याचे वलय निर्माण झाले. काही दैवतकथांचा संबंध धार्मिक विधींशी जोडलेला असतो. एखादा धार्मिक विधी का करावा ? केव्हा करावा? याचे स्पष्टीकरण तर त्या विधिकथेत असतेच, शिवाय ती विधिकथा त्या विधिचाच एक अविभाज्य घटक असते. उत्पत्तिकथा हा दैवतकथांचाच एक विभाग मानला जातो. दैवतकथांत अद्भुततेचे विपुल प्रमाण असते. मावची जमातीतील दैवते ही निसर्गातील पशुपक्षी, वनस्पती, पंचमहाभूते, पूर्वज यांच्याशी संबंधित असल्यामुळे एकीकडे त्यांचे मानवीकरण केले जाते तर दुसरीकडे त्यांच्या अंगी अतिमानवी शक्ती प्रदान केलेली आढळते. उदाहरणार्थ:- वागदेव[१], हिंवाऱ्यादेव[२] या लोककथा.

## अद्भुतकथा : -

'अद्भुतकथा' हा जगात विपुल प्रमाणात आढळणारा एक लोककथाप्रकार आहे. मावची आदिवासींमध्येही अद्भुतकथेचा भरणा अधिक प्रमाणात दिसतो. प्रारंभी गरीब आणि निराश्रित असलेल्या परंतु, नंतर अद्भुतशक्तींचा महत्त्वपूर्ण वाटा असलेल्या काही साहस मालिकांनंतर आपले ध्येय साध्य करून नंतर सुखात राहणाऱ्या नायक वा नायिकेभोवती केंद्रिभूत झालेली, विनोद वर्ज्य नसला तरी सामान्यतः गंभीर स्वरूपाची आणि ठराविक लांबीची गद्यकथा म्हणजेच अद्भुतकथा होय. अद्भुतकथेचे जग नेहमीच्या जगापेक्षा फार भिन्न असते. अतिमानवी स्वरूपाचेच असते. या कथा प्रामुख्याने मनोरंजनासाठी सांगितल्या जातात. कथाकथन व श्रोते या दोघांनाही या जगाच्या कल्पिततेची पूर्ण कल्पना असते. अतिसुष्ट आणि अतिदुष्ट पात्रांच्या चित्रणातील विरोधाभासामुळे अद्भुत कथेत नाट्यात्मकता आणि कारुण्यपूर्ण वातावरण निर्माण होते. जादूचे प्राबल्य, रुपांतराची प्रचुरता यांच्यामुळे या वातावरणाला आणखी रंगत चढते आणि या वातावरणाचीच मानवी मनाला अतिशय ओढ असते. अद्भुतकथांच्या रचनेत अनेक वळणे आणि गुंतागुंत दिसून येते. दुःखी नायक-नायिकांना त्यांच्यावरील संकटातून पार पडण्यासाठी मिळणारी अद्भुत व अतिमानवी मदत हे या अद्भुततेचे मुख्य सूत्र आहे. एखादी अतिमानवी शक्ती स्वतःच मदतीला धावते किंवा संकटग्रस्ताला अद्भुत वस्तू प्रदान करून संकटमुक्त करते. रुपांतराचे साह्यही अनेकवेळा घेतले जाते. कल्पनाशक्तीला कुठलेच बंधन नसल्यामुळे अद्भुतकथांत अतिशयोक्ती सहजपणे प्रवेश करते. मावची जमातीच्या अद्भुतकथांमध्ये राक्षस, रानगाय, टिपऱ्या पक्षी, चमत्कारी साधू, चमत्कारी कावळा, भुताळी, सोनेरी मासा, होमी नाग, उडता घोडा, सोनेरी प्रकाशमान पक्षी, चमत्कारी बैल अशा प्रकारचे अद्भुत शक्ती असणारे घटक येताना दिसतात. उदाहरणार्थ :- विधवा आणि तिचा मुलगा[३], टिपऱ्या पक्षी[४], पोरका मुलगा[५], लोहार आणि सुतार[६], या लोककथा.

## वास्तवकथा :-

या कथांत काहीशी अतिशयोक्ती असते परंतु, अद्भुतता नसते. वास्तवतेचे समान सूत्र असणाऱ्या विविध स्वरूपाच्या मिश्र कथांचा समावेश या प्रकारात होतो. चातुर्य, हुशारी, विनोदबुद्धी, चलाखी, सहनशीलता, शांतपणा इत्यादी मानवी गुणांना या कथात अधिक प्राधान्य दिलेले असते. एखादे कोडे चतुरपणाने सोडविणे किंवा अवघड प्रश्नांना चपखल उत्तरे देणे असेही या कथांचे स्वरूप असू शकते. या कथांतील पात्रे ही बहुधा साधीसुधी माणसे व घटना वाटाव्या अशा असतात. त्यातील नायक-नायिका कशाच्या तरी प्राप्तीसाठी घरापासून दूर जातात. खलपात्रे त्यांचा छळ करतात. तथापि, हे सर्व मानवी मर्यादांच्या परिघात घडते. त्यामुळे वास्तवकथेचे विषय अद्भुतकथांच्या तुलनेत अधिक साहसपूर्ण, करुण

आणि भावनात्मक असतात. उदाहरणार्थ :- धिवरपक्षी आणि मासे मारणारा म्हातारा[७], शिरीफुले आणि आदिवासी लोक[८] या लोककथा.

**प्राणीकथा, बोधकथा :-**

हा कथाप्रकार अत्यंत प्राचीन काळापासून लोकप्रिय असून परंपरेने चालत आलेला आहे. या कथांना वास्तवाचा व ऐतिहासिक सत्याचा आधार असतो. सामान्यतः प्राणीमात्र असलेली आणि उघडपणे नीतीतत्त्व प्रतिपादन करणारी कथा म्हणजे बोधकथा होय. प्राचीन काळापासून मानवाला प्राणीमात्रांच्या जीवनाबद्दल, त्यांच्या विविध वैशिष्ट्यांबद्दल अपार कुतूहल होते. या अनुषंगाने रचल्या गेलेल्या कथा म्हणजेच प्राणीकथा. या कथांमध्ये प्राण्यांचे मानुषीकरण केले जाते. या कथांतील प्राणी बोलतात, तर्कशुद्ध विचार करतात. माणसांच्या अनेक क्रियांचे अनुकरण करतात. मात्र हे सर्व करीत असताना त्यांची नैसर्गिक स्वभाववैशिष्ट्ये नजरेआड केली जात नाहीत. त्या त्या प्राण्यांच्या सर्व स्वभाववैशिष्ट्यांचेही नेमके दर्शन त्यात घडते.

या कथात विनोदाचा सूक्ष्म धागा असतो. दोन प्राण्यांच्या स्वभावातील विसंगती आणि उपरोध यातून सहजपणे ही विनोदनिर्मिती होते. यामुळे त्यांतील नीतिप्रतिपादन बोचत नाही, उलट अधिक परिणामकारक होते. या कथा सामान्यतः आकाराने लहान असतात व त्यातील पात्रे, घटना मर्यादित असतात. त्यांचा आशय पूर्णतः व्यावहारिक व लौकिक पातळीवरचा असतो. दैवतकथा आणि अद्भुतकथांमध्ये येणारे प्राणी हे बहुधा अतिमानवी शक्तीने मंडित असतात. प्राणीकथांतील प्राणी मात्र पूर्णपणे लौकिक असतात. त्यामुळेच हा प्रकार अत्यंत लोकप्रिय ठरलेला असून, सर्वसामान्य माणसाला अधिक जवळचा वाटतो. उदाहरणार्थ :- कोल्हा आणि तितर पक्षी[९], तांबूस उंदीर[१०] या लोककथा.

**हास्यकथा :-**

लोककथेला विनोदी स्वरूप देऊन हास्यनिर्मिती करण्याचे कार्य परंपरेने वर्षानुवर्षे चालू आहे. याच हास्यकथा होत. त्यांचे विपुल प्रमाण आढळते. हास्यकारक परिस्थिती निर्माण करणाऱ्याप्रसंगांची प्रसंगमालिका वर्णन करणाऱ्या कथेस हास्यकथा म्हणतात. त्यांचा विषय रोजच्या जीवनातून घेतलेला असतो. विनोदनिर्मितीच्या हेतूसाठी विनोदसाधने मात्र विविध वापरली जातात. शारीरिक व्यंग, मानसिक व्यंग, विनोदी घटना, दुराग्रही स्वभाव, मूर्खपणा अशा अनेक मार्गाचा अवलंब केला जातो. उदाहरणार्थ :- म्हातारा आणि वाळूक[११], वेडा आणि मतिमंद[१२], या लोककथा.

**मालाकथा :-**

या कथा विनोदी, खेळकर किंबहुना, एखाद्या मनोरंजक खेळासारख्या असतात. त्यांना ठराविक पद्धतीची, सुविहित अशी रचना आणि कथनशैली असते. त्यातून नाट्यपूर्णतेचा उत्कट भास निर्माण होतो. त्यातील पात्रांची सृष्टी, माणसे, प्राणी, पक्षी, अचेतन वस्तू या सर्वांची मिळून तयार होते आणि त्यांच्या संवादातून कथेचा विकास होत जातो. प्रथम एक किंवा दोन पात्रे कथेत समाविष्ट होतात. आणि नंतर एक एक पात्रांची त्यात भर पडत जाते. संवादातील वाक्ये आणि घटना याचे पुन्हा पुन्हा त्याच शब्दांत पुनरावर्तन होत जाते. या वैशिष्ट्यांमुळे सहजपणे विनोदनिर्मितीही होते. या कथांमध्ये कथा भागापेक्षा त्याची रचना अधिक वैशिष्ट्यपूर्ण व महत्त्वाची असते. मालाकथेचा कथक हा कथेच्या आशयाकडे फारसे लक्ष्य देत नाही आणि आशयाचा फारसा विचार करत नाही; परंतु कथनशैलीच्या ज्या वैशिष्ट्यांचा तो

अवलंब करतो, त्यांना भावनिक प्रतिसाद मिळावा अशी त्याची अपेक्षा असते. उदाहरणार्थ :- म्हातारा आणि कावळा[१३] ही लोककथा.

## मावची लोककथांचे विशेष :-

मावची आदिवासींच्या लोककथांचा अभ्यास अधिक तपशीलाने केल्यावर त्यांचे जे विशेष लक्षात येतात, त्यामुळे त्यांच्या विश्वात्मकतेची अधिकाधिक लक्षणे स्पष्ट होऊ लागतात आणि त्यांचे जागतिक लोककथांशी दिसून येणारे नाते अधिक दृढ होताना दिसते. मावची लोककथांचे विशेष हे पुढीलप्रमाणे.

१) मावची लोककथांत अद्भुताचे प्राबल्य आहे. अद्भुतकथेप्रमाणे दैवतकथांमध्येही अद्भुतता असते. या अद्भुत शक्तीचे वाहक देवदेवता, नाग, राक्षसपिशाच्चादि योनी, सिद्ध माणसे, प्राणी, वनस्पती वगैरे. विविध तऱ्हांनी व हेतूंनी आपली अंगभूत शक्ती प्रकट करतात. येथे स्थलकालाचे बंधन अत्यंत शिथिल झालेले आढळते. अद्भुत घटना, शाप व उःशाप, रुपांतर, जादूच्या विविध वस्तू अशा अनेक बाबींतून अद्भुताचे दर्शन सतत होत राहते. लोककथेत संघर्ष व नाट्यात्मकता या अद्भुतशक्तीमुळेच निर्माण होते.

२) मावची लोककथांचा आशयाच्या अनुषंगाने विचार केला असता, यात मावची जमातीच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि सामूहिक भावना आविष्कृत होताना दिसतात. या कथांमध्ये मावची आदिवासींमधील रूढी, परंपरा, श्रद्धा, अंधश्रद्धा, सणोत्सव, विधिविधाने, देवदेवता, स्त्रीपुरुष संबंध, विवाहविधी, मर्तिकविधी आदी बाबी प्रकटतात. किंवा जीवन सुकर व्हावे म्हणून जादूची वस्तू मिळवणे, कुणीतरी ती लोभाने पळविणे आणि एखाद्या प्रतिकूल वस्तूच्या साहाय्याने ती परत मिळविणे हा कथाविशेषही फार लोकप्रिय आहे. हा मावची कथांमध्येही दिसतो. उदाहरणार्थ 'म्हातारा आणि कावळा' ही लोककथा.

३) मावची आदिवासींचे जीवन निसर्गाश्रयी असल्यामुळे त्यांच्या जीवनात पक्षी व प्राण्यांना विशेष महत्त्व आहे. मावची कथांमध्ये पक्षी व प्राणी अपरिहार्यपणे येतात. या लोककथांमध्ये कुत्रा, मांजर, बैल, माकड, वाघ, गाय, अस्वल, कोल्हा, ससा, धीवर पक्षी, बेडूक आदी पशुपक्षी महत्त्वाची भूमिका बजावतात.

४) मावची आदिवासींच्या जीवनात पशुपक्ष्यांप्रमाणे वनस्पतींनाही महत्त्वाचे स्थान आहे. मावची कथांमध्ये पळस, साग, बांबू, आपटा, मोह, उंबर, शिरी या वनस्पतींचा निर्देश येतो.

५) मावची आदिवासींचे जीवन हे अतिशय कष्टमय असते. दिवसभर कष्ट करून थकलेल्या लोकांना लोककथा ऐकून दिवसभराचे कष्ट हलके झाल्यासारखे वाटतात. लोककथांमधील कल्पित विश्व, विनोदी घटना, प्रसंगांची मांडणी, नीतितत्त्वे या लोकांचे मनोरंजन करण्याचा प्रयत्न करतात. या लोककथांमधून मानवी जीवनाच्या सुखदुःखाची मांडणी केलेली आढळते. त्याचबरोबर परंपरागत नीतितत्त्व, आदिमत्त्वाचा अभिमान, सभोवतालच्या गूढतेविषयी उत्सुकता या बाबीही प्रकर्षाने जाणवतात.

६) मावची लोककथांची मांडणी करणारा कथक हा कथेच्या परिणामकारकतेसाठी वेगवेगळ्या कथनपद्धतीचा आधार घेताना दिसतो. निवेदने, प्रथमपुरुषी आत्मनिवेदने, तृतीयपुरुषी निवेदने यांचा आधार तो घेतो.

७) मावची आदिवासी लोककथांमधून रचनाबंधाच्या अनुषंगाने अंकबंध आलेले पाहावयास मिळतात. उदाहरणार्थ सात, तीन, एक, बारा हे अंकबंध.

८) मावची आदिवासी लोककथांतून शृंगार, हास्य, करुण, रौद्र, शांत, वीर, भयानक, बीभत्स व अद्भुत या रसांचा आविष्कार होतो.

९) मावची आदिवासी लोककथांमध्ये म्हणी, वाक्प्रचार आणि आदिम प्रतिमा सहजपणे येतात.

१०) मावची लोककथांमध्ये राजपरिवाराचे चित्रण येते. तसेच समाजातील इतर स्तरांचेही चित्रण दिसून येते. लोहार, सुतार, शेतकरी, वाणी, गुराखी, पाटील, साधू हे घटकही या लोककथांत भेटतात.

११) राजपरिवाराच्या चित्रणात त्याचे राजकीय व सामाजिक जीवन वर्ज्य असून त्याच्या फक्त कौटुंबिक जीवनाचेच चित्रण या कथांमध्ये आढळते. तसेच पतीपत्नी, सापत्नभाव, मातापिता आणि मुले, भाऊ-बहीण, सासू-सून, नणंद-भावजय इत्यादी अनेक नात्यांतून उत्पन्न होणाऱ्या संघर्षाचे चित्रण मावची लोककथांमध्ये आढळते.

१२) सवतीमत्सर आणि सावत्र मुलांचा छळ हा लोककथांचा एक जागतिक विषय आहे. तो मावची लोककथांतही दिसतो. सवतीचा छळ करणे, सावत्र मुलांवर विषप्रयोग करणे, त्यांची आश्रयस्थाने नष्ट करणे, त्यांना कष्टाची कामे करावयास लावणे, सावत्र भावंडात सतत तेढ असणे इत्यादी कल्पनाबंध कमी-अधिक फरकाने अशा कथाविशेषांतच सर्वत्र दिसून येतात. उदाहरणार्थ :- 'राजा आणि त्याची दोन मुले' ही लोककथा.

१३) जादूच्या वस्तुंची प्राप्ती, वस्तू पळविली जाणे, पुन्हा प्राप्त होणे, संकटातून मुक्तता व्हावी किंवा जीवन सुकर व्हावे म्हणून जादूची वस्तू मिळवणे, कुणीतरी ती लोभाने पळविणे आणि एखाद्या प्रतिकूल वस्तूच्या साहाय्याने ती परत मिळविणे हा कथाविशेषही फार लोकप्रिय आहे. हा मावची कथांमध्येही दिसतो. उदाहरणार्थ 'म्हातारा आणि कावळा' ही लोककथा.

१४) प्राणी-मानव यांचा विवाह लोककथांत आढळतो. अर्थात यातील प्राणी कायम प्राणीरूप राहात नाहीत. कालांतराने प्राणी-मानव रुपांतर घडते. उदाहरणार्थ 'हिंवाऱ्योदेव' ही लोककथा.

१५) शेतात पीक लावण्यापूर्वी दुसऱ्या कोणाला तरी पिकाचा खालचा, वरचा भाग द्यायचे कबूल केलेले असते. त्यानुसार विशिष्ट पीक काढून चातुर्याने स्वतःचा फायदाच फायदा करून घेणे ही कथाही बऱ्याच प्रदेशात रूढ आहे. उदाहरणार्थ:- 'म्हातारा आणि देव' ही लोककथा.

१६) देवाचा, नशिबाचा शोध घेण्यास नायक निघणे, वाटेत अनेक संकटे येणे, दैवी कृपेतून संकटनिवारण होणे, नायकाचा भाग्योदय अशा कल्पनाबंधांनी कथा गुंफलेल्या दिसतात. उदाहरणार्थ :- 'विधवा आणि तिचा मुलगा', 'विधवा म्हातारी, तिचा मुलगा आणि पाटलाच्या दोन मुली', 'म्हातारा आणि त्याची तीन मुले' या लोककथा.

१७) पारंपरिक समाजजीवनात विधिनिषेधांना फार महत्त्वपूर्ण स्थान असते. त्यामुळे समाजव्यवहाराचे एकप्रकारे नियमन होते. मावची लोककथांतही या निषेधकल्पनेच्या संकेतांचे पालन केलेले आढळते. उदाहरणार्थ (१) गुप्त गोष्ट उघड न करणे. (२) प्रथम स्वतः न बोलणे. उदाहरणार्थ :- 'राजा आणि त्याची मुलगी', 'वाणी आणि शेतकरी' या लोककथा.

१८) निरक्षर आदिवासी कथक परंपरा आणि कल्पनाशक्तीच्या आधाराने लोककथांची अभिव्यक्ती करीत असतो. लोकांचे मनोरंजन आणि उद्‌बोधन व्हावे हा त्याचा हेतू असतो.

१९) आदिवासी कथकाला शीर्षक विचारले असता, त्याला लोककथेचे शीर्षक सांगता येत नाही. त्यामुळे आदिवासी कथक शीर्षकाची मांडणी करीत नाही. कथकाच्या दृष्टीने कथा कथन करणे महत्त्वाचे असते. तो कथेची सुरुवात निवेदनाच्या माध्यमातून करतो.

२०) मावची आदिवासी लोककथांमधील भाषिक रचनाबंधाच्या अनुषंगाने येणारी लयबद्धता महत्त्वपूर्ण आहे. कथक आपल्या जमातीतील पारंपरिक लोकगीतांचा स्वीकार करून, त्यांचा आपल्या लोककथेत समावेश करतो. उदाहरणार्थ :- 'विधवा आणि तिचा मुलगा' या लोककथेत आलेले लोकगीत-

**इंदला पावी, पितला पावी**

**टुरहुल्यो टुच**

**रानी गायीले हुरजो पोडे**

**टुरहुल्यो टुच**

**रानी गायी माले वाचावी लेजे**

**टुरहुल्यो टुच**[१४]

'टिपऱ्या पक्षी' या लोककथेत आलेले लोकगीत-

**बुंय बुंय राळो**

**ऊचे ऊचे माळो**

**त्यांव बोठो टिपऱ्या चिडो रे चिडो**[१५]

२१) मावची लोककथांमध्ये अनेक कल्पनाबंध आलेले दिसतात. ते पुढीलप्रमाणे - राक्षसाचे मानवी रूप धारण करणे, भगताचा भोंदूपणा, रानगायींच्या कळपात राहणारा गरीब मुलगा, अद्भुत शक्ती असणाऱ्या रानगायी, अद्भुतशक्ती असलेला कावळा, म्हाताऱ्याला मदत करणारा टिपऱ्या पक्षी, राक्षसिणीचा किंवा राक्षसाचा पराभव करणारा चतुर मुलगा, हुशार कोल्हा, धीवरपक्षी आणि म्हातारा यांची मैत्री, वेडा आणि मतिमंद यांचे चातुर्य, ससा आणि कोल्ह्याची मैत्री, वाळुक खाणारी माकडे, कोंबडा आणि कोल्हा व्याही असणे, कोल्हा आणि तितरपक्षी व्याही असणे, राक्षसाचा जीव पोपटात असणे, मांजरीच्या रूपातील शापित राजकन्या, उडणारा लाकडी जादूई घोडा, मंदिरात अद्भुतशक्तीचा वास, कोल्ह्याच्या अंगी दैवी शक्ती, उडता घोडा, सोन्याचा पक्षी, राजाच्या मुलीच्या ठायी अद्भुतशक्ती असणे, राक्षसाजवळ जादूची पिसारी असणे, शंकर-पार्वतीचे मुलगा रडताना मदतीला धावून जाणे, बैलात दैवी शक्ती असणे, सात भाऊ आणि एक बहीण, बहिणीचा बळी देणे, बहीण बासरीच्या रूपात परत जिवंत होणे, खोडकर उंदीर, मृत मुलीचे फूल बनणे, बुटक्यांची चतुराई, देवाला फसविणारा म्हातारा, स्त्रीलंपट राजा, निसर्गाचे आकर्षण असणारा आदिवासी, लाकडी खांब आकाशाच्या दिशेने जाणे, बेडूक बनलेला हिंवादेव, शिरीच्या फुलाच्या सुगंधाच्या वेडाने सुखाचे गाठोडे गमावलेला आदिवासी, यथोचित पूजाविधी केल्यावर माणसांना व प्राण्यांना त्रास न देणारा वागदेव.

## संदर्भ :-

१. संग्राहक निवेदक - श्री. छगन डुंड्या गावित, मु. बंधारपाडा. पो. विसरवाडी, ता. नवापूर, जि. नंदुरबार.
२. संग्राहक निवेदक - श्री. किसन धेड्या गावित, मु.पो. पिपळा, ता. नवापूर, जि. नंदुरबार.
३. संग्राहक निवेदक - श्री. टाकल्या दिवल्या गावित, मु. बंधारपाडा. पो. विसरवाडी, ता. नवापूर, जि. नंदुरबार.
४. संग्राहक निवेदक - श्री. छगन डुंड्या गावित, मु. बंधारपाडा. पो. विसरवाडी, ता. नवापूर, जि. नंदुरबार.

५. संग्राहक निवेदक - श्री. मीखा गोरजी गावित, मु. बंधारपाडा. पो. विसरवाडी, ता. नवापूर, जि. नंदुरबार.
६. संग्राहक निवेदक - श्री. रेंजा सामा वसावे, . बंधारपाडा. पो. विसरवाडी, ता. नवापूर, जि. नंदुरबार.
७. संग्राहक निवेदक - श्री. किसन धेड्या गावित, मु.पो. पिपळा, ता. नवापूर, जि. नंदुरबार.
८. संग्राहक निवेदक - श्रीमती विजया शांताराम गावित मु. बंधारपाडा. पो. विसरवाडी, ता. नवापूर, जि. नंदुरबार.
९. संग्राहक निवेदक - श्री. किसन धेड्या गावित, मु.पो. पिपळा, ता. नवापूर, जि. नंदुरबार.
१०. संग्राहक निवेदक - श्री. किसन धेड्या गावित, मु.पो. पिपळा, ता. नवापूर, जि. नंदुरबार.
११. संग्राहक निवेदक - श्री. गोरजी दांवजी गावित, मु. बंधारपाडा. पो. विसरवाडी, ता. नवापूर, जि. नंदुरबार.
१२. संग्राहक निवेदक - श्री. किसन धेड्या गावित, मु.पो. पिपळा, ता. नवापूर, जि. नंदुरबार.
१३. संग्राहक निवेदक - श्री. टाकल्या दिवल्या गावित, मु. बंधारपाडा. पो. विसरवाडी, ता. नवापूर, जि. नंदुरबार.
१४. संग्राहक निवेदक - श्री. टाकल्या दिवल्या गावित, मु. बंधारपाडा. पो. विसरवाडी, ता. नवापूर, जि. नंदुरबार.
१५. संग्राहक निवेदक - श्री. छगन डुंड्या गावित, मु. बंधारपाडा. पो. विसरवाडी, ता. नवापूर, जि. नंदुरबार.

❖❖❖

# वर्तमानाचा अचूक वेध घेणारा काव्यसंग्रह "वर्तमान तुडवताना"

**प्रा. डॉ. पी. आर. जाधव**
**मराठी विभागप्रमुख,**
**स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालय**
**नांदगाव पेठ, ता. जि. अमरावती.**
**दूरध्वनी क्रमांक 9423649072**

"वर्तमान तुडवताना"हा परमेश्वर व्यवहारे यांचा सुविद्या प्रकाशन पुणे यांनी जानेवारी 2014 मध्ये प्रकाशित केलेला काव्यसंग्रह "वर्तमान तुडवताना" या काव्यसंग्रहातून कवीने अलीकडच्या वर्तमानात जात, धर्म, पंथ,व लिंग यांची होत असलेली हेळसांड त्यातून निर्माण होणारे जटिल प्रश्न आणि या प्रश्नांच्या सोडनुकीसाठी सामान्य माणसाची तगमग कवीने व्यापक संदर्भ देऊन व्यक्त केली आहे.---

"तेल गेलं, तूप गेलं, हाती धुपाटनं आलं
लाथ मारून पाणी काढील
चिलम पेटवून धुवा सोडून
फुटणारं नशीब समोर ठाकलं
उभं गाव पर्हाठीवाणी वाकलं" पृष्ठ (70)

कवीने वरील ओवीतून वर्तमानाची अवस्था व्यक्त केली आहे. कवीच्यामते वेदनेशिवाय उद्याचा वर्तमान जाज्वल्य होऊ शकत नाही. वर्तमानाला जाज्वल्य करायचे असेल तर वेदनेला उरात ठसठसून देणे गरजेचे आहे. वेदनेशिवाय संवेदना म्हणजे-----

"येरे येरे पावसा
तुला देतो पैसा
पैसा झाला खोटा
पाऊस आला मोठा" पृष्ठ -(69)

वेदना अशा अवस्थेत आहेत, वेदना मग ते भूमिपूत्राची असो की आणखी कोणाची, तिला धिरोधात्तपणे सामोरे गेले पाहिजे, हा सक्षम विचार ही कविता मांडते. सध्याचे वर्तमान बघता कवी वर्तमानाला आणि वर्तमानच्या प्रश्नाला व्यक्त करताना म्हणतात---

"रक्त हिरवे असो, भगवे असो, घट्ट असो की पातळ असो
ब्लड टेस्टचा फेरा सुरू असतो त्यांच्या मागे फिरून फिरून" पृष्ठ (10)

सध्याच्या काळात रक्ताचे राजकारण सुरू आहे, उच्चनीचतेने कळस घातला आहे. राजकारणातील गल्लीच्छ पातळीने रक्त- रक्तात भेदभाव जात केला आहे. हिरव्या आणि भगव्या रक्तासाठी दंगली घडतात....

"कुणाचा राग
कुणाच्या माथी
कुणाची काठी
कुणाच्या हाती?" पृष्ठ (11)

कविता मते आज अशी सद्य:स्थिती आहे. समतेच्या नावावर जो-तो आपल्या जातीला धर्माला श्रेष्ठ ठरण्याचा प्रयत्न करतोय, हे वास्तव अधोरेखित करताना कवी म्हणतोय-----

"कुणाची जात
कुणाचं नातं
कुणाचा धर्म
कुणाचा पंथ" पृष्ठ (11)

आज जातीपातीच्या राजकारणाने देश होरपळतो आहे. याचे वर्तमान बघता होणाऱ्या राजकारणाचा सभासभेतील त्यांची भाषणे, देशापेक्षा पक्ष कसा मोठा होईल याची चढाओढीने ग्रासली आहे. त्यासाठी मग कधी धर्माला आव्हान देत, कधी जातीपातीला श्रेष्ठ कर हा खेळ सुरू आहे. या खेळात माणूस मात्र कवडीमोल आहे. अशा सामान्य माणसाला कवी कवितेतून सांगतोय-----

"जाणून घे मातीचा धर्म
नको भरारीची मिजास
तुझ्याविषयी बोल;
तुझी कुवत कवडीमोल" पृष्ठ (12)

माणसाच्या जगण्याला कवडीमोल कवीने अधोरेखित केले आहे. माणसा माणसात दंगली घडवून आपण मात्र मेजवानीवर ताव मारायचा ही आजच्या वर्तमानाची वस्तू:स्थिती आहे. ही वस्तुस्थिती मांडताना कवी म्हणतोय---

"महामानवांच्या देशात जेव्हा
उद्रेक होतो दंगलीचा
तेव्हा
कत्तलीने कापली जातात
दीन दुबळ्यांचे हात
नि रंगवली जाते
व्हिस्की- बियरच्या मेजवानीची रात" पृष्ठ (17)

दंगली, जाळपोळ यात सामान्य माणसाचे जगणे होरपळून जाते. खरे तर सामान्य माणसाला काय हवे असते? दोन्ही वेळचे जेवण व सुखाची झोप मात्र तेही आता दुर्मिळ झाली आहे. अशावेळी विज्ञान-तंत्रज्ञान आपण किती युगांतर घडविले असले तरी जोपर्यंत सामान्य माणसाची उत्थान घडून शकत नाही तोपर्यंत या प्रगतीला काही अर्थ नाही."वास्तव जीवनाचे चित्रण करून सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणे, समाजाची जागृती करणे आणि सामाजिक प्रश्न सोडवायला उपयुक्त असा ध्येयवाद जनतेपुढे ठेवणे हे देखील साहित्याचे कार्य आहे" (२)---

"सोसता सोसता जगावे
जगता जगता भरडावे"

अशा स्थितीमध्ये अंधारे अस्तित्व नाहीसे करून प्रगतीचे पल्ले कसे गाठता येईल. अशा वर्तमानाची विदारक स्थिती पाहताना कवी म्हणतोय---

"डबघाईस आलेल्या डोळ्यांना
पाहवत नाही आता
आकाशाची गत
नि मातीची धग" पृष्ठ (25)

अशी सर्वसामान्यांची अवस्था आहे. ही वर्तमानाची अस्वस्थ कोंडी फोडायची असेल तर, मातीच्या सृजनशीलतेशी आपले नाते घट्ट झाले पाहिजे त्यासाठी विज्ञाननिष्ठ मूल्य स्वीकारणे गरजेचे

आहे. परंपरा, संस्कृती ही मानवाला निश्चितच मोठे करते मात्र कधी कधी ती माणसाचा घासही घेते. ही स्थिती पालटायची असेल तर कवी म्हणतोय----

"आपल्या हातानी
औदार्याचे झरे वाहवे
स्वबळावर,
कुबेरास दान द्यावे." पृष्ठ (14)

कवी आपल्या कवितेमधून भूमिपुत्रांचे प्रश्न मांडतोय, त्याची अस्वस्थता व अआर्ततेची कारणमीमांसा मांडतो आणि एक नवा अनुबंध जोडण्याचा प्रयत्न करतो. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर कवी पोटतिडकीने बोलतो. वर्तमान जगताना घरचे बियाणे जाऊन सीलबंद, पाकीट बंद बियाणे केव्हा हाती आलं हे समजलं नाही. शेतकऱ्यांना शेतात का पुरत नाही, त्याच्या लागवडीचा खर्चही कधी कधी निघत नाही. या मागचं कारण लागवड खर्च व उत्पन्न यातील दरी आहे. पूर्वी घरचे बियाणे शेतात पडायचे याविषयी कवी म्हणतोय--

"घरच्या बियाण्यांची गोष्ट
न्यारीच होती, त्यांना
होता मायेचा स्पर्श
बापाच्या घामाचा दर्प
त्यात दिसायचे उद्याचे स्वप्न:
मुलाचे शिक्षण, मुलीचे लग्न
असं बरंच काही आशादायी" पृष्ठ (77)

आज आशादायी चित्र शेतकऱ्यांच्या बाबतीत दुरापास्त झाले आहे. त्याची स्वप्न ही आता फलद्रूप होत नाहीत. यामागे बियाण्यासोबतच रासायनिक खते, फवारे त्याचा भरमसाठ वापर शेतकऱ्यांना नेस्तनाबूत करायला बसला आहे. या सर्वांचा परिणाम शेती-शेतकरी आणि मातीवरही जाणवायला लागला आहे.--

"आता मातीला हात लागला की
जाणवते तिची सत्वहीन माया
जीर्ण झालेली दातृत्व कुवत
ती खंगरून गेली संपूर्ण
डोंगर बैला सारखी
आणि आता ते म्हणतात
चला परतीच्या प्रवासाला!" पृष्ठ (78)

वर्तमान जगताना वर्तमानच आता शेतकऱ्यांच्या जीवावर उठला आहे. कवी "वर्तमान तुडवताना" मधून धर्म- जाती मधील विषमता, देश- प्रांत यातील दुरावा, हिरवा भगवा रंगातील दरी शेतकऱ्यांच्या जीवावर उठलेला रासायनिक औषधांचा वापर मिटविण्यासाठी कवितेत आवाहन करतो यासोबत एक इशाराही कवी देतात---

"उजवली नाही ना,
जर मातीची कूस
तर समज;
सुरू होईल उलट प्रवास
आदिम अंधाराकडे
मग अटळ नाही का

आपले कवडीमोल होणे?" पृष्ठ (13)

असे कवडीमोल जाणे टाळायचे असेल तर----

"आपल्या हाताचे कर्तृत्व
असे असावे
प्रवास करताना
पाण्यावर ठसे उमटावे."
शेवटी आपल्या हातांनीच आपल्या माथ्यावर लिहावा
एक शिलालेख लिहावा.....
मी भविष्याचा लाडका लेक." पृष्ठ (14)

कवीने "वर्तमान तुडवताना"या काव्यसंग्रहातून देश, धर्म, जात, व पंथ यासोबत शेती, शेतकरी, समाजकारण, राजकारण यावर परखडपणे आपली भावना व्यक्त केली. वर्तमानाच्या संदर्भात अनेक प्रश्न निर्माण करून ते सोडवण्यासाठी कवी म्हणतो----

"आपल्या हातांनी
प्रामाणिक राहून
समुद्राची खोली शोधावी
हिरे माणिक मोत्यांनी
धनाची आरास मांडावी" पृष्ठ (14)

तर शेतीच्या संदर्भात मातीत घट्ट पाय रोवून तिला घामाचा परिसस्पर्श करायला सांगतात. असे झाले तर वर्तमान पुढे भविष्य उज्वल आहे. हा आशावाद कवी मनामनात पेरून जातो. आशावाद व्यक्त करताना कवी म्हणतात--

"मग पा,
कशा हंबरतील
तुझ्या गोठ्यातील गाई
आणि येथील बहरून
अंगणातील जाई-जुई" पृष्ठ (76)

हा आशावाद वास्तवात उतरावा ही कवीची तळमळ आणि कवीचा एकूणच मानवतेवरचा विश्वास दृढ आहे."दर्जेदार साहित्यकृती अशी नुसत्या कल्पनेवर निर्माण करता येत येत नसते, तर साहित्यकृतीचा गाभा किंवा केंद्रबिंदू हा माणूस व त्याचे जगणे हेच असते"(२) हे "वर्तमान तुडवताना" या काव्यसंग्रहातून पानो-पानी जाणवत राहते.

## आधारभूत संदर्भ ग्रंथ:-

(१) "खडक आणि पाणी" गंगाधर गाडगीळ, तिसरी आवृत्ती, 1985, पृष्ठ क्र.-45

(२) "साहित्य, समाज आणि परिवर्तन"-डॉ. वासुदेव मुलाटे, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, पहिली आवृत्ती, 2007, पृष्ठ-13.

(३) "वर्तमान तुडवताना"-परमेश्वर व्यवहारे, सूविद्या प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे 30, प्रथमावृत्ती 12 जानेवारी 2014.

❖❖❖

# उत्तम बंडू तुपे यांच्या कथेतील समाजवास्तव: एक दृष्टिक्षेप

**प्रा.डॉ. अन्नपूर्णा अजाबराव चौधरी**
मराठी विभाग प्रमुख
श्री. बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पांढरकवडा
मो. 9373510971 Email : annapurnaraut16@gmail.com

**प्रस्तावना :-**

उत्तम बंडु तुपे हे मराठी साहित्यविश्वात गाजलेल एक नाव आहे. आत्मकथन (काट्यावरची पोटं) कथा, कादंबरी हे वाङ्:मयप्रकार हाताळून मराठीसाहित्यविश्वात गुणात्मक दृष्टीने प्रतिभेच्या अनोख्या सामर्थ्यासह एक नवसमाजभान त्यांच्या साहित्याने दिलेले आहे. दलित, उपेक्षित व ग्रामीण जीवनाला कवेत घेऊन त्यांचे साहित्य पुढे आलेले आहे.

तुपे यांनी १९७२ पासून कथालेखनाला प्रारंभ केलेला आहे. जीवनात आलेल्या अनुभवाच्या मुशीतून त्यांची कथा साकारली आहे. त्यांच्या कथेची नाळ ग्रामीण दलित जीवनाशी जुळलेली आहे. त्यांचे कथाविश्व समृद्ध आहे. त्यांच्या अनेक कथा ग्रामीण दलित जीवनाचे अंतरंग उलगडून दाखवणाऱ्या आहेत.

त्यांच्या अनेक कथा समाजवास्तवाचे भान देणाऱ्या आहेत. सामाजिक जाणिवेतून त्यांची कथा पुढे आलेली आहे. माणसाची खरी प्रगती ही सर्वस्वी त्याच्या आर्थिक, सांस्कृतिक व वैचारिक साधनावर अवलंबून असते या बाबी समाजाजवळ नसतात तो समाज प्रगती करु शकत नाही उदा. दलित अस्पृश्य समाज म्हणता येईल प्रस्थापित व्यवस्थेने आपल्या सोयीनुसार हजारो वर्षे धर्म व जातीच्या नावाखाली बेमालूमपणे अज्ञान व दारिद्र्यात जखडून ठेवले त्यांची शैक्षणिक व आर्थिक उन्नती होवू शकली नाही दलित व अस्पृश्य समाजाकडे माणूस म्हणून बघावे ही जाणिव तुपे यांच्या कथेने दिली आहे.

**उत्तम तुपे यांच्या कथेतील समाजवास्तव :-**

सामाजिक जाणीव हा उत्तम तुपे यांच्या कथेचा प्राण आहे. 'गुबूगुबू', 'वझ्याखालचं वझं', 'जग', 'रेडजत्रा', 'भष्म', 'कस्बीन' या कथा समाजिक जाणिवेच्या दृष्टीकोनातून उल्लेखनीय आहे. 'गुबूगुबू' (आंदण) या कथेत पोट पाठीवर घेऊन सतत भटकंती करणाऱ्या आणि लहान मुलांच्या पोटावर नंदी नाचवून दारोदार भीक मागणाऱ्या 'चंदण्या' नंदीवाल्याची करुण कहाणी आहे. भटक्यांचे जीवनवास्तव या कथेत प्रभावीपणे आले आहे. वणवण भटकंती करावी लागते तरीही निट पोट भरता येत नाही, शिक्षण घेता येत नाही. पर्यायाने नंदीवाल्याचे जीवन दैन्य, दारिद्र्य अज्ञानाने ओथंबलेलेच राहते हे वास्तव आहे. त्यांचे जीवन जिथे होते तिथेच आजही आहे याचे हृदयस्पर्शी चित्रण या कथेत आले आहे. जातपंचायतीच्या बंधनावर ही माणसे अजूनही विश्वास ठेवून आहेत. अजूनही त्यांची देवावर नंदीवर गाढ श्रद्धा आहे. चंदण्याला मात्र परंपरेने लादलेल्या या लांच्छनास्पद व्यवसायाची चिड आहे. हा व्यवसाय लाचारीचा असून अपमानित करणारा आहे, दारोदार भीक मागायला लावणारा आहे. हे वास्तव लेखकाने या कथेत टिपले आहे. या कथेचा नायक जीवनाकडे अंतर्मुख होवून बघतो राजगिरीशी लग्न करायचे टाळतो. त्याच्या लग्न करण्याचे कारण त्याची जमात समजून घेत नाही. राजगिरीचा बाप सरण्या हा चंदण्याला जातपंचायतीपुढे उभे करण्याची धमकी देतो तर राजगिरी चंदण्याला समुळ नष्ट करण्यासाठी नंदीला विष पाजून मारुन टाकते. चंदण्यावर सुड उगवते. चंदण्या नंदीचे दु:ख करत नाही. उलट या यातनामय चक्रातून आपली सुटका झाली असे त्याला वाटते. डॉ. सुरेश पैठणकर म्हणतात त्याप्रमाणे, "परिवर्तनाच्या दिशेने निघालेला हा कथानायक परिणामकारक पणे तुपे यांनी या कथेच्या निमित्ताने उभा केला आहे. लेखकाची जीवनाकडे बघण्याची दृष्टी तशी असल्यामुळे ओघाने असे घडते."

'वझ्याखालचं वझं' (आंदण) या कथेत भटक्या कैकाडी जमातीचे वर्णन आलेले आहे. गाढवावर पोट लादून जमिनदाराच्या रानात कष्ट करुन जगणारा उमाजी हा या जातीचा प्रतिनिधी म्हणून आलेला आहे. झोपडी तील दारिद्र्य,

उपासमार यामुळे पिचून गेलेली ही माणसे आहेत. इभ्रतीचे मानाचे जीवन यांच्या नशिबी नाही. गावातील भिका सरपंच उमाजी कैकाड्याला गावात थारा दिल्यामुळे त्यांच्या चार गाढवाला व चार माणसांना आपल्या शेतात राबवून घेतो. एक दिवस त्याचे गाढव मरते त्याला आपल्या हाताने मुठमाती देण्याची उमाजीची इच्छा असते कारण गुण्या गाढवाने त्याच्यासह त्याच्या कुटुंबाला आपल्या पाठीवर ओझे वाहत जगवलेले असते. त्याची ही आंतरिक इच्छा मात्र पूर्ण होवू शकत नाही. आपल्या वाट्याला ते कष्ट अवहेलना आली ती आपल्या मुलाच्या वाट्याला येवू नये असे त्याला वाटते. भटक्या जमातीच्या दयनिय स्थितीचे दर्शन या कथेतून आले.

'जयवंत' (पिंड) ही कथा पाथरवट या भटक्या जमातीच्या जीवनावर प्रकाश टाकते. पाथरवट या जमातीच्या जगण्याची झालेली वाताहत ही कथा दर्शवते. पाथरवट जमातीचा व्यवसाय म्हणजे गावाला लागणाऱ्या जाते-वरवंटे, पाटे, देवाच्या मूर्ती, समाधीच्या पादुका, उरवळ, खलबत्ते, इ. दगडी वस्तू पुरवून आपला व कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे. यासाठी सतत गावोगाव भटकंती करावी लागते. गावात चोरी होते नि गाव जयवंतसह त्याच्या जमातीला जबाबदार धरतात. पोलीस कार्यवाही व छळ होतो. डॉ. सुरेश पैठणकर म्हणतात त्याप्रमाणे "तुपे यांची ही कथा भटक्यांचे एक अनोखे विश्व डोळ्यासमोर आणते. जयवंतासारखी अनेक माणसे भोवताली आहेत. ज्यांच्याकडे अजूनही चोर म्हणून बघीतले जाते."

'भस्म' (पिंड) ही कथा स्मशानात राहणाऱ्या मेलेल्या माणसांच्या हाडांची राख अंगाला फासून दररोज भीक मागणाऱ्या शंकर मसणजोग्याची व त्याच्या कुटुंबाची कहाणी आहे. समाज व्यवस्थेच्या जात्यात भरडली जाणारी ही जमात आहे. त्यांच्या पोट भरण्याची गुंतागुंत ही कथा स्पष्ट करते. मसणजोग्यांनी गावात राहू नये असा दंडक आहे. यामुळे ही जमात गावाच्या स्मशानातच राहते. महादेव व कालीमाता ही या समाजाची आराध्य दैवते आहेत. भस्माचे रुप बघून लोक भितात याचे कारण म्हणजे मसणजोगी जादूटोणा जाणतात, करतात असा समज आहे. या कथेत शंकर मसणजोग्याच चित्रण आलेल आहे. अधिकची भिक्षा मिळण्यासाठी तो वेगवेगळ्या योजना आखतो. या कथेत मसणजोग्याचे जीवनवास्तव चित्रीत झाले आहे. दारिद्रय अज्ञान उपासमारीने समाजजीवनाच्या मुळ प्रवाहापासून कोसो योजना दूर असलेला आणि आपल्या जमातीच्या श्रद्धांचे चित्रण ही कथा करते.

'जग' (आंदण) या कथेत यल्लमा देवीचा मुखवटा डोक्यावर घेऊन देवीची गाणी म्हणत भीक मागणाऱ्या राधा जोगणिनीची हृदयस्पर्शी कहाणी 'जग' या कथेत आली आहे. सोबतच यल्लमा देवीच्या नावाखाली चाललेल्या स्त्रियांच्या देहाचा बाजार ते भरवणारी माणसे या कथेत चित्रित झालेली आहे. तुपे यांनी जोगत्याच्या जगण्यावर आणि जीवनावर या कथेच्या माध्यमातून बोट ठेवलेले आहे.

'कस्बीन' (पिंड) या कथेत कोल्हाटी समाजाचे जीवनदर्शन आलेले आहे. तमाशामध्ये स्त्रियांना नाचवून मिळालेल्या मोबदल्यात हा समाज उदरनिर्वाह करतो. परंतु काळ बदलल्यामुळे कलेच्या या खऱ्या पोशिंद्यावर गदा आली आणि त्यांचे जगणे अधिक कठिण झाले. याचेच वास्तव दर्शन या कथेत आले आहे. नबी आणि तिचा नवरा तुकाराम यांच्या कुटुंबाची ही करुण कहाणी आहे.

'रेडंजत्रा' (आंदण) ही कथा मांग जमातीच्या पारंपारिक अंधश्रद्धेवर प्रकाश टाकते. परंपरेने जपलेल्या अंधश्रद्धेच्या आड कोणीही येवू शकत नाही हे वास्तव या कथेने टिपलेले आहे. या जत्रेच्या निमित्ताने सात दिवस ही माणसे देवीच्या आवारात ढोलावर नाचतात. हळद कुंकवाचा मळवट भरुन देवीची पुजा करतात. या यात्रेच्या दिवशी चोराचा खेळ खेळला जातो. या कथेत तुपे यांनी श्रद्धेच्या नावाखाली चालू असलेली अंधश्रद्धा आणि तिला प्राणपणाने जोपासणारी भेळीभाबडी अनाडी दरिद्री माणसे याचे सूक्ष्म दर्शन घडवले आहे.

## सारांश :-

उत्तम तुपे यांच्या कथेतील माणसाचे जगणे हे विषमतेचे आहे. हे जगणे बहाल करण्यात, विषमताधिष्ठित समाजव्यवस्थेचा वाटा आहे. तसेच परिस्थितीने निर्माण केलेल्या प्रश्नांच्या वर्तुळाभोवती ही माणसे सतत त्या वर्तुळातच फिरत राहातात. प्राथमिक गरजांच्या पुर्ततेसाठी या माणसांचा जीवनसंघर्ष सतत चाललेला आहे.

भारतीय समाजव्यवस्थेत सर्वसामान्य माणसाचे तसेच तळागाळातील दलित, उपेक्षित माणसांचे जगणे कसे नागवले गेले आहे याचे दर्शन तुपेंच्या कथेने घडवलेले आहे. समाजजीवनातील सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतीक, राजकीय इ. सर्वच क्षेत्रात कुचंबणा झालेल्या माणसांच्या जीवनातील काळोखे विश्व तुपेंच्या कथेने चितारले

आहे. तुपेंच्या कथेने वाचकाच्या मनाचा ठाव घेतलेला आहे. सद्यास्थितीत त्यांच्या कथेतील माणसे मूळ जीवनप्रवाहापासून कोसोदूर आहे. समग्र माणसाच्या जीवनाचे दर्शन पर्यायाने त्यांच्या कथेने घडवलेले आहे.

एका पिढीने दुसऱ्या पिढीला बहाल केलेले हे जगणे खऱ्याअर्थाने ही माणसे निमुटपणे स्विकारतात. तुपे यांच्या कथेने दिशाहीन माणसांच्या सूपर्ण सामाजिक आणि सांस्कृतीक जीवनाच्या अंतरंगात शिरुन त्यांच्या जगण्याचे सूक्ष्मपदर त्यांच्या कथेने टिपलेले आहे. जुना पारंपारिक विचार आणि नवा परिवर्तनवादी विचार यांचा झगडा त्यांच्या कथेतून समर्थपणे उभा राहतो. विषय आणि आशयाच्या दृष्टने त्यांच्या कथेने एक वेगळीच उंची गाठलेली आहे.

## संदर्भ ग्रंथ :-


- डॉ. सुरेश पैठणकर : उत्तम बंडू तुपे यांचे साहित्य : आस्वाद आणि समिक्षा, कैलास पब्लीकेशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती
- उत्तम बंडू तुपे :- 'आंदण' चंद्रकला प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती
- उत्तम बंडू तुपे :- 'पिंड' लोकसाहित्य प्रकाशन औरंगाबाद


## आधारभूत ग्रंथ :-


- म.द. हातकणंगलेकर :- 'मराठी कथा : रुप आणि परिसर (सुपर्ण प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती)
- डॉ. योगेंद्र मेश्राम :- दलित साहित्य : उद्गम आणि विकास (मंगेश प्रकाशन नागपूर प्रथम आवृत्ती)
- डॉ. भालचंद्र फडके :- दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह (श्री विद्या प्रकाशन पुणे प्रथम आवृत्ती)


❖❖❖

# दलित आत्मकथनांची वाटचाल

प्रा. डॉ. अतुल नारायण चौरे
एस. एम. जोशी कॉलेज
हडपसर, पुणे-२८
मो.नं. - 8169424517 इ-मेल: choureatul.paru@gmail.com

## प्रास्ताविक :

१९६० नंतर ''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समतावादी चळवळीचे लोण खेडयांपर्यंत पोहोचले होते. खेडयातील दलितवर्गात विद्रोहाची भावनाही निर्माण झाली. परंपरागत जातीव्यवस्था, बलुतेदारी नाकरण्याकडे दलितांचा कलही दिसला. मंदिरप्रवेशाचा लढा, चवदार तळयाचा लढा, धर्मांतरासारखी घटना या मनवी हक्काच्या चळवळी होत्या. खेडयांतील जातीय उतरंडीमुळे परंपरागत जीवनसरणीत साचलेपण आलेले हाते. शेतीतले प्रश्न, तसेच गावगाडयातले जातीय प्रश्न प्रत्यक्षअप्रत्यक्षपणे लोकमानसाला ढवळून काढत होते. स्वातंत्र्य, बंधुता, सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता, स्त्रीपुरूष समानता, लोकशाही, समाजवाद या मूल्यव्यवस्थेचे अनुसरण व्हावे, ही राष्ट्रीय जाणीवही वाढीस लागली.''[१] अशाप्रकारे १९६० नंतरच्या ग्रामजीवनात परिवर्तन घडवून आणणा-या घटनाही मोठया प्रमाणात घडल्या. जीवनात परिवर्तन घडले की त्याचे पडसाद साहित्यात उमटत असतात. जीवनामध्ये नवेपण आल्यास साहित्यक्षेत्रातसुध्दा नवेपण येते. १९६० नंतर विविध वाङ्.मयीन प्रवाहांचा उदय झाला. उदा. ग्रामीण, स्त्रीवादी, महानगरीय, आदिवासी तसेच दलित साहित्य. दलित साहित्याने मराठी साहित्यविश्वात खळबळ उडवून दिली. ''दलित समाजात शिक्षित तरूणांची एक पिढी जेव्हा तयार झाली, तेव्हा ती सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करू लागली. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिकवणुकीप्रमाणे परिवर्तनाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी तिचा संघर्ष सुरू झाला. त्या संघर्षाचे पडसाद दलित आत्मकथनामध्येही उमटणे स्वाभाविकच होते. हा संघर्ष वैयक्तिक आणि सामूहिक अशा दोन्ही स्तरांवर केला जात होता. ज्या दलित आत्मकथनकारांनी या संघर्षाचा अनुभव घेतला किंवा जे त्यात प्रत्यक्षपणे सहभागी झाले, त्यांच्याच लेखनकृतीमध्ये या संघर्षाचे प्रतिबिंब उमटलेले आहे''[२] हे उषा हस्तक यांचे मत विचारात घेण्यासारखे आहे. दलित आत्मकथनातील सामाजिक वास्तव पाहण्याअगोदर दलित आत्मकथनाचे स्वरूप पुढीलप्रमाणे पाहता येईल.

## दलित आत्मकथनातील आशय :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्याय प्रेरणेमधून शिक्षित झालेली दलितांची नवी पिढी साहित्यनिर्मितीकडे वळली. वर्षानुवर्षे येथील दलित समाजाच्या वाटयाला आलेली सामाजिक, आर्थिक विषमता आपल्या आत्मकथनांच्या माध्यमातून मांडली. दलितांच्या वाटयाला आलेल्या विषमतेसंदर्भात उषा हस्तक यांचे मत विचारात घेण्यासारखे आहे. ''दलित आत्मकथनांमधल्या समाजव्यवहारातील अस्पृश्यतेचे स्वरूप थोडक्यात असे—स्पृश्यांच्या देवळांमध्ये प्रवेश नसणे, त्यांच्या विहिरींवर—पाणवठयांवर पाणी भरण्यास वा पाणी पिण्यास मनाई असणे, त्यांच्या घरात प्रवेश नसणे, काही कामानिमित्त अंगणात वगैरे आल्यास कुठेही शिवाशिव करू न देणे. चुकून अशी शिवाशिव झाल्यास आंघोळ करून त्यांनी शुध्द होणे. विटाळाच्या भितीने शेजा-यांनी त्यांच्याशी संबंध न ठेवणे. विद्यार्थ्यांना शाळेत इतर मुलांबरोबर वर्गात न बसू देता, पायरीवर वगैरे बसायला लावणे, शिक्षकांनी त्यांना स्पर्श न करताच जमेल तसे विद्यादान करणे. वसतिगृहात राहणा-या विद्यार्थ्यांना भोजनासाठी वेगळया पंक्तीत बसवणे. हॉटेल, खानावळीमध्ये त्यांना इतर गि-हाईकांसारखी वागणूक न देणे. त्यांनी वापरलेल्या वस्तू वेगळया ठेवणे, केस कापण्यासाठी हेअर कटिंग सलूनमध्ये प्रवेश नसणे, डॉक्अरांकडेही अंगाला हात न लावता रोग्याला औषध देणे. इत्यादी व्यवहारातील अशा स्वरूपाच्या अस्पृश्यत्वाचे चटके बसलेल्या दलित आतमकथनकारांच्या अनुभवांमध्ये

साम्य जाणवते. कारण ही अस्पृश्यता एकूणच समाजात खोलवर रूजलेली असल्यामुळे कोणत्याही प्रदेशात वास्तव्याला असणा-या अस्पृश्यांना ती सारखेच चटके देते.''[३] यावरून आपल्या असे लक्षात येते की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने दलित समाजाने शिक्षण घेतले. शिक्षणामुळे आत्मभान आले. आत्मभान आल्याने हा समाज आपल्यावर होणा-या अन्यायाविरूध्द बोलू आणि लिहू लागला. सामाजिक शोषण आणि लादलेली गुलामगिरी, माणूस म्हणून जन्माला आलो पण पशूपेक्षाही हीन स्वरूपाची वागणूक येथील समाजव्यवस्थेने दिली. शतकानुशतके भोगाव्या लागलेल्या व्यथावेदना, दैन्य, दारिद्रय, अन्याय, अत्याचार याच्याविरोधी उभे राहण्याची ताकद शिक्षणामुळे आली. दलित आत्मकथनांमधून या सर्व गोष्टींचे पडसाद उमटलेले दिसतात.

दलित आत्मकथन हा दलित साहित्यामधील एक उत्कट आणि सशक्त अशा स्वरूपाचा वाङ्.मयप्रकार आहे. दलित आत्मकथनांमधून जे जगले, भोगले, सोसले, आकण अनुभवले त्याचे चित्रण येते. दलित आत्मकथनांच्या माध्यमातून स्वतःच्या जगण्याबरोबर आजूबाजूच्या समाजजीवनाचेही चित्रण केले आहे. दलित आत्मकथने एक प्रकारे धग—धगती अग्निकुंडे आहेत. कारण आजपर्यंत वाटयाला आलेले उपेक्षेचे, दुःख—भोगाचे चित्रण त्यामधून येते. प्रत्येक माणसाला आपल्या मनातील दुःख किंवा आनंद कुणालातरी सांगण्याची इच्छा असते. आपण भोगलेल्या दुःखाच्या वेदना आणि त्यामुळे आलेला शारिरीक आणि मानसिक ताण सांगण्याने कुठेतरी हलका झाल्यासारखे वाटते. श्री. म. माटे म्हणतात, ''महारामांगादी तळाच्या समाजातील माणसे आले अनुभव साहित्यातून सांगू लागतील तेव्हा मराठी साहित्य अधिक पुष्ट, अधिक प्रतिनिधिक वास्तव असे झालेले असेल.'' वरील विधान दलित साहित्य लेखनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. दलित साहित्य लेखनामुळे प्रस्तापित मराठी साहित्याची चौकटीची मोडतोड झालेली दिसून येते. प्रस्तापित बेगडी साहित्याला हे वास्तववादी लेखन मानावणारे नव्हते. दलित साहित्या संदर्भात सदा क-हाडे म्हणतात, ''दलित साहित्य हेच मुळ लाक्षणिक अर्थाने दलित आत्मकथन आहे. कविता महणजे वेदनेचा आत्मोद्‌गार असेल तर दलित कथेत कविता आहे, कादंबरीत कथा आहे. आणि दलित आत्मकथेत अथवा दलित आत्मचरित्रात दलित कादंबरी आहे.''[४] यावरून आपल्याला असे महणता येते की दलित आत्मकथनांनी तथाकथित साहित्य प्रकारांचे संकेत, आकृतीबंध झुगारून देऊन साहित्यलेखन केले आहे. अशाप्रकारे आपल्यास दलित आत्मकथनांचे स्वरूप सांगता येते.

## १९८० नंतरची दलित आत्मकथने :

दलित आत्मकथनांची वाटचाल पाहत असताना या आत्मकथनांची पाळेमुळे ज्या अंकामुळे रूजली त्याविषयी डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात, ''दलित आत्मकथनांचा शोध घेत असताना असे लक्षात येते की, दलित आत्मकथनाची बीजे एका महाविद्यालयाच्या वार्षिकांकात सापडतात. तो वार्षिकांक म्हणजे मिलिंद महाविद्यालय औरंगाबादचा वार्षिकांक, १९६४ च्या 'अस्मिता' या मिलिंद माहविद्यालयाच्या वार्षिकांकामध्ये प्र.ई.सोनकांबळे यांचा 'वाटाडया' या शीर्षकाचा एक आत्मकथनपर लेख प्रसिध्द झाला आहे.''[५] हा लेख म्हणजेच ख-या अर्थाने दलित आत्मकथनाची सुरूवात आहे. मात्र दया पवार यांचे 'बलुत' हे आत्मकथन (२४ डिसेंबर १९७८) ला प्रसिध्द झाले. आणि नंतर प्र.ई.सोनकांबळे यांचे 'आठवणींचे पक्षी' (२७ जानवारी १९७९) ला संग्रहहित रूपाने प्रकाशित झाले. यानंतर मात्र दलित साहित्यमध्ये 'दलित आत्मकथनांची' एक लाट आलेली दिसते. या आत्मकथनांच्या माध्यमातून शतकानुशतके येथील वर्णव्यवस्थेत दलितांना भोगाव्या लागणा-या व्यथा—वेदनांच दर्शन घडते. वर्णव्यवस्थेमुळे दलित समाजाच्या भावना दडपल्या गेल्या होत्या. त्यांचे मनसुध्दा संवेदना बधिर झाले होते. या आत्मकथनांमुळे त्यांना आपलया व्यथा—वेदना मुक्तपणे व्यक्त करता आल्या. दलित साहित्याचे अभ्यासक प्रा. म. भि. चिटणीस हे चार दशकापूर्वी 'अस्मितादर्श' च्या एका चर्चासत्रात म्हणाले होते की ''माझा जीवन दुस-यांपेक्षा वेगळ आहे, आणि ते सांगण्यासारख आहे. या दृष्टीकोनातून जास्त उतकट साहित्य निर्माण होऊ शकते.''[६] म. भ. चिटणीस यांचया विधानाचा विचार केल्यास आपल्याला त्याचा प्रत्यय वरील आत्मकथने पाहिल्यावर येतो. या सर्व आत्मकथनांनी मराठी साहित्य विश्वात खळबळ माजवली. या आत्मकथनांचया निर्मितीपासून त्यावर उलटसुलट चर्चा सुरू झाली होती. दलित साहित्य हे साहित्यच नाही. अशा स्वरूपाची चर्चा सुरूवातीच्या काळात मराठी साहित्यविश्वात सुरू झाली होती. मात्र दलित साहित्य प्रवाहाने मराठी वाङ्.मयाला समृध्द बनविले आहे. यासंदर्भात दलित साहित्याचे

अभ्यासक डॉ. मनोहर जाधव यांचे मत विचारात घेण्यासारखे आहे. ''अस्पृश्यांमधील आणि गावगाडयाबाहेरील भिन्न–भिन्न जातींच्या लेखकांनी–लेखिकांनी आपापली आत्मकथने लिहून दलित साहित्य–पर्यायाने मराठी साहित्य समृध्द केले, या आत्मकथनांमुळे अनोखे जीवनदर्शन समोर आले. शतकानुशतकांचा दबलेला आवाज आणि गोठलेला हुंदकत बाहेर पडला. भारतीय समाज व्यवस्थेचे अंतर्गत अदृश्य, परंतु हिडीस स्वरूप बाहेर पडले. सत्य समोर आले आणि साहित्य सुंदर झाले.''[७] एकूणच असे म्हणता येईल की दलित आत्मकथनांनी मराठी साहित्याला श्रीमंत केले. मराठी साहित्यविश्वात मैलाचे दगड ठरावेत अशा स्वरूपाची ही आत्मकथने आहेत. खरेतर ही आत्मकथने तृप्त मनाने लिहिलेली नसून, ही आत्मकथने म्हणजे आतल्या–आत ठसठसणा-या जखमांचे अस्वस्थ मनाने केलेले कथन कआहे. या आत्मकथनांमधील वेग–वेगळेपणा पुढल काही दलित आत्मकथनांमधून पाहता येईल.

## दलित आत्मकथनातील सामाजिकता :-

### 'बलुतं': (२४ डिसेंबर १९७८)

या आत्मकथनामधून दगडू पवार याच्या आयुष्यातील वेगवेगळया बदलांची स्थित्यंतर झाले त्यामध्ये आर्थिक, शैक्षणिक, मानसिक, वैचारिक अशा वेगवेगळया पातळयांवर स्थित्यंतर झाले आहे.

### 'आठवणींचे पक्षी': (२७ जानेवारी १९७९)

या आत्मकथनामधून मराठवाडयातील दलित जीवनाचे वास्तव चित्रण केले आहे. यामधून मराठवाडयातील सामंतशाहीव्यवस्थेचे चित्रण आले आहे. नायकाच्या वाटयाला आलेले दु:ख, दैन्य, दारिद्रय, शोषण याचे ह्दयस्पर्शी चित्रण यामधून आले आहे. या आत्मकथनामधून प्रकटलेली भूक मानवजातीला अस्वस्थ करते.

### 'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे': (१९७९)

हे आत्मकथन दैनंदिनी (डायरी) च्या स्वरूपामध्ये लिहिलेले आहे. कोकणच्या परिसरात राहणा-या सर्वसामान्य मानसाच्या वाटयाला येणा-या व्यथा–वेदना यामधून प्रकटलेल्या आहेत.

### 'उपरा': (१९८०)

या आत्मकथनानंतर ख-या अर्थाने भटक्या–विमुक्त जाती–जमातींच्या प्रश्नांवर चर्चा सुरू झाली. पिढयान्–पिढया गाढवाच्या पाठीवर बि-हाड घेऊन जगणा-या मंडळींच्या वेदना मांडल्या आहेत. गावकाबाहेरच्या घाणीत वस्ती करून राहणे, पोटाची खळगी भरण्यासाठी या गावावरून त्या गावात भटकणा-या एका उपेक्षित समाजाची व्यथा–वेदना मांडलेली आहे.

### 'काटयावरची पोटं': (१९८१)

या आत्मकथनाच्या माध्यमातून जीवनाविषयी आसक्ती, निराशा, दैन्य, दास्य यांच्याशी द्यावी लागलेली प्रखर झुंज तसेच जीवनातील आगतिकता, अमानुषता, कारूण्य आणि मानुसकी अशा विविधांगी गोष्टींचे जीवनदर्शन घडते.

### 'तराळ–अंतराळ': (१९८१)

शंकरराव खरात यांनी या आत्मकथनाच्या माध्यमातून महार जातीच्या वाटयाला आलेल्या व्यथा–वेदनांचे दर्शन घडवलेले आहे. शंकररावांचे पुर्वायुष्य आटपाडी, औंध या साता-याकडील ग्रामीण परिसरात गेले आहे. पुर्वीच्या काळी त्यांच्या वाटयाला आलेले दु:ख–भोग भयानक स्वरूपाचे होते. त्या काळामध्ये महार जातीच्या

वाटयाला आलेल्या अनेक चाली–रीती, प्रथा–परंपरांचे दर्शन यामधून घडते. हे आत्मकथन फक्त शंकरराव खरातांचे न राहता संपूर्ण दलित समाजाची व्यथा–वेदना घेऊन अविष्कृत होते.

**'अंतस्फोट': (१९८१)**

या आत्मकथनाच्या माध्यमातून कुमुद पावडे दलित स्त्रीची वेदना मांडतात. त्यांचे विचार हे सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने महत्वाचे आहेत. दलितांच्या वाटयाला अनेक व्यथा–वेदना आल्या होत्या. मात्र दलित स्त्रीयांच्या वाटयाला स्त्री असल्याच्या वेदनेबरोबरच दलित असल्याचीही वेदना आहे. या आत्मकथनाच्या माध्यमातून कुमुद पावडे परिवर्तनवादी विचार समाजात पेरताना दिसतात.

**'फांजर': (१९८२)**

या आत्मकथनामधून नानासाहेब झोडगे आपल्या आयुष्यात दाहक अनुभव व्यक्त करतात. ते डॉ. बाबासाहेब यांच्या आंबेडकरी विचाराने प्रेरित झालेले आहेत. 'शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा' या मंत्राचे पालन त्यांनी आपल्या आयुष्यात केले आहे. या आत्मकथनामधून एका सामाजिक कार्यकर्त्याचा जीवनपट आपणास समजतो.

**'गबाळ': (१९८३)**

यामधून दादासाहेब मोरे एका उपेक्षित समाजाचे चित्रण घडवतात. 'पिंगळा जोशी' समाजाची व्यथा–वेदना यामधून व्यक्त झाली आहे. ही जमात गावोगाव हिंडून आपले पोट भरत आहे. त्यासाठी स्वत:ला आणि समाजाला फसवत ती गावोगाव भटकत आहे. या समाजात जन्माला आलेले दादासाहेब मोरे सर्व हाल–अपेष्ठा सोसत आपले शिक्षण पूर्ण करतात. त्यामुळे त्यांचा हा प्रवास प्रगतीकडे घेऊन जाणारा आहे. इतरांसाठी नवी वाट दाखवणारा आहे.

**'मिटलेली कवाडे': (१९८३)**

या आत्मकथनाच्या माध्यमातून मुक्ता सर्वगौड यांनी स्वनुभवातून दलित समाजाच्या जीवनात प्रकाश टाकला आहे. या आत्मकथनाच्या माध्यमातून लेखिका दलित समाजाला मिळणा-या सवलती आणि त्या सवलती मिळवून देणारे नेते स्वत:चा मोठेपणा कशाप्रकारे मिरवतात या संदर्भातील दाहक वास्तव त्या मांडतात.

**'गावकी': (१९८३)**

रूस्तुम अचलखांब यांनी आपल्या जीवनाचा प्रवास रेखाटला आहे. यातील नायक दलित समाजात जन्माला आला आहे मात्र त्याला शिक्षणाविषयी अत्यंत प्रेम आहे. अनेक हाल–अपेष्ठा सोसत यातील नायक शिक्षण घेतो व प्राध्यापक होतो. याबरोबरच या आत्मकथनाच्या माध्यमातून दलित समाजातील विविध चाली–रीती, प्रथा–परंपरा यांची महत्वपूर्ण माहिती मिळते. या आत्मकथनामधून 'महारी बोली'चा परिचय होतो.

**'आभरान': (१९८४)**

यामधून पार्थ पोळके हे पोतराज समाजाच्या वाटयाला आलेली व्यथा–वेदना स्पष्ट करतात. यातील नायक एका पोतराजाच्या पोटी जन्माला आला आहे. मात्र डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने तो शिक्षण घेतो. आणि सामाजिक चळवळीत कार्य करतो. या आत्मकथनामधून 'पोतराज' समाजातील अंधश्रध्देचे दर्शन घडते. त्यांच्या सामाजिक, धार्मिक जीवनाचा परिचय यामधून घडतो.

**'अक्करमाशी': (१९८४)**

यामधून शरणकुमार लिंबाळे येथील समाजव्यवस्थेला प्रश्न विचारतात. आपल्याला आपला बाप कोण हे सांगता येत नाही. कारण येथील शोषण करणा-या समाजव्यवस्थेने आमच्या स्त्रीयांवर नेहमीच अन्याय–अत्याचार

केले यामधून आपण जन्माला आलो. भारतीय समाजव्यवस्थेतील जात—धर्म, मानसाचा जन्म, नाती—गोती, शरीरधर्म, भोगवादी वृत्तीचा समाज त्याच्या विविध प्रथा—परंपरांवर हे आत्मकथन प्रकाश टाकते. हे आत्मकथन वाचकाला अंतर्मुख करून विचार करायला भाग पाडते.

**'धूळपाटी': (१९८५)**

या आत्मकथनातील श्रीरंग तलवारे याच्या जीवनाचा आलेख चितारलेला आहे. यातील नायक येथील समाजव्यवस्थेतील हाल—अपेष्ठा सहन करीत शिक्षण घेतो. दारिद्रयामधून शिक्षण घेत असताना त्याची उपसमार होते. मात्र अनेक हाल—अपेष्ठा सहन करीत यातील नायक शिक्षण पूर्ण करून प्राध्यापक होतो. त्याच्या जीवनाचा हा चढता आलेख इतरांना प्रेरणादायी आहे.

**'कोंडाळ': (१९८६)**

यामधून तुषार भाग्यवंत 'महार' समाजाचे दर्शन घडवतात. जातीच्या चौकटीत मकडीप्रमाणे अडकून पडलेल्या समाजाचे चित्रण ते करतात. शिक्षणाने आली आणि आपलया समाजाची प्रगती होईल म्हणून तो शिक्षण घेतो. ग्रामीण भागातील अठरापगड जाती—जमातीचे सणोत्सव, देव—देवता त्यांच्या जत्रा, विविध रूढी—परंपरांचे वास्तावाच्या पातळीवर दर्शन घडते. या आत्मकथनाच्या माध्यमातून कोकणातील महार बोलीचे दर्शन घडते.

**'झळा': (१९८६)**

या आत्मकथनाच्या माध्यमातून ल.स.रोकडे महार जातीचे दर्शन घडवतात. महार जातीमधील लोकांनी बौध्दधर्म स्वीकारल्यानंतर आपल्या जाती—जमातीमधील पोटजाती नष्ट व्हाव्यात, अशी एक तळमळ रोकडे यांच्या मनामध्ये आहे. या आत्मकथनाच्या माध्यमातून रोकडे आपल्या समाजातील बांधवांचे प्रबोधन करण्याचा प्रयत्न करतात.

**'माज्या जल्माची चित्तरकथा': (१९९०)**

या आत्मकथामधून शांताबाई कांबळे यांनी दलित असण्याची व्यथा आणि एक स्त्री असण्याची व्यथा सुध्दा मांडलेली आहे. येथील समाजाची पारंपरिक चौकट मोडण्याचा, त्याला सुरूंग लावण्याचा प्रयत्न शांताबाईने केला आहे. या आत्मकथनाच्या माध्यमातून एका करारी, जिद्दी आणि प्रेमळ दलित स्त्रीचे दर्शन घडते. येथील समाजव्यवस्थेने आपल्याला कितीही दु:ख दिले तरी त्याविषयी मनामध्ये कोणतीही कटुता न मानता आणि त्याविषयी कोणतीही तक्रार न करता अत्यंत संयमीपणे आपल्या जीवनाचा प्रवास मांडतात.

**'जिणं आमुचं': (१९८६)**

बेबी कांबळे यांनी महार समाजाच्या वाटयाला आलेल्या व्यथा—वेदना मांडलेल्या आहेत. महार समाजामध्ये पाळल्या जाणा-या अनेक प्रथा—परंपरांचे दर्शन यामधून घडते. उदा.लग्नविधी, सासुरवास, बाळंतपण, वेगवेगळे नवस—सायास, अंगात येणे, जत्रा करणे इ. तपशिलांचे बारकाव्याने वर्णन करतात.

**'बेरड': (१९८)**

या आत्मकथनाच्या माध्यमातून भिमराव गस्ती यांनी बेरड जातीच्या व्यथा—वेदनांना मोकळी वाट करून दिली आहे. येथील समाजव्यवस्थेने या जातीला प्रामाणिकपणाने जगू न दिल्याने पोटाच्या भुकेसाठी यांना गुन्हा करून जीवन जगावे लागले आहे. समाजव्यवस्थेच्या जाचाला कंटाळून ही जमात गावाबाहेर राहू लागली. पोटासाठी चो-या—मा-या करू लागली. बेरड जातीचा इतिहास, देवीच्या सण—उत्सवाचे वर्णन, देवीच्या जत्रा, नवस—सायास, लग्न करत असतानाचे विधी, अंतयात्रेचे विधी, लोकांमधील अज्ञान, परंपरागत रीती रिवाजांना चिकटलेले लोक इतर अनुभव भिमराव गस्ती या आत्मकथनाच्या माध्यूातून व्यक्त करतात. यातील नायक

सामाजिक कार्यकर्त्याची भूमिका पार पाडत आहे. आपलया लोकांचे शोषण थांबावे म्हणून जातीय परिषदा घेतो. त्यांना काम मिळवून देण्याचा प्रयत्न करतो.

**'उचल्या': (१९८७)**

लक्ष्मण गायकवाड. उचलेगिरी करणा-या गुन्हेगार जमातीचे चित्रण करतात. आपल्या समाजाव्यवस्थेने यांना काम—धंदा, नोकरी देण्याचे नाकारल्याने या जमातीला पोटाची खळगी भरण्यासाठी चो-या—मा-या कराव्या लागतात. या आत्मकथनाच्या माध्यमातून त्यांच्यातील अज्ञान, अंधश्रध्दा, नवस—सायास, लग्नविधी, अंत्यविधी इ. माहिती मिळते. पोलीसांकडून या जमातीची होणारी पिळवणूक, छळ याची माहिती मिळते. भूक आणि निवा-याची सर्व साधणे मिळणे कायदेशीररीत्या बंद झाल्याने चारी करून आपला उदरनिर्वाह करणारी ही जमात आहे.

**'तांडा': (१९८९)**

या आत्मथनातून आत्माराम राठोड लमाण, लभाण किंवा बंजारा म्हणून ओळखल्या जाणा-या भटक्याविमुक्त समाजाचे चित्रण मांडतात. 'तांडा' आत्मकथनातून लमान जमातीची माळावर वसलेल्या वस्तीच चित्रण/वर्णन करतात. त्यांच्या घरातील अठराविश्व दारिद्रयाचा परिचय करून देतात. लमानल जमातीचा दारूचा व्यवसाय, आपापसातील तंटे/भांडणे, ती सोडवाण्यासाठी बोलावलेली जातपंचायत, त्यांच्यातील अंधश्रध्दा इ. सर्व गोष्टींचे चित्रण या आत्मकथनातून घडते. एका सामाजिक कार्यकर्त्याचे हे आत्मकथन असल्याने त्यातून परिवर्तनवादी विचारांचे दर्शन घडते.

**'जातीला जात वैरी': (१९९१)**

ना.म.शिंदे या आत्मकथनामधून महानगरामधील दलित समाजाच्या व्यथा—वेदना स्पष्ट करतात. या आत्मकथनाच्या माध्यमातून 'ढोर आणि चांभार' अशा दोन जातीमधील संघर्षाचे चित्रण करतात. या दोन जाती प्राण्यांच्या कातडयाशी निगडीत आहेत. एकमेकांची जात उच्च—नीच असल्याची भावना दोघांचया मनामध्ये आहे. दलित समाजाने जातीयतेसंदर्भात फक्त संवर्णांना न बोलता, अगोदर आपसातील जातीयता (उच्च—नीचता) नष्ट केली पाहिजे. अशा स्वरूपाचा परिवर्तनवादी विचार देणारे हे आत्मकथन आहे.

**'ख्रिस्ती महार': (१९९०)**

बाळासाहेब गायकवाड यांनी या आत्मकथनाच्या माध्यमातून पुर्वीच्या काळी महार असलेला समाज नंतर या गरीब—दलितांच्या शोषिकतेचा फायदा घेऊन धर्मांतर घडवून आणलेल्या समाजाच्या व्यथा—वेदना, त्यांच्यातील अज्ञान—अंधश्रध्दा, त्यांचे सामाजिक, कौटुंबिक प्रश्न या आत्मकथनामधून प्रांजळपणे व्यक्त केले आहेत.

**'मरणकळा': (१९९८)**

जनाबाई गि-हे या आत्मकथनामधून रानोमाळ भटकणा-या गायेपाळ समाजाच चित्रण घडवतात. रानोमाळ भटकणारी ही स्त्री डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा 'शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा' या नियमाचे पालन करताना दिसते. रानोमाळ भटकणारी हि स्त्री शिक्षण घेते. शिक्षिका होते. आणि सुख—समाधानाने जीवन जगते. या आत्मकथनाच्या माध्यमातून गोपाट समाजाच्या व्यथा, वेदना, बकालपण, अज्ञान, अंधश्रध्दा त्यांच्या प्रथा—परंपरा यांचे ह्दयस्पर्शी दर्शन घडवतात.

**'कोल्हाटयाचं पोर': (१९९४)**

किशोर शांताबाई काळे यामधून नाचगाण करणा-या कोल्हाटी समाजातील स्त्रीचे दर्शन घडवतात. स्वतःच आयुष्य पणाला लावून ते झिजवणा-या स्त्रियांचे जग म्हणजे कोल्हाटयाचे जग. या समाजात लग्नाची प्रथा

नाही, 'चिरा उतरविणे' या प्रकारामधून लाभलेला मालक एकप्रकारे विचा नवरा असतो. ती बाई त्या मालकाची एक उपभोग्य वस्तू असते. वाटेल तशी, हवी तेव्हा वापरण्याची आणि सोडून देण्याची या आत्मकथनाच्या माध्यमातून किशोर आणि त्याची आई यांचया आयुष्याची झालेली ससेहोलपट वाचकाचे अंतर्मन हेलावून टाकते.

## समारोप:

अशा प्रकारे दलित आत्मकथनांनी मराठी साहित्यविश्वाला समृध्द केले आहे. ही आत्मकथने प्रत्येक मानसाच्या, समाजाच्या, कुटुंबाच्या व्यथा—वेदनांचे दर्शन घडवतात. दलित साहित्य प्रवाहातच नव्हे तर एकूण मराठी साहित्य विश्वाला दलित आत्मकथनांनी समृध्द केले आहे. दलित साहित्य प्रवाहातच नव्हे तर एकूण मराठी साहित्यविश्वात मैलाचे दगड ठरावेत अशा स्वरूपाची ही आत्मकथने आहेत. या आत्मकथनांमधून महाराष्ट्रातील विविध जाती—जमातीच्या संस्कृतीचे दर्शन घडते. या आत्मकथनांबरोबरच तो परिसर, निसर्ग, पीकपाणी, लोकजीवन, यात्रा—जत्रा, धार्मिक स्थाने, श्रध्दा—अंधश्रध्दा, रीती—रिवाज, प्रथा—परपंरा, विविध जाती—जमातीचे आचार—विचार, विविध बोलीभाषा यांचा मराठी वाचकांना परिचय होतो. लेखक ज्या जाती—जमातीत जन्माला आला आहे त्यांचे आचार—विचार, व्यवसाय, जातपंचायती, लग्नकार्य, अंत्यसंस्कार इ. गोष्टींचा परिचय होतो. महारवाडा, मांगवाडा, रामोसवाडा, चांभारवाडा, रानमाळ, हागनदारी, तांडा, डोंगरद-या इ. ठिकाणांचे दु:ख, दैन्य, दारिद्रयात अडकलेली माणसे, लाचार, रंजलेले—गांजलेले आयुष्य जगणारी माणसे या आत्मकथनांतून भेटतात. इथल्या समाजव्यवस्थेने त्यांना दलित म्हणून कायम नाकारले. पाणी दुरून देणे, जेवणाच्या पंक्तींत न बसू देणे, शाळेत वेगळे बसवणे, दुरून छडया मारणे इ. अनुभव प्रत्ययकारीपणे दलित आत्मकथनामधून व्यक्त झाले आहेत.

## संदर्भग्रंथ

१) जाधव रा.ग./देशपांडे वि.भा.(संपादक) 'मराठी वाङ्.मयाचा इतिहास' खंड सातवा/भाग दुसरा १९५० ते २००० प्रकाशन—महाराष्ट्र साहित्य परिषद, प्रथम आवृत्ती.जाने.२०१०(पृ.३९३)
२) हस्तक उषा 'मराठीतील आत्मचरित्रपर लेखन' प्रकाशन स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस पुणे.प्रथमावृत्ती ३० मार्च २००६. (पृ.क्र.१८१)
३) उ.नि. (पृ.क्र.१७३)
४) डॉ. मुलाटे वासुदेव 'साहित्य समाज आणि परिवर्तन' स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद प्रथमावृत्ती ५ सप्टें. २००७ (पृ.क्र.७४,७५)
५) हस्तक उषा 'मराठीतील आत्मचरित्रपर लेखन' स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती ३० मार्च २००६ (पृ.क्र.२००९,२०१०,२०११)
६) कोठावळे अशोक (संपादक) 'ललित चरित्रे/आत्मचरित्रे'(विशेषांक)जुन—जुलै२०१३
७) डॉ. जाधव मनोहर, देशमुख श्रीकांत 'डॉ. नागनाथ कोत्तापल्ले गौरवग्रंथ समकालीन साहित्यचर्चा' प्रतिमा प्रकाशन पुणे. प्रथमावृत्ती २ जून २०१० (पृ.क्र.४३८)

❖❖❖

# राष्ट्रसंतांची ग्रामोद्धारक दृष्टी

**प्रा. डॉ. करुणा वसंतराव डहाके**
सेट, नेट, पीएचडी
महात्मा फुले कला, वाणिज्य आणि सीतारामजी चौधरी
विज्ञान महाविद्यालय, वरूड.

## प्रस्तावना :

आज आपण २१ व्या शतकात पदार्पण करून ज्ञान, विज्ञान तंत्रज्ञानात प्रगती करून उन्नतीच्या अत्युच्च शिखरावर पोहचलो असलो तरी ग्रामविकासाच्या मुळापर्यंत अद्याप पोहोचलो नाही. वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेच्या रूपाने आपणांस ग्रामविकासाची संजीवनीच प्रदान केली आहे.

सद्य:स्थितीचा विचार करता आज एकीकडे चंद्रयान-३ यशस्वी करून चंद्राच्या अभ्यासावरून मानव जणू अंतराळात वस्ती करण्याचे स्वप्न बघू इच्छितो आणि दुसरीकडे मानवी जीवनमुल्यांचा ऱ्हास होतांना दिसून येतो. जग भौतिक विकासाने समृध्द झाले आहे. माणूस भौतिक सुखाच्या मागे लागून विमानात बसून जगभर प्रवास करण्याचे स्वप्न साकार करीत आहे. पण त्याच दूतगतीने खेडी ओस पडत आहे. शहरात बहुमजली इमारती दाटीवाटीने वसल्या असल्या तरी शहर व खेडी यामधील दरी बरीच रुंद होत आहे. आपल्याच देशातील ग्रामीण भागात अन्न वस्त्र निवाऱ्याव्या, शिक्षणाऱ्या अन आरोग्याच्या गरजा भागविणेही कठीण झाले आहे. शहर आणि खेडे यामधील विकास आणि राहणीमानात बरेच अंतर पडले आहे. खेड्यातील लोकांचा प्रवाह शहराकडे बेगाने होत आहे म्हणून ग्रामीण जीवनाला समृध्द करण्याची आज खऱ्या अर्थाने गरज आहे. हीच गरज ओळखून वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीता लिहून ती जगाचा पोशिंदा असलेल्या ग्रामनाथास अर्पण केली आहे. 'देवदर्शन' या पहिल्याच अध्यायात ग्रामगीतेचा पाया रचतांना वं. महाराज म्हणतात,

"गाव हा विश्वाचा नकाशा गावावरून देशाची परीक्षा
गावाची भंगता अवदशा येइल देशा ||" (अध्याय १.४९)

राष्ट्रसंतांचे हे उद्गार अगदी सार्थ आहे. राष्ट्रसंताच्या ग्रामगीतेबाबत वैराग्यमुर्ती संता गाडगेबाबा म्हणाले होते की, 'तुकडोजी बाबांची 'ग्रामगीता' हा आज गीता ज्ञानेश्वरीप्रमाण जनतेला खरं ज्ञान देऊन खेड्यापाड्यात, झोपडी-झोपडीत सुख समाधान पैदा करील. असा भरवसा वाटतो. या ग्रंथापासुन साध्या भोळ्या समाजाला ज्ञान मिळून, त्यांच्या हातून त्यांच दुःख, दैन्य दूर होण्याचं भाग्य त्यांना मिळू शकेल इतक याचं महत्व आहे.' यावरून ग्रामविकासास वं. महाराजांचे कार्य व त्यांची ग्रामगीताच उपयुक्त आहे असा गाडगे महाराजांचा विश्वास होता.

## विषय विवेचन :

ग्रामविकासातूनच देशविकास साधला जातो. ग्राम म्हणजे खेडे अगदी काही घरांची वस्ती, तेथे राहणारा शेतकरी, शेतमजूर अशा उत्पादक असलेल्या खेड्यातील ग्रामनाथास उद्देशून वंदनिय महाराज आपल्या ग्रामगीतेच्या अर्पणपत्रिकेत म्हणतात,

सर्व ग्रामस्थांना खूश करून त्यांना अन्न, वस्त्र, पात्रादी द्यावे
परि स्वतः दुःखचि भोगावे | भुषण तुझे ग्रामनाथा

संपूर्ण जगाचा पोशिंदा असलेल्या ग्रामनाथाची हीच वास्तविकता ओळखून ग्रामविकासाचे सुत्र साकारतांना ग्रामगीतेत एकूण आठ पंचकात एकेचाळिस अध्यायांची रचना केलेली दिसून येते. सद्धर्ममंथन पंचक, संस्कारशोधन पंचक, ग्रामनिर्माण पंचक, दृष्टीपरिवर्तन पंचक, संस्कारशोधन पंचक, प्रेमधर्म संस्थापक पंचक, देवत्वसाधन पंचक, आदर्शजीवन पंचक असे आठ पंचक आणि शेवटी एकेचाळीसावा अध्याय अशा ग्रामगीतेच्या रचनेतून वंदनिय महाराजांनी अनुक्रमे भौतिक विकास, शैक्षणिक विकास, मानसिक विकास, आर्थिक विकास, सामाजिक विकास, आध्यात्मिक विकास, राजकिय विकास, शारिरीक विकास, बौध्दिक विकास, धार्मिक विकास व सांस्कृतिक विकास असा मानवी जीवनाचा सर्वांगिण विकास साधून एकप्रकारे संपूर्ण मानवजातीसाठी ग्रामगीतेच्या रूपाने ग्रामोध्दारक दृष्टीच दिली आहे.

**१) भौतिक विकास :**

मनुष्य हा समाजशील प्राणी असल्याने तो समुहाने राहतो. अन्न-वस्त्र-निवाऱ्याच्या या महत्वाच्या प्राथमिक गरजा पूर्ण झाल्यावर तो ऐहिक सुखाकडे वळतो. ऐहिक आनंद त्याच्या भौतिक विकासावर अवलंबून असतो. अशा मानवाचा भौतिक विकास कसा साध्य करायचा ते वं. महाराज ग्रामगीतेतून सांगतात. वं. महाराज म्हणतात,

सर्वा मिळोनि करावी साफसफाई नाली मोरी ठायी ठायी
हस्ते परहस्ते साफ सर्वहि चहुकडे मार्ग (अध्याय १२.५४)

वं. महाराजांनी ग्रामगीतेत सांगितलेल्या या भौतिक विकासाबाबत आचार्य विनोबा भावे म्हणतात, "ग्रामगीतेत भोळ्या कल्पनांना कोठेच वाव नाही. अगदी आधुनिक मन त्यात पाहावयास सापडेल" ग्रामरचनेच्या कोणत्याही अंगाकडे त्यांचे सहसा दुर्लक्ष झाले नाही" अशा प्रकारे वं. महाराजांनी ग्रामगीतेतून खराखुरा ग्रामविकास साधल्याचे दिसून येते. यावरून विनोबाजींना ग्रामगितेच्या मुल्यमापणाचा यथार्थ वेध घेतलेला दिसून येतो.

**२) शैक्षणिक विकास :**

शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. ग्रामविकासासाठी शिक्षण ही काळाची गरज असल्याचे राष्ट्रसंतांनी ओळखले. त्यांना विश्वास होता की,

"आपणासि वाटे जैसे गाव व्हावे ।
तैसेचि बालकांना शिकवावे
शहाणे करोनि सोडावे | विद्याशिक्षणे सर्वचि" (अध्याय १९.३७)

वंदनिय महाराजांनी स्वि शिक्षणासाठी, उच्चशिक्षणासाठी प्रयत्न केला. ते १९व्या अध्यायात म्हणतात.

"उच्च ज्ञानाची विद्यालये गावीच आणावी निश्चये
जी ग्रामजीवन सजवितील चातुर्ते | शिकवोनि जना" (अध्याय १९.३०)

विद्यार्थ्यांमध्ये वाचनकलेचा विकास व्हावा म्हणून वाचनालय हस्तलिखित, मासिक गावाच्या चौकात वृत्तफळा सुचवला. प्रौढ शिक्षणाचा, गृहशिक्षणाचा प्रचार प्रसार केला. सुंदर अक्षरे, युवक युवतींसाठी भाषणकला, शारीरिक शिक्षण, वैद्यकिय शिक्षण, कृषी शिक्षण, कला शिक्षणाचा त्यांनी प्रचार व प्रसार केलेला दिसून येतो.

सुप्रसिध्द साहित्यिक डॉ.अ.ना. देशपांडे म्हणतात, "सर्वांगीण जीवन विकासाच्या विविध पैलूंची अधिकार वाणीने या ग्रंथात जाणिव करून दिलेली आहे." यातूनच राष्ट्रसंताच्या ग्रामोध्दारक दृष्टीकोनाचे स्वरूप दिसून येते.

### ३) मानसिक विकास :

वं. महाराजांनी ग्रामविकास करीत असतांना मानसिक अवस्था महत्वाची मानली कारण ग्रामस्थांची मानसिक अवस्था क्रमाक्रमाने बदलवून हृदयपरिवर्तन करून त्यांना ग्रामोध्दार घडवून आणावयाचा होता म्हणून सर्व देवच करतो ही लोकांची संकल्पना बदलवून 'पेरली तेचि उगवते बळे' (अध्याय ३५.२४) ही उक्ती त्यांनी ग्रामस्थांमध्ये रूजवली, संतदेवाची निश्क्रिीय गर्जना करू नये, दुबळी निराशा मनातून काढून टाकावी, स्वार्थी लोकांपासून सावध असावे. सतत वाईट चिंतीता वाईटच होते. संत चमत्कार खोटे असतात, पिंडदान केल्याने काही कुणी स्वर्गात जात नाही. आपणच कर्ताहर्ता आहोत है विचार त्यांनी ग्रामगितेतून रूजवले आहे. ते प्रयत्न प्रभाव या ३५ व्या अध्यायात म्हणतात,

आपणचि सर्व कर्ताहर्ता | साची प्रतिचीचेतवून देत |
नाही तर माणूस बसता भाग्य झोपते | चालता पुढेच घेई झेपते |
प्रयत्नांचेचि रूपांतर होते भाग्यामाजी निश्चयाने (अध्याय ३४.४२)

सुप्रसिध्द साहित्यिक पु.ल. देशपांडे ग्रामगितेवर भाष्य करतांना म्हणतात, "या ग्रंथात काय आहे" हा प्रश्न विचारण्याऐवजी मला वाटते काय नाही हा प्रश्न विचारावा. उत्तरात असे आढळेल या ग्रंथात सर्वच आहे. अशाप्रकारे ग्रामगितेतून त्यांनी ग्रामोध्दारक दृष्टी दिली आहे.

### ४) आर्थिक विकास:

ग्रामोध्दारासाठी आर्थिक विकास हा महत्वाचा मानून ग्रामस्थांचे कृषी उत्पन्न वाढावे. कच्चा माल पक्का करून विकावा, जोडधंदे सुरू करावे, वकिलांची घरे भरू नये, धनाची उधळन करू नये, न्यायाने धन मिळवावे, मालकिचे शेत विकू नये, उपभोगासाठी कर्ज काढू नये, दुर्व्यसनात पैसा खर्च करू नये, धनासाठी साधुच्या मागे लागू नये इत्यादी बाबी त्यांनी आर्थिक विकासाबाबत सुचवल्या आहेत ते म्हणतात,

लग्नासाठी कर्ज करावे | जन्मभरी व्याज भरीत जावे
लग्नासाठी कफल्लक व्हावे | कोण्या देवे सांगितले (अध्याय 21.84)

### ५) सामाजिक विकास :

पुर्वीपासून समाजात चालत आलेल्या अनिष्ठ रुढ्या परंपरांनी समाज अधोगतीला नेता म्हणून सामाजिक विकास घडविण्यासंबंधी वं. महाराजांनी ग्रामगीतेतून अस्पृश्येतचा विचार मनातून काढून टाकण्यास सांगीतला कारण

जन्मावरोनि चाचले वर्ण | धंद्यावरोनि जाति भिन्न वाढल्या लोकी (अध्याय 24)

ते याची प्रचिती देतात, ज्योतिष्याकडे मुहूर्त पाहू नये, साध्या पध्दतीने विवाह पार पाडावा, आदिवासी सुधारणा, रंजल्या गांजल्याची सेवा, वाईट व्यसनांपासून मुक्ती, गावासाठी सहभोजन, रामधूनची योजना केल्याने समाज संघटीत होईल. अशाप्रकारे ग्रामोध्दारासाठी ते सामाजिक विकास महत्वाचा असल्याचे सांगतात. राष्ट्रसंताच्या ग्रामगीतेबाबत डॉ. वि.भि. कोलते म्हणतात, "ग्रामगिता कर्तव्यविमुख ग्रामांना आज कर्तव्य करण्याची दिक्षा देत आहे" हे विधान अगदी सार्थ ठरते.

### ६) आध्यात्मिक विकास :

बंदनिय महाराज ग्रामोध्दारासाठी आध्यात्मिक विकासाकडेही लक्ष देतात. जन्म हा आपल्या इच्छेचाच खेळ असला तरी मृत्यू म्हणजे फक्त शरीर परिवर्तन. कारण आत्मा मरत नाही, मृत्युने पाप

पुण्याचे निवारण होत नाही, प्रारब्दवाद मान्य करावा पण प्रयत्नवाद सोडू नये. कर्म तसे फळ याचा कधीही विसर पडू नये यासाठी ते म्हणतात,

"माणूस बसतो, नशीब झोपतो | चालतो, पुढे सरकत नाही.
प्रयत्नांचेच रूपांतर होते भाग्यामाजी निश्चयाने | "
ईश्वर म्हणजे चैतन्य, सर्वांना समत्त्वाने बघावे ही दृष्ठी ठेवून ते.
शास्त्र प्रचिती, गुरूप्रचिती | मगचि होते आत्मप्रचिती (अध्याय ४७. ४९)

अशा या आत्मप्रचितीच्या तीन पायऱ्या सांगून ग्रामोध्दारक दृष्टी दिली आहे.

## ७) राजकीय विकास :

राष्ट्रसंतांनी ग्रामगीतेतून ग्रामराज्याची संकल्पना साकारली. राजकिय विकासाने ते शक्य आहे. त्यासाठी आपल्या गावातीलच राजकारणाची दिशा, पुढारी कसे असावे, सेवा आणि पुढारी यांचे अतूट नाते, निवडणूक समयी मतदार व उमेदवार यांनी पाळावयाचे तत्व इत्यादी रचनात्मक बाबींचे मार्गदर्शन वंदनीय महाराज ग्रामगीतेतून करतात. ग्रामगीतेचे संसर्ग प्रभाव या सहाव्या अध्यायात वं. महाराज म्हणतात

पुढारी जे जे गावी करी लोक तैसेचि वागती घरोघरी || (अध्याय ६.९९)

म्हणून नेता निवडण्यासाठी कसोट्या. नेता होण्यापूर्वी तो प्रचारक, सेवाभावी वृत्तीचा असावा अशा अनेक बाबींचे वर्णन ग्रामविकासासाठी वं महाराज करतात.

## ८) शारीरिक विकास:

भारतीय संस्कृतीने मानवी आयुष्याच्या प्रत्येक २५ वर्षाचा एक भाग उचलून जे चार भाग पाडले त्या ब्रम्हचर्यापासून तर सन्यासापर्यंतच्या प्रत्येक टप्प्यात शरीर सुदृढ व उत्तम आरोग्य लाभावे, यासंबंधी खाण्यापिण्यापासून ते मातापित्याच्या उत्तम संस्कारापर्यंत संपुर्ण बाबीचे यथोचित वर्णन ग्रामगीतेत महाराजांनी केले आहे. उत्तम आरोग्यासाठी दिनचर्या कशी असावी ते सांगताना वं. राष्ट्रसंत म्हणतात

वेळेवरि झोपवावे, जागवावे (अ.२.५६)
कराया लावावे प्रातः ध्यान (अ. २.५७)
रोजच्या दिनचर्येत सकाळी प्यावे | सूर्यनमस्कार, आसन, पोहणे आणि निंबसेवन |
आरोग्यदायी जे सोपे (अ. २.५८)

अशाप्रकारे उत्तम आरोग्यास सात्विक भोजन व व्यायामाची गरज वं. महाराज विषद करतात.

## ९) बौद्धिक विकास:

उत्क्रांतीवादाच्या सिध्दान्ताने पशुपक्षांच्या बुध्दिपेक्षा मानवात बुध्दी अधिक विकसित झालेली असेल त्या मानवाच्या सद्सद् विवेकबुध्दीला जागृत करून मानवी विकासाचा मार्ग ग्रामगीतेतून सांगतांना वं. महाराज म्हणतात,

गावचे गेल्याविन अज्ञान | सुखी जीवन न होई (अध्याय 14.20)

भगत, मांत्रीक, करणी कौटाळ, बळी प्रकार हे सारे अज्ञानीपणाचे लक्षण आहे. म्हणून ते मानू नये. तर संतापासून विवेकबुध्दीचे धडे घेण्यास सांगतांना ते म्हणतात

संताचे ऐका संत अज्ञान रोगाचे वैद्य | जीवनविकासाचे सर्वाद्य
शुध्द कर्मानी असनी वंद्य | तिन्ही लोकी (अध्याय ३१.९६)

## १०) धार्मिक विकास:

मनवसमाज राहावया सुस्थिती |
धर्म सकळा निवेदिला || (अध्याय २.१)

अशाप्रकारे धर्म व धार्मिक मूलतत्वे सांगतांना वं महाराजांनी सर्व विश्व सुखी होवो हीच संकल्पना साकारली आणि ग्रामोध्दार घडवून आणला.

सर्वाधपति ईश्वर एकच असून तो धर्मरक्षण्यासाठी उभा आहे. सगुणाकडून निर्गुणाकडे अशी त्याची वाटचाल आहे, म्हणून देव धर्मावरून धर्मा-धर्मात न भांडता सामुदायिक प्रार्थनेतून वं. महाराजांनी सर्व जातीधर्माचा समन्वय साधला. ते म्हणतात.

सर्व धर्माचा समन्वय | विश्वशांतीचा उपाय
लोकसुधारणेचे विद्यालय | सामुदायिक प्रार्थना (अध्याय २८.१)

अशाप्रकारे वं. महाराजांनी ग्रामगितेव्दारे सर्वांगीण विकासाचे तत्व मांडून ग्रामोध्दारक दृष्टीच दिली आहे म्हणून ती आजच्या युगाची संजीवनी बुटीच ठरली आहे. देवदर्शन' या पहिल्याच अध्यायात ग्रामगीतेचा पाया रचतांना

गाव हा विश्वाचा नकाशा गावावरूनी देशाची परीक्षा |
गावचि भंगता अवद्शा येईल देशा (अ.१.४९)

वं. महाराजांचे ग्रामोध्दारक दृष्टीचे हे उद्‌गार हे अगदी सार्थ ठरते.

## सारांश :

आज खऱ्या अर्थाने वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांची समाजाला गरज आहे. गावागावात व्यसने मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. संगणकाच्या युगात ऑनलाईन गेम मध्ये मोठ्या प्रमाणात तरुण पिढी वाया जाताना दिसून येत आहे. मोबाईलचे सकारात्मक व नकारात्मक परिणाम असले तरी मोबाईल मध्ये लहानांपासून तर मोठ्यापर्यंत संपूर्ण पिढी बरबाद होताना दिसून येत आहे. माणूस माणसांपासून दूर होत चालला आहे. गाव खेडी बकास होत आहे म्हणून राष्ट्रसंताच्या विचारातून गाव समृद्ध व्हावे खऱ्या अर्थाने ग्रामोददार घडून यावा यासाठी वंदनीय राष्ट्रसंतांच्या विचाराची आज गरज आहे. पूज्य राष्ट्रपिता महात्मा गांधी म्हणायचे "ही पृथ्वी परमेश्वराची आहे येथे राहणारे सर्व मानव एक आहेत प्रत्येक गाव स्वयंपूर्ण व समतेने सुखी व्हावे हेच माझ्या स्वप्नातील रामराज्य". गांधीजींच्या स्वप्नातील रामराज्य साकार करण्यासाठीच जणू वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांनी सर्व माणूस समाजाच्या कल्याणासाठी सामुदायिक प्रार्थना राष्ट्रभाषा हिंदी मधून लिहून विश्वशांतीची संकल्पना अखिल मानव समाजाला दिली.

विश्व होऊ शकेल शांतता । तेथे गावाची कोण कथा ॥
सामुदायिक प्रार्थना करील एकता, नित्यासाठी । तुकड्या म्हणे ॥

सामुदायिक प्रार्थना याच्या निमित्ताने वंदनीय महाराजांनी सर्व जाती धर्म संप्रदायाच्या लोकांना एकाच क्षताखाली आणले यातून मानवता व विश्वबंधुत्वाची भावना वाढीस लागते. ज्याची आज खऱ्या अर्थाने भरकटलेल्या समाजाला गरज आहे. कारण भारत देश महाशाली व्हावा हे एक बलशाली राष्ट्र व्हावे हेच वंदनीय महाराजांना अपेक्षित होते हीच अपेक्षा आपल्या भजनातून व्यक्त करताना ते म्हणतात.

"तन-मन-धन से सदा सुखी हो, भारत देश हमारा ||
सर्वधर्म अरु पंथ पक्ष को दिल से रहे पियारा,
विजयी हो, विजयी हो, विजयी हो, भारत देश हमारा"

## निष्कर्ष :

१. वंदनिय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामविकास वेगवेगळे विभाग कल्पुन सर्वांगीन विकासातून ग्रामोध्दार साधल्याचे दिसून येते.
२. वं.राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामविकासासाठी जो भौतिक विकास विस्ताराने मांडला आहे त्याव्दारे ग्रामविकासाच्या योजना आखणे रचनात्मक संस्थेतील कार्यकर्त्यांना, शासकिय अधिकाऱ्यांना व समाजसेवकांना सोपे जाईल हे दिसून येते.
३. वं. महाराजांनी ग्रामगितेतून जे स्वावलंबन, स्वयंरोजगार, स्वयं शेती, सेंद्रीय शेती आणि ग्रामोद्योग सांगीतले त्यातुन स्वयंपूर्ण खेडी, आर्थिक विकास, सामाजिक विकास साधल्याचे दिसून येते.
४. वं. महाराजांनी लोकशाही तत्वप्रणालीवर गावातील राजकारण, पुढारी, सेवाभाव, मतदार, उमेदवार यांवर रचनात्मक मार्गदर्शन करुन जणु राजकिय विकास घडवून आणल्याचे दिसून येते.
५. वं.महाराजांनी अंधश्रध्देच्या खाईत भरकटलेल्या तत्कालीन समाजाला देव-धर्म-श्रध्दा, भक्ती याचे यथोचित धडे देऊन बौध्दीक विकासाव्दारे समाजाची विवेक जागृती केल्याचे दिसून येते.
६. वं.महाराजांनी संस्कृतीप्रिय समाजासाठी वेगवेगळ्या सणोत्सवाव्दारे सांस्कृतिक विकास समजावून सांगितल्याचे दिसून येते.
७. राष्ट्रसंतांच्या ग्रामोध्दाच्या संकल्पनेतील केंद्रबिंदू माणूस होता म्हणुन. अखिल मानव समाजाच्या उन्नतीसाठी राष्ट्रसंतांनी ग्रामोध्दार घडवून आणल्याचे दिसून येते.

## संदर्भग्रंथ :

'ग्रामगीता' वं. राष्ट्रसंत श्री. तुकडोजी महाराज

'राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे साहित्य आणि शैक्षणिक मूल्य भूपेश माकडे, डॉ. गौरीशंकर पाराशर (पृ.क्र.२२९) डॉ. साधना

'ग्रामविकासाची संजीवनी ग्रामगीता' (पृ.क्र.१.२) प्रा.रघुनाथ कडवे, प्रा.प्रदीप नाकतोडे

'तुकड्या म्हणे', रा.मो.बेलुरकर

'राष्ट्रपिता आणि राष्ट्रसंत', रा.मो.बेलुरकर

❖❖❖

# साहित्य व चित्रपट भाषा : एक अभ्यास

**प्रा. डॉ. विठ्ठल पंढरीनाथ लंगोटे**
कला व वाणिज्य महाविद्यालय, बेलापूर,
ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर.
Email - langotevitthal82@gmail.com मो. नं. 8149138397 / 8830593679

## प्रस्तावना :-

भारतीय चित्रपटांचा इतिहास हेच सांगतो की शब्दांचीच साथ नव्हती. तेव्हा चित्रपट म्हणजे फक्त हलत्या चित्रपटांची साखळी होती. तो बोलू लागला तेव्हा त्याची खरी प्रगती झाली. चांगल्या साहित्याची जोड लाभल्यावर चित्रपट अधिक परिपक्व झाला. चित्रपटांची भाषा म्हणजे कॅमेरा हे तर जगन्मान्य सत्य आहे. त्याबद्दल कोणालाही शंका असू शकत नाही. पण या भाषेला शब्दांची सोबत मिळाली आणि चित्रपट संपन्न झाला हे देखील सत्य आहे. साहित्याच्या तुलनेत चित्रपट हे अनेकांना अगदी निरक्षरांनाही उपलब्ध असू शकणारं असं 'जनमाध्यम' च आहे. तेव्हा स्वाभाविकपणे साहित्यकृतीला चित्रपटरुप दिल्याने ती कृती अधिकापर्यंत पोहचते. दिग्दर्शक जेव्हा साहित्यकृतीचे रुपांतर करुन त्याला चित्रपट रुप देतो. तेव्हा तो एक अर्थाने विश्लेषक, समीक्षक, भाष्यकार, आणि सर्जकाचे ही काम करीत असतो. त्यामुळेच चित्रपटांद्वारे ती कलाकृती अधिकांना अधिक प्रभावीपणे खुली होते.

## साहित्य व चित्रपट भाषा :-

भारतात निरनिराळ्या भाषेतून चित्रपट बनतो आणि त्या चित्रपटात त्या राज्याची संस्कृती, त्याचा भूतकाळ आणि वर्तमानकाळ त्याच्या भाषेतून व्यक्त होतो. यावरून चित्रपटातलं शब्दाचं महत्त्व कळत. मातृभाषेतून चित्रपटाची अभिव्यक्ती चांगली होते म्हणून प्रादेशिक चित्रपटाला राष्ट्रीय पातळीवर पुरस्कारांमधून प्रोत्साहन दिलं जातं. 'हरिश्चंद्राची फॅक्टरी' हा प्रादेशिक (मराठी) चित्रपट भारतासारख्या विराट राष्ट्रांचं बहुप्रतिष्ठा प्राप्त, आंतरराष्ट्रीय मान्यतेच्या ऑस्कर स्पर्धेत प्रतिनिधित्व करतो, हा प्रादेशिक चित्रपटाचा आणि त्याच्या भाषेचा गौरव आहे.

साहित्य व चित्रपट भाषा यांत तुलना करतांना रार्बट रिचर्डसन यांनी म्हटले आहे की, "भाषेतील शब्द विविध वस्तू आणि विचारांचेच अमूर्त पातळीवरील रूप असते." व्याकरण म्हणजे त्या शब्दांची सुसंगत जुळणी करणारी व्यवस्था असते पण चित्रपटांची भाषा ही प्रतिमांची भाषा असते. आणि या भाषेचे व्याकरण हे संकलन, मोन्ताज या विभिन्न दृश्य घटकांना जोडणाऱ्या तत्त्वांतून साकारलेले असते. प्रतिमेचा साहित्य आणि चित्रपट यात होणारा वापर हा त्यातील तुलनेचा आणखी एक बिंदू साहित्यात प्रतिमेचा प्रभावीपणे वापर केलेला असतो. कारण स्वभावःच भाषा ही प्रतिमा चिन्हनिर्मिती करणारी प्रक्रिया असते. चित्रपटातल्या प्रतिमा समूर्त साकार आणि अधिक जाणिवपूर्वक असतात. पण चित्रपट ही काही केवळ प्रतिमांची भाषा नव्हे, तर ती त्याचबरोबरीने ध्वनीचीही भाषा आहे. ध्वनी म्हणजे नैसर्गिक ध्वनी, सांकेतिक ध्वनी किंवा शब्द ध्वनी हे ध्वनी प्रतिमांना अधिक अर्थपूर्ण करीत असतात. उदाः- एक जोडप, नवरा बायको एका समीप दृश्यात दिसतात. ते बोलतायत बोलतच राहतात. बराच वेळ भाषिक ध्वनी यातून वजा केले तर सबंध दृश्यच निरर्थक ठरेल.

साहित्याप्रमाणे प्रतिमासुध्दा आपल्या पलिकडच्या संलग्न अर्थ सुचित करू शकतात. आपण जेव्हा पुस्तक वाचतो किंवा चित्रपट पाहतो तेव्हा आपण त्यासंबधीच्या मनोप्रतिमा आपल्या पातळीवर स्वतः रचत असतो. वाचन करताना आपल्याला त्या मनोप्रतिमा रचाव्या लागतात. तर चित्रपट बघण्याच्या प्रक्रियेत प्रतिमा उपस्थितच असतात. पण वाचणे असो अथवा पाहणे, प्रतिमांच्या द्वारेच आपल्या संवेदनानुभवा द्वारेच आपण या नवनव्या प्रतिमांचा अर्थ लावत जातो.

साहित्य आणि चित्रपटाची भाषा यातील आणखी एक साम्य स्थळ म्हणजे त्यातील चिन्हांची अर्थपूर्ण जुळणी. उदाः- शॉवरचे दृश्य.... त्याखाली न्हाणारी स्त्री चाकूने भोकसण्यात येते. हे दृश्य न दाखवता सुध्दा, दृश्य घटकांच्या त्या विशिष्ट जुळणीमुळे आपण त्याचा तसा अर्थ मात्र लावतो. चित्रपट भाषा संदर्भात संजय पाटील म्हणतात, “ज्याला पटकथा कळली त्याला सिनेमाची भाषा कळली.” म्हणजेच चित्रपटाच्या पटकथेतून दिग्दर्शकाला काय सांगायचे हे कळले तर सिनेमाची भाषा सहजपणे समजू शकते. तसेच चित्रपटाच्या भाषा संदर्भात अभिनव देव देखील म्हणतात, “कथा उलगडण्याची प्रक्रिया हीच चित्रपटाची खरी भाषा असते, ती दिग्दर्शकांनी अधिक प्रभावीपणे सादर करणे महत्त्वाचे आहे.”

चित्रपट एक जनसंपर्काचे प्रभावी माध्यम आहे असे आपण जेव्हा म्हणतो तेव्हा चित्रपटाला स्वतःची प्रेक्षकांशी संवाद साधणारा एक भाषा असते भाषा म्हणजे समाजाने संवाद साधण्यासाठी निर्माण केलेली सांकेतिक व्यवस्था होय. भाषा ही संकेत मधून निर्माण होत असते विशिष्ट घटकासाठी विशिष्ट संकेत सामाज स्वीकारतो व ते वारंवार वापरल्यामुळे रूढ होऊन भाषेचे घटक बनतात.

चांगल्या चित्रपट संहिता लेखकाला साहित्याची भाषेची जशी सखोल जाण असणे आवश्यक आहे तसेच त्याला चित्रपटाची ही एक जी विशिष्ट भाषा आहे ते अवगत असणे गरजेचे आहे प्रत्येक कलेची स्वतःची एक भाषा असते आणि तिच्याशी संबंधित काही संकल्पना ही प्रचलित असतात उदा:- रंग आणि रेषातून चित्रकलेची भाषा तयार होते पदन्यास आणि मुद्रांमधून नृत्याची भाषा तयार होते अर्थात त्या त्या कला समजून घेण्यासाठी विशिष्ट प्रकारची रसिकता आणि जाण आस्वादकाकडे असणे आवश्यक आहे म्हणून शास्त्रीय संगीताचा पूर्ण आस्वाद घेण्यासाठी ताल, सूर याची जाण असावी लागते साहित्याची भाषा हे लिखित स्वरुपाची प्रत्यक्ष असल्यामुळे ती भाषा अवगत असणाऱ्या व्यक्तीला त्यातील सौंदर्याचा आस्वाद घेणे शक्य असते लिखित स्वरूपातील किंवा बोलली जाणारी भाषा ही मूर्त स्वरूपाचे असते उदाहरणार्थ माणूस असे लिहिले व उच्चार आल्यानंतर एक व संदिग्ध व्यक्ती असा बोध आपल्याला होतो मग ती स्त्री आहे की पुरुष उंच की बुटकी सावळे आहे ते गोरे आदी तपशील तिथे आवश्यक ठरतात परंतु चित्रपटाची भाषा ही प्रत्यक्ष दृश्यातून व्यक्त होत असते त्यामुळे त्यात समृद्धता नसते पडद्यावर दिसणार या सर्व बारीकसारीक तपशील आम्ही चित्रपटात दाखवलेला माणूस हा व्यक्ती विशिष्ट असतो येथे अमूर्त त्याला मुळीच वाव नसतो हुबेहूब पण आहे या माध्यमांचे एकमेवाद्वितीय वैशिष्ट्य आहे त्यामुळे वास्तव त्याचे परिणाम चित्रपटाला लाभले असून प्रेक्षकांना तो ग्रहण करण्यास सुलभ जाते.

प्रत्येक भाषेला स्वत:ची अशी एक सुव्यवस्था राखण्यासाठी व्याकरण नियम असतात. लिखीत भाषा अक्षरे, वाक्ये, परिच्छेद या घटकांनी मिळून बनते. चित्रपटातही २४ प्रतिमांचे मिळून एक दृश्य, अनेक दृश्यांचा मिळून एक प्रसंग, अनेक प्रसंगाचा मिळून चित्रपट तयार होतो. म्हणजेच चल प्रतिमांच्या संचातून तयार होणारे दृश्य आपल्याशी संवाद साधते आणि अमुक दृश्यानं तर अमुक दृश्य यांच्या मांडणीतून नावे अर्थ व्यक्त होत असतात २०२० यांच्या एकत्रित ग्रहणा नंतर नवा सूचक अर्थ त्या दृश्यांना प्राप्त होत असतो याचा अर्थ अनेक चित्रपटाची भाषा म्हणजे काय याचा विचार करायचा झाला तर तो थोडा संवेदनशीलपणे आणि सूक्ष्मपणे करावा लागेल कारण चित्रपटातील संवाद म्हणजे केवळ चित्रपटाची भाषा नसून संवादा व्यतिरिक्त दृश्यातून प्रतिमा मधून काही विशिष्ट अर्थ ध्वनित केलेला

असतो म्हणूनच 'पुष्प' क सारख्या मुख्य चित्रपटात एकही संवाद नसताना हास्य आणि करून रसांचा परिपोष अतिशय यशस्वीपणे झालेला दिसतो.

चित्रपटांमध्ये एक कथा मांडण्याचा प्रयत्न केलेला असतो आणि ती कथा पात्रांच्या हावभाव बरोबरच संवादातून नाही व्यक्त होत असते संवादाचे चित्रपटातील महत्त्व निर्विवादपणे मान्य करूनही असे म्हणावे लागते की केवळ संवाद म्हणजे चित्रपटाची भाषा नव्हे वस्तुत: भाषेच्या पलीकडे जाऊन अभिव्यक्ती करणे हीच या माध्यमाची खरी ताकत आहे या चित्रपटांमध्येही क्षमता जेवढी जास्त प्रमाणात अभिव्यक्त झालेली असते तो चित्रपट तेवढा जास्त सार्वभौम व सार्वकालिक बनतो कलेमध्ये व्यक्त झालेली सर्जकता तेव्हाच खरी तीव्र संवेदनशील व कालातीत होते जेव्हा ती भाषा विचार आणि सांस्कृतिक परिवेशात यांच्या मर्यादा ओलांडून शुद्ध मानवी संवेदना बनते अशा कलाकृती समर होतात आणि त्यातून त्या स्वतःची भाषा सक्षम बनवितात सत्यजित राय यांचे चित्रपट म्हणूनही आज जगभर अभ्यासले जात आहेत.

दृष्य ही चित्रपटाची तारे भाषा असते. इथे संवेदनेला अधिक महत्त्व असते. संवेदनेची बोली ही भाषा नसून भाव असतो. हा भाव भाषेपेक्षा जास्त मुद्रा, हावभाव, हालचाली, पार्श्वभूमीसाठी वापरलेल्या निसर्गाचे मूड्स, प्रतिमा, प्रतिके, दृश्ये आणि पार्श्वध्वनी यांच्यातून प्रभावीपणे व्यक्त होत असतो. या सर्वांच्या बरोबरीने भाषा आली की चित्रपटाला चैतन्य प्राप्त होऊन त्यातील अर्थ अधिक गहिरेपणाने व परिपूर्णतेने अभिव्यक्त होतो. असे म्हणतात की, 'खामोशी की अपनी जुबान होती है' !

चित्रपटाच्या बाबतीत अनेक ठिकाणी मौनाला खूप महत्त्व प्राप्त होत असते. हे मौनच चित्रपटाची भाषा अधिक सशक्त बनवते 'बल्क' या चित्रपटात दृश्य भाषेचा वापर सुयोग्यपणे केल्यामुळे तो चित्रपट प्रभावी बनला आहे. चित्रपटात दृश्य भाषेचा वापरामध्ये संवादांची दृश्यांवर कुरघोडी होता कामा नये भाषेचा परिणाम प्रेक्षकांवर सक्षमतेने करणे यातून दिग्दर्शकाचे कौशल्यपणाला लागते. त्याची निर्मिती समजण्यास सर्वात सोपा असा आहे प्रकिया वआस्वाद प्रकिया सामुहिकपणे घडत असल्यामुळे इथे संवेदनशील चित्र भाषेला अधिक महत्त्व प्राप्त होते.

चित्रपट एक जनसंपर्काचे प्रभावी माध्यम आहे असे आपण जेव्हा म्हणतो तेव्हा चित्रपटाला स्वतःची प्रेक्षकांशी संवाद साधणारा एक भाषा असते भाषा म्हणजे समाजाने संवाद साधण्यासाठी निर्माण केलेली सांकेतिक व्यवस्था होय भाषा ही संकेत मधून निर्माण होत असते विशिष्ट घटकासाठी विशिष्ट संकेत सामाज स्वीकारतो व ते वारंवार वापरल्यामुळे रूढ होऊन भाषेचे घटक बनतात.

चांगल्या चित्रपट संगीता कैलास साहित्याची भाषेची जशी सखोल जाण असणे आवश्यक आहे तसेच त्याला चित्रपटाची ही एक जी विशिष्ट भाषा आहे ते अवगत असणे गरजेचे आहे प्रत्येक कलेची स्वतःची एक भाषा असते आणि तिच्याशी संबंधित काही संकल्पना ही प्रचलित असतात.

एकूणच साहित्याची भाषा हे लिखित स्वरुपाची प्रत्यक्ष असल्यामुळे ती भाषा अवगत असणाऱ्या व्यक्तीला त्यातील सौंदर्याचा आस्वाद घेणे शक्य असते लिखित स्वरूपातील किंवा बोलली जाणारी भाषा ही मूर्त स्वरूपाचे असते उदाहरणार्थ माणूस असे लिहिले व उच्चार आल्यानंतर एक व संदिग्ध व्यक्ती असा बोध आपल्याला होतो मग ती स्त्री आहे की पुरुष उंच की बुटकी सावळे आहे ते गोरे आदी तपशील तिथे आवश्यक ठरतात परंतु चित्रपटाची भाषा ही प्रत्यक्ष दृश्यातून व्यक्त होत असते त्यामुळे त्यात समृद्धता नसते पडद्यावर दिसणार या सर्व बारीकसारीक तपशील आणि चित्रपटात दाखवलेला माणूस हा व्यक्ती विशिष्ट असतो येथे अमूर्त त्याला मुळीच वाव नसतो हुबेहूब पण आहे या माध्यमांचे एकमेवाद्‌वितीय वैशिष्ट्य आहे त्यामुळे वास्तव त्याचे परिणाम चित्रपटाला लाभले असून प्रेक्षकांना तो ग्रहण करण्यास सुलभ जाते. साहित्याची भाषा आणि चित्रपटाची भाषा यांचा विचार करता असे लक्षात

येते की, साहित्याची भाषा ही फक्त वाचली जाते. मानवी हावभाव, निराग्रसता, सुख, दुःख या गोष्टी आपण बघू शकत नाही, पण चित्रपटात सर्व गोष्टी दृश्य रूपात बघू शकतो.

## निष्कर्ष :-

१. साहित्याची भाषा ही शब्दातून व्यक्त होत असते आणि चित्रपटाची भाषा दृश्यातून व्यक्त होते.

२. साहित्याचा आस्वाद ऐका वेळी एकाच व्यक्तीला घेता येतो तर चित्रपटाचा आस्वाद ऐका वेळी अनेक लोकांना घेता येतो.

३. साहित्याच्या तुलनेत चित्रपट हे अनेकांना अगदी निरक्षरांनाही उपलब्ध असू शकणारं असं 'जनमाध्यम'च आहे.

४. चांगल्या संहिता लेखकाला साहित्य भाषेची सखोल जाण असवी लागते तरच तो चांगला संहिता निर्माण करू शकतो.

५. संवाद म्हणजे केवळ चित्रपटाची भाषा नसून त्यापलिकडे अभिव्यक्ती करणे ही चित्रपटाची खरी ताकद आहे.

६. साहित्य भाषेला एक सुव्यवस्था राखण्यासाठी व्याकरण नियम आहेत, परंतु चित्रपट हा अनेक प्रतिमांचा मिळून बनलेला असतात.

७. लिखीत भाषा अक्षरे, वाक्ये, परिच्छेद या घटकांनी मिळून बनते. चित्रपटातही २४ प्रतिमांचे मिळून एक दृश्य, अनेक दृश्यांचा मिळून एक प्रसंग, अनेक प्रसंगाचा मिळून चित्रपट तयार होतो.

## संदर्भ ग्रंथ :-


१. अभिनय देव, कथा उलगडणे हीच चित्रपटाची भाषा, ई - सकाळ, २०११

२. प्रभा कुडके, साहित्य आणि चित्रपट, लोकसत्ता, १८ स्पटें. २००६

३. माधव शेळके, भारतीय चित्रपट, नीहारा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती,

४. पुष्पा भावे, पुस्तकाचे पान, लोकसत्ता, लोकरंग, रवि. २४ मे २००९

५. झनकर अनिल, सिनेमाची गोष्ट, राजहं प्रकाशन, पुणे, १९८७


❖❖❖

# आदिवासी कोलाम जमातीच्या संस्कृतीचे दर्शन घडविणारे भाऊ मांडवकर

संशोधक
दिपाली विजय ठावरी
डॉ. आंबेडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
चंद्रपूर
मो. नं ७०२११३२२०९

मार्गदर्शक
डॉ. मृदुला निळकंठ रायपूरे
डॉ. आंबेडकर कला, वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय, चंद्रपूर
मो. नं ९९७५०३३०२७

**बीजशब्द :—** कोलाम, जमात, लोकसाहित्य, संस्कृती

## सारांश :—

'कोलाम' हे भाऊ मांडवकर यांचे संशोधनात्मक पुस्तक १५ ऑगस्ट १९६६ रोजी प्रकाशित झाले. भाऊ मांडवकर यांच्या कोलाम या संशोधनात्मक पुस्तकातून कोलाम या आदिवासी जामातीच्या जीवनाचे संपुर्ण अवलोकन समाजसमोर मांडण्यात आले आहे. भाऊ मांडवकर ह्यांनी यवतमाळ जिल्हातील आदीवासी जमातीमधील 'कोलाम' ह्या जमातीच्या संस्कृतीचे चित्रण आपल्या पुस्तकातून केले आहे. त्यांनी कोलामांच्या राती—भाती, सण—उत्सव, विवाह, गावगाडा, मृत्यू प्रसंगी करावयाच्या विधी, देव—देवता, तसेच कोलामाचे संपुर्ण जिवण 'कोलाम' ह्या संशोधनात्मक लेखणातून मांडले आहे. अज्ञान, अशिक्षित समाज असलेल्या डोंगराळ भागात राहणाऱ्या या कोलामांच्या जगण्याचे सुक्ष्म अवलोकन भाऊ मांडवकर यांनी केले. भाऊ मांडवकर हे स्वत: ह्या कोलाम लोकांच्या पोडावर राहून त्यांच्या संस्कृतीचे निरिक्षण करून त्यांच्या संशोधणात्मक पुस्तकात मांडले आहे. आदिवासी जमातीतील 'कोलामंची संस्कृती ही सांस्कृतीक दृष्ट्या कशी प्रगत आहे. हे या प्रस्तुत संशोधणात्मक शोधनिबंधाचे उद्दिष्ट आहे.

## प्रस्तावना :—

महाराष्ट्रात सुमारे दोनशे वन्यजमाती राहतात, त्यांची नोंद प्रत्येक जिल्हात आहे. महाराष्ट्राच्या सर्वच भागात आदीवासी राहतात. विदर्भात गोंड, कोलाम, कोरकू, आंध, हलबा, कवर, कोल, धनवर, बिन्हूळ, मैना, बिंझवर, भत्रा, ओसओन, मुंजिया, कोया, नागासिया, धोती, माना, भिल्ल, परधान, माडिया, मुरिया इ. लहान मोठ्या जमाती राहतात. यापैकी गोंड, कोलाम, कोरकू, परधान आंध, माडिया, मुरिया, माना ह्या जमातीचे लोक विदर्भात मोठ्या प्रमाणात दिसून येते. यवतमाळ, अमरावती, चंद्रपूर या तीन जिल्हातील ह्या आदिवासींचे प्रमाण दिसून येते. तसेच ह्या जमातींचा वावर इतर आजूबाजूंच्या जिल्हांत दिसून येतो. ह्या जमातींचे मुख्य वास्तव्य म्हणजे डोंगराळ भा, नदी, काठाचे परिसरात जीवन जगणारे हे आदिवासी जंगली भूभागात जास्त राहतात. पारंपारिक आदिवासींच्या जगण्याचे साधन जंगली हेच आहे. हे लोक नागरी जिवणाशी अजूनही समरस तेवढ्या प्रमाणावर झालेले दिसत नाही. आदिवासींचे जनमापासून मृत्यूपर्यंतचे संपुर्ण संस्कार हे वैशिष्ट्यपुर्ण असे आहे. विदर्भातील आदिवासींच्या विभिन्न अशा पारंपारिक जीवनखुणा विदर्भाच्या सर्व भागांतल्या आदिवासींमध्ये आढळतात. त्या बाबतीत एकमेकांशी बऱ्याच जागी साम्य राखत असले तरी त्यांच्यात काही प्रमाणात फरकही फार आहे. त्यांच्यापैकी अनेक जमातींच्या भाषासुध्दा भिन्नभिन्न असून त्या भाषांची संख्यासुध्दा विपुल आहे.

## विषय विवेचन :—

लोकजीवन व लोकसाहित्याचा अभ्यास करून विचारवंत व अभ्यासकांना त्याची ओळख करून देणे व कोलाम या जमातीस या अनुषंगाने लोकभिमुख करणे या शोध निबंधाचे कारण आहे. यवतमाळ जिल्हातील जवळपास सर्वच तालुक्यात विखुरलेल्या कोलाम या आदिवासी जमातीच्या लोकजीवन व लोकसाहित्याचा अभ्यास

करताना केलेल्या संशोधनातून ज्या काही गोष्टी जाणवल्या त्या अशा की, इतर लोकजीवनासारखच पण थोडेचे आव्हाणात्मक जीवन त्यांचे आहे. लोकगीते, लोकविधी, लोककथा यांनी ओतप्रोत भरलेले आहे त्यांना त्यांच्या भटकेपणातच आनंद आहे. वेळप्रसंगी कंदमुळे खाऊन ते आपला उदरनिर्वाह करतात अत्यंत जाज्वल्य इतिहास त्यांचा आहे.

आदिवासी कोलाम जमात

भारतीय संस्कृतीही विविधतेने नटलेली आहे. या भूमीवर असंख्य जाती जमाती आपापल्या सांस्कृतीक वारस्याने जीवन जगत आहेत. महाराष्ट्राचा विचार करता देशातील इतर राज्यांच्या तुलनेत विविधता या राज्याच्या सर्व जाती जमातींनी समृध्द केल्याचे दिसून येते. या महाराष्ट्रात अनेक जिल्ह्यात वेगवेगळ्या जात जमातींनी आपआपल्या लोकजीवन व लोकसाहित्याच्या माध्यमातून पारंपारिक इतिहासाची जपवणूक केल्याचे दिसून येते.

परंपरेने हे लोक डोंगराळ भागात उतारा—पठावरावर शेती करून तसेच डोंगरी उत्पन्न यावर कशीबशी गुजराण करावी आणि जंगली वस्तू शेजारच्या मोठ्या गावी विकून रिकाम्या वेळी जगण्यासाठी धडपडावे असा या आदिवासींचा नित्यक्रम होता. निसर्गाच्या मोकळ्या वातावरणात वावरल्यामुळे दारिद्र्यातही संतुष्ट आणि बेफिकीर राहणारी ही जमात आहे. परंपरेने चालत आलेले जीवन जगणे, निसर्गाच्या सहवासात वावरणे, प्राकृतिक जीवनात आनंद मानणे अकृत्रिमतेचा स्वीकार करणे असे या जमातींचे जीवनमान या जमातीने त्यांच्या संस्कृतीतून त्यांच्या जीवनाला आकार दिला आणि त्यांचे समाजजीवन घडत गेले. त्यांचे लोकजीवन, दैवते, विधी, नाट्य, सण, उत्सव, रूढी, परंपरा, इ.चे अवलोकन केले असता ही जमात अत्यंत सांस्कृतिक दृष्ट्या श्रीमंत असल्याचे दिसून आले. कोलाम, नाईक, पोड, राजगोंड अशा मुख्य जमाती आहे. झामकोल, पोडगौन, बदडी, जांभोरा, कोलझरी अशी त्यांची आडनावे आहे. त्यावरूनच त्यांच्या गावाची नावे पडलेली ज्या आडनावाचे लोक त्या गावी राहत ते नाव गावाला पडलेले आहे. कोलाम लोक देवीची आराधना करतात. त्यांची श्रध्दा भवानीवर आहे त्यांच्यामध्ये पुजेच्या वेळी बळीदेण्याची प्रथाही आहे. महत्त्वाच्या सण, उत्सवाप्रसंगी तसेच मंगल कार्यासाठी देवकार्य नावाचे पूजा अर्जा करण्याचा प्रकार आहे. श्रध्देसोबतच त्यांनी अंधश्रध्दाही जोपासल्याचे दिसून येते. पण इतरांसाठी त्या जरी अंधश्रध्दा असल्या तरी त्यांच्यासाठी त्या श्रध्दाची आहेत. आजवर त्याच्यावर त्यांच्या जमातींतील कोणाही शिकून मोठ्या पदावर गेलेले आढळत नाही त्यांच्यात असे भाऊ मांडवकर यांनी संशोधनात मांडले आहे. त्यांनी त्यांना 'वेडी आणि बावळट जात' असे म्हटले आहे.

भारतीय समाजेतिहास मोठा विविधतेने नटलेला आहे. आदिवासी ते प्रगत अशी ती कालिक उत्क्रांती म्हणावी लागेल. परंतु बहुतांश जमाती मुख्य कालप्रवाहात आल्यास नाहीत त्याला विविध कारणे असतील रानावनात ती वनवन भटकणाऱ्या काही जमातींचा इतिहास तर संपन्नतेचा तसेच वैविध्यपुर्ण असलेला दिसून येतो. काहींनी नैसर्गिक ओढीने रानात राहणे पसंत केलं तर काही कारणांमुळे रानातच राहायला लागले. यातीलच एक जमात म्हणजे 'कोलाम' होय.

आदिवासी संस्कृती

भारतीय संस्कृती म्हणून आपण ज्या संस्कृतीचा अभिमान बाळगतो तिचा गाभा बऱ्याच प्रमाणात या जमातीमध्ये असल्याचे आढळून येते. सांस्कृतीकिकरणामुळे त्यांनी स्वतःच्या संस्कृतीत बदल केलेत आता त्यांनाही काही प्रमाणात पारंपारिक, सांस्कृतिक परिवर्तन केल्याचे निदर्शणास येते. लोकमानस ज्या अनेक प्रकारे अभिव्यक्त होते. त्यातूनच लोकसंस्कृतीची जडणघडण झाल्याचे दिसून येते. त्यामुळे लोकसाहित्याचा अभ्यास या लोकसंस्कृतीचा अभ्यास आवश्यक ठरतो.

लोकांच्या जीवन जगण्यातून निसर्गतः ज्या अनेक घटकांची निर्मिती होते तिच लोकसंस्कृती होय. त्यामुळे कृत्रिमता कुठेच आढळत नाही ती लोकबंधनातून व्यक्त होतांना दिसते. परंपरेने चालत आलेले जीवन जगणारे, निसर्गाच्या सहवासात वावरणारे, प्राकृतिक जीवनात आनंद मानणारे अकृत्रिमतेचा स्वीकार करणारे लोक म्हणजे लोकसंस्कृतीतील लोक असे स्थूलमानाने म्हणता येते. असे डॉ. शरद व्यवहार म्हणतात. विविध जमातींच्या लोकसंस्कृतीचाच विकास पावलेल्या लोकजीवनात अढळ स्थान असलेल्या काहींची लोकसंस्कृती ही भारतीय लोकसंस्कृतीचाच एक प्रादेशिक अविष्कार आहे. 'असे डॉ. रा. चि. ढेरे यांचे मत आहे. जसे संस्कृतीतून समाज

जीवन घडते तसा समाजाच्या जगण्यातून, संस्कृतीला आकार येत असतो. 'कोलाम' जमातीने त्यांच्या संस्कृतीतूनच त्यांच्या जीवनाला आकार दिला आणि त्यातूनच त्यांचे समाजजीवन घडत गेले असे लक्षात येते. त्यांचे लोकजीवन, दैवते विधी, नाट्य, सण—उत्सव रूढी, परंपरा इ. चं अवलोकन केले असता त्यांचीही संस्कृती त्यांचे ठिकाणी संमृध्द असल्याचे दिसून येते. कोलाम जमातीमध्ये चार गोत्र आहेत. यात चारदेवे, पाचदेवे, सहादेवे, सातदेवे,

१) टेकाम भिवईकर आत्राम किनारे जांभे

२) पाटोले येलके कसार पाडसीने

मडावी लोणसावळी कुंभेकार मसराम

मांगुर्ले देवमारे मादनी मोवरे धोटे लुंगसे नोचा बोरकर सकरापुरे

कोलाम जमातीत त्याच कुळात लग्न केले जात नाही उदा. चारदेवे — चारदेव्यांशी लग्न करू शकत नाही. तर इतरांशी करावे लागते. कोलाम जमातीमध्ये लग्नविधी अतिशय जोरदार थाटामाटात धार्मिक विधी करून केला जातो. लग्नविधीत रात्री नृत्ये व संवाद होतो 'सोंगाड्या , किंवा वेताळक' ही कामे करतो. लग्नाच्या रात्री अनेक गीते गायिली जातात. ही गीते लांबलचक व रसभरित असतात.

हाती शिदोरी
डोईवर घागर
खांद्यावर कुऱ्हाड
कोव्या डोंगरी —
जाऊ वो नाय

अशी गाणी, नृत्ये, सांगे ही लग्नप्रसंगी तसेच, गावबांधुणी, मोडडोंबरी यांसारख्या कोलामांच्या सणांच्या वेळी रात्री होतात.

कोलाम लोक देवाला मानतात. त्यांच्या भाषेत 'देव' या शब्दासाठी 'दियाम' आणि 'अय्याक' हे शब्द रूढ आहेत. झाडे, लाकडे, व दगडधोंडे यांना पुजणारे कोलाम देवदेवतांच्या पूजेअर्चेच कट्टर नियम पाळतात. देवांशी त्यांचे जीवन भावनेने श्रध्देने आणि निष्ठेने निगडीत आहे. देवसंबीचे सारे कार्य लोक 'भगत' च्या माध्यमातून करतात. या भगताच्या अंगात 'भिवसनदेव' येतो. त्याचे एक झोपडीत ठाणे असते. लोक त्याच्याकडे आपले दुःख घेवून जातात. त्याच्याकडे गेल्याने सर्व दुःख रोग दूर होतात. अशी लोकांची श्रद्धा आहे. महामारी, माता, यांसारखे साथीचे रोग आले तर तेव्हाही देवीची पूजा विधुक्त केली जाते. देवीला शेंदूर लावून कोंबडी — बकरे कापून दिले जाते. अशी प्रथाही कोलामात आहे. कोलाम जमातीमध्ये विविध स्त्री लिंगी, पुलिंगी देवतांना पुजले जाते. स्त्रीलिंगी — आया, बेक, कारायमेराम, मागकूबाई, लाळाबाई, भोवानी, भुताय, वाघाय इ. पुलिंगी — भीमाय्याक, सानुर्याक, पारध्योक, जयतुर, चाणखाण, कलासुही इ. प्रकारचे कोलामांच्या गुणवैशिष्ट्यांचाही परिचय त्यांच्या देवतांवरून मिळू शकते. कोलाम स्त्रिया स्वतंत्रपणे रीतीने सण साजरे करून कोंबडीचे पिल्लू वगैरे कापतात, यावरून त्या स्त्रिया निर्भय वृत्तीची, स्वतंत्ररित्या काम करतात. वाघाई, भुताई, माय्या, यांसारख्या त्यांच्या नित्य वस्तु—प्रतीक देवतांचे पुजन आहेत. भूताखेतांवरील श्रध्देची ती प्रतीके असून निसर्गमयाची भावणा अशा देवपुजेमागे असते. कोलाम लोक सण—उत्सव साजरे करतात त्यात चैत्र शु. (वर्षप्रतिपदा) यापासून सुरवात होते. बारा महिण्यात विविध सण साजरे करतात भाऊ मांडवकररांनी 'कोलाम' या ग्रंथात २४ सणांची माहिती सविस्तर संशोधन करून लिहीली आहे. त्यात फणमोडी, मोहडोंबरी, गावबांधी, माय्या चैत, मीमाय्याकाला बी देणे, बायबाकी दिवस भीमाय्याकाची आंघोळ, मौराम देवाचा उत्सव वाघाई पूजा, जयतूर देवाची पूजा, कारगुल व काष्टाफेडी, नागपंचमी, फुलझडणी, पोळा अतारी, अखरपख, दसरा, दिवाळी, मोहरम, 'मेटी दियाम' पेट्टा दियाम, आईची पुजा होळी.

हे सर्व सण—उत्सव कोलामात सामुहिक पणे पार पाडले जातात. विविध सण—उत्सवाप्रसंगी एकत्र येवून शिकार करणे व जंगलातून आणलेले शिकार भाजून घरोघरी वाटणे यातून त्यांची एकता दिसून येते. सण—उत्सवाप्रसंगी विविध देवतांची सोंगे घेवून नृत्य केले जाते. रात्रभर जागून नाचण्यात घालविली जाते आणि रात्र अपुरि पडल्यास दिवसालाही तेच केले जाते. नृत्यात सर्वच कोलाम आलटूनपालटून भाग घेतात. तरूण कोलाम

लुगडे नेसून स्त्रियांसारखा शृंगार करून नाचतात. 'दंडारी' हा नृत्याचा एक प्रकार आहे. हातभर लांबीच उर्फएक दांडू रांगेत उभे असलेल्या ७–८ जणांनी उजव्या हातात घ्यावा व तालावर एकमेकांच्या दांडूवर दांडू मारीत नाचावे ही दंडारीची कला कोलामांना चांगलीच अवगत आहे.

कोलाम इतर कलागुणातही हुशार आहेत. निसर्गातील गुंज–मणक्यांच्या वा बियांच्या माळा करून ते शृंगारसाधनामध्ये भर घालतात. मोरपिसांचे टोप, तसेच देवांचे व गुरांचे साज ते तयार करतात. कोलामाचे मुख्य वाद्य म्हणजे 'डफ' आहे. कोलामी भाषेत 'डफास' ताप्पारे असे म्हणतात डफ कोलाम स्वत:च तयार करतात. लाकडी वेटोळीवर बकरा, हरीण, सांबर, यांचे कातडे लावले जाते. डफाबरोबर 'पावा' हे वाद्ये वाजविले जाते. विविध प्रसंगी ही वाद्ये वाजविली जातात कोलमांच्या स्वतंत्र वस्तीप्रमाणे त्यांची न्यायव्यवस्था ही स्वतंत्र आहे. कोलाम जमातीचे एक न्यायमंडळ असते, त्याच 'पंचमंडळ म्हणतात कोलामाचे आपसातील न्यायनिवाडे त्यांच्या जातीच्या पंचाकडूनच होत असतात. कोलाम परंपरेमुळे आदराने या व्यवस्थेकडे पाहते. आजचे जीवन गुंतागुंतीचे होऊनही कोलाम जमात आपसातील तक्रारी न्यायालयात घेवून जात नाही. नाईक हा अध्यक्ष असतो, महाजन कारभारी, घट्या अशा व्यक्ती न्यायमंडळात असतात. वेगवेगळ्या गुन्हाला वेगवेगळी शिक्षा केली जाते. त्यांच्यात वाळीत टाकण्याचेही काही प्रकार आहेत.

अशा प्रकारे 'कोलाम' या संशोधनात्मक पुस्तकातुन भाऊ मांडवकर 'कोलाम' जमातीचे त्यांच्या लोकसाहित्याचे दर्शन हे वरीलप्रमाणे घडवितात. आजही या समाजात अंधश्रध्दा, व्यसणे, जीवघेण्या रूढी, प्रथा, परंपरा इ. ना त्यांच्या आयुष्यातून हद्दपार करण्याची गरज आहे. त्यामुळेच ते इतरांपेक्षा बहुतांश प्रमाणात मागे राहिलेले आहे. अंधश्रद्धेमुळे ते दवाखान्यात न जाता 'भगतांकडे' आजही जातात नवस करता, कोंबडी बकरे कापतात. त्यांच्यात जागृकता निर्माण करण्याची गरज आहे.

## निष्कर्ष :–

१) डॉ. भाऊ मांडवकर यांनी आपल्या साहित्यातून कोलाम संस्कृतीचे दर्शन हे अतिशय जिव्हाळयाने घडविलेले आहे. इतर लेखकांच्या तुलनेत त्यांनी कोलाम संस्कृतीचा अतिशय सुक्ष्म रितीने अभ्यास करून आपल्या साहित्यात मांडलेला दिसून येते.

२) कोलाम जमातीची संस्कृती ही वैशिष्टयपुर्ण आहे. कोलाम संस्कृतीवर संशोधन केल्यास त्यांच्याकडून खूप काही नविन संशोधकांना शिकण्यासारखे आहे.

३) कोलाम जमातीचे लोकसाहित्य हे उच्च कोटीचे आहे याची माहिती मिळते.

## संदर्भ :–

१) डॉ. शरद व्यवहारे – लोकसाहित्याचा अंत:प्रवाह पृ. ०६
२) डॉ. रा.चि.ढेरे – मराठी लोकसंस्कृतीचे उपासक पृ–१४४
३) डॉ. भाऊ मांडवकर – कोलाम
४) डॉ. नलिनी पाटिल – भाऊ मांडवकर समग्र खंड ३
५) डॉ. प्रभाकर मांडे – 'लोकसाहित्याचे स्वरूप'
६) डॉ. भाऊ मांडवकर – आदिवासी आदीजन

❖❖❖

# भटक्या विमुक्त समाजाची कला

प्रा. डॉ. विजयकुमार खंदारे
मराठी विभागप्रमुख
इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव दाभाडे,
ता. मावळ, जि. पुणे
मोबा. ९४२२५६९२४९ Mail ID: hodmarathi@gmail.com

**बीजशब्द:**
वाघ्या, मुरळी, डवरी, गोसावी, नंदीवाले, पोतराज, बहुरूपी, कोल्हाटी, डोंबारी, गोपाळ, गारुडी, वासुदेव, माकडवाले, दरवेशी, गोंधळी, तुळजाभवानीचे भुते, धनगर, चित्रकथी, कळसुत्री बाहुल्या, भराडी, 'ढोलकं', 'दिमडी', 'तुणतुणे', 'पुंगी', 'बासरी', 'पुंगी', 'डमरू', 'कोल्हाटी', 'ढोलकं', 'पोतराज', 'हलगी', 'झांजरी' देऊळवाले, पांगुळ, बाळ संतोषी, 'मेढंगी', 'जोशी', 'पिंगळा जोशी', 'कुडमुडे जोशी', 'नंदीबैलवाले', 'तिरमाळी', मेंढगी, 'रायरंद', 'डोंबरी', 'डफ', 'करपल्लवी', 'नेत्रपल्लवी', भटके, विमुक्त.

## प्रास्ताविक:

भटक्या विमुक्तांमध्ये काही जाती–जमातीत जन्मजात कलावंत आहेत. वाघ्या, मुरळी, डवरी, गोसावी, नंदीवाले, पोतराज, बहुरूपी, कोल्हाटी, डोंबारी, गोपाळ, गारुडी, वासुदेव, माकडवाले, दरवेशी, गोंधळी, तुळजाभवानीचे भुते, धनगर, चित्रकथी, कळसुत्री बाहुल्यावाले, भराडी, देऊळवाले, पांगुळ, बाळ संतोषी आदी नावांची जंत्री सांगता येते. या जमातीतील कलावंतांना कलेचे अंग असल्याचे दिसून येते. पण त्यांच्यासाठी स्वतंत्र व्यासपीठ उपलब्ध नाही, ही खेदाची वस्तुस्थिती आहे. त्यामुळे त्यांच्याकडे असलेल्या कलागुणांना वाव मिळत नाही. पोतराज, वाघ्या, मुरळी, वासुदेव, अशा काही बोटावर मोजता येईल अशा मोजक्याच कलावंतांना दूरदर्शन, आकाशवाणी या माध्यमावर थोडेफार प्रतिनिधित्व मिळत आहे. मात्र बाकीचे कलावंत आजही उपेक्षितच आहेत.

## विषय विवेचन:

भटक्या विमुक्तांमधील काही जाती–जमातीतील लोकांना वाद्य वाजवण्याची कला अवगत असते. जसे वाघ्या–मुरळी यांना 'ढोलकं', 'दिमडी', 'तुणतुणे' तर गारूडींना 'पुंगी', 'बासरी', 'पुंगी', 'डमरू' आदी. कोल्हाटींना 'ढोलकं', गाणी म्हणणाऱ्या पोतराजाकडे 'हलगी', 'झांजरी' इत्यादी. ही मंडळी वाद्य वाजविण्यात निपुण असतात. याशिवाय या जाती जमातीतील बरेच लोक 'बँड' देखील वाजवतात. याविषयी लक्ष्मण माने 'उपरा'त म्हणतात, ''आता बेंडात मी ढोल वाजवीत होतो. ढोल वाजविताना मी रंगून जायचो. ती आमची जन्मजात कला हुती.''[१]

कसरतीचे प्रयोग करणे ही 'डोंबरी' समाजाची परंपरेने चालत आलेली कला आहे. विशेषतः लहान मुले आणि स्त्रिया हेच कसरतीच्या प्रयोगातील मुख्य आकर्षण समजले जाते. स्त्रीने किंवा मुलीने तारेवर चालणे, बाटलीवर फळी ठेवून उभे राहणे, किंवा वेगवेगळ्या प्रकारच्या उड्या मारणे. लोखंडी गोलातून दोन शरीर बाहेर काढणे. त्यांच्या शरीराचा लवचिकपणा हेच या खेळातील मुख्य आकर्षण असते. तसेच लहान मुलांना उंच हवेत फेकणे, तळ हातावर उंच काठी उभी करून मुलाला त्या काठीवर तरंगत ठेवणे, असे त्यांचे खेळ असतात. याविषयी रामनाथ चव्हाण म्हणतात, ''डोंबाऱ्याचा खेळ मुख्यतः लहान मुलांच्यावरच अवलंबून असल्याने मूल जन्माला आल्यानंतर दोन ते तीन महिन्यानंतर लगेच त्या बाळाच्या अवयवांना लवचिकता आणण्याचे प्रयत्न केले जातात. लहान वयातच त्याच्या शरीराची हवी तशी हालचाल करून घेतल्याने चार–पाच वर्ष ते मूल त्या खेळात तरबेज होते.''[२]

परंपरेने चालत आलेल्या विशिष्ट कलागुणांच्या आधारे जे लोकसमूह गावोगावी जाऊन आपला चरितार्थ चालवितात, त्या समूहापैकी 'कोल्हाटी' हा समाज महाराष्ट्रात 'कलावंत समाज' म्हणून ओळखला जातो. या समाजातील महिला नाच—गाण्यांचा व्यवसाय करतात. पूर्वी महिला आणि पुरुष मिळून गावोगावी कसरतीचे प्रयोग करताना आढळतात. पारंपरिक कला हेच या समाजाचे चरितार्थाचे प्रमुख साधन मानले जाते. बदलत्या काळानुसार या समाजाने आपली उपजीविकेची माध्यमे बदलली आहेत. आता कसरतीचे खेळ करण्यापेक्षा नाचगाणी करूनच आपली उपजीविका हा समाज करताना दिसत आहे. त्यांनी स्वत:चे तमाशाचे फड, संगीत बारी काढलेल्या आहेत. पुरुष मंडळी सुद्धा तमाशा, संगीत बारी करताना आढळतात. काहींनी या कलेत चांगलेच नाव मिळवले आहे. असे जरी असले तरी या समाजातील स्त्रियां आपली व्यथा बोलून दाखवताना म्हणतात, ''मान्सं आपली कला बघत नाहीत. कलावंतीनीला (नाचणरणीला) बघाया येत्यात. या धंद्यात जवर जवानी, तवर सुगी अस्ती.''[३]

वर्षानुवर्ष भटकंती करणारा 'रायरंद' हा समाज महाराष्ट्रात प्रसिद्ध कलावंत म्हणून ओळखला जातो. आपल्या सोंगाढोंगाच्या खेळात ते उंटालाही सहभागी करून घेतात. त्यांच्या खेळात संवाद, पुराणकथा आणि गाण्यांचा समावेश असतो. 'डफ' हे त्यांच्या खेळातली प्रमुख वाद्य असून डफाच्या विशिष्ट ठेक्यावर 'बाजीराव नाना, आता तुंबडीभर दे ना...' अशा प्रकारची गाणी गाउन लोकांचे मनोरंजन करतात. हे लोक बोलण्यात अत्यंत पटाईत व हजरजबाबी आणि विनोदी असतात.

'ज्योतिष' सांगण्याची कला अवगत असलेल्या भविष्य सांगणाऱ्या काही भटक्या जाती आहेत. त्यामध्ये 'मेढंगी', 'जोशी', 'पिंगळा जोशी', 'कुडमुडे जोशी' याशिवाय 'नंदीबैलवाले', 'तिरमाळी', मेंढगी इत्यादी जातींचा समावेश होतो. भविष्य सांगणे ही या समाजाची पारंपरिक कला आहे. एवढेच नव्हे तर ''ही कला म्हणजे आम्हाला देवाने दिलेली खास देन आहे,'' असे यांच्यातील काही मंडळी अभिमानाने सांगतात. पूर्वी ग्रामीण भागात समाजात असणारी या जमातींची लोकप्रियता आज म्हणावी तितकी पाहावयास मिळत नाही. 'ब्राह्मण' या जातीतील जोशीसारखीच भविष्य सांगून जीवन जगणारी ही जमात आहे. पंचांग कळत नाही तरी ते जवळ बाळगायचे, पिंगळा पक्षाचीच काय पण कुठल्याच पक्षाची भाषा त्यांना कळत नाही, तरीही ती कळते असे ते भासवतात. याविषयी प्रा. वासुदेव मुलाटे म्हणतात, ''ब्राह्मण, जोशी यापेक्षा वेगळे काय करतात? मात्र या जमातीत एक मूलभूत फरक असा आहे की ब्राह्मणांनी आपल्या धंद्याला धर्माधिष्ठित समाजप्रतिष्ठा मिळवून घेतली. जगण्याची सोय करून घेतली. तसे या कुडमुडया जोशांचे नाही.''[४]

'ओतारी' या समाजाला मोगल काळात महत्त्वाचे स्थान होते. तत्कालीन संस्थानिकांच्या दरबारात या समाजाला कलावंत म्हणून मोठी प्रतिष्ठा होती. युद्धासाठी लागणारी शस्त्रसामग्री ही मंडळी आपल्या परंपरागत हस्त कौशल्याने तयार करीत असत. प्रामुख्याने युद्धाला उपयुक्त असणाऱ्या मोठ्या तोफा तयार करण्याचे काम हा समाज करीत असे. त्यामुळे राजदरबारी 'खास कालावंत' म्हणून त्यांचा गौरव होत असे. त्यांना मोठमोठी बक्षीसेही दिली जात असत.

पुढे काळाच्या ओघात मात्र 'ओतारी समाजाची अवस्था अत्यंत दयनीय झाल्याचे दिसून येते. एकेकाळी राजाचा आश्रित असणारा हा कलावंत समाज आज इतर समाजाच्या वळचणीला उभा राहिला आहे. आज तो दारोदारी भटकत असताना आपल्याला दिसून येतो. त्यांची परंपरागत कला हीच या समाजाचा आजच्या जगण्याचा प्रमुख आधार आहे. त्यांनी आपल्या अंगी असणाऱ्या कलागुणांचा उपयोग परिस्थितीच्या बदलानुसार केला. तोफा तयार करणारा हा समाज पोटासाठी भांडयांना कल्हई करून उपजीविका करताना दिसत आहे. पूर्वीच्या काळी पंचधातू ओतून देवादिकांच्या मूर्ती तयार करणारा हा समाज नंतर जस्त हा धातू ओतून पोळपाट, चमचे, उलथने तयार करू लागला. काळाच्या ओघात यंत्रसामग्रीमुळे आणि औद्योगिकीकरणामुळे हस्तकला मागे पडली आणि पिढ्यानंपिढ्या हस्तकलेवर काळ गाजविणारे असे अनेक कलावंत समाज आज पोटासाठी भटकंती करताना दिसून येत आहेत, टिचभर पोटाची खळगी भरण्यासाठी त्यांना आजही उपेक्षेचे जीवन जगावे लागत आहे, खरे तर ही खेदाची बाब आहे.

## सारांश:

थोडक्यात काय तर आजही बहुतांश भटक्या जाती जमातीतील लोक देव देवतांची गाणी गाऊन भिक्षा मागतात. काही जमाती कसरतीचे, हालचलीखीचे, करमणुकीचे खेळ करून भिक्षा मागतात. काही जमाती बैल, साप, माकड, अस्वल, पोपट वगैरे प्राण्यांचा कलात्मक उपयोग भिक्षेसाठी करतात. नाच–गाणे, भविष्य सांगणे, कर पल्लवी, नेत्र पल्लवीच्या आधारे निरोप ओळखणे, ताल, सूर शब्दांचा वेध घेऊन लपवलेली वस्तू किंवा गुप्त ठिकाण ओळखणे वगैरे कलांचा उपयोग काही जमाती भिक्षेसाठी करतात. काही जमाती वनऔषधी किंवा लहान मुलांसाठी पानाफांद्यांची खेळणी बनवून त्यांचे वाटप करून भिक्षा मागतात. अशा प्रकारे उपेक्षांना तोंड देत 'विंचवाचे बिऱ्हाड पाठीवर' या पद्धतीने हा समाज जीवन जगतो आहे.

ज्या भटक्या जमातींनी काळानुरूप बदल करून घेतले, त्यांची कला आज टिकून आहे. काळ बदलला, लोकांची अभिरुचीही बदलली. चित्रपट जमान्यामुळे भटक्या विमुक्तांच्या कलागुणांवर फार मोठे गंडांतर आले. त्यामुळे आज भटक्या विमुक्तांची कला कालबाह्य होताना दिसून येते.

## संदर्भग्रंथ:

१. लक्ष्मण माने, 'उपरा', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई १९८०, पृष्ठ ९१.
२. रामनाथ चव्हाण, 'भटक्या विमुक्तांचे अंतरंग', सुगावा प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती, जानेवारी १९८९, पृष्ठ ६८.
३. रामनाथ चव्हाण, 'वेदनेच्या वाटेवरून', माझ्या पायातला चाळ आता शेवटचा, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड, पुणे ३०, प्रथम आवृत्ती २०००, पृष्ठ ५७.
४. वासुदेव मुलाटे, 'दलितांची आत्मकथने: संकल्पना व स्वरूप', स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, प्रथम आवृत्ती जानेवारी १९९९, पृष्ठ १५७.

❖❖❖

# उच्च शिक्षणातील समस्या

**प्रा. डॉ. उज्ज्वला भोर**
प्र. प्राचार्य
एस.एस.जी.एम. कॉलेज, कोपरगाव

'न ही ज्ञानेन सदृश्यम पवित्र मिह विद्यते' हे भगवद्गीतेतील वचन भारतीय समाज परंपरेतील ज्ञानाचे महत्त्व सिद्ध करणारे आहे. ज्ञानाशिवाय पवित्र दुसरे काही नाही या जाणीवेतूनच ज्ञानदान व ज्ञान संवर्धन करणारी गुरुकुल शिक्षण पद्धती भारतात अस्तित्वात आली. परंतु, तत्कालीन समाज नियमन आणि मर्यादांनी ती सार्वत्रिक शिक्षण देणारी होऊ शकली नाही.

ब्रिटिश राजवटीकालीन समाज प्रबोधन युगात ज्ञानदानाची ही जाणीव तीव्र होऊन राजर्षी शाहू, महात्मा फुले यांसारख्यांकडून ती सार्वत्रिक होण्याची गरज अधोरेखित केली गेली. शाहू, फुले यांनी स्वकृतीतून त्याची सुरुवातही केली. त्यांच्या या प्रयत्नांना मिशनरी संस्था व ब्रिटिश सरकारची जोड मिळाली. बालकांच्या विकासाबरोबरच तरुणांच्या विकासाचे महत्त्व ध्यानी येत गेले. यातूनच पुढे १८५७ ला मद्रास,कोलकाता आणि मुंबई ही उच्च शिक्षणाची सुविधा पुरविणारी विद्यापीठे उदयाला आली. १८८२ ला भारतीय शिक्षण आयोग अस्तित्वात येऊन त्याच्या शिफारशीनुसार भारतातील शिक्षणाची दिशा व स्वरूप निश्चित केले गेले.

स्वातंत्र्योत्तर काळात 'शिक्षण हेच राष्ट्राच्या विकासाचे इंजिन' आणि १८ ते २३ वयोगटातील 'तरुण हीच राष्ट्राची शक्ती' असल्याची बाब विचारवंत व शिक्षण तज्ज्ञांच्या मनी रुजत गेली. त्यांच्या सूचनेवरून भारतीय नेतृत्वानेही उच्च शिक्षणाचे स्वरूप ठरवून, भारताच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या उच्च शिक्षणाला योग्य दिशा देण्यासाठी शिक्षण आयोगाची निर्मिती केली. यातूनच 'राधाकृष्णन आयोग', 'कोठारी आयोग', 'नॅशनल कमिशन फॉर टीचर्स', 'नॅशनल पॉलिसी ऑफ एज्युकेशन' असे विविध आयोग अस्तित्वात आले आणि आता २०२० मध्ये जाहीर झालेले, क्रांतिकारी बदलाचे स्वप्न दाखविणारे नवे शैक्षणिक धोरण लवकरच अंमलात येत आहे.

ही सर्व पार्श्वभूमी व शिक्षण क्षेत्राच्या वाटचालीवर दृष्टीक्षेप टाकला असता, भारताने उच्च शिक्षणाबाबत केलेली प्रगती जशी दिसून येते; तशाच काही समस्याही सामोरे येतात.ऑन्युअल स्टेस ऑफ एज्युकेशन रिपोर्ट अर्थात, 'असर'सारख्या मुल्यांकन संस्थांच्या अहवालातूनही त्या वेळोवेळी दृगोचर होतांना दिसतात. राष्ट्राची शक्ती बनणारे तरुण घडविण्यासाठी, त्यातून गांधीजींच्या स्वप्नातील उत्तम माणूस निर्माण होण्यासाठी आणि डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे भारताला महासत्ता बनविण्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरविणारे नागरिक तयार होण्यासाठी उच्च शिक्षणातील या समस्या जाणून घेणे आणि त्यांच्या सोडवणुकीच्या दृष्टीने योग्य ते बदल घडवून आणणे आवश्यक आहे. या समस्यांच्या सोडवणूकीतूनच राष्ट्रीय उत्थानाची प्रक्रिया आकार घेऊ शकते.

## १) विद्यार्थी व पालकांचा दृष्टिकोन :-

प्राचीन कालीन गुरुकुल शिक्षण पद्धतीत 'अज्ञानाच्या अंध:कारातून ज्ञानाच्या प्रकाशाकडे नेणारी प्रक्रिया म्हणजे शिक्षण', असा शिक्षण विषयक दृष्टिकोन होता. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या बुद्धीची जोपासना

करून त्याला स्वावलंबी आणि समाज उपयोगी तसेच चारित्र्यसंपन्न, उत्तम नागरिक बनविणे हे शिक्षण प्रक्रियेचे उद्दिष्ट होते. त्या पातळीला उतरेपर्यंत त्याला घडविणाऱ्या अध्यापन व मूल्यमापन पद्धती होत्या. 'व्यक्तीचे सर्वांगीण परिवर्तन म्हणजे शिक्षण','शिक्षण म्हणजे उत्तम नागरिक बनविणे',शिक्षण म्हणजे लहान व असहाय्य प्राण्याला सुखी,नीतिमान व कार्यक्षम बनण्यास मदत करणे',जीवनाच्या सर्व व्यवहारांकरिता महत्वाचे असणारे ज्ञान,कौशल्य व जाणीव संक्रमित करणारे संघटीत व सातत्याचे अध्यापन म्हणजे शिक्षण'......इत्यादी व्याख्या याच्याच निदर्शक आहेत. मात्र, कालांतराने विद्यार्थी, पालकांबरोबरच शिक्षण क्षेत्रातील विविध घटकांचाही दृष्टिकोन बदलत गेला. भाकरी आणि नोकरी देणारया पाठांतरित शिक्षणाचे महत्त्व वाटू लागले. परिणामी ज्ञानात्मक दृष्टिकोन बाजूला पडला. त्यातून, "विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली। नितीविना गती गेली, गती विना वित्त गेले।वित्ताविना शुद्र खचले,इतके अनर्थ एका अविद्येने केले.।" हे महात्मा फुले यांनी सांगितलेले सूत्र नव्याने दुष्परिणाम स्वरूपात अनुभवाला येत आहे. शिक्षण हे साध्य नसून चारित्र्यवान नागरिक घडविण्याचे, त्याग आणि सेवाभाव रुजवून बलशाली भारत निर्मितीचे साधन आहे, हेच विसरले गेले आहे. 'शिकले तेवढे हुकले' हा सामाजिक समज सार्वत्रिक स्वरूपात दृढ होत आहे.

## २) घोका व ओका' पद्धतीचा प्रभाव–

ब्रिटिश राजवटीत भारतीयांना शिक्षण देण्यासंबंधाने निर्णय घेणाऱ्या 'कमिटी ऑफ पब्लिक एज्युकेशन' चे अध्यक्ष थॉमस बॅबिंग्टन मेकॉले यांनी २ फेब्रुवारी १८३५ रोजी गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम बेटिंग यांना एक अहवाल सादर केला.त्याला मान्यता मिळून भारतात औपचारिक शिक्षण पद्धतीची सुरुवात झाली. मात्र पाश्चात्य वाङ्मय आणि शास्त्रांचा प्रसार तसेच इंग्रजी माध्यमातून शिक्षण या बाबींना प्राधान्य असल्याने आकलन आणि उपयोजनाऐवजी 'घोका आणि ओका' या प्रकारची शिक्षण पद्धती अस्तित्वात आली.ही पद्धत प्रामुख्याने ब्रिटिश प्रशासनाला उपयोगी असे सामान्य पातळीवरचे सेवक किंवा नोकर पुरविणारी ठरली. त्यातून 'शिक्षण = सरकारी नोकरी' असे समीकरण दृढ झाले. कालांतराने, स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षण प्रक्रियेत सुधारणा घडविणारे विविध आयोग आले. तरी देखील या पद्धतीचा प्रभाव कमी झाल्याचे म्हणता येत नाही. खाजगी क्लासेसचे फुटलेले पेव, घोकंपट्टी करून घेत पोपटपंची विद्यार्थी बनविणारे शिक्षण, मार्कांच्या टक्केवारीतून दिसणारी सूज हे याचेच निदर्शक म्हणता येईल. सध्या तर उच्च शिक्षण घेऊनही नोकरी मिळत नसेल तर शिकायचेच कशाला? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. आणि उच्च शिक्षणाच्या गळतीचे हेच एक व मुख्य कारण बनले आहे.

## ३) कुशल व गुणवत्तायुक्त विद्यार्थी निर्मितीची समस्या:-

कोणत्याही देशाचा विकास त्या देशातील उच्च शिक्षणाचे प्रमाण व गुणवत्तेवर अवलंबून असतो. त्यामुळे शिक्षण प्रणाली आखताना विद्यार्थी हा चांगला नागरिक, विज्ञाननिष्ठ आणि अखंड ज्ञानलालसा असलेला असावा, अशी उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवली जातात. आज भारतातील शिक्षण व्यवस्था जगातील दुसऱ्या क्रमांकावरील व्यवस्था असल्याचे सांगितले जाते या व्यवस्थेत १०४३ विद्यापीठे, ११९२३ उच्च शिक्षण संस्था, ३९ ९३१ महाविद्यालये आणि ०३कोटी ८४ लाख विद्यार्थी संख्या अशी आकडेवारी असल्याचे ए. आय .एस .एच इ २०१९ चा अहवाल सांगतो.असे असतानाही 'दैनिक लोकसत्ताने' प्रसिद्ध केलेल्या बातमीनुसार (१३ मे २०१३) जागतिक क्रमवारीत पहिल्या २०० मध्ये भारताचे एकही विद्यापीठ

नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे भारतीय शिक्षण व्यवस्थेला अजूनही विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती आणि अभिनवता रुजवता आलेली नाही. परिणामी एका बाजूला उच्च शिक्षित बेकारांचे बाहेर पडणारे लोंढे आणि फुगत चाललेली बेकारांची संख्या तर दुसरीकडे कुशल व गुणवत्तायुक्त मनुष्यबळाअभावी आकसलेले उद्योग- व्यवसाय, गती मंदावलेल्या कंपन्या ,कारखाने, शेती उद्योगाची दुरावस्था हे वास्तव आहे.

## ४) भारतातील गरिबी आणि निधीची कमतरता-

ज्ञान संक्रमण, ज्ञान संवर्धन आणि ज्ञान निर्मितीसाठी उच्च शिक्षण अतिशय गरजेचे असते. असे असूनही १८ ते २३ या उच्च शिक्षण गटाचे एकूण प्रमाण २७.१ % एवढेच आहे. म्हणजे ७३% टक्के युवकांना महाविद्यालयात जाण्याची संधीच मिळत नाही. यामुळे सुमारे १२ कोटी युवक - युवती उच्च शिक्षणापासून वंचित राहतात. नवीन शैक्षणिक धोरणात उच्च शिक्षण प्रवेशाचे प्रमाण २०३० पर्यंत ५० टक्के करण्याचे उद्दिष्ट आहे. मात्र त्यासाठीच्या सुविधा व तरतुदींची व्यवस्था झालेली पहावयास मिळत नाही. कारण १९६८ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये शिक्षणावरील खर्च एकूण देशांतर्गत उत्पन्नाच्या सहा टक्के पर्यंत नेण्याची शिफारस करण्यात आली असली तरी, अद्याप पर्यंत कधीही हा निधी पूर्ण क्षमतेने दिला गेलेला नाही. याउलट तो प्रत्यक्ष खर्च तरतुदीनुसार २०१९-२० व २१ला ०.४४,२०२१-२२ ला ०.३८ आणि २०२२-२३ ला ०.३६ याप्रमाणे ३ टक्के व त्यानंतर कमी होत जाऊन कोरोना महामारीच्या परिस्थितीत ९९,३११ कोटींवरून ९३ हजार २२४ कोटीवर आलेला आहे." राज्यातील विद्यापीठे मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करत असली तरी त्यांना मिळणारे अनुदान / निधी हा केंद्रीय संस्थांना मिळणाऱ्या अनुदानाच्या तुलनेने काही अंशीच मिळतो. बऱ्याच वर्षांपासून काही राज्य उच्च शिक्षणासाठी पुरेशा निधीची तरतूद करू शकत नाहीत. राज्यांचा उच्च शिक्षणावरील नियोजनबद्ध खर्च हा जवळजवळ मंदावलेला आहे. परिणामतः राज्य विद्यापीठांमधील पायाभूत सुविधा, अध्यापन इत्यादी गोष्टी या स्वीकारार्ह दर्जाच्याही पलीकडच्या आहेत"असे मत डॉक्टर व्ही. बी.गायकवाड यांसारख्या तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. विद्यापीठ अनुदान मंडळाच्या २००७-०८ मधील एका अभ्यासानुसार भारतातील दारिद्र्यरेषेखालील ग्रामीण कुटुंबांचे उच्च शिक्षणातील प्रमाण अवघे २% आहे. याचे कारण डॉ. सुधीर गव्हाणे यांच्या मते बालमजुरीची अपरिहार्यता व सामाजिक आर्थिक दुर्बलतेने शिक्षणातून होणारी गळती हे आहे. आजही खेड्यापाड्यांतील खुल्या संवर्गातील गरीब वा मध्यमवर्गीय मुलेही उच्च शिक्षण घेऊ शकत नाहीत. कारण देशातील ७८ % महाविद्यालये खाजगी आहेत. या महाविद्यालयांचा भर विद्यार्थी फी तून खर्च भागविण्यावर असतो. मात्र त्यासाठी महाविद्यालयांनी आकारलेली फी दारिद्र्यरेषेखालील व मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांना परवडणारी नसते. परिणामतः त्याला उच्च शिक्षणापासून वंचित राहावे लागते.

आज सर्वच क्षेत्रांप्रमाणे शिक्षण क्षेत्रावरही माहिती तंत्रज्ञानाचा, डिजिटलाईजेशनचा प्रभाव आहे. एज्युसॅट उपग्रह, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग अशा उपकरणांद्वारे मोठ्या भूभागावर पसरलेल्या अफाट लोकसंख्येच्या भारतासाठी असे दूरप्रणालीद्वारे दिले जाणारे शिक्षण उपयुक्त ठरणारेही आहे. पण यासाठीच्या सेवा सुविधांची उपलब्धता करून देण्यासाठीची तरतूद विद्यापीठे व महाविद्यालयात नाही. आणि आर्थिक परिस्थितीबरोबरच भौतिक, तांत्रिक सुविधांच्या अभावी विद्यार्थ्यांना ते प्राप्त होऊ शकत नाही .अशा दुष्टचक्रात आजची उच्च शिक्षण व्यवस्था अडकलेली आहे.

## ५) असमानता / भेदाभेद-:

भारत हा जसा विविधतेने नटलेला देश आहे तसाच, विविध जाती, धर्म,स्तर यात विभागला गेला आहे. अशा विखंडित भारताला अखंडित करण्याचे, सर्वांच्या सुप्त क्षमतांचा विकास करून त्यांच्या उत्थानाचे साधन म्हणून शिक्षण ही चळवळ स्वरूपात प्रत्यक्षात आणण्याचे काम राजर्षी शाहू, महात्मा फुले, डॉक्टर आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील अशा अनेक धुरिणांनी केले आहे. त्यातून उच्च शिक्षणाचा विस्तारही झालेला दिसतो. मात्र, यात समानतेचे तत्त्व पाहायला मिळत नाही.सध्या महाराष्ट्रात ५ लाख विद्यार्थी आश्रमशाळांत शिकतात.पण त्यांच्या उच्च शिक्षणाची सोय नाही.तसेच,आश्रमशाळेच्या पायाभूत सुविधा /पट कमी असलेल्या शाळा बंद करण्याचे धोरण शासनाकडून वारंवार राबविले जाते.एकलव्य शिक्षण चळवळीचे राजू केंद्रे यांच्या म्हणण्यानुसार मेळघाटसारख्या भागांत पदवी घेणाऱ्यांचे प्रमाण ग्रॉस एनरोलमेंट रेशो (जीईआर)पाचच्या आसपासही नाही.कि जो शहर/उच्च जातीय विद्यार्थ्यांत ५० च्या वर आहे. कारण आजही खाजगी संस्थांची शाळा महाविद्यालये आणि शासन प्रणित शाळा महाविद्यालये तसेच ग्रामीण व शहरी भागासाठीच्या उच्च शिक्षण सुविधा यात भौतिक व दर्जात्मक फरक असल्याचे दिसून येते.दिव्यांगांसाठी स्वतंत्र उच्च शिक्षण सुविधा नाहीत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देणाऱ्या शहरी महाविद्यालयात जाऊन शिक्षण घेणे शक्य होत नाही. परिणामी २०१८ च्या शासकीय आकडेवारीनुसार आजच्या उच्च शिक्षण व्यवस्थेत दलितांचे प्रमाण १३.९%, आदिवासींचे प्रमाण ४.९% तर मुस्लिम समाजाचे प्रमाण अवघे ४.७ % आहे. स्त्री-पुरुष प्रमाणातही अशीच तफावत आहे. उच्च शिक्षणातील स्त्रियांचे प्रमाण १६.५ % तर पुरुषांचे प्रमाण २०.९ % आहे. यातही स्त्रियांच्या गळतीचे प्रमाण मोठे आहे. स्त्री शिक्षण विषयक दूषित दृष्टिकोन, विवाहादी उपचारांना व स्त्री भूमिकांना दिले जाणारे प्राधान्य, परंपरागत समजुतींचा पगडा, जुन्या प्रथा परंपरांचा प्रभाव अशा समस्या उच्च शिक्षणातील या असमानतेमागे आहेत.

## ६) समाजाभिमुख शिक्षणाचा अभाव-:

शिक्षण ही मानवी परिवर्तनाचे साधन आणि गुरुकिल्ली असलेली निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. याचे रूपांतर केवळ पदव्या देणाऱ्या कारखान्यांत होता कामा नये. याबद्दल सावध करणाऱ्या सूचना प्रा. जे.पी. नाईक,डॉ.राम ताकवले यांसारख्या शिक्षण तज्ज्ञांनी वेळोवेळी केलेल्या आहेत. असे असतांनाही आज कौशल्ययुक्त शिक्षण बाजूला पडून केवळ परीक्षार्थी निर्मिणारे शिक्षण व मूल्यमापन पद्धती अवलंबली जात असल्याचे कटू वास्तव निदर्शनास येत आहे. नवनिर्मितीला चालना देणाऱ्या ज्ञानाधिष्ठित, विद्यार्थी केंद्रित पद्धतीऐवजी आशयाधिष्ठित शिक्षककेंद्री पद्धतीचाच अवलंब मोठ्या प्रमाणावर केला जात आहे. त्यामुळे शिक्षण- व्यवसाय- रोजगार यातील विसंगती व असूत्रता अनुभवाला आणून देणारी मोठी समस्या उच्च शिक्षणातून उभी ठाकली आहे.कौशल्यांबरोबरच मुल्यांनाही पायदळी तुडविणाऱ्या या शिक्षणामुळे शिक्षण आणि समाजाची ही फारकत झाली आहे.

## ७) ध्येयधोरणे आणि अंमलबजावणीतील विसंगती-:

सर्वांना दर्जेदार शिक्षण देणे, समानता निर्माण करणे, विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनविणे इत्यादी मुद्द्यांचा विचार १९६६ च्या कोठारी आयोगापासूनच केला जात आहे. असे असतानाही उच्च शिक्षणाची गुणवत्ता झपाट्याने खालावत जाऊन वरीलप्रमाणे अनेक समस्या उत्पन्न झालेल्या आहेत.

याचे मुख्य कारण ध्येयधोरणे आणि अंमलबजावणीतील विसंगती किंवा ध्येयधोरणांची सदोष अंमलबजावणी होय. कोठारी आयोगाने सुचविलेल्या जेडीपीच्या सहा टक्के निधीबाबत जसे हे दिसून येते, तसेच ते स्वायत्तता, सशक्तिकरण, सुलभता याबाबत नियामक संस्थांद्वारे केल्या जाणाऱ्या अतिरिक्त नियंत्रणा बाबतही दिसून येते. कृतीपेक्षा कागदाला आणि वृत्ती व विश्वासापेक्षा वर्चस्वाला जेव्हा अवास्तव महत्त्व दिले जाते, तेव्हा दर्जा बासनात गुंडाळून ठेवला जातो. एका बाजूने विद्यार्थी क्षमता,शिक्षक पदांची परिपूर्णता,इमारतींची उपलब्धता याबाबत आग्रही ध्येयधोरणे ठरविणारे शासनच मात्र,यासाठीच्या निधीची कमतरता, कुलगुरूसारख्या सर्वोच्च पद निवडीच्या अधिकाराबाबतचे अविवेकी कायदे करण्याबरोबरच, कंत्राटी किंवा तासिका तत्त्वावरील शिक्षक भरतीला मान्यता देणारे धोरण राबविते; तेव्हा साहजिकच उच्च शिक्षण, उन्नतीचे स्वप्न पूर्ण करण्याऐवजी आचके देऊ लागते.हे थांबवून,नव्याने येऊ घातलेले जुलै २०२० चे 'नवे शैक्षणिक धोरण' खऱ्या अर्थाने क्रांतिकारी करायचे असेल तर, आधी उपरोक्त समस्यांची सोडवणूक होणे गरजेचे आहे.

- **संदर्भ साधने :-**

१) https.//marathivishwakosh.org.

२) https.//Maharashtratimes.com -: May,2017, डॉ.व्ही.बी. गायकवाड - 'भारतीय उच्च शिक्षणासमोरील आव्हाने'

३) https.//www.orforline.org Marathi - 7 Dec.2021-निरंजन साहू

४) https.//Maharashtratimes.com -: Aug.3,2022 प्रा.डॉ. सुधीर गव्हाणे- 'उच्च शिक्षणातील समतेचे आव्हान'

४) https.//Maharashtratimes.com -: Jul.18,2022-श्रीधर लोणी

५) https.//Maharashtratimes.com -: Aug.15,2022- डॉ. भूषण पटवर्धन- 'दर्जेदार शिक्षणाचे आव्हान'

६) उद्योग व शिक्षण क्षेत्रामध्ये समन्वय हवा.–डॉ.राम ताकवले,दै.सकाळ १८ ऑगस्ट २०१९

❖❖❖

# कवी नारायण मुरलीधर गुप्ते यांच्या कवितेचे स्वरूप

**प्रा. डॉ. लालबा चां. दुमटकर**
मराठी विभाग
गो. सी. टोम्पे महाविद्यालय, चांदूरबाजार

## प्रस्तावना

मराठी साहित्यात नव्या कवितेचा प्रारंभ १८८५ पासून झाला. याच काळात केशवसुतांनी आपल्या काव्य लेखनाला प्रारंभ करून मराठी साहित्यात सौंदर्यवाद, स्वच्छंदवाद ही नवी प्रवृत्ती प्रथमत: आपल्या कवितेतून मांडली; म्हणूनच मराठी कवितेच्या क्षेत्रात नवयुग केशवसुतापासून सुरू झाले असे मानले जाते. या सौंदर्यवादाचा ठळक प्रभाव त्यांच्या काही कवितेतून आपणाला जाणवतो. पुढे या काळातील काही महत्त्वाच्या कवींनी केशवसुत विचारसरणी प्रमाण मानून आपल्या कवितेला सुरुवात केली. त्यात कवी रेव्हरंड वा.ना. टिळक, कवी दत्तात्रय, कवी गोविंदाग्रज, कवी एकनाथ रेंदाळकर, बालकवी आणि कवी बी हे महत्त्वाचे कवी आहेत. विशेषत: केशवसुतांच्या सौंदर्यवादाने प्रभावित झालेले हे कवी आहेत. या प्रत्येक कवीचा पिंड वेगवेगळा असला तरी त्यांनी आपल्या कवितेतून केशवसुताप्रमाणेच सामाजिक, सौंदर्यवादी जाणीवा व्यक्त केलेले आपल्याला दिसते आणि म्हणूनच या सर्व कवींना केशवसुत संप्रदायातील कवी म्हणून ओळखले जाते. या संप्रदायातीलच एक महत्त्वाचे कवी म्हणजे कवी नारायण मुरलीधर गुप्ते.

## विषय विवेचन -

कवी नारायण मुरलीधर गुप्ते उर्फ कवी बी हे केशवसुत संप्रदायातील शेवटचे कवी म्हणून ओळखले जातात. यांनी बी या टोपण नावाने कविता लिहिलेल्या आहेत. बी याचा अर्थ भ्रमण किंवा भुंगा असा होतो. यांचा कालखंड 1872 ते 1947 हा आहे. या कालखंडातील त्यांचा एकमेव काव्यसंग्रह म्हणजे 'फुलाची ओंजळ' या नावाने प्रकाशित झाला. केशवसुत संप्रदायातील गुड गुंजन पर कवितेचा प्रवाह समृद्ध करणारे असे महत्त्वाचे कवी म्हणून कवी बी कडे पाहिले जाते. चिंतनशीलता हे कवी बी यांच्या कवितेचे ठळक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. कवी बी यांचे व्यक्तिमत्व हे एक संकुल व्यक्तिमत्त्व होते. याचा अर्थ अनेक परस्परविरोधी घटक असलेले व्यक्तिमत्व म्हणजे संकुल व्यक्तिमत्त्व होय. असे म्हटले जाते की कवी बी यांच्या व्यक्तिमत्त्वांमध्ये ठळकपणे अध्यात्म प्रवृत्ती आहे आणि त्याचबरोबर विज्ञानवादी प्रवृत्ती सुद्धा आहे म्हणजेच एकीकडे विज्ञानवादाचा ते पुरस्कार करतात आणि दुसऱ्या बाजूने अध्यात्मावरही त्यांची विपुल श्रद्धा आहे.

दुसरा महत्त्वाचा ठळक भाग म्हणजे कवी बी यांच्या व्यक्तिमत्वावर संत काव्याचे संस्कार झालेले आहेत आणि त्याचबरोबर अर्वाचीन कवितेविषयी त्यांच्या मनात आदर आहे. एकीकडे ते संत ज्ञानेश्वरांचा गौरव करतात आणि दुसरीकडे जुने जाऊ द्या मरणा लागूनी' असे म्हणणाऱ्या केशवसुतांचेही ते पुरस्कार करतात. एकीकडे त्यांची कविता बहिर्मुख प्रवृत्तीची आहे आणि अंतर्मुखताही त्यांच्या कवितेत असल्याचे पाहायला मिळते. बहिर्मुख कवी हा सामाजिक आशयावर कविता लिहितो, केशवसुतांची 'स्फूर्ती' ही कविता बहिर्मुख कविता आहे. कवी बी यांनी अशा कविताही लिहिल्या आणि अंतर्मुख म्हणजे स्वतःच्याच विचारात मग्न असणे, अशा परस्पर विरोधी घटक असलेल्या कविता त्यांनी लिहिल्या.

नावात काय आहे असे ते स्वतः विचारतात आणि ते स्वतः च इंग्रजीतील 'बी' हे नाव टोपण नाव धारण करतात; तेव्हा असे अनेक परस्पर विरोधी घटक त्यांच्या व्यक्तिमत्वात असल्याचे

आपणाला पाहायला मिळते म्हणून त्यांचे व्यक्तिमत्त्व हे संकुल व्यक्तिमत्त्व आहे असे म्हटले जाते. त्यांनी विविध कविता लिहिल्या त्यामध्ये काव्यविषयक जाणीव असलेल्या कविता याचा उल्लेख करावा लागतो. यामध्ये कवी बी केशवसुतांचे अनुकरण करतात कवीला प्रतिभा शक्तीचे वरदान लाभलेले असते. त्यामुळे कवी हे देवाचे लाडके असतात. अशी कल्पना केशवसुतांनी मांडली. हीच केशवसुतांची भूमिका कवी बी प्रमाण मानतात. कवी बी यांनी काव्य निर्माण करणाऱ्या प्रतिभा शक्तीला देवता कल्पिलेले आहे. काव्य निर्माण करणारी प्रतिभा ही एक देवता आहे. या देवतेची देणगी लाभलेल्या कवीचे मन अंतर्मुख स्वरूपाचे असते. त्यामुळे सामान्य माणसं आणि कवी यांच्यामध्ये प्रवृत्तीच्या दृष्टीने खूप मोठा फरक असतो असे कवी बी ठामपणे सांगतात. कवी बी लोकांना या संसारातील तात्कालिक गोष्टीची कधीही अपेक्षा नसते. त्यांना अपेक्षा असते ती अद्भुताची, त्यांना इच्छा असते ती अलौकिकत्वाची आणि म्हणूनच कवी हा सृष्टीचा प्राण असतो असे कवी बी यांना वाटते. ते आपल्या कवितेत म्हणतात,

"कवीच झालाय सृष्टी
सारी सृष्टीच झाली कवी"

अशाप्रकारे सृष्टी आणि कवी मध्ये एकरूपता निर्माण झाली पाहिजे काव्य म्हणजे काय तर सुंदरता, सौंदर्य होय. या सौंदर्याची दिव्य स्फुरण म्हणजे कविता होय. आणि या दिव्य स्फुरणांना परतत्व स्पर्श लाभलेला असतो. आपल्या लक्षात असेल प्रतिभेची जी पारंपरिक रचना आहे. त्या परंपरेची ही शक्ती आहे. अशा प्रकारची प्रतिभा शक्ती कवींना लाभलेली असते. या प्रतिभा शक्तीलाच त्या देवतेचे वरदान प्रसाद असे म्हटले आहे. कवी बी म्हणतात, जेव्हा कवी काव्य लिहितो त्यावेळी त्या विषयाशी तो तादात्म्य पावलेला असतो. त्या विषयाशी तो तन्मय झालेला असतो किंबहुना मी तू पणाची भावना लपलेली असते म्हणजे काव्य निर्मितीच्या वेळी कवी स्वतःचं अस्तित्व विसरतो. या प्रकारचा जर रसिकांना आनंद मिळवायचा असेल तर रसिकांनीही आपलं मी पण विसरायला हवे. पुढे कवी बी म्हणतात, कविता ही इंद्रियांनी अनुभवण्याची वस्तू नाही तर ती प्राणाने अनुभवाण्याची वस्तू आहे; तेव्हा अशा प्रकारे अनुभव जो रसिक घेईल त्यालाच कवितेचा खरा अनुभव प्राप्त होतो. थोडक्यात ज्या कवीचा काव्य निर्मितीच्या वेळी कवीतेचे स्वरूप असते तशी मनस्थिती निर्माण केल्याशिवाय त्या कवितेचा रसिकाला आनंद मिळणार नाही. अशा प्रकारचा आनंद श्रेष्ठ असतो. त्या आनंदाला जगातल्या कुठल्याही आनंदाची उपमा देता येत नाही. जगातील सगळं सौंदर्य त्या आनंदात आहे; तेव्हा अशा प्रकारचे श्रेष्ठ आनंद प्राप्ती करून घेणारे काव्य निर्मितीचे वरदान ज्या कवींना लाभलेले असते, ते कवी या जगात श्रेष्ठ कवी असतात असे म्हणता येईल. आणि म्हणूनच ते एके ठिकाणी म्हणतात, "कविता म्हणजे पूर्णत्वाचे साधन होय" म्हणजेच कविते शिवाय या जगाला पूर्णत्व प्राप्त होऊ शकत नाही असे कवी बी यांना वाटते, तेव्हा काव्य हे मानवी जीवनाला पूर्णत्व प्राप्त करून देणारे मानवी जीवनातील अपुरे पण न संपवणारे आणि आनंद निर्माण करणारे असे एक महत्त्वाचे साधन आहे. अशा प्रकारचा कवी सर्व समाजात श्रेष्ठ असेल यात काहीही नवल नाही. कवी बी यांनी कवीला समय जाणता असे म्हटलेले आहे. म्हणजेच काळ जाणणारा कवी असतो. या विश्वचक्राच्या किंवा कालचक्राच्या प्रवासाची जाणीव असणारा कवी असतो. पुढे म्हणतात, कवी सामान्य माणसाचे तेजोबल वाढवत असतात. सगळ्या समाजाला मार्गदर्शन करीत असतात असे मार्गदर्शन करण्याचे सामर्थ्य त्यांच्यात असते, पण गंमत अशी ती सर्व कवी असे असतीलच असे नाही तर काही कवीच असे असतात.

## गुढगुंजनत्मक कविता -

मराठी कवितेत केशवसुतानंतर गुडगुंजनात्मक कविता समृद्ध करणारे एक महत्त्वाचे कवी म्हणून कवी बी ओळखले जातात. कवी बी यांच्या कवितेचा गुडगुंजनत्मकता हा मुख्य भाग आहे. याचे उदाहरण म्हणून त्यांची 'चाफा' ही कविता उल्लेखनीय आहे.

"चाफा बोलेना, चाफा चालेना
चाफा खंत केल्या, काही बोलेना"

ही कवी बी यांची गुडगुंजनपर कविता मुळात प्रेम जाणीव व्यक्त करणारी कविता आहे. पण या प्रेमात शारीरिक प्रेम अजिबात नाही. चाफा ही एक रूपकत्मक कविता आहे. प्रियकर चाफा रुसून बसलेला आहे आणि त्याची सखी त्याला आनंदी बनवण्यासाठी सुखी बनवण्यासाठी खुश करते आहे. आपल्या रुसून बसलेल्या प्रियकराला ती विविध प्रलोभने देते, पण तरीही तो त्याची खंत संपत नाही, तेव्हा कवितेच्या शेवटच्या भागात जेव्हा ती प्रेयसी शुद्ध रसापानाची गव्हाही देते. याचा अर्थ यामध्ये शारीरिक संबंध नाही अशी भावना शुद्ध प्रेम मिळाल्यामुळे चाफा फुलून येतो. अशी ही एक रूपकत्मक कविता कवी बी द्वैत आणि अद्वैत अशा भारतीय परंपरेतल्या अध्यात्म वादाचा अर्थ प्राप्त करतात. अद्वैत याचा अर्थ तू आणि मी वेगळे नाही अशी अवस्था निर्माण होणं. एकरूपत्व प्राप्त होणं. याबरोबरच 'वेडगाणे' या नावाची एक कविता बी यांनी लिहिली. तिसरी कविता 'पिंगा' या नावाची आहे. कवी बी यांच्या या कवितामध्ये भारतीय परंपरेतील तत्त्वज्ञान वारंवार आलेले आहे. आणि या तत्त्वज्ञानाला विलक्षण सौंदर्य प्राप्त झालेले आहे; तेव्हा कवी बी यांची जवळपास सर्व कविता ही वैचारिक स्वरूपाची कविता आहे. चिंतनशीलता हे त्यांच्या कवितेचे ठळक वैशिष्ट्य आहे आणि या चिंतनशीलतेला या कवितेत विलक्षण सौंदर्य प्राप्त झालेले आहे.

## सारांश

मराठी कवितेत केशवसुताच्या सौंदर्यवादाबरोबरच गुडगुंजनात्मक तेची रुजवणूक करणारे एक महत्त्वाचे कवी म्हणून कवी 'बी' ओळखले जातात. त्यांची कविता ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाप्रमाणेच संकुल प्रवृत्तीची कविता आहे. त्यांच्या कवितेतून अध्यात्माबरोबरच विज्ञानवादही दिसून येतो, पण कवी बी यांच्या काव्य शैलीचा विचार करताना कवी बी यांच्या काव्यशैलीचा वेगळा विचार करावा लागतो. याचे कारण प्रामुख्याने कवी बी यांची काव्यशैली ही संस्कृतप्रचूर अशी आहे, पण या संस्कृत प्रचुरूतेमुळे त्यांच्या कवितेमध्ये कुठेही अर्थ सौंदर्याची मात्र हानी होत नाही. आपल्या कवितेत कवी बी जे शब्दप्रयोग करतात, त्या शब्दप्रयोगावरून कवी बी यांची चौखंदलवृत्ती आपल्या लक्षात येते. शब्दाची निवड अत्यंत काळजीपूर्वक करतात आणि शब्द पारखून आपल्या कवितेत वापरतात. त्यामुळे कवी बी यांच्या काव्यशैलीमध्ये एक गोडवा आहे असे आपणाला म्हणता येईल.

## संदर्भसूची -

१) निर्मला अनंत कणेकर - 'बी' कवी चरित्र व काव्यचर्चा,
प्रकाशक, ग. ल. ठोकळ, पुणे आवृत्ती 1972
२) प्रा. पंडित म. श्री. - आधुनिक कवितेचे प्रणेते, भाग दुसरा
प्रकाशक, दि.मा. धुमाळ, पुणे, प्रथमावृत्ती 1971
३) गं. दे. खानोलकर - अर्वाचीन मराठी वाङ्मय सेवक,
चतुर्थ खंड, प्रकाशक, गं. दे. खानोलकर, मुंबई, प्रथमावृत्ती 1957
४) आचार्य अत्रे - प्रस्तावना - ' फुलांची ओंजळ' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
सातवी आवृत्ती 1976

❖❖❖

# अण्णा भाऊ साठे यांच्या 'लोकमंत्र्यांचा दौरा' या वगनाट्याचे स्वरूप व समकालीन प्रस्तुतता

**डॉ. कैलास सोनू महाले**
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग
रा. ब. ना. बोरावके कॉलेज, श्रीरामपूर, जि. अहमदनगर (स्वायत्त)

**प्रस्तावना :**

समाजातील अज्ञान, अत्याचार, जाती- धर्म भेद, अंधश्रद्धा या पिढीजात रुढ परंपरांवर लेखणीचा आसूड ओढणारे आणि स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय यांचे समर्थन करणारे साहित्यिक अण्णाभाऊ साठे यांनी बहुविध स्वरुपाची साहित्यनिर्मिती केली. कोणतेही पूर्वसंस्कार नसताना त्यांनी आपली डोळस सामाजिक बांधिलकी जोपासत लेखन केले. अण्णा भाऊ शिकलेले नव्हते; पण त्यांच्यात जिद्द होती, ध्यास होता, अनुभव होता. लाल बावटा कलापथकासाठी त्यांनी हाताळलेला महत्वाचा व प्रभावी लेखन प्रकार म्हणजे वगनाट्य होय. किंबहुना तो अण्णा भाऊंच्या पिंडाला मानवणारा वाङ्मय प्रकार होता. जगण्यासाठी धडपडणाऱ्या उपेक्षित सामान्य माणसाची व्यथा, त्यांचे विचार, त्यांचा व्यावसायिक गुंता व एकूणच त्यांच्या जीवनाची होणारी परवड यांना केंद्रस्थानी ठेऊन त्यांनी आपली वगनाट्य सजवली. खरोखरच अण्णा भाऊ लोककला जगले याची प्रचिती देणारी अनेक वगनाट्य त्यांनी लिहिली आहेत. त्यांच्या तुफान गाजलेल्या वगनाट्यातील महत्वाचे वगनाट्य म्हणजे 'लोकमंत्र्याचा दौरा' होय. तत्कालीन राजकीय परिस्थितीवर परखड भाष्य करणाऱ्या या वगनाट्याचे वास्तव स्वरुप व समकालीन प्रस्तुतता या अनुषंगाने प्रस्तुत शोधनिबंधात भाष्य केले आहे.

## वगनाट्याचे कथासूत्र:

'लोकमंत्र्याचा दौरा' या वगनाट्यात एकूण चार दृश्य असून गृहमंत्री मगरचंद, त्यांचे सेक्रेटरी घोटाळे, गिरणीमालक संघाचे खटारीया, गिरणी कामगार युनियनचा प्रमुख विष्णू, त्याचा भाऊ हनमू तसेच रामू व सदू या मोजक्याच पात्रांच्या माध्यमातून हे वगनाट्य साकार झाले आहे. प्रस्तुत वगनाट्य तत्कालीन सामाजिक, राजकीय स्थितीवर प्रखर भाष्य करते.

गृहमंत्री मगरचंद हे सारखे दौऱ्यावर असल्यामुळे त्यांच्याकडे त्यांच्या भेटीला येणाऱ्या कोणाचीच त्यांच्याशी भेट होत नाही. गिरणीमालक संघाचे खटारीया, गिरणी कामगार युनियनचा प्रमुख विष्णू यांचीही त्यांच्याशी भेट होत नाही. त्यांचा सेक्रेटरी घोटाळे त्यांना सांगतो की, साहेब सतत दौऱ्यावर असल्यामुळे तुम्हीही त्यांच्या भेटीसाठी दौरा काढा. मगरचंद मंत्री ठिकठिकाणी दौरे काढून झाडे लावायला सांगतात. पण जिथे राहायलाच स्वतःची जागा नाही तर झाडे कुठे लावणार? सर्वसामान्य माणसांचं, गिरणी कामगारांचं जगणं कठीण झालेलं असताना आपल्या मागण्यांसाठी संप करणाऱ्या या माणसांना धीर देण्याएवजी तुम्ही त्यांच्यावर गोळ्या का झाडता ? असा खडा सवाल विष्णू मंत्री महोदयांना एका सभेत विचारतो तेव्हा मंत्री म्हणतात की, 'तुम्ही मागण्या मागत नाही तर संप करता, दंगल करता म्हणून शांततेसाठी आम्हाला तसं करावं लागत'. यावर 'तुम्ही अहिंसावादी नसून हिंसावादी आहात असे विष्णू सांगतो. मंत्री महोदय सामान्य जनतेचे मुलभूत प्रश्न बाजूला ठेऊन वृक्षारोपण कार्यक्रमाच्या निमित्ताने दुसऱ्याच गोष्टींकडे लक्ष वेधतात. 'बोल आमुचे लक्षात ठेवा । तुम्ही झाडे लावा । बाग फुलवाया राष्ट्राची । सुखी होईल पिढी पुढची' ।। असे म्हणत प्रचाराचे नाटक करतात. कमी खावून

लोकांनी जास्त काम केलं पाहिजे, अधिक धान्य पिकवले पाहिजे तसेच देशातल्या प्रत्येक माणसाने राम बनले पाहिजे व रामराज्याचे रक्षण केले पाहिजे असा त्यांचा सवाल आहे. यावर आम्हाला शेत न्हाई, गावात राहायला घर न्हाई मग अधिक धान्य कसं पिकवायचं यासाठी आम्हाला जमीन द्या असे हनमू म्हणतो तेव्हा जमीन काय आम्ही खिश्यात घेऊन फिरतो का असे सेक्रेटरी घोटाळे त्याला सांगतात व मंत्री महोदय आपला अधिक धान्य पिकविण्याचा तगादा सुरूच ठेवतात. शेतात, बागेत, परसात, अंगणात, व्हरांड्यात, ग्यालरीत, गच्चीवर धान्य पिकवा असे म्हणत स्वतः मी आणि या देशाचे पंतप्रधान देखील हा प्रयोग करीत असल्याचे अभिमानाने जनतेला सांगतात मंत्री महोदयांची तिसरी घोषणा आहे ती म्हणजे लोकांनी कमी खावे यासाठी ते म्हणतात, 'खा अळू कंदमुळे रताळी। शेंगदाणे केळी। वाचवा तांदूळ या समया। कचरु नका खूप पेंड खाया' ।। असा लोकांना जनावरांप्रमाणे पेंड खाण्याचा प्रामाणिक सल्ला दिला जातो. मंत्री महोदयांच्या अशा वागण्यामुळे एकूणच स्वतःला अहिंसावादी म्हणवून घेणारे हे सरकार, मंत्री कट्टर हिंसावादी असल्याचे विष्णूला पटते. तो महोदयांचे लक्ष आपल्या मूळ प्रश्नांकडे वळविण्याचा प्रयत्न करतो मात्र त्याला योग्य उत्तर मिळत नाही. अखेरीस तर त्याला सरकार विरोधी भूमिका घेतल्याने अटक होते व पोलीस कोठडीत ठेवले जाते. यावर हेच का स्वराज्य असा तो सवाल करतो.

स्वातंत्र्यानंतर या देशात आपल्याच लोकांकडून सामान्य जनतेवर स्वराज्याच्या नावाखाली कसे अन्याय झाले. तत्कालीन सरकारमधील संधिसाधू मंत्री जनतेशी बेईमानाने कसे वागत याचे वास्तव दर्शन या वगनाट्यातून अण्णा भाऊंनी घडविले आहे.

## वगनाट्याची लेखन पार्श्वभूमी :

'लोकमंत्र्याचा दौरा' हे वगनाट्य १९५२ साली महाराष्ट्रात घडलेल्या राजकीय घडामोडींवर आधारित आहे. या काळात महाराष्ट्रात कॉंग्रेसचे सरकार प्रथमच सत्तेवर आले. परंतु असे दिसले की, या सरकारच्या मंत्रिमंडळातील बऱ्याचशा मंत्र्यांना सामान्य जनतेच्या समस्यांचे अजिबात ज्ञान नव्हते. हे मंत्री फक्त संधिसाधू होते. सामान्य जनतेच्या जीवनाशी त्यांचा जराही संपर्क नव्हता. खऱ्या समस्यांऐवजी दुसऱ्याच समस्यांवर हे मंत्री बोलत. त्यांचा कळवळा खोटा व तत्कालीन पक्षीय स्वार्थी धोरणे रेटून पुढे नेणारा होता. अशा या सत्ताधारी मंत्रिमंडळातील दोष स्पष्टपणे या वगनाट्यातून अण्णा भाऊंनी उघड केले आहेत. तत्कालीन राजकीय परिस्थितीवर परखड भाष्य करणारे हे महत्वाचे वगनाट्य आहे. 'तत्कालीन शासनाची अहंता, असे शासन ज्यांच्या आधार विचारावर चालते त्या धनवंत बलिष्टांची शोषकता अशा साऱ्या माणसांशी वैर करणाऱ्या घटकांची पुरेपूर जिरविण्याची पार खडूसपणे जिरविण्याची एक जिगर या वगनाट्य निर्मितीच्या बुडाशी सळसळत होती' अशी अण्णा भाऊंच्या वगनाट्य निर्मितीची एक प्रेरणा सांगितली आहे. 'लोकमंत्र्याचा दौरा' या वगनाट्याची लेखन पार्श्भूमी याच प्रेरक विचारात दडली आहे असे म्हणावयास हरकत नाही.

## वगनाट्याचे लेखन विशेष :

आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही दृष्टीने वगनाट्याची विषयानुरूप चर्चा अण्णा भाऊंनी केली आहे. पुढील मुद्यांच्या आधारे यादृष्टीने सविस्तर विचार करता येईल.

**अ) विषय मांडणी** : प्रस्तुत वगनाट्याचा विषय हा राजकीय असल्याने ग्रामीण व शहरी जीवनवास्तव मध्यवर्ती ठेवून अत्यंत प्रभावी अशी मांडणी अण्णा भाऊंनी केली आहे. सामान्य जनतेच्या विभिन्न मुलभूत प्रश्नांच्या निमित्ताने ग्रामीण ढंगासह हे नाट्य साकारले आहे. सामान्य वाचकांच्या मनाचा ठाव घेण्यासाठी गोष्टीरूपात नाट्य प्रगट करीत या वगनाट्याची मांडणी केल्याने वाचक मुख्य प्रश्नाशी सहज समरस होतात, हे या वगनाट्याचे महत्वाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

**ब) भाषा :** अत्यंत प्रभावी भाषेचा वापर या वगनाट्यात अण्णा भाऊंनी केला आहे. ग्रामीण शहरी अशा पात्रानुरूप भाषेचा वापर केल्याने वाचक पात्रांच्या मनातील विचार, भावना सहज समजून घेतात. साध्या, सोप्या व सामान्य वाचकांना सहज समजेल अशा भाषेमुळे या वगनाट्याचे सौंदर्य वाढले आहे. घरगुती वातावरणातील अनेक शब्द येथे अनुभवायला मिळतात एकूणच अण्णा भाऊंची शब्दकळा दाणेदारपणे येथे प्रकट झाली आहे. लोककलावंत म्हणून अण्णाभाऊंच्या सामान्य जनतेचे मनोरंजन व प्रबोधन करण्याच्या भूमिकेसाठी आवश्यक असलेल्या भाषा शैलीचा प्रत्यय येथे आल्यावाचून राहत नाही.

**क) संवाद :** सवांद हे वगनाट्याचे महत्वाचे वैशिष्ट्ये आहे. मार्मिक सवांदाचा वापर या वगनाट्यात अण्णा भाऊंनी केला आहे. पद्यमय संवादांमुळे या नाट्याला अधिक रंजकता प्राप्त झाली आहे. अनेक ठिकाणी संवादातील विनोद वाचकांचे मनोरंजन करणारा वाटत असला तरी त्यातून समकालीन वास्तव परखडपणे अधोरेखित झाले आहे. संवांदामधून प्रकट होणारी सामान्य माणसांच्या मुलभूत प्रश्नांची लेखकाची जाणीव महत्वाची ठरते. अण्णा भाऊंची वगनाट्य गाजली ती त्यातील संवादामुळे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. जिवंत संवादातून त्यांनी शासन कर्त्यांवर टीका करीत त्यांना वठणीवर आणले व बहुजन समाजाचे प्रबोधनही केले.

## सामाजिक दृष्टिकोण :

डोळस सामाजिक जाणिवेतून अण्णा भाऊंनी आपले सर्व लेखन केले आहे. तत्कालीन सामाजिक स्थितीवर भाष्य करताना सर्व सामान्य जनतेचे मुलभूत प्रश्न त्यांनी आपल्या लेखनातून ऐरणीवर आणले. शोषक आणि शोषित यांच्यातील संघर्ष प्रकट करीत असताना त्यांचा सामाजिक दृष्टिकोन सहज अभिव्यक्त झाला आहे. 'लोकमंत्र्याचा दौरा' हे वगनाट्य देखील याला अपवाद नाही. तत्कालीन राजकीय स्थितीवर भाष्य करीत असताना जनसामान्यांविषयीची सामाजिक बांधिलकी हेच सूत्र त्यांनी केंद्रवर्ती ठेवले आहे असल्याची सहज जाणीव होते. अर्थात नैसर्गिक प्रतिभा लाभलेल्या अण्णा भाऊंच्या साहित्याच्या मुळाशीच जनसामान्य विचारांची बांधिलकी आहे. प्रस्तुत वगनाट्यातून सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांकडे लक्ष वेधत ही बांधिलकी सहज प्रकट केली आहे. तत्कालीन राजकीय स्थितीवर भाष्य करीत जनसामान्यांच्या समस्यां येथे त्यांनी परखडपणे मांडल्या आहेत. घाम गाळणाऱ्या कष्टकरी, कामगार वर्गाचे संसार सुखी व्हावेत ही अण्णा भाऊंची आस होती. त्यांचा हा दृष्टिकोन या वगनाट्यात सहज प्रकट झाला आहे.

## 'लोकमंत्र्यांचा दौरा' या वगनाट्याची समकालीन प्रस्तुतता :

साहित्यातून समाज प्रबोधनाची भूमिका साकार करीत असताना समकालीन समाज जीवनातील विभिन्न प्रश्न अण्णा भाऊंनी वाचकांसमोर उभे केले. मग तत्कालीन राजकीय जीवनातील भयानक वास्तव त्यांच्या नजरेतून कसे सुटणार ? त्या काळात कॉग्रेसचे पहिले मंत्रिमंडळ सत्तेवर आले परंतु जनप्रश्नांचे वास्तव भान नसल्यामुळे भोंगळ, संधिसाधू, दिखाऊ राजकारणामुळे आणि जनतेच्या वर्तमान जीवनाशी कार्यकर्त्यांचा संपर्क नसल्यामुळे मंत्री वारेमाप कसे बोलतात, जनतेशी बेईमानाने कसे वागतात याचे दर्शन या वगनाट्यात घडते. मंत्री मगरचंद मुंबईतील झोपडपट्टीत आणि चाळ जीवनात राहणाऱ्या लोकांच्यासमोर त्यांच्या प्रश्नांचा विचार न करता  झाडे लावा, अहिंसा पाळा, स्वच्छता पाळा अशा प्रकारचे उपदेश करीत फिरतात. मुंबईतील बकालवस्तीचे प्रश्न, बेघरांची समस्या, महागाई, काळाबाजार, भ्रष्टाचार, लाचलुचपत, बेकारी, उपासमार अनारोग्य अशा कुठल्याही प्रश्नांची समज नसणारे मंत्री दोऱ्यामध्ये कसे बोलतात याचे उपहासगर्भ दर्शन येथे घडविले आहे. 'सत्यमेव जयते', 'जय हिंद',

'कमी अन्न खा', 'अधिक धान्य पिकवा', 'शांतता पाळा' अशा प्रकारची मंत्री मगरचंद यांच्या मुखातील मुक्ताफळे निष्प्रभ बनलेल्या मंत्रिमंडळाचे उघडेनागडे दर्शन घडवितात.

गेल्या काही दशकात आपल्या देशातील राजकीय परिस्थिती अनुभवता अण्णा भाऊंच्या 'लोकमंत्र्याचा दौरा' या वगनाट्यातील वास्तवाची प्रखर जाणीव होते. स्वातंत्र्योत्तर कालखंडात प्रसिद्ध झालेल्या या वगनाट्याचा आशय आजच्या राजकीय वास्तवाशी नाते सांगतो. या निमित्ताने अण्णा भाऊंच्या व्यापक दूरदृष्टीची जाणीवही होते. आज अपवाद वगळता कोणतेही सरकार असो या सरकारमधील अनेक मंत्री हे केवळ संधिसाधू वृतीने वागतात. केवळ पक्षीय स्वार्थी धोरणे राबविण्यासाठी सामान्य जनतेच्या प्रश्नांचा त्यांना विसर पडतो. अनेक मंत्री आपल्या दौऱ्यांमध्ये इतके व्यस्त असतात की त्यांना जनतेच्या अडचणींशी काहीच देणेघेणे नसते. आज मंत्र्यांच्या दौऱ्यांवर होणाऱ्या वरेमाप खर्चावर न बोललेले बरे. ज्या जनतेने निवडून दिले त्यांच्याशीच प्रतारणा करीत बेगडी सहानुभूती दाखविणे ही अनेक महाभागांची सवय झाली आहे. अभ्यासू वृत्ती नसल्याने सामान्य जनतेच्या मुलभूत प्रश्नांची जाणीव त्यांना नाही, सरकार विरोधी आवाज उठविल्यास संपकरी किंवा अन्य व्यक्तींना वेठीस धरले जाते. एकूणच लोकशाही मूल्यव्यवस्थेचा विसर सरकारला पडल्याचे वारंवार जाणवत राहते. म्हणूनच की काय सामान्य माणसाचा सरकारी यंत्रणेवर आज विश्वास राहिलेला नाही. केवळ सत्ता हेच समीकरण बनल्याने महाराष्ट्राचे आजचे राजकारण कुठल्या दिशेने वाटचाल करते याची प्रचिती आपणास आली आहे. ही आणि अशा प्रकारची अनेक गंभीर सत्य उलगडण्याचे काम 'लोकमंत्र्याचा दौरा' या वगनाट्याने केले आहे. अर्थात हे सत्य आज सर्व बाबतीत आणि साऱ्याच मंत्र्यांना लागू पडते असे म्हणता येणार नाही. परंतु स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांची 'राजकारणातून समाजकारण' ही संकल्पना आजच्या राजकीय व्यवस्थेतून हद्दपार होत चालल्याचे दिसते. एकूणच स्वातंत्र्योत्तर काळातील राजकीय व सामाजिक वातावरण ज्या पद्धतीने अण्णा भाऊंनी आपणापुढे उभे केले आहे त्या वातावरणाशी आजचे राजकीय वास्तव निश्चीतपणे मिळतेजुळते आहे, याची कुणालाही खात्री पटल्यावाचून राहणार नाही.

## समारोप :

अण्णा भाऊंची अनेक वगनाट्य काळाच्या कसोटीवर टिकणारी आहेत. आपल्या वगनाट्यामध्ये त्यांनी पारंपरिक तमाशापेक्षा मूलत: वेगळेपण जपले व जोपासले. त्या काळातील भौतिक तसेच लोकांसामोरील ज्वलंत प्रश्न वगनाट्यातून मांडले. 'लोकमंत्र्याचा दौरा' हे एक वगनाट्य त्यापैकीच एक आहे. सामान्य माणसांच्या व्यथा, त्यांचा संघर्ष जसा वगनाट्यातून येतो तसाच बंडखोर सामाजिक, राजकीय आशयही येतो, तोच आशय या वगनाट्यात प्रगट झाला आहे. तत्कालीन वास्तवाबरोबरच आजच्या राजकीय परिस्थितीवर भाष्य करणारे अण्णा भाऊंचे हे अत्यंत महत्वाचे वगनाट्य आहे. राजकीय जीवनातील वास्तव या वगनाट्यातून त्यांनी परखडपणे वाचकांसमोर उभे केले आहे. 'अण्णा भाऊंच्या अनेक वगनाट्याचे आवाहन लोकसमूहाला आहे' या गोष्टीचा विचार करता 'लोकमंत्र्याचा दौरा' या वगनाट्यातील वास्तवाची त्या काळातील प्रखरता आणि आजचे राजकीय चित्र याकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे असे वाटते.

## संदर्भ सूची :

१. डांगळे, अर्जुन, व इतर (संपा), 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे निवडक वाङ्मय', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९९८
२. साठे, अण्णा भाऊ, 'लोकमंत्र्याचा दौरा', विद्यार्थी प्रकाशन, पुणे, १९५२
३. गायकवाड, आसाराम, (संपा) 'लोकशाहीर तथा लोकलेखक अण्णा भाऊ साठे', झेप प्रकाशन, नाशिक, १९९६

❖❖❖

# सिमोन द बोव्हुआर : जीवन आणि लेखन

प्रा. डॉ. नंदकुमार ग. भाकरे
कला व वाणिज्य महाविद्यालय,
बोरी अरब, ता. दारव्हा जि. यवतमाळ

सिमोन द बोव्हुआर या एक फ्रेंच लेखिका, तत्त्वज्ञ, राजकीय कार्यकर्ती, आणि स्त्रीवादी चळवळीची अग्रणी म्हणून सर्वांना परिचित आहेत. जगामध्ये त्यांची ओळख प्रामुख्याने सेकंड सेक्स' या पुस्तकाची लेखिका म्हणून आणि जॉ पॉल सार्त्रची जन्मभराची मैत्रीण म्हणून आहे. परंतु यासोबतच त्यांच्या इतर लेखनाकडे दुर्लक्ष झालेले दिसून येते. या प्रबंधलेखनाच्या माध्यमातून सिमोन द बोव्हुआर यांच्या जीवन व साहित्यलेखनाचा संक्षिप्त स्वरूपात आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

सिमोन द बोव्हुआर या एक फ्रेंच लेखिका, तत्त्वज्ञ, राजकीय कार्यकर्ती, आणि स्त्रीवादी चळवळीची अग्रणी म्हणून सर्वांना परिचित आहेत. त्यांचा जन्म १९०८ साली पॅरिस येथील एका मध्यमवर्गीय कॅथालिक कर्मठ कुटुंबात झाला. त्यांच्या शालेय शिक्षणाच्या काळात त्यांच्यावर ख्रिश्चच धर्माचा खूप प्रभाव होता, वयाच्या १२ ते १३ वर्षापर्यंत सिमोन फार देवभोळी होती. परमेश्वर आपला पाठीराखा आहे, त्याच्यावर श्रद्धा ठेवली की आयुष्यात आपल्याला काही अडचणी येणार नाहीत, असा तिला विश्वास वाटत होता. परंतु किशोर वयात पदार्पण करण्याच्याच काळात पहिले महायुद्ध सुरू झाले. कुटुंबावर एकापाठोपाठ एक आपत्ती कोसळू लागल्या. वडील निश्कांचन झाले. आपले आयुष्य सावरण्यासाठी केवळ देवाचा धावा करून उपयोगाचे नाही, त्यासाठी चांगले शिकून लवकरात लवकर स्वत:च्या पायावर उभे राहिले पाहिजे ही जाणीव सिमोनला झाली. शिवाय बायबल मधील विश्व व वास्तवातील जग यात तिला कुठे मेळ दिसेना. तिच्या हे पण लक्षात आले की परमेश्वरावर श्रद्धा असणारे व नसणारे या दोघांच्याही वर्तणुकीत काहीच फरक नसतो. एकूणच धार्मिक शिक्षण आणि ईश्वरी श्रद्धा यांमध्ये तिला अनेक विसंगती दिसू लागल्या. परमेश्वर नेहमी बंधने घालतो, पण काय करा हे मात्र कधीच सांगत नाही. रोज दोन प्रार्थना म्हटल्या की तेवढयावर समाधान मानणारा हा परमेश्वर माणसाकडून काही सकारात्मक कामाची अपेक्षा कशी काय ठेवत नाही असाही तिला प्रश्न पडू लागला. देवभोळेपणा पुरूषांपेक्षा स्त्रियांमध्ये अधिक असतो हे तिला दिसत होते. अशा अनेक प्रश्नांमुळे तिचा धर्म आणि ईश्वर या दोन्ही संकल्पनांवरचा विश्वास उडू लागला. जोपर्यंत ईश्वरांवर अढळ श्रद्धा होती तोपर्यंत तिला फक्त देवाच्या कृपाप्रसादाची आस होती. पण धर्मश्रद्धेला तडा गेल्यानंतर तिचे भौतिक जगातील कुतुहल वाढले. त्यानंतर तिने स्वत:ला नास्तिक म्हणवून घ्यायला सुरूवात केली.

सिमोन ५ ते ६ वर्षाची असताना वाटीमध्ये सुकामेवा घेऊन खात बसली होती. तिला अक्रोड–पिस्ते खाण्यात गुंगलेली पाहून तिची एक आत्या म्हणाली, "सगळया लहान मुलांना पिस्ते आवडतात नाही? यावर सिमोन फटकन म्हणाली,: सगळया लहान मुलांना म्हणू नकोस. सिमोनला आवडतात म्हण." सर्व लहान मुलांना एकाच दृष्टिकोनातून बघणे तिला पटायचे नाही. प्रत्येक लहान मूल हे एक स्वतंत्र व्यक्तिमत्व असते. त्याच्या व्यक्तिविशेषांची मोठयांनी जाण ठेवली पाहिजे असा तिचा आग्रह असे. हाच नियम लागू करता सर्व स्त्रियांना स्त्री म्हणून एकाच मुशीत कोंबायचे, एकाच साच्यात घालून ठाकून ठोकून बसवायचे, जी स्त्री साच्यात बसत नाही तिला समाजप्रवाहातून बाजूला तरी टाकायचे किंवा साच्याबाहेर येणाऱ्या तिच्या अंगाना छाटून तरी टाकायचे या मान्यताप्राप्त सामाजिक दडपशाहीला तिचा विरोध होता.

सिमोन द बोव्हुआर यांनी इतर खाजगी संस्थाबरोबरच मुलींसाठी असलेल्या रोमन कॅथालिक शाळेतील इन्स्टिस्टयूट अॅडेलिन–डेसिरमध्ये शिक्षण घेतले. तिने १९२६ मध्ये सॉरबोन येथे तत्वज्ञानाचा अभ्यास करण्यास

सुरूवात केली. १९२९ मध्ये त्यानी तत्वज्ञानातील कठोर परीक्षा उत्तीर्ण केली ज्यामुळे तिला उच्च अध्यापन पदावर नियुक्ती मिळाली.

महाविद्यालयीन शिखण घेत असताना साहित्य आणि तत्वज्ञान या विषयाची आवड त्यांच्या मनात निर्माण झाली आणि त्यातूनच अस्तित्ववादाचा अभ्यास त्यांनी चालू केला. तत्वज्ञान विषयाचा सखोल अभ्यास करत असताना त्यांची भेट झां–पॉल सार्त्र नावाच्या तरूण विद्यार्थ्यांशी झाली. अस्तित्वावादाच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणाऱ्या सार्त्रचा त्यांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनावर नितांत प्रभाव राहिला. सीमॉन आणि सार्त्र यांच्यामध्ये निर्माण झालेले भावबंध शेवटपर्यंत कायम होते.

## सिमॉनचे लेखन :–

१९३० च्या दशकात सीमॉन यांनी तत्त्वज्ञान आणि साहित्य यांच्या अध्यापनाचे काम केले. परंतु दुसऱ्या महायुद्धाला सुरूवात झाल्यानंतर त्यांना प्राध्यापक पदावरून दूर करण्यात आले. १९४० नंतर त्यांनी साहित्याच्या क्षेत्रात पाय रोवण्यास सुरूवात केली आणि लवकरच त्या प्रथितयश लेखिका म्हणून उदयाला आल्या. त्यांच्या साहित्यप्रकारात कादंबरी, नाटक आणि निबंधलेखन यांचा प्रामुख्याने समावेश होतो. नंतरच्या काळात त्यांनी प्रवासवर्णन आणि आत्मचरित्रपर लेखन करायलाही सुरूवात केली. 'शी केम टू स्टे (१९४३), ऑल मेन आर मोर्टल (१९४६), या कादंबऱ्या, अमेरिका डे बाय डे (१९४८), आणि द लॉग मार्च (१९५७), ही प्रवासपर्णने, मेमरीज ऑफ अ डयूटिफुल डॉटर (१९५८), द प्राईम लाईफ (१९६०), फोर्स ऑफ सर्कमस्टन्स (१९६३), व ऑल सेड अँड डन (१९७२) ही आत्मचरित्रपर पुस्तके ही त्यांची प्रमुख ग्रंथसंपदा आहे. १९४० च्या दशकात त्यांनी नियतकालिकांमध्ये निबंधलेखन आणि संपादन देखिल केले. तयांच्या लेखनाच्या आणि विचारांच्या केंद्रस्थानी मानवी नातेसंबध आणि अस्तित्ववादाची विचारप्रणाली असत्याचे दिसते.

वरील सर्व पुस्तकापेक्षा वेगळे असे १९४९ साली प्रसिद्ध झाले 'द सेकंड सेक्स' हे सीमॉन यांचे सर्वोत्तम पुस्तक आहे. वास्तविक स्त्रियांवर ग्रंथ लिहावा, असे त्यांचे उद्दिष्ट नव्हते, त्यांच्या इतर साहित्यातही त्यांनी उघडपणे स्त्रीवादी भूमिका घेतलेली दिसत नाही. या पुस्तकात मात्र त्यांनी स्त्रियांच्या संदर्भात अस्तित्ववादाचा सिद्धांत मांडला आहे. व्यक्तिचे अस्तित्व हे त्याच्या शरीराबरोबरच मानसिक जाणिवेवर अवलंबून असते. हे अस्तित्ववादाचे मूलभूत गृहीतक आहे. या सिद्धांताच्या आधारे त्यांनी स्त्री–पुरूष यांच्यातील सामाजिक भेद स्पष्ट केला आहे. स्त्रीला मिळणारे दुय्यम स्थान हे नैसर्गिक नसून ज्या प्रकारे तिला वाढवले जाते, तिच्यावर संस्कार केले जातात त्यातून ते निर्माण होते, स्वातंत्र्य, निर्णयक्षमता, तर्कनिष्ठरता, आत्मविश्वास हे पुरूषांचे गुण मानले गेले असल्यामुळे ते गुण स्त्रीमध्ये रूजविले जात नाहीत. पुरूष स्वत:ला आद्यतत्व व स्त्रीला दुय्यम तत्व समजतो. त्यामुळे पुरूष स्त्रीचे शोषण करतो. स्त्री पुरूषांमधील भेदभाव, आपण स्त्री असल्याची सतत जाणीव आणि भोवतालच्या समाजाने पुरूषप्रधानता जोपासणे, संपूर्ण समाजव्यस्थाच पुरूषकेंद्रित असणे या सगळयांत स्त्री समस्यांचे मूळ आहे. स्त्रीला सशक्त व सबला बनवायचे असेल, तर तिच्या मानसिकतेत बदल झाला पाहिजे, स्त्रीत्वाचा तिला अभिमान वाटला पाहिजे, ज्यामुळे ती ताठ मानेने आयुष्याला सामोरी जाऊ शकेल, सीमॉन यांच्या मते वैयक्तिक सुखापेक्षा वैयक्तिक स्वातंत्र्याला, त्यानुसार स्त्रियांच्या सुखापेक्षा स्त्रियांच्या स्वातंत्र्याला महत्त्व आहे. त्यांच्या म्हण्ण्याप्रमाणे स्त्री ही जन्मत नाही, तर ती घडवली जाते. अनेक स्त्रीसुलभ समजल्या जाणाऱ्या कृती निसर्गत: स्त्रीसुलभ नसून सामाजिक संस्कारांनी स्त्रीमध्ये रूजविल्या जातात. स्त्री वु पुरूष यांच्यातील नैसर्गिक फरकांना अवास्तव महत्त्व दिल्यामुळेच त्यांच्या सामाजिक स्तरांमध्ये दरी निर्माण झाली आहे.

यासंदर्भात शोभा पाटील लिहितात,ॅवउमदशे सपइमतंजपवद उवअमउमदजश मध्ये सक्रिय कार्यरत असणारी ही फ्रेंच लेखिका सेकंड सेक्स या पुस्तकात पुरूषप्रधानता व स्त्रीचे गौणत्व यांना तोंड फोडताना दिसते. तिच्या मते, समाजात धर्म, कायदा,शिक्षण, विज्ञान, तत्वज्ञान या सर्वच क्षेत्रामध्ये पुरूषप्रधान व पुरूषकेंद्री विचार

चौकटीने स्त्रीकडे अभाववादी वा न्युनवादी दृष्टिकोनातून पाहिलेले आहे. स्त्री व पुरूष यांमध्ये जे शारीरिक भेद असतात, त्या व्यतिरिक्त सांस्कृतिक भेद चिकटलेले असतात. स्त्री ही शारीरिकदृष्टया दुर्बल, स्वभावाने चंचल, भित्रेपणा, नम्रता, विनय, क्षमा हे गुण जन्मजात घेऊन आलेली असते. हे तिचे स्त्रीत्व तर उलट पुरूष शरीराने समर्थ, पराक्रमी, बुद्धिमान, धीट, रांगडा, अभिमानी असतो. हे त्याचे पुरूषत्व असे स्त्री व पुरूष यांचे ठराविक साचे बनवून, पितृसत्ताकपद्धतीने स्त्रियांवर सामाजिक नियम लादलेले असतात.''

'सेकंड सेक्स' मधील अत्यंत महत्त्वाचा व संपूर्णपणे नवीन असा सिद्धांत म्हणजे पुरूष स्त्रीचे शोषण करतो कारण तो स्वतःला आद्य तत्व; तर स्त्रीला परतत्व, दुय्यम तत्व समजतो. स्वतःपेक्षा 'निराळया' अस्तित्वाचे स्वतःच्या स्वार्थासाठी शोषण करणे ही सिमोनच्या मते मानवाची नैसर्गिक वृत्ती आहे.

पुरूषात रूजवल्या जाणाऱ्या स्वातंत्र्य, निर्णयक्षमता, तर्कनिष्ठता, आत्मविश्वास या गुणांचे सिमोनला कौतुक होते. स्त्रीमध्ये हे गुण रूजवले जात नाहीत व त्यामुळे स्त्री दैनदिन रहाटगाडग्याच्या चक्रात अडकून राहते. याउलट पुरूष मात्र रोजच्या दिनचर्येपेक्षा व शारीरधर्मापेक्षा उदात्त असे काहीतरी भरीव कार्य तडीस नेऊन 'स्व' चे प्रकटीकरण साधतो हा सिमोनच्या 'सेकंड सेक्स' मधील वारंवार प्रतिपादला जाणारा मुद्दा होता. 'सेकंड सेक्स' प्रकाशित झाल्यानंतर स्त्री दास्यविषयीचे तिचे सिद्धांत स्त्रीविषयक भान जागृत होण्यास खूप उपयुक्त ठरले. मुलगा व मुलगी यांना वाढवण्यात केला जाणारा भेदभाव, त्याचे स्त्री व पुरूष या दोघांच्याही मानसिकतेवर होणारे दूरगामी परिणाम, स्त्रीच्या मानसिक दौर्बल्यामागची तिच्यावरील कुसंस्कारांची परंपरा यांचे विस्तृत विश्लेषण सिमोनने केल्यामुळेच स्त्री समस्यांविषयी झोपी गेलेला समाज थप्पड बसून जाग यावी त्याप्रमाणे खडबडून जागा झाला.

द सेकंड सेक्स' या पुस्तकामध्ये सिमोनने स्त्रीचा अगदी कृषिसंस्कृतीच्या उगमापासून ते फ्रेन्च राज्यक्रांतीचा काळ व तेथून पुन्हा आधुनिक काळापर्यंतचा जो राजकीय व सामाजिक इतिहास विस्तृतपणे नोंदला आहे, तो स्थळाच्या मर्यादा ओलांडून जगभरच्या स्त्रियांना लागू पडतो. स्त्रीच्या सामाजिक दर्जाची एवढी सखोल कारणमीमांसा याआधी कोणीही केली नव्हती. सिमोनच्या पुस्तकाचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे तिच्या शारीरिक सौंदर्याला दिले जाणारे अवाजवी महत्त्व, आणि त्याच वेळी तिच्या शारीरिक क्षमतांकडे केले जाणारे दुर्लक्ष, तिच्या बौद्धिक विकासाचा उपहास करून तिची तिच्या लैंगिक देहधर्मात केलेली स्थानबद्धता यांचा सविस्तर ऊहापोह केला जाते. स्त्री व पुरूषांमधील नैसर्गिक फरकांना अवास्तव प्रमाणात भडक करून त्यांच्या मानसिक व शारीरिक क्षमतांमध्ये व पर्यायाने त्यांच्या सामाजिक स्तरांमध्ये जी खोल दरी निर्माण केली गेली आहे, ती निसर्गसुलभ नसून मानवनिर्मित आहे.

सिमोनच्या साहित्याचे ठळकपणे वैचारिक व ललित असे दोन भाग पडतात. तिच्या वैचारिक साहित्यकृतीमधील सेकंड सेक्सने इतिहास घडवला. तिचा तेवढाच महत्त्वाचा परंतु कमी प्रसिद्ध ग्रंथ म्हणजे जीम वसक ह्मण या गंथाचे लेखन सिमोनने स्वतःच्या पन्नाशीत केले तोपर्यंत तिची एक विदुषी व अव्वल दर्जाची साहित्यिक म्हणून प्रतिमा तयार झाली होती. जीम वसक ह्मण हे पुस्तक म्हणजे वृद्धत्व या विषयाचा सामाजिक/आर्थिक/मानसिक अंगानी विश्लेषण करणारा प्रबंधच होता. परंतु त्याचा विषयच समाजाला रूचला नाही. सिमोन म्हणते ''पुरूष जसे म्हातारे होतात, तशाच स्त्रियापण म्हाताऱ्या होत असतात. तरीसुद्धा वार्धक्याच्या समस्येविषयी बोलताना पुरूषांनाच डोळयासमोर ठेवून बोलले जाते याचे कारण देशाच्या कायद्यांमध्ये, सामाजिक, औद्योगिक आचारसंहितांमध्ये फक्त पुरूषांचेच अस्तित्व उमटते. देशाच्या उत्पादन प्रक्रियेमध्ये स्त्रीचा सहभाग कमी असल्याने तिच्या वार्धक्याची कुणी विशष दखल घेत नाही.''

जगाच्या दृष्टीने सिमोन यांची ओळख सेकंड सेक्स' या पुस्तकामुळे असली तरी त्यांच्या मायदेशी मात्र ललित लेखिका, कादंबरीकार म्हणूनच प्रसिद्धी जास्त प्रमाणात आहे. त्यांच्या कथा व कादंबऱ्यांमधून त्यांचा स्त्रीविषयक दृष्टीकोन ठळकपणे प्रतिबिंबित होतो. त्यामुळे त्यांच्या ललित लेखनाचा परिचय करून घेणे आवश्यक ठरते. सिमोन द बोव्हुआर ैम बंउम जव ेजंल ही पहिली कादंबरी ही कादंबरी सिमोन, सार्त्र व ओल्गा यांच्या प्रेमाच्या त्रिकोणावर बेतली आहे. त्यानंतरच्या त्यांच्या गाजलेल्या कादंबऱ्या म्हणजे ।सस उमद ंतम डवतजंसए

गोंकूर्ड ॲवार्ड विजेती डंदकंतपदेए आईच्या शेवटच्या आजाराविषयी लिहिलेली श । अमतल मेंल क्मंजीए तीन दीर्घ कथांचा सग्रह ॅवउंद कमेजतवलमकए लघु कादंबरी ठमंनजपजनस प्ङंहमे व पाच भागात लिहिलेले आत्मचरित्र. सार्त्रच्या मृत्यूनंतर सिमोनने सार्त्रला वाहिलेली साहित्यिक प्रेमांजली । थ्ंतमूमस जव ैतजतम हे शेवटचे व पुस्तक आहे. यामधील ैम बंउम जव ेजंलए ।सस उमद ंतम डवतजंस आणि डंदकंतपदे या कादंबऱ्या त्यांच्या वास्तव जीवनाला अधिक जवळच्या होत्या. त्यातील अनेक व्यक्तींचे त्यांच्या प्रत्यक्ष जीवनात भेटलेल्या व्यक्तींशी साधर्म्य दाखवता येते. ही सिमोनची एकमेव कादंबरी आहे. जिच्यामुळे प्रतिकूल टिकेचे व व्यक्तिगत निंदा—नालस्तीचे आसूड त्यांना सहन करावे लागले नाहीत. मात्र या कादंबरीचे वेगळेपण अनेकांना रूचले नाही.

## निष्कर्ष :

सिमोन यांनी ज्या काळात स्त्रीविषयक लिखाण केले, त्या काळातील स्त्री चळवळ ही प्रामुख्याने स्त्रियांचे अर्थाजनाचे हक्क, स्त्रियांचे राजकीय हक्क यांसाठी काम करत होती. मात्र या समस्यांचे मूळ स्त्रीचे सामाजिक स्थान दुय्यम असण्यात आहे याविषयी फारसा विचार केला गेला नव्हता व या स्वरूपाचे काही लेखन किंवा शोध—साहित्यही निर्माण झाले नव्हते. त्यामुळे सीमॉन यांचे विचार हे स्त्रीवादी चळवळीला एक वेगळी दिशा देणारे ठरले. या अर्थाने त्यांना स्त्रीवादी चळवळीची अग्रणी मानले जाते व त्यांच्या विचारांनी स्त्रीवादी अभ्यासात मोलाची भर घातली गेली.

## संदर्भ :


१) सिमोन द बोव्हुआर, गोखले करूणा (अनुवाद) : 'द सेकंड सेक्स', पद्मगंधा प्रकाशन, पुणे प्र.आ. १ मे २०१०

२) पाटील, शोभा : स्त्रीवादी विचार आणि समीक्षेचा मागोवा, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्र.आ. २००७

३) https://marathivishwakosh.org/49105/


❖❖❖

# तुकडोजी महाराजांचे शिक्षणविषयक विचार

**प्रा. डॉ. सी. डी. पाखरे**
महात्मा फुले महाविद्यालय, वरूड

वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे स्वयंप्रज्ञ तत्त्वज्ञ, संत, कवी व आपल्या मानवतावादी चिंतन व कृतीव्दारे समाजात नवनिर्माणाची व समाज परिवर्तनाची चेतना जागविणारे महान जननायक होते. त्यांचा 'ग्रामगीता' हा प्रबंध काव्यग्रंथ १९५५ साली एकाच वेळी १००० गावातून समारंभपूर्वक प्रकाशित करण्यात आला आहे. ग्रामीण व नगरवासियांचा शैक्षणिक, सामाजिक, राजकीय व आर्थिक संदर्भात तसेच शैक्षणिक, धार्मिक व मानवतावादी त्यांचा चिंतनामुळे युगग्रंथ ठरलेला एक महान चिंतन ग्रंथ होय. राष्ट्रसंताचे आयुष्यभराचे समाज चिंतन अर्करुपाने या ग्रंथात संकलित झाल्याचे दिसून येते.

प्रस्तुत शोधनिबंधात राष्ट्रसंताच्या ग्रामगीतेतील 'जीवन शिक्षण' या एकोणविसाव्या अध्यायातून त्यांनी जे शिक्षण विषयक चिंतन मांडले आहे त्याचा आढावा घ्यावयाचा आहे. असे करीत असताना त्यापूर्वीची गुरुदेव रविंद्रनाथ टागोर, म. गांधी, स्वामी विवेकानंद, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचीही तत्ससंबंधी थोडक्यात मते जाणून घेणे महत्त्वाचे ठरले.

शिक्षणाचा विचार केल्यास भारतातील नालंदा विद्यापीठामध्ये अत्यंत समृध्द व उच्चदर्जाची व्यवस्था अस्तित्त्वात होती असे आपणास दिसून येते. परंतु काळानुसार मानवी गरजा या बदलत गेल्या. राहणीमान, शिक्षणाची ध्येय आणि उद्दिष्ट्ये बदलत गेली. त्यानुसार शिक्षण पध्दतीतही बदल झाले. आणि पुढे आधुनिक काळातील शिक्षण पध्दतीपर्यंत येता येता मानवी जीवन व त्याचा सर्वांगीण विकास यासंर्दभात शिक्षणात मूळ गाभाच बदलून गेल्याचे दिसून येते. ''सर्वात दुर्दैवाची व आत्मघातकी बाब अशी की स्वातंत्र्यप्राप्ती नंतरही आम्ही इंग्रजी शिक्षणपध्दतीचेच लांगूलचालन केले व पर्यायाने इंग्रजांना अपेक्षित असलेल्याच भारतीय समाजाची निर्मिती होत राहिली. आजचे सामाजिक वास्त्त्व व शिक्षणाची अवस्था तसेच शिक्षणाची फलश्रृती पाहिल्यास ती भयावह वाटते ते यामुळेच.[१]

शांतिनिकेतनची स्थापना करणारे रविंद्रनाथ टागोर यांचा शाळेबाबतचा अनुभव चांगला नव्हता. त्याचे मते शालेय शिक्षण हे मुलांच्या व्यक्तिमत्त्वाला विचारात न घेता केवळ शिस्त लावण्याचा प्रकार आहे. शाळा मुलाला देवाने निर्मिलेल्या सुंदर जगापासून बळपूर्वक दूर नेते. ''रविंद्रनाथांनी बालकांच्या मनाचा, त्याच्या नैसर्गिक उर्मी–आवेगांचा बारकाईने विचार केला होता. त्यांचे मते आपण मुलाला भूगोल शिकविण्यासाठी त्याला जमिनीपासून तोडतो, व्याकरण शिकविण्यासाठी त्याला त्याच्या भाषेपासून तोडतो, त्याच्या महाकाव्य जाणण्याच्या भुकेला आम्ही ऐतिहासिक घटना व तारखांच्या जंजाळाने मारतो. त्याचा परिणाम म्हणजे मुलगा सर्व शिक्षण सहन करता करता शांत होत जातो.''[२]

स्वामी विवेकानंदाच्या मते शिक्षण म्हणजे माणूस घडविणे होय. त्यांचे संपूर्ण चिंतन वेदांत तत्त्वज्ञानावर अवलंबून आहे. त्यांच्या मते मानवी सत्त्व हे त्याच्या शरीर, बुध्दिबरोबरच त्याच्या आत्म्यात आहे. त्यामुळे त्याच्या आत्म्यात असलेल्या पूर्णत्त्वाचे प्रकटीकरण करणे म्हणजे शिक्षण होय. विवेकानंद प्राचीन गुरुकुल पध्दतीचा पुरस्कार करतात. शिक्षकाने आदर्श असावे, विद्यार्थ्यांचे आदर्श व प्रेरणास्त्रोत असावे. यावर ते भर देतात. शिक्षण हे मातृभाषेतूनच असावे असा आग्रह ते धरतात. परंतु त्याच वेळी पाश्चिमात्य विज्ञान व तंत्रज्ञानही समजून घेण्यासाठी इंग्रजी शिकलेच पाहिजे, यावरही ते भर देतात.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्ण मेनन हे तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातील एक महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व होय. ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या भेटीस गुरुकुंजात येवून गेल्याचा इतिहास मिळतो. औद्योगिक क्षेत्राच्या प्रगतीसाठी तांत्रिक व वैज्ञानिक शिक्षण घेतलेल्या अभियंत्याची गरज आहे. ''अशा व्यावहारिक अभ्यासक्रमात प्रशिक्षण घेतलेली माणसे शेती आणि औद्योगिक क्षेत्रातील उत्पादन क्षमतेत वाढ करतात. त्यांना सहज व लवकर रोजगार मिळण्यास मदत होते. उपजिविका प्राप्त विद्यार्थ्यांना मदत करणे हे शिक्षणाच्या कार्यापैकी एक कार्य आहे.''[३]

महात्मा ज्योतिराव फुल्यांनी — विद्येशिवाय कसल्याही प्रकारची प्रगती शक्य नाही हे अचूक ओळखून पुणे आणि परिसरात तळागाळातील शूद्र–अतिशूद्रासाठी शाळा उघडल्या. स्त्री शिक्षणाचे कार्याने त्यांनी सुरुवात करुन भारतात क्रांतीकार्याची सुरुवात केली. म. फुले म्हणजे पुरुषापेक्षा स्त्रियांना शिक्षणात अग्रक्रम दिला पाहिजे हे सांगणारा पहिला भारतीय द्रष्टा होय. पुण्यातील भिडेंच्या वाडयात १ जानेवारी १८४८ रोजी त्यांनी पहिली मुलींची शाळा उघडली. सावित्रीबाई या शाळेच्या पहिल्या मुख्याध्यापिका झाल्या. शिक्षण हे समाजपरिर्वतनाचे एक अत्यंत प्रभावी असे साधन आहे असे सांगून महात्मा फुले यांनी सावित्रीबाई यांच्या सहकार्याने केवळ शाळाच सुरु केल्या नाहीत तर त्या शाळांसाठी योग्य असा अभ्यासक्रमही सुरु केला.

म. गांधीनी १९३७ मध्ये भारतात राबविल्या जाणाऱ्या निरर्थक शिक्षण पध्दतीवर हल्ला चढविला. ही शिक्षणपध्दती ग्रामीण जनतेमध्ये भेदभाव निर्माण करणारी, त्या दीन, लाचार व दूर्बळ करणारी व हळूहळू त्यांना दारिद्रय, बेरोजगारी व नैराश्यात ढकलणारी आहे. त्याऐवजी त्यांनी 'नईतालिम' वर लक्ष केंद्रित केले. ते म्हणत, मी हृदयाच्या शिक्षणाला म्हणजे चरित्र्याच्या विकासाला नेहमीच प्रथम स्थान देत आलो आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या पद्दलित समाज बांधवांना 'शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा' असा संदेश दिला. पुढे त्यासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. कर्मवीर शिंदे, वीर सावरकर या सर्वांनी दलित वर्गाच्या मुलांना हिंदू मुलांबरोबर शाळेत बसण्यासाठीच अधिकार प्राप्त होण्यासाठी आयुष्यभर संघर्ष केला.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या शिक्षण विषयक विचारांचा अभ्यास करताना ते ३–४ था वर्ग शिक्षण घेतलेल्या अल्पशिक्षित व्यक्ति असले तरी जिज्ञासापूर्वक केलेले ज्ञानार्जन व स्वानुभवाच्या बळावर तसेच अनौपचारिक शिक्षणाच्या आधारावर एका सामान्य व्यक्तिला किती ज्ञानात्मक उंचीवर पोचता येते व किती लोकमान्यता प्राप्त करता येवू शकते याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे राष्ट्रसंत तुकडोजी होत. या देशातील खेडी स्वयंपूर्ण बनवून युवकांचा शहराकडे जाणारा लोंढा थांबविण्यासाठी खेडयातील लोकांच्या गरजा खेडयातच पूर्ण करणे त्यासाठी राष्ट्रसंतानी ग्रामगीतेत अत्यंत सोप्या, सरळ, ओघवत्या भाषेत सांगितले आहे. ग्रामगीतेतील राष्ट्रसंताच्या चिंतनाचा विचार केला तर ते त्यांच्या आतापर्यंतच्या ज्ञानाचे संपूर्ण फलित म्हणावे लागेल. म्हणून ग्रामगीतेच्या प्रत्येक अध्यायाचा शेवट करताना ते लिहितात, 'इति श्री ग्रामगीता ग्रंथ। गुरु–शास्त्र–स्वानुभव संमत।'

शिक्षणाच्या संदर्भात मुलामुलींचे वय कमी–अधिक असले तरी, 'हे जे नियम मुलांसाठी। तोच मुलींकरिता रहाटी। (अध्याय–२, ओवी. ९४) अशा स्त्री–पुरुष समानतेच्या सूत्राचा विचार मांडतात. शिक्षणासाठी ते भारतीय परंपरेतील आश्रम धर्माचा आधार घेतात. परंतु कालमानाप्रमाणे ते आजच्या युगात (तैसे आज करिता आश्रम। कठीण जाईल गावासि।।) गावाकरिता शक्य होणार नाही हेही मान्य करतात.'

शिक्षणाचा विचार करताना राष्ट्रसंत जीवनातील मूलभूत मूल्यव्यवस्थेचा व उत्तम संस्काराचा आधार घेतात. उच्च शिक्षण हे शहरातच घेतले पाहिजे. ही बाब ते नाकारुन ते म्हणतात. ''दिखाऊ कपडे कोरडी ऐट। नोकरपेशी थाटमाट।''हे शिखणाचे नव्हे उद्दीष्ट। ध्यानी घ्यावे नीट हे आधी।।अ.१९, ओ.५

शिक्षणाची जीवनामध्ये महत्त्वाची भूमिका (शिक्षणाची जीवनाचे काम। दोन्हींची सांगड व्हावी उत्तम) असते यावर राष्ट्रसंत भर देतात.

'नुसते नको उच्च शिक्षण। हे तो गेले मागील युगी लपोन'।

आता व्हावा कष्टिक, बलवान। सुपुत्र भारताचा।। अ.१९,

'मुलात एखादा तरी असावा गुण। ज्याने पोट भरेल त्यात निपुण'।

न ये संसारामाजी अडचण। कोणत्याही परी।। अ.१९,

अशा रितीने शिक्षणाने विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबीत्त्व यावं यावर राष्ट्रसंत भर देतात. मुला–मुलींना पोहता आलं तर तो दुसऱ्याचे जीव पाण्यातून वाचवू शकेल, गावात भोजनाच्या कार्यप्रसंगी त्याला स्वयंपाक करता यायला पाहिजे, त्याला पंगती वाढता यायला पाहिजे, घरचे पाणी भरता यायला पाहिजे अशा व्यावहारिक लहान–लहान बाबींवर ते लक्ष केंद्रित करतात. म्हणून जर 'मुलगी शिकली शाळेमाझारी। परी स्वयंपाक करता न ये घरी।। काय कामाची विद्याचातुरी १।।' असा प्रश्न ते विचारतात आणि जीवन सफल करण्यासाठी त्याला कोणत्या

कला व बलविद्या यायला पाहिजे याचाही ते सविस्तर विचार मांडतात. विद्येच्या अंगी विनम्रता असली पाहिजे. ही एक महत्त्वाची बाबही ते मुख्यत्त्वे मांडतात.

—विद्येअंगी व्हावा विनय। विद्या करी स्वतंत्र, निर्भय।

शिक्षणाने वाढावा निश्चय। जीवन—जय करावया।। अ.१९/ओ.२०

शिस्त व संयमातून चारिऱ्याची उत्तम घडण होवू शकते. या चिंतनाचे प्रतिबिंब राष्ट्रसंताचे साहित्यात अनेक ठिकाणी पडलेले दिसून येते.

—''गावचे सर्वात मुख्य धन। त्याचे संरक्षावे चरित्रधन।''

तेणे गावाचे वाढेल महिमान। चारिऱ्यापरी उज्वल।।अ.१९/ओ.३६

व्यक्ती हा समाजनिष्ठ प्राणी आहे, तो एकटा राहू शकत नाही आणि प्रत्येक व्यक्तीची प्रगती झाल्याशिवाय संपूर्ण समाज पुढे जावू शकणार नाही, म्हणून समाजात सहकार्याच्या भावनेवर ते भर देतात.

''व्हावे परस्परांशी पूरक। हेचि आहे शिक्षणाचे कौतुक।''

व्यक्तिनिष्ठतेने भयाण दु:ख। मानव—जीवन।।अ.१९/ओ.३४

—''सहकार्याची प्रबळ भावना। हेचि शिक्षणाचे मुख्य सूत्र जाणा।

सहकार्यावाचोनि शिक्षणा। महत्त्व नाही''।।अ.१९/ओ.३३

एका विशिष्ट बाल वयातच मुलांचं शिक्षण सुरु झालं पाहिजे अन्यथा त्याचे वय झाल्यावर पुढे त्रास होईल याची नोंद घेऊन गावात अशा शिक्षणासाठी काय सोयी उपलब्ध व्हाव्यात यावरही ते भर देतात.

—बाळपणीच शिक्षण होई। वय झालीया त्रास जाई।

वळविल्याही न वळतो। इंद्रिये त्यांची।।अ.१९/ओ.३८

—म्हणोनि सर्व गावाने मिळून। काढावे शिशुसंगोपन

बाई—बुवास शिक्षण देऊन। नेमावे त्या कार्यासि।।अ.१९/ओ.४८

अशा प्रयत्नातूनच गावात विद्याभूवन, बालोद्यान, शिशुसंगोपणगृह इ.ची निर्मिती करुन मुलांना योग्य वळण देण्यावर ते भर देतात. आई—वडिलांचे अतिरिक्त लाड यांनी मुलं वाया जातात. परंतु अशी मुलं कशी वठणीवर आणायची याचं मानसशास्त्र मात्र अध्यापकांना बरोबर माहित असते हेही ते नोंदविण्यास विसरत नाही.

—आईबापांचा प्रेमळचाळा। पुरवी लहान मुलांचा आळा।

मुलगा होतो ठोंब्या—भोवळा। अतिलाडाने निकामी।।अ.१९/ओ.४६

मुला—मुलींच्या एकत्र शिक्षणाचे काही दुष्परिणामही आहेत. परंतु अशा एकत्र शिक्षणाला राष्ट्रसंताचा विरोध नाही. परंतु समाजाची नैतिकता टिकून राहावी यांवर मात्र ते भर देतात. म्हणून मुलामुलींमध्ये बंधु—भगिनी भाव निर्माण होण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करायला हवे यावर ते भर देताना दिसतात.

शिकवावे बंधुभगिनी—प्रेम। सेवाधर्म शिकवावा''(अ.२/ओ.६३)

—''मुलाचे वय जसजसे वाढे। तोडावे स्त्रियांचे संबंध गाढे।

नेहमी चरित्रवंताचे धडे। द्यावेत तयासि।।आ.२/ओ.६५

—''अश्लिलता कोठेही न दिसावी। दिनचर्या आदर्श असावी।

सकाळी, सायंकाळी द्यावी। बौध्दिके ब्रम्हचर्याची।।अ.२/ओ.६७

परंतु आजच्या आधुनिक युगात राष्ट्रसंताचा हा विचार टिकेल असे वाटत नाही. हुशारकीच्या बाबतीत काही जातीय हुशार असतात, ही बाब मात्र राष्ट्रसंतानी धुडकावून लावली असून त्यामागील कारणांचाही त्यांनी शोध मांडला आहे.

—कोणी म्हणती जातची मूर्ख। मुले कैसी निघालीत चलाख?

काही जाती मुळातचि चोख। हुशार असती शिक्षणी।।अ.१९/ओ.८७

—ही कल्पनाही चूक असे। भेद मुकामाजी नसे

तो परंपरागुणे भासे। वातावरणाच्या योगे।अ.१९/ओ.८७

वातावरणाच्या सातत्यामुळे एखादा गुण परंपरागत वाटतो. बाप न्यायाधिश, काका प्रोफेसर, मामा कीर्तनकार, भोवती सगळं बुध्दिवंतांचं वातावरण, खायला सत्त्वशील अन्न अशातून मुलं साहजिकच हुशार निघतील. परंतु अत्यंत प्रतिकूल परिस्थिती एखाद्या मुलाने प्रगती केली, तर तरी कौतुकास्पद बाब ठरावी. यासंदर्भात राष्ट्रसंत आशावादी आहेत.

—या कोवळया कळयांमाजी। लपले ज्ञानेश्वर, रविंद्र, शिवाजी।

विकसता प्रकटतील समाजी। शेकडो महापुरुष।।अ.१९/ओ.७६

—खेडयात उपजले ज्ञानेश्वरादि। काय उणी त्याची बळबुध्दी।

श्रीकृष्ण आणि महात्मा गांधी। हालवी सूत्रे खेडयातूनि।।अ.१९/ओ.८५

''राष्ट्रसंत संकल्पित व सुदाम सावरकर संपादित ग्रामगीतेच्या जीवन—शिक्षण या अध्यायामधील विचार पाहिले की त्यांनी शिक्षण—समाज संबंधाचा फार खोलवर विचार केला होता हे पटते. अनेक शिक्षण तज्ज्ञांच्या मतांशी तुलना केल्यास राष्ट्रसंताच्या जीवन शिक्षण, मध्येही सर्वच मते व्यक्त झाल्याचे व अधिक प्रायोगिक स्वरुपात शिक्षणाचा विचार झाल्याचे स्पष्ट जाणवते''[४] दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी की, ''खरा भारत खेडयात आहे, या विचारांवर भरपूर चिंतन करुन राष्ट्रसंतांनी शिक्षणाचा महात्माजींच्याही थोडे पुढे जाऊन अभ्यास केला व मांडला. खंत एकच आहे की या मोठया तत्त्वज्ञांचे विचार आपण मात्र आज निव्वळ देव्हाऱ्याची शोभा करुन ठेवले आहेत. विचारकांमध्ये त्यांना तत्त्वज्ञ म्हणून मान्यता देण्याची व त्यांना शिक्षण तज्ज्ञ म्हणून श्रेय देण्याची प्राज्ञा नाही व राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना प्रात:स्मरणीय मानणाऱ्या आम्हा अनुयायांनाही त्याचे अजून काही दु:ख नाही की बोच नाही''.[५]

राष्ट्रसंताचे सर्व साहित्य मूल्याधिष्ठीत आहे. मूल्य संवर्धनामुळे समाजाचे, देशाचे स्वास्थ्य राखले जाते. राष्ट्रसंतानी आपल्या समग्र साहित्यातून तसेच भजन, भाषण, प्रवचनातून मानवी प्रवृत्तीच्या संवर्धनाचा ध्यास घेतला. त्यांचा माणसातील माणूसपण जपण्याचा ध्यास त्याच्या साहित्यातून, चरित्रातून दिसून येतो. ''सर्व साधारण माणसाचे जगणे सफल व्हावे म्हणून ज्यांनी बंड पुकारले त्यात बसवेश्वर, चक्रधर, नामदेव अग्रणी असले तरी त्याच बंडवाल्यांच्या मालिकेतील 'ध्वज तू कळसावरी' या प्रमाणे बंडाचे निशाण राष्ट्रसंत तुकडोजी होत''.[६]

## संदर्भ सूची :

१) प्रा. अनिल प्रांजळे, 'पददलित जनमंच — राष्ट्रसंत स्मृती संमेलन विशेषांक—२०११, संपा. डॉ. सुभाष सावरकर, पृ.११७

२) तत्रैव, पृ.१८

३) तत्रैव, पृ.१९

४) प्रा. अनिल प्रांजळे, 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व्यक्ती आणि वाड्मय' संपा. अक्षय कुमार काळे, पृ.२१६

५) तत्रैव, पृ.२२१—२२२

❖❖❖

# लेखकाच्या अभ्यासगुणाची सिद्धता

**प्रा. डॉ. मार्तंड कुलकर्णी**
मराठी विभागप्रमुख, सरस्वती विद्यामंदिर कला महाविद्यालय,
किनवट, जि. नांदेड. मो. ९४२१७५८०३२

प्रा. डॉ. सुभाष बागल यांचा 'संत तुकारांचे अभंग : एक चिंतन' हा अलीकडे प्रसिद्ध झालेला ग्रंथ वाचला आणि मनात सहज चलबिचल झाली. पूर्वसूरींची संत तुकारामांवरील जे आत्तापर्यंत ग्रंथ वाचले ती गं्रथ नजरेसमोरून गेली. तसे तुकारामांना अगदी प्राथमिक, माध्यमिक वर्गापासून ते आजतागायत कोणत्या ना कोणत्या रूपात वाचत आलेलो आहे, ऐकत आलेलो आहे. आताही ही प्रक्रिया चालू आहे. मात्र, या ग्रंथाचे वेगळेपण लगेच लक्षात आल्यानंतर त्यावर लिहावे अशा मानसिक स्थितीत येऊन लिहिते झालो. एकूण एकोणावीस प्रकरणांमधून हा ग्रंथ येतो. हा ग्रंथ पारंपरिक पद्धतीने व तेच ते विषय घेऊन अवतरत नाही तर; या ग्रंथामध्ये आलेली मांडणी नाविन्यपूर्ण पद्धतीची असल्याने हे चिंतन लक्षणीय झाल्याचे लक्षात आले.

पहिल्या प्रकरणात 'अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची' मधून संत मंडळातील सर्व संतांनी अभंगरचना केली. आपल्या जीवनानुभवाला आविष्कारित करण्यासाठी माध्यम म्हणून अभंग हा रचनाप्रकार वापरला. निवृत्तीनाथापासून सुरू झालेली ही अभंग लेखनाची परंपरा निळोबाराय यांच्यापर्यंत येते. या अभंगवाणीचा कळस होण्याचे कार्य संत तुकारामांच्या अभंगवाणीला प्राप्त होते. ते आशय व अभिव्यक्ती या दोनही दृष्टिकोनातून संत तुकारामांना अभंग हा रचनाप्रकार अत्यंत काटेकोरपणे वापरता आला. तो कसा व त्या आशयाभिव्यक्तीचे स्वरूप कसे याची मांडणी पहिल्या प्रकरणातून अभ्यासपूर्ण पद्धतीने उदाहरणासहित येते.

संत तुकाराम आपल्या अभंगरचनेमागील भूमिका स्पष्ट स्वरूपात मांडतात. ही संत मंडळातील आगळीवेगळी आणि दृष्टीस भरणारी गोष्ट आहे. संत तुकाराम आपल्या अभंगरचनेमागील भूमिका मांडताना स्पष्टपणे व निर्भिडपणे मांडतात. आपल्याला अभंगरचना का करावयाची आहे? कोणसाठी करायचे आहे? याचे डोळसपण त्यांच्यात आहे. तुकारामांच्या समाजजीवनाविषयीच्या कळवळयातून निर्माण झालेली ही अभंगवाणी सामाजिक बांधिलकीची विन अधिक घट्ट करते हे लेखकाने म्हटले आहे ते यथार्थ वाटते. तुकारामांची कविता सनातन्यातील दांभिकपणा, कर्मटपणा या विरोधात बोलते. समाजनिंदेच्या त्रासातून तुकारामांच्या अभंगवाणीतील जिवंत सामर्थ्य प्राप्त होते. तुकारामांनी आपले हे अनुभव समाजासमोर अभंगरूपाने मांडले. तुकारामांना अभंगरचना करण्याचा अधिकार नाही म्हणून त्यांना त्रास सहन करावा लागला. सनातन्यांकडून त्यांचा छळ करण्यात आला. हा छळ त्यांना प्रखर विरोध करून सहन करावा लागला. हे दिव्य पार करूनही त्यांनी अठरापगड जातीच्या सुख-दु:खांना मुखर केले. संत तुकाराम दुष्ट प्रवृत्तीवर हल्ला चढवितात आणि सत्प्रवृत्तीचा उदघोष करतात. या सर्व बाबींचा अत्यंत सखोल ऊहापोह या ग्रंथातून येतो.

तुकारामांच्या अभंगरचनेच्या प्रेरणा अनेक आहेत. मात्र श्रेष्ठ दर्जाच्या नेणिवेतून सूचते त्या जाणिवेकडे, जीवनानुभवातून आलेल्या जाणिवेकडे तुकाराम पाठ फिरवीत नाहीत. हाच त्यांच्या अभंगवाणीचा कणा आहे. ही लेखकाने केलेली मांडणी व चिंतन अधिक महत्त्वाचे आहे. तुकाराम

सातत्याने जीवनाभिमुख होऊन आजूबाजूच्या समाजजीवनातील द्वंद्व प्रतिक्रियात्मक स्वरूपता अभंगरूपाने मांडतात आणि समाजापुढे चांगल्या समाजजीवनाचा आदर्श ठेवतात. लेखकाचे हे चिंतन अत्यंत मोलाचे आहे. कारण तुकाराम हे असे संत आहेत की ते समाजापासून दूर जात नाहीत, जाऊ इच्छित नाहीत. मानवी समाजजीवनासंबंधी त्यांच्या मनात प्रेम भावना आहे. मात्र, समाजातील दृष्प्रवृत्ती पाहून त्यांच्या मनात सामान्यजनांविषयी कळवळा निर्माण होतो. ही त्यांच्या संतत्वातील महत्त्वाची गोष्ट आहे. तुकाराम याविषयी पोटतिडकीने, अभिनिवेशाने, सात्विकक्रोधाने बोलतात. म्हणून त्यांची ही अभंगवाणी 'जातीवंत शिक्षकाच्या ठिकाणची कळकळ खऱ्या खुऱ्या पंथोपदेशकाच्या वृत्तीतील अभिनिवेश, साक्षात्कारी प्रेषिताच्या ठिकाणी आढळणाऱ्या प्रबळ विश्वासातून अपरिहार्यपणे प्रगट होते.' तुकारामांच्या संबंधी मांडलेले हे चिंतन तुकारामांच्या अभंगवाणीची नीटसी मांडणी करणारे, वेगळे आगळे आहे.

संत तुकाराम महाराजांच्या गाथेतील अभंगाची अभ्यासासाठी निवड करून प्रा. डॉ. सुभाष बागल यांनी आपले त्याविषयीचे चिंतन मांडले आहे. ते विविधांगाने येते. विविध दृष्टिकोनातून व विविध पैलू घेऊन येते. अभिनव परिप्रेक्ष्यातून प्रभावित करणारे हे मूल्यांकन नव्या समीक्षकांना आवाहन करणारे आहे.

तुकारामांचे काव्य आणि व्यक्तिमत्व हा सातत्याने अभ्यासाचा आणि चिंतनाचा विषय राहत आलेला आहे. तरी संत तुकारामांचे हे काव्य समग्र पद्धतीने आत्मसात झाले असे कोणी म्हणू शकत नाही. कुणी म्हणणारही नाही. कारण तुकाराम हे आकाशाएवढे संत व तेवढेच महान कवी आहेत. त्यांच्यातील एक महान कवी, श्रेष्ठ संत आणि सामान्य माणूस या दृष्टीने लेखकाने या ग्रंथाची केलेली गुंफण अभिनव आणि नाविन्यपूर्ण आहे. संत तुकाराम आधी माणूस होते. उत्तम माणूस होते. नंतर संत झाले. आपल्या संतत्वाचा आणि जीवनानुभवाचा आविष्कार करताना महान कवी म्हणून ते उदयाला आले आहे. लेखकाने अशा पद्धतीने आणि तुकारामांच्या काव्यातील विविध पैलू घेऊन त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील बलस्थाने मोठ्या ताकदीने मांडली आहेत. ही मांडणी तुकारामांच्या काव्यासंबंधीचा अभ्यास उत्तम रितीने असल्याचे द्योतक आहे असे म्हटले पाहिजे.

संत तुकारामांच्या काव्याची बलस्थाने सांगताना शब्दचित्रे, सुभाषिते, दृष्टांत आणि प्रतिमासृष्टी या काव्य घटकाचा केलेला अभ्यास आणि मांडणी अनोखी आहे, नाविन्यपूर्ण आहे. ती तुकारामांच्या काव्याचे श्रेष्ठतम गुणधर्म आणि वेगळेपण अधोरेखित करणारी आहे. नवीन अभ्यासकांसाठी ती दिशादर्शक ठरणारी आहे. शिवाय संत तुकारामांच्या काव्याच्या श्रेष्ठत्वाचा अचूकपणे शोध घेणारी आहे. 'मंगलाचरणाच्या अभंगाची गुणवैशिष्ट्ये' हे प्रकरण तर तुकारामांच्या काव्याची अतिशय उत्तम पद्धतीने मांडणी करणारे आहे. जसे काही संत तुकाराम लेखकाच्या नेमकेपणाने हाती सापडले असे म्हणावे इतपत ही मांडणी वाचकाच्या मनाला भारावून टाकणारी आहे. डॉ. सुभाष बागल यांनी जवळजवळ एकोणावीस प्रकरणातून तुकारामांच्या समग्र गाथेचे आकलन मांडले आहे. स्वतंत्र पद्धतीने चिंतन करून स्वत:ची स्वतंत्र अशी मांडणी करून लेखकाने संत तुकारामांच्या काव्यसृष्टीला नाविन्यपूर्ण पद्धतीने वाचकांच्या समोर आणले आहे. ही मांडणी, हे चिंतन त्यांच्या लेखनावर मोहर उमटविणारे ठरले आहे.

प्रास्ताविकाचे 'अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची' या प्रकरणापासून संत तुकारामांची अभंग रचनेमागील भूमिका, अभंग रचनेमागील प्रेरणा, मंगलाचरनाचे अभंग, किर्तन भक्ती, विराण्या, गौळणी, नाट, भूपाळी, शाक्तपर अभंग, आरती, हरिपाठ अशा विविध अंगाने येणारी ही अविष्कार रूपे लक्षात घेऊन लेखकाने आपले भाष्य केले आहे. त्यातील संत तुकारामांचा भक्तीभाव, भक्तीतील उत्कटता, ईश्वराधना, समाज प्रबोधन याची केलेली चर्चा त्यामधील वेगळेपण सिद्ध करणारी आहे. एकूणच संत तुकारामांच्या गाथेचा

समग्र आकलानाविष्कार आणि त्यातील लेखकांचे नम्र विश्लेषक आणि चिंतकाची भूमिका समर्पितपणाची आहे. तुकारामांच्या अभंगांची भाषा आणि अर्थ अर्थात आशयाभिव्यक्ती गुणविशेषांनी आतप्रोत आहे. हे चिंतनात्मक पातळीवरून सांगताना लेखकाने आपली स्वतंत्रपणे असलेल्या मतांची मांडणी ठामपणे केली आहे. तीही मला अतिशय महत्त्वपूर्ण वाटते.

संत तुकाराम आणि त्यांचे काव्य हे विभाज्य आहे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा तो अविभाज्य भाग व अंग आहे.

तुकाराम त्यांच्या अभंगातून विविधांगाने अविष्कारित होतात. त्यातून तुकारामांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूंचे दर्शन होते. त्यांचे व्यक्तिमत्त्व त्यांच्या अभंगातील शब्दाशब्दांतून प्रकटते. त्या पैलूचे कोणकोणते घटक आहेत. त्याची ग्रंथातून येणारे मांडणी तुकारामांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणारी आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वेगळे प्रगटीकरण करणारी आहे. तुकारामांच्या व्यक्तिमत्त्वाचे घटक त्यांच्या काव्याला रूप देण्यासाठी कारणीभूत ठरणारे आहेत आणि ठरले आहेत. याचीही मांडणी अत्यंत अनोखी आहे. ती तुकारामांच्या व्यक्तिमत्त्वाला उलगडून तर दाखवीतेच सोबत त्यांच्या काव्य घटकांनाही उलगडून दाखविताना त्यांच्यातील एकरूपत्वाचे दर्शन घडविणारी आहे. तुकारामांचे व्यक्तिमत्व समजून घ्यायला जशी ती उपयुक्त ठरते तशी ती त्यांच्या काव्यघटकांना, त्या काव्यघटकातील आशयाभिव्यक्तीच्या विविध कंगोऱ्यांना समजून घेण्यासाठीही उपयुक्त ठरणारी आहे. नवीन अभ्यासकांना दिशादर्शक ठरणारी आहे असे म्हणायला पुष्कळ वाव आहे, नव्हे असे म्हणणेच अधिक औचित्यपूर्ण आणि न्याय होणारे आहे. त्यामधून डॉ. बागल यांच्या कार्यक्षमतेचा, अभ्यासाचा, चिंतनाच्या खोलीचा, आकलनाचा अंदाज करता येतो.

संत तुकाराम हे अत्यंत संवेदनशील मनाचे, तेवढ्याच संवेदनक्षमतेने, हळुवारपणे, कोवळीकतेने ते समाज जीवनातील अनुभव घेतात. त्या अनुभवांना स्वत:मध्ये जीरवितात, मुरवितात. त्या अनुभवातील 'स्व' ला बाजूला सारून मानवी मनाचा आविष्कार करतात. 'स्व' शिवाय काव्य असणार नाही ही सत्यता असली तरी त्यांच्यातील संतत्व व्यापक जाणीवेच्या पातळीवर जाते आणि समाजाच्या कळवळ्यातून कणखरपणाने अभिव्यक्त होते. तेव्हा ते अविष्कारण तुकारामांचे राहत नाही. तो समाज मनाचा अविष्कार ठरतो. हा भावाविष्कार एकाच वेळी दुहेरीपणाचा असतो. तो त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा घटक असतो. तुकाराम समाज जीवनासंबंधी चिंतन करीत असले अथवा त्यांच्या अभंगातून तत्कालीन समाजाचे दर्शन घडत असले तरी अंतिक भूमिका समाजशास्त्रज्ञांची नव्हे; तशीच ती समाजदर्शकाचीही नाही. त्यांच्या अभंगांना संस्कृतीटीकेचे रूप येत असेल पण तेच त्यांचे अभंग रचनेचे अंतिम लक्ष नाही. तसेच तुकाराम उपदेशाची भाषा बोलत असले तरी तेथेच ते थांबत नाहीत. त्याच्याही पलीकडे जाऊन अधिक काही सुचविण्याचा प्रयत्न त्यांच्या अभंगातून एक सारखा प्रत्यास येत राहतो. लेखकाची ही मांडणी तुकारामांच्या काव्याविष्काराला नेमकेपणाने पकडून पाहणारी आहे. अशी सखोल मांडणी डॉ. बागल यांच्या चिंतनातून येते. त्यातूनही त्यांचे तुकारामांच्या काव्यासंबंधीचे आकलन समजून घेता येते.

संत तुकारामांच्या व्यक्तिमत्वात एक सामान्य माणूस, एक श्रेष्ठ संत आणि महान कवी हे पैलू आहेत. संत तुकाराम हे आधी माणूस आहेत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात एक सामान्य माणूस पण भरलेला आहे. हे सामान्य माणूसपण सतत संघर्षरत राहून संतत्वाच्या पातळीवर जाते. तेव्हा त्यांच्या अभंगातून समाजचिंतन प्रगटते. हे समाजचिंतन सामान्यजणांच्या कळवळ्यांनी भरलेले आहे. म्हणून संत तुकाराम संत असूनही समाज जीवनात वावरणारे, समाजातील बऱ्या वाईट अनुभवांना घेऊन समाजाच्या

भल्यासाठी, कल्याणसाठी उपदेश करतात. त्यांची नाळ सामान्य माणूस, सामान्य समाज आणि लोककल्याण याच्याशी जुळलेली आहे. त्यांनी ती जाणीवपूर्वक जोडून घेतलेली आहे. जोडून ठेवलेली आहे. हेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील, संतत्वातील, विचारातील आणि भूमिकेतील वेगळेपण आहे. म्हणून त्यांची अंत:मुर्खता त्यांच्याशी सीमित राहत नाही ती बहि:र्मुख स्वरूपाचीच आहे. कारण त्यांनी स्वत:ला विसर्जित करून, त्याला समाज जीवनाशी जोडून घेऊन, जीवनानुभवाला अविष्कारित करण्याचा धन्यता मानलेली आहे. म्हणून 'मी' च्या ऐवजी 'आम्ही' या भावनेतून, त्या भूमिकेतून तुकाराम बोलतात. स्वत:ला अविष्कारित करतात. लेखकाने तुकारामांच्या काव्य लेखनाच्या प्रेरणेची काढलेले हे मध्यवर्ती सूत्र त्यांच्या चिंतनाला योग्य दिशा देणारे ठरले आहे. म्हणून डॉ. सुभाष बागल यांनी संत तुकारामांच्या गाथेतील वैविध्यपूर्ण अभंगावर केलेले हे भाष्य, चिंतन लक्षणीय ठरणारे आहे. त्यांनी गाथेतील सर्व अभंगांची अभ्यासासाठी, लेखन करण्यासाठी निवड केली नसली तरी या चिंतनाची मांडणी करण्यासाठी निवडलेल्या अभंगांची संख्या पाहता त्यांच्यातील सचोटी लक्षात आल्याशिवाय राहत नाही. आपले चिंतन मांडण्यासाठी, तुकारामांच्या काव्याची बलस्थाने सांगण्यासाठी, त्यांच्या अभंगांची गुणवैशिष्ट्ये सांगण्यासाठी आणि एकूणच तुकारामांना सर्वांगीण पातळीवर आणून सिद्ध झालेला ग्रंथ लेखकाच्या अभ्यास गुणालाही सिद्धता प्राप्त करून देणारा ठरला आहे. या ग्रंथाचे लेखक, वाचक, अभ्यासक, रसिक, चिंतक, भाषिक, समीक्षक स्वागत करतील असा मला विश्वास वाटतो. संत तुकारामांसंबंधी झालेले हे चिंतन तुकारामांच्या काव्यासंबंधी भविष्यात होणाऱ्या लेखनासाठी दिशादर्शक ठरेल असा सद्भाव व्यक्त करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी मी शुभेच्छा देऊन या ठिकाणी थांबतो.

❖❖❖

# लोकरंगभूमीवरील रामायण-महाभारताचा प्रभाव

**प्रा. डॉ. सौ. वीरा पवन मांडवकर**
सहायक प्राध्यापक
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ
भ्रमणध्वनी ९४०३०१४८८५, इ मेल veeramandavkar18@gmail.com

## गोषवारा

भारतात आदिम काळापासून नाटयाविष्कार प्रचलित आहेत. आनंददायी प्रसंगांत अधिक रंग भरण्याच्या धार्मिक भावनेतून विधिनाट्य आणि लोकनाट्य जन्माला आले, रुजले आणि रुढ झाले. भारताच्या राष्ट्रीय, सांस्कृतिक वैभवाला रामायण आणि महाभारत या दोन महाकाव्यांनी शोभा आणली आहे. लोकरंगभूमीवर रामायण-महाभारत या महाकाव्यांचा प्रभाव पडलेला आहे. रंगभूमीवर रामकथा सादर करण्याची परंपरा प्राचीन आहे. रामलीलानाट्याचे प्रवर्तक कोण आहेत व त्यांनी हे प्रवर्तन केव्हा कुठे केले, हे निश्चित सांगणे कठीण आहे. ब्रजभूमी आणि त्यातही विशेषतः वृंदावन हे रासलीलेचे उद्‌गमस्थान आहे. भक्ती आणि भगवद्भाव अलीकडच्या काळात रासलीलानाट्याचा आधार राहिलेला नाही. म्हणूनच रासलीला सादर करणारे लोकरंगकर्मी प्रेक्षकांचे हरतऱ्हेने मनोरंजन करण्याचा प्रयत्न करतात. तरीही आजही लोकरंगभूमीवर रामायण-महाभारताचा प्रभाव असल्याचे निदर्शनास येते.

## Abstract:

Dramas have been prevalent in India since ancient times. Vidhinathaya and folk dramas were born, rooted and flourished out of the religious spirit of adding more color to happy occasions. The national and cultural glory of India has been adorned by two epics Ramayana and Mahabharata. Folk theater has been influenced by the epics Ramayana and Mahabharata. The tradition of performing RamaKatha on stage is ancient. It is difficult to say exactly who the promoters of Ramlilanatya are and when and where they introduced it. Brajabhumi, and especially Vrindavan, is the origin of Rasalila. Bhakti and Bhagavadbhava have not been the basis of Raslilanatya in recent times. That is why the folk artists who perform Rasalila try to entertain the audience. Even today, the influence of Ramayana-Mahabharata on folk theater can be seen.

## बीजशब्द

लोकरंगभूमी, रामायण, महाभारत, नाट्याविष्कार, महाकाव्य, रामलीला, रासलीला, अभिनय, परंपरा

## प्रस्तावना

भारतात आदिम काळापासून नाट्याविष्कार प्रचलित आहेत. सिंधू संस्कृती, इतिहासपूर्व काल, वेद, ब्राम्हण ग्रंथ, जातक कथा, महाभारत, रामायण, कौटिल्याचे अर्थशास्त्र या ग्रंथात भारतातील नाटयपरंपरेचे उल्लेख विपुल आढळतात. वेदकाळात नाट्य विधी आणि कर्मकांड यांच्याशी जोडलेले असले तरी यथावकाल त्याचे लौकिकीकरण होत गेले. उत्सव, महोत्सवाच्या आनंददायी प्रसंगांत अधिक रंग भरण्याच्या धार्मिक भावनेतून विधिनाट्य आणि लोकनाट्य जन्माला आले, रुजले आणि

रुढ झाले. सामाजिक परंपरा, लोकांचे राहणीमान, प्रदेशाची ओळख आणि धार्मिक वृत्तीचे थेट प्रतिबिंब दिसते ते लोककलेतून. त्यामुळेच दशावतार, लळीत, गोंधळ, तमाशा आदी लोकनाट्यांची पाळेमुळे ही एखाद्या देवतेच्या उपासना विधीमध्ये दडलेली दिसतात. दशावताराचे नाट्य हे कोंकण आणि गोव्यात विशेष प्रचलित होते, असे दर्शविणारे पुरावे प्राचीन मराठी वाङ्मयात आहेत. या लोकनाट्यांची प्रयोगपद्धती आकृतीबंधात्मक नसते. अत्यंत उत्स्फूर्तदायी आणि विलासी, मजेशीर असते. ग्रामीण परंपरेतील हे उपासना नाट्यप्रकार बहुजन समाजाच्या अगदी मनाला भिडणारे असून देवताअर्चना आणि भजन-कीर्तनाच्या अनुषंगाने त्यात नाट्याचे दान सहजरीत्या घडत असते.

## विषय-विवेचन

कमीतकमी दोन हजार वर्षे भारताच्या राष्ट्रीय, सांस्कृतिक वैभवाला रामायण आणि महाभारत या दोन महाकाव्यांनी शोभा आणली आहे. विविध आकृतिबंध असलेल्या साहित्यसंपदेच्या निर्मितीची ही दोन महाकाव्ये मूलस्त्रोत बनली आहेत. संस्कृतमधील काव्याच्या अभिजात आकृतिबंधाचा पहिला व उत्कृष्ट नमुना म्हणजे वाल्मीकिरामायण होय. विविध प्रकारच्या अलंकारांच्या सूचकतेतून अभिव्यक्ती, हे अभिजाततेचे लक्षण आहे. वाल्मिकीरामायण आणि महाभारत यांची तुलना करताना समग्र स्वरूपातील महाभारत हे एका लेखकाची कृती म्हणून जाणवत नाही. लाख श्लोकांच्या या ग्रंथामध्ये त्याच्या मूळ लेखकाचा ग्रंथ सरासरी चतुर्थांश वा पंचमांश आणि बाकीची मागाहून दीर्घकालपर्यंत प्रसंगोपात्त कथानकांची आणि उपदेशांची सैलपणाने पडलेली भर, असे दिसते. चोवीस सहस्त्र श्लोकांचे वाल्मिकीरामायण तसे नाही. हे एका लेखकाने योजनाबद्ध रीतीने सुरेख रचलेले अद्भुतरम्य महाकाव्य म्हणून रसिक वाचकांवर याच्या केंद्रवर्ती रचनेची छाप पाडते. त्यात मागाहून पडलेली भर अल्प आहे. दुय्यम दर्जाच्या घटनांच्या स्वरूपात असलेली, अगदी मर्यादित प्रमाणातली भर कोणती ते लक्षात येते. महाभारताचा गाभा म्हणजे कौरव-पांडवांचे युद्ध होय. शूर-वीर माणसांच्या दोन विरोधी पक्षांचे हे युद्ध होय. रामायणामध्ये एका बाजूला लढणारा सेनापती मानव असून, दुसऱ्या बाजूने लढणारा मुख्य शत्रू राक्षस आहे. भारताच्या पश्चिमेस महाभारत घडले, त्याच्या उलट रामायण भारताच्या पूर्वेस असलेल्या प्राचीन कोसल देशात निर्माण झाले.

## रामायण-महाभारत या महाकाव्यांचा प्रभाव

भारतातील निरनिराळ्या प्रांतांत प्रचलित असलेले लोकरंगभूमीवरील नाट्याविष्कारांचे स्वरूप पाहिले तर असे दिसते की, त्यावर रामायण-महाभारत या महाकाव्यांचा प्रभाव पडलेला आहे. रामायण व महाभारत यांतील कथांचे सादरीकरण या लोकरंगभूमीवर होत असते. अशा सादरीकरणाची परंपरा फार प्राचीन आहे.

लोकरक्षक राम आणि लोकरंजक कृष्ण यांच्या जीवनातील निरनिराळे प्रसंग गीतांत गायले जातात आणि रंगभूमीवर सादर केले जातात. लोकरंगभूमीवरील राम, कृष्णांचे लीलादर्शनाचे प्रयोग केवळ भारतातच प्रचलित नाहीत तर थायलंड, ब्रह्मदेश (म्यानमार), सिंगापूर, जावा, सुमात्रा इ. दक्षिणपूर्व आशियाई देशांतही लोकप्रिय आहेत. भारतात तसेच जगातील निरनिराळ्या देशांत रामकृष्णांची विविध रूपे दिसतात आणि तेथील लोकरंगभूमीवर या कथांतील प्रसंगांचे सादरीकरण आजही होते. यावरून रामायण-महाभारत यांच्या लोकरंगभूमीवरील प्रभावाची कल्पना येते.

## रंगभूमीवर सादर होणारी रामकथा

रंगभूमीवर रामकथा सादर करण्याची परंपरा प्राचीन असल्याचे दिसते. इ. स. पूर्व ५०० पासून त्याचे उल्लेख सापडतात. हरिवंशपुराणात रामायण महाकाव्य रंगभूमीवर सादर केल्यासंबंधीचे विस्तारपूर्वक वर्णन आले आहे. महाकवी भार यांच्या 'प्रतिभा' नामक नाटकात रामजीवनातील घटनांचा समावेश आहे. त्यानंतर ही परंपरा अव्याहत सुरू आहे असे दिसते. लोकधारणेनुसार त्रेतायुगात जेव्हा प्रभू रामचंद्र चौदा वर्षांच्या वनवासासाठी गेले, त्यावेळी अयोध्येतील जनतेने रामाच्या बाल व किशोर अवस्थेतील घटनांचे अभिनयात्मक सादरीकरण करून आपला रामविरह शमविला होता. रामकथा लोककंठांत सुरक्षित होती आणि निरनिराळ्या काळांतील कलाकारांनी तिचे लोकरंगमंचावर सादरीकरण करून सामान्य जनांना भक्तिरसाचा आनंद दिला होता. कृष्णकथेसंबंधीही ब्रजवासीयांनी अशीच प्रवृत्ती व्यक्त केली आहे.

## उत्तर प्रदेशातील रामलीला नाट्य

वर्तमानकालीन प्रचलित रामलीलानाट्याचे प्रवर्तक कोण आहेत व त्यांनी हे प्रवर्तन केव्हा कुठे केले, हे निश्चित सांगणे कठीण आहे. पतंजलीने विष्णूच्या विविध अवतारांचे अभिनयात्मक दर्शन घडविले जात असल्याचा उल्लेख केला आहे. हिमालयाच्या गर्भातून गंगेचा उगम केव्हा झाला, हे सांगणे जितके कठीण तितकेच रामलीला प्रथम केव्हा प्रगटली हे सांगणे कठीण आहे.

'यावत्स्थास्यान्ते गिरयः सरितश्च महीतले ।
तावदामायण कथा लोकेषु प्रचरिण्याति ।।' - वाल्मिकी रामायण

हे वाल्मिकी रामायणातील यासंबंधीचे मत लक्षात घेतले, तर रामलीलानाट्याची परंपरा अनादी आहे असे रामभक्त का मानतात हे लक्षात येते. आज हिंदी भाषिक प्रांतांत ज्या स्वरूपात रामलीलानाट्य प्रचलित आहे तिचे प्रवर्तक गोस्वामी संत तुलसीदास आहेत असे मानले जाते. परंपरेने प्रचलित असलेल्या रामलीलानाट्याचे परिष्करण करून परंपरेचे पुनरुज्जीवन तुलसीदासांनी केले असे म्हणता येते. रामलीलेत मूक अभिनयाला स्थान होते. प्रारंभी रामाच्या मुकुटाचे पूजन करून इतर संबंधित विधींच्या स्वरूपात पूर्वरंगाचे नाट्य सादर करून नंतर रामचरितमानसाच्या पदांच्या आधारे रामकथेचे व उपकथेचे सादरीकरण केले जाते. रामकथेतील अनेक प्रसंग रामलीलेत निरनिराळ्या प्रदेशविशिष्ट शैलीत सादर केले जात असले तरीही त्यांच्या एकूण स्वरूपात साम्य दिसते. एखाद्या मैदानात आयताकार उंच मंच उभारला जातो. त्याच्या पृष्ठभागात पडदा असतो. मंचावर एका आयताकार उंच आसनावर राम लक्ष्मण सीता स्थानापन्न असतात. मंचाच्या मागून कलाकार उचित स्वरूप धारण करून पडद्यापुढे येतात. समोरच्या एका कोपऱ्यात व्यास असतात. रामलीलेचे सूत्रसंचालन तेच करतात. प्रारंभी आणि शेवटी राम-लक्ष्मण आणि सीता यांची पूजा करून आरती होते.

उत्तर प्रदेशात निरनिराळ्या ठिकाणी रामलीलेच्या सादरीकरणात प्रदेशविशिष्ट निराळेपण असते. कथागत पात्रांना मानवीय पातळीवर आणून सर्वसाधारण लोकजीवनात घडणाऱ्या प्रसंगांच्या स्वरूपातच रामकथाप्रसंग सादर केले जातात. रामलीलेचा प्रेक्षकांवरही परिणाम होतो. सीता-वियोगाच्या-वेळी ते रडतात, तर रामराज्यारोहणाचा आनंद साजरा करतात. रावणवध प्रेक्षकांच्या आनंदोत्सवास कारण ठरतो.

अलीकडच्या काळात रामलीलेवर पारशी रंगमंचाचा प्रभाव पडला असून, अनेक रामलीलामंडळे अस्तित्वात आली आहेत. काही लोककलामंडळींनी रामलीला सादर करणे हा व्यवसाय बनविला आहे. विशुद्ध भक्तिभाव क्षीण होऊन नाट्यस्वादाला महत्त्व आले आहे.

## रासलीलानाट्य

लोकरंगभूमीवरील रामलीलेत ज्याप्रमाणे रामचरित्र हा नाट्यविषय असतो, त्याचप्रमाणे रासलीलेत सादरीकरणाचा विषय कृष्णचरित्र असतो. भगवद्भक्ती हीच रासलीलेची प्रेरणा असते. रासलीलेचे प्रयोजन उदात्त असून, भगवद्भक्तीचा प्रसार करणे, पुरुषार्थप्राप्ती, भगवंताचे दर्शन घडवून सात्विक बुद्धी उत्पन करणे या प्रेरणेने रासलीलेचे आयोजन केलेले असते. ब्रजभूमी आणि त्यातही विशेषतः वृंदावन हे रासलीलेचे उद्‌गमस्थान आहे.

रासलीला या शब्दाची व्युत्पत्ती अनेकांनी अनेकप्रकारे सांगितली आहे. भगवान श्रीकृष्ण हे स्वतःच रसस्वरूप असून तेच ब्रह्म आहेत. अशा रसांचा समूह म्हणजे रास. 'रसान। समूहो रासः' यावरून हेच स्पष्ट होते. दोन कृष्णांमध्ये एक गोपी वा दोन गोपीत एक कृष्ण, तालस्वरात नृत्य करतात. या नृत्याला रास म्हणतात. 'रास' शब्द नृत्याच्या मध्यभागातून मोठ्याने आवाज देणे, यासाठीही वापरला जातो. काहींच्या मते रास हा देशी शब्द असून, रासो आणि रासक नावाच्या राजस्थानी प्रयोगात तो सापडतो. वीरोचित लीलांना 'रासो' म्हणतात. भरतमुनींनी नाट्यशास्त्रात जी १० रूपके सांगितली आहेत, त्यात 'रासक' हे उपरूपक आहे. रासकाचेही त्यांनी तालरासक, दंडरासक व मंडलरासक असे भेद सांगितले आहेत. रामलीलानाट्याप्रमाणेच रासशैलीलादेखील प्राचीन परंपरा असल्याचे सांगितले जाते. श्रीमद्भागवतानुसार रासलीलानाट्याच्या प्रवर्तक ब्रजगोपिका असून श्रीकृष्णाच्या मथुरा प्रवासाच्या वेळी ब्रजवासी कृष्णाचे रूप घेऊन त्यांच्या क्रीडा सादर करीत आणि आनंद घेत. जनजीवनातील हीच प्रवृत्ती लोककलावंतांनी विकसित करून त्यातून एका स्वतंत्र रंगमंचीय आविष्काराला जन्म दिला.

## कृष्णलीलानाट्य

मध्ययुगात भारतभर जे भक्तीचे आंदोलन निर्माण झाले त्यात वैष्णव संप्रदायांच्या संतकवींनी कृष्णलीला वर्णन केल्या. रासलीला कुणी प्रवर्तित केली, यासंबंधी मतभेद असले तरी वल्लभाचार्य व निंबार्काचार्य यांच्या अनुयायांनी रासलीलानाट्य विकसित केले यात संदेह नाही. त्याला आजचे परिष्कृत स्वरूप गौरांग महाप्रभू चैतन्यदेव यांनी दिले. कृष्णलीला नाट्याने उत्तर प्रदेश आणि राजस्थान या विशाल भूभागात अनेक प्रदेशांतील लोकरंगभूमी प्रभावीत केली. एवढेच नाही तर अनकिया, नाट, जात्रा, कथकली इ. लोकशैलींवर देखील आपला प्रभाव टाकला.

रासलीलेचे कार्यक्रम प्रामुख्याने मंदिराच्या गाभाऱ्यात वा प्रांगणात केले जातात. रामलीलेत ज्याप्रमाणे रंगमंचाच्या मागे पडदा असतो. तसाच येथेही असतो. मंचावर एका कोपऱ्यात राधा व कृष्ण बसलेले असतात. दुसऱ्या कोपऱ्यात सारंगी, मृदंग, झांज, तानपुरा, हामोनियम इ. वादक असतात. रंगमंचाच्या मागे जवळच वेषभूषेची खोली असते. त्यांना यथोचित वस्त्राभूषणांनी सजविले जाते. राधा-कृष्ण स्थानापन्न होतात. समोरचे प्रेक्षक, नव्हे भक्त, कृष्णाचा जयकार करतात. भक्तिभावाने दर्शन घेतात, चरणस्पर्श करतात. पूर्वी रासलीला सादर करण्यापूर्वी विधी होत असे.

अलीकडच्या काळात नाटकात ज्याप्रमाणे पूर्वरंगाचा लोप झाला तसाच रासलीलेत झाला आहे. काही रासधारी घटस्थापना करून रंगाचा मंगलाचरण म्हणतात व रासलीलेला प्रारंभ करतात.

प्रारंभी आणि शेवटी रामलीलेप्रमाणे आरती होते. प्रारंभी आरतीनंतर गवळणी राधा-कृष्णांना रासमंडळात येण्यासाठी पाचारण करतात. हा संवाद तालासुरात पुनरुक्त होतो. कृष्णाच्या बासरीने नृत्यरासाला सुरुवात होते. नृत्यगीत-संवाद आणि यथोचित अभिनय यांचा रासलीलेत मनोहारी संयोग असतो.

रासनृत्यानंतर कृष्णाच्या जीवनातील विविध प्रसंग अभिनीत केले जातात. त्यात एक विदूषकासारखे 'मनसुखा' नावाचे पात्र असते जे विशिष्ट वेषभूषेने आणि उपहासाने विनोद निर्माण करते व मधूनमधून भक्तप्रेक्षकांना हसविते. रासलीलानाट्यात सुरुवातीपासून शेवटपर्यंत एक सूत्रधार रंगमंचावर असतो. तो कृष्णचरित्रातील विविध प्रसंगांची जोडणी करून एकूण प्रसंगाचे संचलन करतो. रासलीला धर्मश्रद्धेवर अधिष्ठित लोकरंगभूमीवरील प्रयोग तर आहेच त्याशिवाय त्याने लोकानुरंजनही होते. रासलीला सादर करणारे अनेक व्यावसायिक रंगकर्मीही निर्माण झाले आहेत. भक्ती आणि भगवद्भाव अलीकडच्या काळात रासलीलानाट्याचा आधार राहिलेला नाही. म्हणूनच रासलीला सादर करणारे लोकरंगकर्मी प्रेक्षकांचे हरत-हेने मनोरंजन करण्याचा प्रयत्न करतात. रामलीला व रासलीला या दोन्हीही लोकनाट्यप्रयोगांत चित्रपटांच्या गाण्यांच्या चालीवर गाणी म्हटली जातात. इतकेच नाही तर त्यातील नृत्यशैलीचीही नक्कल केली जाते.

एकंदरीत आजही लोकरंगभूमीवर रामायण-महाभारताचा प्रभाव आहे. भारतातच नव्हे तर जगातील अनेक देशांत आजही राम आणि कृष्ण यांच्या लीला आणि हा इतिहास नाट्यरूपांत सादर केला जातो आणि रसिकप्रेक्षक तितक्याच श्रद्धेने आणि आनंदाने त्याचा आस्वाद घेतात.

## निष्कर्ष

1. उत्सव, महोत्सवाच्या आनंददायी प्रसंगांत अधिक रंग भरण्याच्या धार्मिक भावनेतून विधिनाट्य आणि लोकनाट्य जन्माला आले.

2. लोकरंगभूमीवरील राम, कृष्णाच्या लीलादर्शनाचे प्रयोग केवळ भारतातच प्रचलित नाहीत तर थायलंड, ब्रह्मदेश (म्यानमार), सिंगापूर, जावा, सुमात्रा इ. दक्षिणपूर्व आशियाई देशांतही लोकप्रिय आहेत.

3. रासलीलेचे प्रयोजन उदात्त असून, भगवद्भक्तीचा प्रसार करणे, पुरुषार्थप्राप्ती, भगवंताचे दर्शन घडवून सात्त्विक बुद्धी उत्पन करणे या प्रेरणेने रासलीलेचे आयोजन केलेले असते.

## संदर्भग्रंथ

1. बापट वसंत, नाट्यशास्त्र: एक सखोल अभ्यास", पुणे साहित्य परिषद, 2003
2. आचार्य मा. न., भारतीय लोककला आणि नाट्य" वाणी प्रकाशन, 1988
3. आपटे ह. ना., मराठी लोकनाट्य", श्रीमंत भोसले पब्लिकेशन्स, 1994

❖❖❖

## Form IV

(See Rule 8)

**Statement about ownership and other particular about the Journal**

**मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका (MPSP)**

| | | |
|---|---|---|
| 1. Place of Publication | - | **Dr. Bhau Mandavkar Research Centre,** Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401 |
| 2. Periodicity | - | **Annual (January)** |
| 3. Printer's Name | - | **Seva Prakashan**, Vijay Colony, Amravati 444606 (M.S.) |
| 4. Publisher's Name | - | **Dr. Mrs. Veera Mandavkar** |
| Nationality | - | **Indian** |
| Address | - | Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401 |
| 5. Editor's Name | - | **Dr. Pavan Mandavkar** |
| Nationality | - | **Indian** |
| Address | - | Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal |

**We, Dr. Pavan Mandavkar & Dr. Mrs. Veera Mandavkar hereby declare that the particulars given above are true to the best of our knowledge and belief.**





Dr. Y.M. Donde Sarwajanik Shaikshanik Trust's (1974)

**INDIRA MAHAVIDYALAYA**

KALAMB, DIST. YAVATMAL, MAHARASHTRA 445401

☎ 07201-226147, 226129 (Fax)

Web.: www.indiramahavidylaya.com

e mail: imvkalamb@yahoo.co.in

indiram414@sgbau.ac.in

For RJI: researchjournalofindia@gmail.com

For MPSP: marathipradhyapak@gmail.com

Permanently Affiliated to SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI

RECOGNIZED BY UGC UNDER 2 F & 12 B

NAAC RE-ACCREDITED WITH 'A' GRADE

Multi-Faculty College Estd. in 1983





| | | | |
|---|---|---|---|
| **Annual Subscription** | - | **Individual / Institutional** | **₹ 700/-** |
| **Account Details : Bank** | - | **Bank of Maharashtra** | |
| **Branch** | - | **Azad Maidan Road, Yavatmal** | |
| **IFSC code** | - | **MAHB0000047** | |
| **MICR coe** | - | **445014001** | |
| **A/c No.** | - | **60175373000** | |
| **A/C Name** | - | **Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre** | |



**(All rights are reserved with the Publisher & Editorial Board. The opinion expressed are of the authors & the association advisory board, editorial board as well as the peer committee does not hold any responsibility for any of the views expressed. Judiciary matter in Kalamb Court only.)**



p-ISSN 2454-7409

9 772454 740009

e-ISSN 2582-5305

9 772582 530008